
शनिवार
१३
जून २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : २०
अंक : ७१
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत



मेस्सीचा पहिला सामना अल्जेरिया विरुद्ध (पान ७ वर)

## थोडक्यात

### मीनाक्षी नटराजन यांची याचिका कोर्टाने फेटाळली



**दिल्ली:** राज्यसभा निवडणुकीसंदर्भात काँग्रेस नेत्या मीनाक्षी नटराजन यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. राज्यसभा निवडणुकीसाठी दाखल केलेला त्यांचा उमेदवारी अर्ज रिटर्निंग ऑफिसरने (आरओ) रद्द केल्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, न्यायालयाने शुक्रवारी त्यांची याचिका फेटाळून लावत या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं की, निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यानंतर न्यायालयाला अशा प्रकरणांमध्ये हस्तक्षेप करता येत नाही.

### रोहित पवारांचे शेतकऱ्यांसाठी आंदोलन



**पंढरपूर :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार शेतकऱ्यांच्या मागणीसाठी पंढरपूर येथे आंदोलनाला बसले आहेत. शेतकऱ्यांसाठी 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग आंदोलन' पार पडत असून, विविध मान्यवरांनी आंदोलनस्थळी भेट देऊन त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे. रोहित पवार अन्नत्याग आंदोलनाला बसल्यापासून या आंदोलनाला भरघोस पाठींबा मिळण्यास सुरवात झाल्याचे दिसून आले. विविध पक्ष, संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींनी प्रत्यक्ष भेटून विनाअट सरसकट कर्जमाफीसाठी सुरु असलेल्या या अन्नत्याग आंदोलनात जाहीर पाठींबा असल्याचे पत्र दिले आहे. यावेळी रोहित पवारांनी 'विनाअट सरसकट २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी करण्यास सरकारला भाग पाडू, असा विश्वास व्यक्त केला.

### खरात प्रकरणात उज्ज्वल निकम विशेष सरकारी वकील

नवी दिल्ली : नाशिकमधील बहुचर्चित भोंदू खरात प्रकरणात ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती होण्याची शक्यता आहे. यासंदर्भातील प्रशासकीय प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून शुक्रवारी आवश्यक पूर्तता केल्यानंतर शासनाकडून अधिकृत आदेश जारी केला जाऊ शकतो, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. भोंदू खरात प्रकरणाच्या तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेकडे राज्यभराचे लक्ष लागले आहे.

# सर्वात महाभयानक 'एल निनो' समुद्रात सक्रिय?


## देशावर पुन्हा दुष्काळाचे सावट

**नवी दिल्ली: दि.१२ वृत्तसंस्था**

अॅटमॉस्फेरिक अॅडमिनिस्ट्रेशन' या नामांकित संस्थेने एक अत्यंत चिंताजनक आणि महत्त्वपूर्ण अहवाल जारी केला आहे. 'एल निनो' म्हणजे पृथ्वीच्या विषुववृत्ताजवळ असलेल्या प्रशांत महासागराच्या पृष्ठभागावरील पाण्याचे तापमान नैसर्गिक सरासरीपेक्षा कमालीचे गरम होणे. महासागरातील पाण्याचे हे तापमान वाढल्यामुळे संपूर्ण जगभरातील पावसाचे आणि हवेचे चक्र पूर्णपणे विस्कळीत होते, ज्याचा फटका विविध खंडांमधील देशांना बसतो. 'नोआ' या आंतरराष्ट्रीय हवामान संस्थेने वर्तवलेल्या ताज्या अंदाजानुसार, यंदाचा एल निनो हा केवळ सक्रिय झाला नसून, तो उत्तरोत्तर अधिक भयानक रूप धारण करत आहे. चालू वर्षातील शरद ऋतूच्या उत्तरार्धात आणि आगामी हिवाळ्याच्या सुरुवातीला या एल निनोची तीव्रता आपल्या सर्वोच्च पातळीवर पोहोचेल. हा प्रभाव इतका प्रचंड असेल की, वर्ष १९५० पासून आजतागायत ठेवण्यात आलेल्या सर्व ऐतिहासिक हवामानविषयक नोंदींचा अभ्यास केला, तर हा यंदाचा एल निनो आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या आणि विनाशकारी एल निनोच्या घटनांपैकी एक ठरेल, अशी अधिकृत घोषणा संस्थेने केली आहे. प्रशांत महासागरात निर्माण होणाऱ्या या उष्ण प्रवाहामुळे जागतिक स्तरावर मान्सूनची दिशा आणि गती बदलते. जेव्हा विषुववृत्ताजवळील पाणी प्रमाणाबाहेर गरम होते, तेव्हा हवामानाचे पारंपारिक प्रवाह उलटे फिरतात. यामुळे दक्षिण अमेरिकेतील काही देशांमध्ये अतिवृष्टी होऊन महापूर येतो, तर दुसरीकडे आशियाई देश आणि प्रामुख्याने भारतीय उपखंडात मान्सूनचा (पान २ वर)

### महासागरातून उष्ण पाण्याचे लोट पृष्ठभागावर

प्रशांत महासागराच्या तापमानात झालेल्या कमालीच्या वाढीमुळे जागतिक हवामानात वेगाने आणि चिंताजनक बदल होत आहेत. एल निनो सक्रिय झाल्यामुळे महासागराच्या अत्यंत खोल भागातून उष्ण पाण्याचे प्रचंड लोट (प्रवाह) समुद्राच्या पृष्ठभागाकडे वेगाने येतात. खोल समुद्रातील हे उष्ण पाणी वर आल्यामुळे नैसर्गिक हवामानाच्या पारंपारिक रचनेवर अत्यंत प्रतिकूल आणि विपरित परिणाम होतो. याच कारणामुळे संपूर्ण जगभरातील अनेक खंडांमध्ये अतिवृष्टी, चक्रीवादळे आणि तीव्र दुष्काळासारख्या अत्यंत भयानक आणि अनपेक्षित नैसर्गिक आपत्ती ओढवतात.





### ऐतिहासिक नोंदींनुसार धोक्याची घंटा

हवामान शास्त्रज्ञांच्या मते, १९५० नंतर जगात मोजक्याच वेळेस अतिशय तीव्र स्वरूपाचे एल निनो पूर आणि दुष्काळाला कारणीभूत ठरले आहेत. त्या प्रत्येक वेळी जागतिक अर्थव्यवस्थेला आणि मानवी जीवनाला मोठी किंमत मोजावी लागली होती. यंदाच्या या महा-एल निनोच्या इशाऱ्यामुळे जगातील सर्वच प्रमुख देशांना आपापल्या पातळीवर आपत्ती व्यवस्थापन आणि कृषी नियोजनासाठी आतापासूनच सज्ज राहावे लागणार आहे, कारण हिवाळ्याच्या सुरुवातीला हे संकट अधिक गहिरे होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार?

## संजय राऊत यांचे समविचारी पक्षांना एकत्र येण्याचे आवाहन







### बुडत्या बोटीमध्ये ते पाय ठेवणार नाहीत - देवेंद्र फडणवीस

**मुंबई : दि.१२ वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालमध्ये माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षाच्या काँग्रेसमधील संभाव्य विलीनीकरणाची चर्चा रंगलेली असतानाच, महाराष्ट्राच्या राजकारणातही या अनुषंगाने मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे काँग्रेसमध्ये विलीनीकरण होणार असल्याच्या चर्चांनी सध्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली आहे. काँग्रेस पक्षाकडून शरद पवार यांच्या पक्षाला विलीनीकरणाचा अधिकृत प्रस्ताव पाठवण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली होती. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी शुक्रवारी माध्यमांशी (पान २ वर)

### 'शिंदे आणि अजित पवार गट म्हणजे अमित शाह यांच्या कंपन्या'

या पत्रकार परिषदेत संजय राऊत यांनी शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यावर अत्यंत तिखट शब्दांत निशाणा साधला. मूळ काँग्रेस विचारांच्या एकीकरणाच्या विषयाला कोणीही वेगळी दिशा देऊ नये. सद्यस्थितीत राष्ट्रीय पक्ष म्हणून काँग्रेसला बळकट करणे हाच मुख्य अजेंडा आहे, असे सांगत त्यांनी दोन्ही कम्युनिस्ट पक्षांच्या एकत्रीकरणाचाही संदर्भ दिला. महाराष्ट्रातील सत्ताधारी गटांवर टीका करताना ते म्हणाले की, जर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटातील आमदारांना त्यांच्या निर्णयाचा पश्चात्ताप होत असेल, तर त्यांनी खुशाल 'मातोश्री'वर परत यावे. मात्र, शिंदे गट किंवा अजित पवार गट हे स्वायत्त राजकीय पक्ष नसून, त्या केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी चालवलेल्या केवळ 'कंपन्या' आहेत, अशी घणाघाती टीका राऊत यांनी केली.

# लातूरच्या शेतकऱ्याला आता मिळणार थेट स्वत:च्या पसंतीचा बैल!

**लातूर : दि.१२ वृत्तसंस्था**

जिल्ह्यातील एका गरीब शेतकऱ्याला शासकीय मदतीअंतर्गत प्रशासनाकडून देण्यात आलेला बैल आजारी असल्याचे समोर आल्यानंतर राजकीय आणि सामाजिक वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना नवीन सूचना दिल्या आहेत. त्यानुसार, संबंधित शेतकऱ्याला उद्या त्याच्या स्वतःच्या पसंतीनुसार नवीन आणि सुदृढ बैल खरेदी करून देण्यात येणार आहे. मात्र, या सर्व प्रकरणावरून आता विरोधकांनी सरकारला धारेवर धरण्यास सुरुवात केली आहे.

लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील बोंबळी गावचे रहिवासी असलेले शेतकरी काशिनाथ गायकवाड यांच्यावर काही दिवसांपूर्वी निसर्गाचा कोप झाला होता. वीज कोसळल्यामुळे त्यांचा एक शेतीउपयोगी बैल मृत्युमुखी पडला होता. ऐन पेरणीच्या हंगामात एक बैल दगावल्यामुळे गायकवाड यांच्यासमोर मोठे संकट उभे राहिले. आर्थिक चणचणीमुळे दुसरा बैल खरेदी करणे अशक्य असल्याने, शेतीचा हंगाम वाया (पान २ वर)



### नव्या सुदृढ बैलाची खरेदी होणार

मुख्यमंत्र्यांनी या संवेदनशील विषयाची पुनश्च गंभीर नोंद घेत लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने कडक निर्देश दिले आहेत. त्यानुसार, संबंधित शेतकऱ्याला कोणत्याही प्रकारचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार नाही, याची काळजी प्रशासनाला घ्यावी लागणार आहे. तसेच, उद्याच त्या शेतकऱ्याला त्याच्या स्वतःच्या पसंतीनुसार एक नवीन आणि पूर्णपणे सुदृढ बैल सरकारी खर्चाने खरेदी करून देण्यात येणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या या तातडीच्या आदेशामुळे जिल्हा प्रशासनाने नव्या बैलाच्या खरेदीसाठी वेगाने हालचाली सुरू केल्या असून, शेतकऱ्याला यामुळे मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

### सरकारच्या नियतीतच खोट- रोहित पवार

याच मुद्द्याचा धागा पकडत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियाद्वारे राज्य सरकारवर कडाडून टीका केली आहे. रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले, केवळ विरोधक आणि प्रसारमाध्यमांच्या दबावामुळे लातूर जिल्ह्यातील त्या पीडित शेतकऱ्याला नुकसानभरपाई म्हणून दिलेला बैल आजारी निघाला. आज या सरकारच्या एकूणच शेतकरी कर्जमाफीची अवस्थाही यापेक्षा वेगळी नाही. द्यायची म्हणून केवळ नावापुरती जाहीर केलेल्या कर्जमाफीमध्ये सरकारने अटी आणि शर्तींचा डोंगर उभा केला आहे. ही कर्जमाफी बहुतांश शेतकऱ्यांना मिळूच नये, याचीच काळजी सरकारने अधिक घेतल्याचे दिसते.

# बीएसएफ- बांग्लादेश बॉर्डर गार्ड आमनेसामने!



**नवी दिल्ली/ढाका: दि.१२ वृत्तसंस्था**

भारत आणि बांग्लादेशच्या सीमेवर मेघालयच्या नैऋत्य गारो हिल्स जिल्ह्यात एक अनोखी घटना घडली. इथे एक बांग्लादेशी नागरिक कित्येक तास अडकून पडला होता. अखेर त्याची ओळख पटल्यावर त्याला ११ जूनला त्याच्या कुटुंबाच्या ताब्यात देण्यात आलं. त्या व्यक्तीची खरी ओळख पटली असून तो हिंदू समुदायाचा आहे. बांग्लादेशच्या सुरक्षा दलांनी त्याला जाणूनबुजून भारतात पाठवण्याचा प्रयत्न केला होता.

संपूर्ण प्रकरण सती राजबंशी नावाच्या ५५ वर्षीय व्यक्तीशी संबंधित आहे. सती राजबंशी (पान २ वर)

# शिक्षक पदोन्नतीचा मोठा पेच सुटला!

## सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निकालानंतर त्या शिक्षकांनाच मिळणार प्रमोशन

**मुंबई: दि.१२ वृत्तसंस्था**

राज्यभरात विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व पदवीधर शिक्षक अशा पदांवर शिक्षकांची पदोन्नती करण्यासाठी सध्या सुरू असलेल्या प्रक्रियेत टीईटी,महाटीईटी,सीटीईटी ही शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्याबाबतची कोणती तारीख ग्राह्य धरायची? सर्वोच्च न्यायालयाच्या १ सप्टेंबर २०२५ रोजीच्या निवाड्याच्या तारखेपर्यंत ही पात्रता धारण केलेल्या शिक्षकांचाच विचार करायचा का? याबद्दल कायदेशीर संभ्रम निर्माण झाला होता. मुंबई उच्च न्यायालयाने २९ एप्रिल २०२६ रोजीच्या निवाड्याने तो संभ्रम दूर करत, '१ सप्टेंबर'चीच तारीख ग्राह्य धरण्याचा स्पष्ट आदेश दिला होता. त्या (पान २ वर)



### त्या शिक्षकांना पुढील वर्षी संधी

सन २०२५-२६ या वर्षातील पदोन्नती प्रक्रियेत १ सप्टेंबर २०२५ पर्यंत पात्रता परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या शिक्षकांचा विचार होणार नाही. त्या तारखेनंतर उत्तीर्ण झालेल्या शिक्षकांना सन २०२६-२७ या वर्षाच्या पदोन्नती प्रक्रियेत संधी मिळेल, हे सर्वोच्च न्यायालयाच्या या ताज्या निकालानंतर स्पष्ट झाले आहे.

# गुटखा, तंबाखू विरोधात थेट मकोका लागणार!

**मुंबई: दि.१२ वृत्तसंस्था**

महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक आरोग्याच्या संरक्षणासाठी आणि प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या संघटीत अवैध व्यापाराला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तत्सम तंबाखू-मिश्रित प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्री करणाऱ्या संघटीत नेटवर्क्सविरुद्ध पात्र प्रकरणांत महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ म्हणजेच मकोका लागू करण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज स्पष्ट आदेश दिले आहेत.



भारताच्या संविधानाच्या कलम ४७ नुसार सार्वजनिक आरोग्य सुधारण्याची आणि आरोग्यास अपायकारक पदार्थांच्या सेवनास प्रतिबंध करण्याची जबाबदारी राज्यावर आहे. गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला आणि अशा प्रकारचे प्रतिबंधित पदार्थ हे सार्वजनिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणार (पान २ वर)

# भारतीय सैन्याला मिळाले १०६ कामिकाझे ड्रोन!

## १८० किमीची रेंज, ४५० किमी प्रतितास वेग

**नवी दिल्ली: दि.१२ वृत्तसंस्था**

भारतीय लष्कराची मारक क्षमता वाढवण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलत, स्वदेशी संरक्षण कंपनी ने लष्कराला १०६ टर्बोजेट इंजिनवर चालणारे 'कामिकाझे' ड्रोन सुपूर्द केले आहेत. यांना 'पीसकीपर (अग्निवेग)' असे नाव देण्यात आले आहे.

हे ड्रोन १८० किमीच्या रेंजपर्यंत हल्ला करू शकतात. तसेच ४५० किमी प्रतितास वेगाने उडू शकतात. म्हणजेच, याचा वेग जगातील सर्वात वेगाने उडणाऱ्या पेरेग्रिन फाल्कन पक्ष्याच्या ३२० किमी प्रतितास वेगापेक्षाही जास्त आहे. इतकेच नाही तर यावर जॅमिंगचा परिणाम होणार नाही, ना कोणी स्पूफिंगद्वारे यांना लक्ष्यापासून भरकटवू शकणार. कंपनीने सांगितले आहे की, त्यांनी १०० ऑपरेशनल आणि ६ प्रशिक्षण ड्रोन लष्कराला सुपूर्द केले आहेत. ही डिलिव्हरी भारताच्या स्वदेशी संरक्षण उत्पादन क्षमता आणि मानवरहित युद्धात (अनमॅन्ड वॉरफेअर) एक मोठी उपलब्धी मानली जात आहे. यांना बेलारूसी फर्म केबी इंडेलाच्या मदतीने तयार करण्यात आले आहे. कंपनीचा दावा आहे की हा ड्रोन पूर्णपणे स्वायत्त (पान २ वर)



### कामिकाझे ड्रोन्स काय आहेत?

कामिकाझे ड्रोन असे ड्रोन असतात जे लक्ष्यावर हल्ला करताना स्वतःही नष्ट होतात. यांना लॉइटरिंग म्युनिशन्स असेही म्हणतात. कामिकाझे हे नाव दुसऱ्या महायुद्धातील कामिकाझे हल्ल्यांवरून घेतले आहे. जेव्हा जपानी वैमानिक आपली विमाने शत्रूच्या जहाजांवर आदळून आत्मघाती हल्ला करत असत. जेव्हा एखादा ड्रोन लॉन्च केला जातो, तेव्हा तो बराच वेळ हवेत घिरट्या घालतो. कॅमेरा आणि सेन्सरने लक्ष्य शोधतो. ते मिळाल्यावर त्याच्या दिशेने वेगाने जातो आणि आदळताच स्फोट करतो. या ड्रोनचा फायदा असा आहे की ते तुलनेने स्वस्त असतात. सटीक हल्ला करू शकतात. सैनिकांचा जीव थेट धोक्यात घालत नाहीत. टँक, रडार, तोफा आणि लष्करी ठिकाणांना लक्ष्य करू शकतात.

## हृदयद्रावक

## शेअर बाजारात पावणेदोन कोटी बुडाले!

# पत्नी, दोन्ही मुलांना विष देऊन शिक्षकाने घेतला गळफास

**वैराग: दि.१२ वृत्तसंस्था**

शेअर बाजारातील तब्बल १ कोटी ८० लाख रुपयांच्या अवाढव्य आर्थिक नुकसानीमुळे आलेल्या नैराश्यातून एका शिक्षकाने आपल्या कुटुंबासह जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना बार्शी तालुक्यातील हत्तीज येथे घडली आहे. शिक्षकाने पत्नी आणि दोन निष्पाप मुलांना प्रथम विषारी औषध दिले आणि त्यानंतर स्वतः गळफास घेऊन जीवन संपविले. या घटनेमुळे बार्शी तालुक्यात खळबळ उडाली असून, हत्तीज गावावर शोककळा पसरली आहे.

योगेश बाळासाहेब पाटील (वय ४१, व्यवसाय- शिक्षक), माधुरी योगेश पाटील (वय ३७, पत्नी), अथर्व योगेश पाटील (वय ११, मुलगा) आणि शिवांश योगेश पाटील (वय ९, मुलगा) अशी मृत पावलेल्या दुर्दैवी कुटुंबीयांची नावे आहेत. योगेश पाटील हे नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यातील चौगांव बु. येथील प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. सध्या उन्हाळी सुट्ट्या असल्याने ते आपल्या कुटुंबासह मूळ गावी हत्तीज येथे आले होते. मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास योगेश यांनी राहत्या घरी हे टोकाचे पाऊल उचलले. त्यांनी आधी आपल्या पत्नीला आणि दोन्ही मुलांना जेवणातून किंवा अन्य माध्यमातून विषारी औषध देऊन जीवे मारले. त्यानंतर घरातच गळफास लावून स्वतःचीही जीवनयात्रा संपवली. शुक्रवारी (दि.१२) सकाळी नेहमीप्रमाणे दूध देण्यासाठी आलेली व्यक्ती पाटील यांच्या घरी गेली. मात्र, दरवाजा आतून बंद असल्याने आणि बराच वेळ हाका मारूनही आतून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने त्या व्यक्तीला संशय आला. त्यांनी लागलीच शेजाऱ्यांना गोळा केले. नागरिकांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला असता, योगेश पाटील हे गळफास घेतलेल्या अवस्थेत तर त्यांची पत्नी व दोन मुले अंथरुणावर मृत अवस्थेत आढळून आले. हा थरारक प्रकार पाहून गावकऱ्यांनी तात्काळ वैराग पोलिसांशी संपर्क साधला.



### १ कोटी ८० लाखांचा तोटा आणि कर्जबाजारीपणा

पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, योगेश पाटील हे गेल्या काही काळापासून मोठ्या आर्थिक विवंचनेत होते. त्यांना शेअर बाजारात सुमारे १ कोटी ८० लाख रुपयांचा मोठा फटका बसला होता. हे नुकसान भरून काढण्यासाठी आणि लोकांचे पैसे देण्यासाठी त्यांनी काही दिवसांपूर्वीच आपल्या आईकडून आणि नातेवाईकांकडून सुमारे १ कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र, तरीही आर्थिक कोंडी सुटत नसल्याने आणि कर्जदारांचा दबाव वाढल्याने त्यांनी हे अत्यंत टोकाचे पाऊल उचलल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे. या प्रकरणाचा पुढील अधिक तपास वैराग पोलीस करत असून सखोल कारणांचा शोध घेत आहेत. एकाच सुशिक्षित कुटुंबातील चार जणांचा असा अंत झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## पान 1 वरून...

### सर्वात महाभयानक ‘एल निनो’...

पाऊस लांबतो किंवा त्याचे प्रमाण सरासरीपेक्षा खूपच कमी होते. यंदा हा एल निनो महाभयंकर रूप धारण करणार असल्यामुळे जागतिक अन्न साखळी, शेती उत्पादन आणि पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर याचा विपरीत परिणाम होण्याची भीती पर्यावरणतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. हवामानशास्त्रज्ञांनी वर्तवलेल्या ताज्या अंदाजानुसार, यंदाच्या या अत्यंत तीव्र एल निनो प्रणालीचा थेट आणि मोठा फटका प्रामुख्याने भारत आणि ऑस्ट्रेलिया या देशांना बसणार आहे. या हवामान बदलामुळे भारतीय उपखंडात उन्हाळ्याचा कडाका अभूतपूर्व पातळीवर पोहोचणार असून, देशातील बहुतांश राज्यांमध्ये नागरिकांना तीव्र उष्णतेच्या लाटांचा सामना करावा लागण्याची दाट शक्यता आहे.दुसरीकडे, दक्षिण गोलार्धातील ऑस्ट्रेलिया या देशाला यामुळे अत्यंत भयानक दुष्काळ, कोरडे हवामान आणि जंगलांना लागणारे विळखा घालणारे वणवे यांसारख्या गंभीर संकटांना सामोरे जावे लागेल, असा कयास जागतिक हवामान संस्थांनी व्यक्त केला आहे.जागतिक स्तरावरील या धोक्याचे सावट आता महाराष्ट्रावरही पडताना दिसत आहे.

### लातूरच्या शेतकऱ्याला आता...

जाऊ नये म्हणून ९ जून रोजी काशिनाथ गायकवाड यांनी एका बैलाच्या जोडीला स्वतःच्या पत्नीला औताला जुंपून शेतीची मशागत केली. १० जून रोजी या हृदयद्रावक घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आणि संपूर्ण राज्यभरातून हळहळ व्यक्त करण्यात आली. सोशल मीडियावरील त्या व्हिडिओची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूर जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने गायकवाड कुटुंबाला मदत करण्याचे आदेश दिले होते. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर प्रशासनाने घाईघाईने हालचाली करत संबंधित शेतकऱ्याला तात्काळ एक बैल सुपूर्द केला. मात्र, प्रशासनाचा हा आनंद फार काळ टिकला नाही. शासकीय यंत्रणेने दिलेला तो बैल अवघ्या दोनच दिवसांत आजारी पडल्याचे समोर आले.

### अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये...

संवाद साधताना अत्यंत सूचक आणि महत्त्वपूर्ण वक्तव्य केले आहे.

ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वातील तृणमूल काँग्रेस पक्ष पश्चिम बंगालमध्ये सलग तीन टर्म सत्तेत होता. मात्र २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने बंगालची निवडणूक जिंकली. निकाल लागल्यानंतर ताबडतोब बंगालमधील अनेक खासदार आणि आमदारांनी भाजपकडे जाण्याचा मोर्चा वळवला. त्यानंतर ममता बॅनर्जी यांनी सोनिया गांधी यांची तर अभिषेक बॅनर्जी यांनी राहुल गांधींची भेट घेतली. या भेटींमध्ये काँग्रेसने तृणमूलला विलीनीकरणाचा प्रस्ताव दिल्याच्या चर्चा होत्या. याच सर्व घडामोडींच्या दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने तृणमूल काँग्रेसची परिस्थिती पाहून सावध पावले घेत काँग्रेसला विलीनीकरणाचा प्रस्ताव दिल्याचे समजते.

### गुटखा, तंबाखू विरोधात...

आहेत. या पार्श्वभूमीवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ च्या कलम ३० (२) (अ) अंतर्गत राज्यात अशा पदार्थांच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्रीवर प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. तथापि, प्रतिबंध असूनही काही ठिकाणी या पदार्थांचा अवैध व्यापार पद्धतशीर, संघटित आणि आर्थिक फायद्यासाठी होत असल्याचे अंमलबजावणी यंत्रणांच्या निदर्शनास आले आहे. अन्न व औषध प्रशासन, पोलीस आणि संबंधित यंत्रणांच्या कारवायांमधून असे दिसून आले आहे की, काही प्रकरणांमध्ये केवळ किरकोळ विक्रेतेच नव्हे, तर उत्पादक, पुरवठादार, वित्तपुरवठादार, वाहतूकदार, गोदाम चालक, घाऊक विक्रेते, उप-विक्रेते आणि इतर सहाय्यक घटक यांचा समन्वयित सहभाग असतो. अनेक वेळा बनावट कागदपत्रे, बनावट चलने, डमी कंपन्या, बेनामी व्यवहार, गुप्त गोदामे, आंतरराज्य पुरवठा साखळी, तसेच वाहतूक व वितरणासाठी विविध मार्गाचा वापर केला जातो.

### शिक्षक पदोन्नतीचा मोठा...

आदेशालाही आव्हान देणारे अनेक शिक्षकांचे अपील सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच फेटाळून लावले असल्याने आता यावर अंतिम शिक्कामोर्तब झाले आहे. सन २००९मध्ये शिक्षण हक्क कायदा आल्यानंतर, पहिली ते आठवीच्या इयत्तांमधील विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी केंद्र सरकारच्या आदेशाप्रमाणे सन २०१०पासून पात्रता परीक्षा बंधनकारक झाली. जवळपास दीड दशक वेगवेगळ्या याचिकांच्या निमित्ताने या अटीविषयीचा वाद वेळोवेळी न्यायालयात पोहोच ला.. अखेर, सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ रोजी ‘अंजुमन इशात-ए-तलीम ट्रस्ट विरुद्ध महाराष्ट्र सरकार’ या याचिकेच्या निमित्ताने निर्णायक आदेश दिला. त्यानुसार, शिक्षकांना नियुक्तीसाठी, सेवेत राहण्यासाठी व पदोन्नतीसाठी ही अट बंधनकारक असल्याविषयी शिक्कामोर्तब झाले.

### बीएसएफ- बांग्लादेश बॉर्डर गार्ड...

बांग्लादेशच्या राजेशाही जिल्ह्यातील गुडागाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या चलना गावचे रहिवासी आहेत. सीमा सुरक्षा दलाने दिलेल्या माहितीनुसार, वैध कागदपत्रांशिवाय सती राजबंशी यांनी भारतात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. त्यांना मेघालयच्या महेंद्रगंज जवळ असलेल्या नंदिरचार सेक्टरमध्ये पकडण्यात आलं. भारतीय सीमा सुरक्षा दलाने सती राजबंशी यांना नियमानुसार बांग्लादेशच्या दिशेनं पाठवून दिलं होतं. पण बांग्लादेश बॉर्डर गार्डनं त्यांना देशात घेण्यास स्पष्ट नकार दिला. यानंतर सती राजबंशी दोन्ही देशांच्या सीमांच्या दरम्यान असलेल्या निर्मनुष्य भागात अडकले.

### भारतीय सैन्याला मिळाले १०६...

अचूक स्ट्राइक मिशन पार पाडू शकतो. म्हणजे, एकदा लक्ष्य निश्चित झाल्यावर, ते कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय मिशन पूर्ण करेल. अग्निवेगमध्ये महत्त्वाच्या लष्करी पायाभूत सुविधांवर, लॉजिस्टिक्स हबवर, कमांड सेंटरवर, रडार इंस्टॉलेशन्सवर आणि इतर धोरणात्मक ठिकाणांवर अचूक हल्ला करण्याची क्षमता आहे. चाचणीदरम्यान, अग्निवेगने जॅमिंग आणि स्पूफिंगच्या वातावरणात काम करताना ५ मीटरपेक्षा कमी सर्कुलर एरर प्रोबेबल प्राप्त केले. सोप्या भाषेत सांगायचे तर, हा ड्रोन आपल्या लक्ष्यावर अत्यंत जवळून हल्ला करण्यास सक्षम आहे. यामुळे एखाद्या लष्करी तळाच्या केवळ एका भागाला लक्ष्य केले जाऊ शकते.

# विलीनीकरणाची दिल्लीत खलबते! काँग्रेसचे दोन बडे नेते राजधानीत

## शरद पवार गटाकडून पहिली प्रतिक्रिया समोर

मुंबई, दि. १२ वृत्तसंस्था



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. याविषयी दोन्ही बाजूच्या बड्या नेत्यांनी दावे प्रतिदावे केले होते. काही काळ राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चांनी जोर धरला होता, पण त्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेच्या विलिनीकरणाचा मुद्दा मागे पडला असून आता शरद पवार गट काँग्रेस पक्षात विलीन करण्याचा प्रस्ताव देण्यात आला असल्य़ाची चर्चा जोर धरू लागली आहे.

यामुळे राज्याच्या राजकारणात मोठा राजकीय भूंकप होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. याविषयी दिल्लीत खलबंत सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. काँग्रेस पक्षाच्या हायकमांडने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना दिल्लीला बोलावलं होतं, त्यानंतर आता पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना देखील दिल्लीला बोलवण्यात आलं आहे. हायकमांडच्या आदेशाचे पालन करत नाना पटोले दिल्लीला रवाना झाले आहेत. त्यापूर्वी त्यांनी सूचक प्रतिक्रिया देत मोठा राजकीय बॉम्ब फोडला. विलिनीकरणाचा प्रस्ताव राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला यापूर्वीच देण्यात आला होता, असं नाना पटोले यांनी म्हटलं आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.

पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला देण्यात आलेला नसल्याचे स्पष्ट करत सुरू असलेल्या चर्चा फेटाळून लावल्या आहेत. एका वृत्तवाहिनीसोबत बोलताना शिंदे म्हणाले, ङ्ककाँग्रेसकडूनही विलिनीकरणासंदर्भात कोणताही प्रस्ताव आलेला नाही. जर अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव असता, तर पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून आम्हाला त्याबाबत कल्पना दिली असती.ङ्ख

दरम्यान, सोमवारी सकाळी शरद पवार यांच्या मुंबईतील ‘सिल्वर ओक’ निवासस्थानी पक्षाची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीतही काँग्रेसमध्ये विलीन होण्याच्या कोणत्याही प्रस्तावावर चर्चा झालेली नसल्याचे शिंदे यांनी सांगितले.

ङ्कया विषयासंदर्भात माझ्यापर्यंत कोणतीही अधिकृत माहिती आलेली नाही. त्यामुळे विलिनीकरणाबाबत प्रसारित होत असलेल्या बातम्यांमध्ये कोणतेही तथ्य नाही,ङ्ख असेही शशिकांत शिंदे यांनी स्पष्ट केले.

### दिल्लीला रवाना होण्यापूर्वी नाना पटोले यांची सूचक प्रतिक्रिया

» राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव ऑलरेडी पवार साहेबांनी दिला होता. मात्र, काही कारणास्तव त्यावर निर्णय घेण्यास उशीर झाला. आता देशातील राजकारणात जे काही चाललं आहे, देशाची संविधानिक व्यवस्था संपत चालली आहे. अशावेळी सेक्युलर मतांचं विभाजन थांबवण्यासाठी, देश वाचवण्यासाठी, संविधान वाचवायला, जे काही सेक्युलर विचारांचे पक्ष आहे, त्यांनी एकत्रित यावे, अशी प्रक्रिया सुरु झाली आहे.ङ्ख अशी सूचक प्रतिक्रिया नाना पटोले यांनी दिल्लीला रवाना होण्यापूर्वी माध्यमांशी बोलताना दिली.

## कपडे वाळत टाकताना विजेचा शॉक लागून आईचा मृत्यू तर १० वर्षीय मुलगा थोडक्यात बचावला

सटाणा, दि. १२ वृत्तसंस्था

शहरातील अहिल्यादेवी चौक परिसरातील आसरा माता मंदिरासमोरील अहिल्यानगर भागात गुरुवारी एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली. कपडे वाळत टाकत असताना विजेचा जोरदार धक्का लागल्याने एका महिलेचा मृत्यू झाला असून या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अहिल्यानगर येथे राहणाऱ्या सोनाली अरविंद सोनवणे या आपल्या घराच्या बाहेर गच्चीवर कपडे वाळत टाकत होत्या. यावेळी परिसरातील विजेच्या खांबावरून आलेली केबल गच्चीच्या रेलिंगला बांधलेली होती. दरम्यान, ही वायर अचानक तुटून रेलिंगच्या संपर्कात आली आणि त्यामुळे रेलिंगमध्ये विद्युत प्रवाह निर्माण झाला.

कपडे वाळत टाकत असताना सोनाली सोनवणे यांचा हात त्या रेलिंगला लागला आणि त्यांना जोरदार विजेचा धक्का बसला. या दुर्घटनेत त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने उपचारासाठी हलविण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र त्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले.

या अचानक घडलेल्या घटनेमुळे सोनवणे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. विशेष म्हणजे, घटनेच्या वेळी त्यांचा दहा वर्षांचा मुलगा त्यांच्या जवळच उपस्थित होता. सुदैवाने तो या दुर्घटनेतून थोडक्यात बचावला असल्याचे सांगण्यात आले आहे.घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून विजेच्या तारांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त करत अशा धोकादायक केबल्सची तातडीने तपासणी करून आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास संबंधित यंत्रणांकडून सुरू असून नेमकी दुर्घटना कशामुळे घडली याबाबत अधिक माहिती घेतली जात आहे.

## रिक्षातच सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला

**मुंबई :** रिक्षामध्ये प्रवाशांची फसवणूक करून सोन्याचे दागिने चोरणाऱ्या दोन आरोपींना अंबड पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने आणि गुंडा विरोधी पथकाने संयुक्त कारवाईत अटक केली असून, त्यांच्याकडून सुमारे २३ लाख रुपये किमतीचे १५ तोळे सोन्याचे दागिने व गुन्ह्यात वापरलेली रिक्षा जप्त करण्यात आली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उंटवाडी येथील रहिवासी नलिनी धनाजी गोसावी (वय ५८) यांनी अंबड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. ६ जून रोजी रात्री त्या कुरूकवाडे येथून निमाणी बसस्थानकावर उतरून रिक्षाने घरी जात होत्या. यावेळी रिक्षाचालकाने गॅस संपल्याचा बहाणा करून त्यांना मध्येच उतरविले. घरी गेल्यानंतर बॅगेतील सोन्याचे दागिने चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी फिर्यादींच्या घरापासून निमाणी बसस्थानकापर्यंत तसेच आरोपींच्या हालचालींचे सुमारे १५० सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यातून संशयितांची ओळख पटली.

## जीवे मारु असे धमकावणाऱ्यांना तुकाराम मुंढेंचा ‘दबंग’ स्टाइल इशारा

नवीदिल्ली, दि. १२ वृत्तसंस्था



अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून तुकाराम मुंढे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. भेसळयुक्त अन्नपदार्थ, गुटखा माफिया आणि विविध अवैध कारवायांविरोधात त्यांनी सुरू केलेल्या धडक मोहिमेमुळे अनेकांचे धाबे दणाणले आहेत.

त्यांनी मे महिन्याच्या अखेरीस अन्न व औषध प्रशासनाचा पदभार स्वीकारल्यानंतर या विभागातून पथकाने राज्यातील अनेक ठिकाणी छापे टाकत कोट्यवधी रुपयांचा भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाचा माल जप्त केला आहे.

हे कारवाईचे सत्र सुरूच असून, याच दरम्यान तुकाराम मुढेंनी घेतलेल्या निर्णयांची देखील चर्चा होत आहे.

सर्वसामान्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेतल्याने तुकाराम मुंढे आणि त्यांच्या कुटुंबीयांना धमक्या मिळत आल्या आहेत. आता सोशल मीडियावर याविषयी चर्चा रंगली आहे. तर काही ठिकाणी एफडीएच्या पथकांवर हल्लूयाच्या घटनाही समोर आल्या आहेत. संभाजीनगरमध्ये एफडीएच्या अधिकाऱ्यांवर हल्ला झाल्याचे वृत्तही समोर आले आहे.

या पार्श्वभूमीवर तुकाराम मुंढेंचं २०१७ मधील एक जुनं विधान पुन्हा व्हायरल होत आहे. पुणे महानगर परिवहन महामंडळ चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक असताना त्यांना धमकीची पत्रे आली होती. त्यावेळी त्यांनी धमक्यांना न घाबरण्याची भूमिका स्पष्ट शब्दांत मांडली होती.

काय म्हणाले होते तुकाराम मुंढे?

ङ्कमला आणि माझ्या कुटुंबाला जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्या आहेत. मात्र अशा धमक्यांमुळे माझे निर्णय बदलणार नाहीत. धमक्या देणाऱ्यांनी आधी माझा इतिहास पाहावा,ङ्ख असे सडेतोड उत्तर त्यांनी दिले होते. सार्वजनिक हितासाठी घेतलेले निर्णय कोणत्याही दबावाखाली बदलणार नसल्याचे त्यांनी त्यावेळी स्पष्ट केले होते.

दरम्यान, एफडीएच्या अलीकडील कारवाईत मुंबईतील मुलुंड परिसरातील एका प्रसिद्ध चाट सेंटरवर छापा टाकण्यात आला. या कारवाईत १०० किलोहून अधिक बनावट, भेसळयुक्त आणि निकृष्ट दर्जाचा माल जप्त करण्यात आला. यामध्ये शेवपुरी आणि पाणीपुरीसाठी वापरल्या जाणाऱ्या पुऱ्या तसेच रासायनिक रंग लावलेले वटाणे आढळून आले.

एफडीएच्या या धडक मोहिमेमुळे भेसळखोरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, त्यामुळे तुकाराम मुंढे यांच्या कठोर आणि तडफफदार कार्यशैलीची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

## सांगली हादरली! भरवस्तीत नेत्याच्या घरात घुसून गोळीबार

सांगली, दि. १२ वृत्तसंस्था



शहरातील अभयनगर परिसरात खंडणीच्या वादातून एका सराईत गुन्हेगाराने १४ वर्षे वयाच्या वेदांत बाळू बंडगर याच्या डोक्यात गोळी झाडून निर्घृण हत्या केल्याची थरारक घटना गुरुवारी घडली. घराबाहेर मोबाईलवर गेम खेळत बसलेल्या निरागस मुलाला गोळ्यांनी टिपण्यात आले. या घटनेने संपूर्ण सांगली शहरात हळहळ व संतापाचे वातावरण पसरले आहे.

सांगलीतील बाळू बंडगर व त्यांचे साथीदार थोरात (रा. जत) यांच्याकडून एका सराईत गुन्हेगाराने खंडणी मागण्यास सुरुवात केली होती. थोरात यांच्या जत येथील घरात घुसून खंडणीची मागणी केल्याने बाळू बंडगर व थोरात हे दोघे जत पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले. याचा सूड उगवण्यासाठी गुरुवारी सकाळी त्या सराईत गुन्हेगाराने जत येथेच बंडगर व थोरात यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तो डाव फसला.

त्यानंतर संतापलेल्या गुन्हेगाराने चार ते पाच साथीदारांसह सांगलीतील अभयनगरमधील बंडगर यांच्या घरावर मोर्चा वळवला. यावेळी बाळू बंडगर यांचा नातू वेदांत घराबाहेर निवांतपणे मोबाइलवर गेम खेळत बसला होता. या निरागस मुलाला पाहताच गुन्हेगाराने थेट त्याच्या डोक्यात गोळी झाडली आणि वेदांतने जागीच प्राण सोडला.

तपासात समोर आलेल्या माहितीनुसार हा वाद दोन कारणांमुळे पेटला होता. त्यानुसार सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीतील टेंडर घेण्यावरून उदभवलेला वाद आणि थोरात यांच्याकडून खंडणी वसुली करण्यावरून सुरू असलेला वाद. या दोन्ही वादांतून सराईत गुन्हेगाराने बंडगर कुटुंबावर सूड उगवण्याचा निर्णय घेतला व निरपराध वेदांतला त्याचा बळी ठरवले.

घटनेची माहिती मिळताच सांगलीत एकच खळबळ उडाली. स्थानिक गुन्हे शाखा व संजयनगर पोलिसांची वेगवेगळी पथके संशयितांच्या मागावर रवाना करण्यात आली आहेत. पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी या प्रकरणी गंभीर दखल घेत तपासाला गती दिली आहे.

खंडणी मागणाऱ्यांविरुद्ध पोलिसांत तक्रार देणे हाच काय तो आजोबांचा गुन्हा ङ्ख आणि त्याची किंमत चुकवावी लागली त्यांच्या १४ वर्षीय निरागस नातवाला. घराबाहेर गेम खेळणाऱ्या वेदांतला त्याच्या मृत्यूची कल्पनाही नसेल. या घटनेने संपूर्ण सांगली शहर हळहळले असून संशयितांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## भारत गौरव पर्यटक रेल्वेची घोषणा

**मुंबई :** भारतीय रेल्वे खानपान आणि पर्यटन महामंडळ लिमिटेड, रेल्वे मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत कार्यरत असलेल्या नवरत्न सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाने आपल्या विशेषरित्या नियोजित दिव्य दक्षिण यात्रा या तीर्थयात्रेची घोषणा केली आहे. ही यात्रा भारत गौरव पर्यटक रेल्वेद्वारे आयोजित करण्यात येणार असून रेल्वे २७ जुलै २०२६ रोजी मनमाड येथून प्रस्थान करेल. आध्यात्मिक पर्यटनाला चालना देणे आणि भाविकांना सुलभ व सर्वसमावेशक तीर्थयात्रेचा अनुभव देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. १० रात्री आणि ११ दिवसांच्या या यात्रेत दक्षिण भारतातील प्रमुख धार्मिक व सांस्कृतिक स्थळांना भेट दिली जाईल. यामध्ये हम्पी, म्हैसूर, कोयंबतूर, तिरुवन्नामलाई, वेल्लोर, तिरुपती आणि मल्लिकार्जुन या प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांचा समावेश आहे. भारत गौरव पर्यटक रेल्वेमध्ये प्रवाशांच्या विविध गरजा लक्षात घेऊन इकॉनॉमी स्लीपर, स्टँडर्ड आणि कम्फर्ट या श्रेणींमध्ये प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सुमारे ७५० प्रवाशांची क्षमता

## अशोक खरात प्रकरणी डॉक्टरांची विशेष तपास पथक चौकशी

मुंबई, दि. १२ वृत्तसंस्था



नाशिकमधील अशोक खरात प्रकरणात आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी ईडीमार्फत सुरू असून, पोलिस अधीक्षक सातपुते यांच्या विशेष तपास पथकाकडूनही स्वतंत्र तपास सुरू आहे. या तपासादरम्यान अन्य काही बाबींचाही शोध घेतला जात आहे. पीडित महिलांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित आरोप लपवण्यासाठी तसेच त्यांना गुंगी देण्यासाठी वैद्यकीय मदत पुरवली गेल्याचा संशय काही महिला डॉक्टरांवर व्यक्त करण्यात येत आहे. यामध्ये मुंबईतील एका नामांकित त्वचारोगतज्ज्ञ महिला डॉक्टरचा सहभाग असल्याची शक्यता सूत्रांकडून वर्तवण्यात येत आहे. विशेष तपास पथकाच्या चौकशीत, अशोक खरातला मदत करण्यासाठी वैद्यकीय क्षेत्रातून कोणत्या प्रकारे सहकार्य झाले याबाबत काही मुद्दे समोर येत असल्याचे सांगितले जाते. कथित घटनांदरम्यान किंवा त्यानंतर पीडित महिलांच्या वैद्यकीय तपासण्या तसेच सोनोग्राफीसाठी संबंधित डॉक्टरांच्या क्लिनिक किंवा केंद्राचा वापर झाल्याचा पोलिसांना संशय आहे. या संदर्भात एसआयटीने संबंधित सोनोग्राफी सेंटरसह एका महिला आणि एका पुरुष डॉक्टरची यापूर्वी चौकशी केल्याचेही समजते. ईडीकडून आर्थिक गैरव्यवहाराचा तपास सुरू असताना, लैंगिक शोषणाशी संबंधित तपास एसआयटीकडून स्वतंत्रपणे सुरू आहे.

## संताप

### शेतकऱ्याला दिलेला बैल आजारी निघाल्याने सपकाळांचा सरकारवर हल्लाबोल

# मदत होती की बळीराजाच्या दुःखाची थट्टा?

लातूर, दि. १२ वृत्तसंस्था



जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील बोंबळी येथील शेतकरी काशिनाथ गायकवाड यांचा एक बैल वीज कोसळून मृत्युमुखी पडला. त्यानंतर पत्नीला औताला जुंपून नांगरणी करत असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि राज्यभरातून हळहळ व्यक्त करण्यात आली. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर लातूरच्या शेतकऱ्याच्या मदतीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस धावले.

शेतकऱ्यानं बैल नसल्यानं पत्नीला नांगराला जुंपल्याचं दृश्य समोर आल्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या फोननंतर जिल्हाधिकाऱ्यांनी त्या शेतकऱ्याला बैल उपलब्ध करुन दिला. स्थानिक गोशाळेतून शेतकऱ्याला बैल दिला असल्याची माहिती समोर आली आहे. परंतु, सरकारच्या मदतीने मिळालेला तो बैल दोनच दिवसांत शेतातील मशागतीदरम्यान खाली बसला. पशुवैद्यकीय तपासणीत तो आजारी असल्याचे निष्पन्न झाले. परिणामी मदत मिळण्याऐवजी शेतकऱ्यावर आता त्या बैलाच्या उपचाराचा खर्च करण्याची वेळ आली आहे. यावरून रोहित पवार आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सोशल मिडियावर पोस्ट शेअर करत सरकारवर टीका केली आहे.

रोहित पवारांनी सोशल मिडीयावर पोस्ट करत म्हटलं की, ङ्कविरोधक आणि माध्यमांच्या दबावामुळं लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्याला नुकसानभरपाई म्हणून दिलेला बैल आजारी निघाला. आता त्याच्या उपचाराचाच खर्च संबंधित शेतकऱ्याला करावा लागतोय. शेतकरी कर्जमाफीची अवस्थाही यापेक्षा वेगळी नाही. द्यायची म्हणून दिलेल्या कर्जमाफीमध्ये अटीशर्तीच जास्त लादून ती बहुतांश शेतकऱ्यांना मिळू नये याची अधिक काळजी घेतली. आता बैलावर उपचारासाठी स्वतःच्या खिशातील पैसे खर्चण्याची वेळ संबंधित शेतकऱ्यावर आली, त्याप्रमाणेच कर्जमाफीसाठीही सरकारने घातलेल्या अटींमुळं आधी स्वतःकडचे पैसे शेतकऱ्यांना भरावे लागणार आहेत. यातून या सरकारच्या नियतीतच खोट आहे, हे दिसतं. त्यामुळं आमची सरकारला विनंती आहे की, अन्नदात्याला द्यायचं ते हातचं राखून देऊ नका, तर निमर्ळ आणि मोकळ्या मनानेच द्या! शेवटी तिजोरी ही जनतेची आहे. तर हर्षवर्धन सपकाळ यांनी पोस्ट करत या सरकारला ‘दलिंदर सरकार’ म्हणतो ते उगाच नाही, अशा शब्दात हल्लाबोल केला आहे. ङ्कबैल मेल्यामुळे पत्नीला नांगराला जुंपण्याची वेळ आलीः हा व्हिडिओ व्हायरल झाला, मग सरकार जागं झालं. मदतीसाठी एक बैल देण्यात आलाः कॅमेरे आले, फोटो काढले गेले, जाहिराती करत सरकारच्या संवेदनशीलतेचा गाजावाजा सुरू झाला. पण एका दिवसातच तो बैल निकृष्ट निघाला आणि शेतातच कोसळला! ही मदत होती की बळीराजाच्या दुःखाची थट्टा?ङ्ख, असा थेट सवाल सपकाळ यांनी राज्य सरकारला केला आहे. ङ्कएका बाजूला हजारो कोटींच्या घोषणा, जाहिराती आणि इव्हेंटबाजीः तर दुसऱ्या बाजूला संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला ढोंगी मदतीच्या नावाखाली निकृष्ट बैल दिला जातो. शेतकऱ्याच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यापेक्षा त्याच्या वेदनांवर स्वतःची मोहीम उभे करणारे हे दलिंदर सरकार आहे, असे म्हणत त्यांनी सरकारवर टीका केली.


### नावात बदल

माझा पासपोर्ट क्रमांक N9987706 आहे. आणि माझे पासपोर्ट ची वैधतेची दिनांक 25/08/2016 ते 24/08/2026 पर्यंत आहे. माझे नाव पासपोर्ट वर चे नाव REHANA BI असे होते. परंतु माझे पूर्ण नाव REHANA BEE ABDUL HAMEED असे आहे. यापुढे मला याच नावाने संबोधित करण्यात यावे. दोन्ही नावे एकच आहेत. त्याचात कोन्त्या ही प्रकारे खोटी माहिती दिली नाही. खोटी माहिती निघाल्यास मी भारतीय संविधानातील कलमा प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहील. **पत्ता:- मर्कज मस्जीद जवळ, जुना फैल, खामगाव, जि बुलढाणा ४४४३०३**

### नाम स्पष्टीकरण सूचना

सर्वसाधारण को सूचित किया जाता है कि मेरे पुत्र का नाम कुछ दस्तावेजों में "Mitul Anup Agrawal" तथा कुछ दस्तावेजों में "Mitul Anupkumar Agrawal" अंकित है। उक्त दोनों नाम एक ही व्यक्ति के हैं। अतः भविष्य में "Mitul Anup Agrawal" एवं "Mitul Anupkumar Agrawal" को एक ही व्यक्ति का नाम माना जाए। दिनांक: १२/०६/२०२६

घोषणाकर्ता

**अनुपकुमार ओमप्रकाश अग्रवाल**

अकोलाचक्की के सामने, स्टेशन विभाग, मूर्तिजापुर, जिला अकोला, महाराष्ट्र.

मणपुरम होम

मनाप्पुरम होम फायनान्स लिमिटेड
(पूर्वीचे नाव: मनाप्पुरम होम फायनान्स प्रा. लि.)
CIN : U65923KL2010PLC039179
Regd कार्यालय: 8/596 A, पद्मप्रभा बिल्डिंग, श्रीराम स्वामी मंदिराजवळ, चेरप्पू - त्रिप्रयार रोड, थ्रिप्रायर, त्रिशूर, केरळ ६८०५६७ | फोन नं.: ०४८७-३५२०५०४, वेबसाइट: www.manappuramhomefin.com

**ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)**

यास्तव, मी, मनाप्पुरम होम फायनान्स लिमिटेड (“MAHOFIN”) चा अधिकृत अधिकारी असून, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट *[अधिनियम], २००२ (२००२ चा ५४) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ९ सह वाचन केलेल्या कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदार आणि सह-कर्जदारांना, सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सूचनेत नमूद केलेली रक्कम आणि त्यावरील व्याज परतफेड करण्यासाठी मागणी सूचना जारी केली. कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, मी, सदर *[अधिनियम] च्या कलम १३(४) सह वाचन केलेल्या सदर नियमांच्या नियम ९ अन्वये मला/तिला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येत आहे की, त्यांनी मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार, खाली नमूद केल्यानुसार, प्रत्येक संबंधित मालमत्तेसाठी मनाप्पुरम होम फायनान्स लिमिटेडच्या बोज्याच्या अधीन असेल:

| क्र. क्र. | कर्जदार आणि सह-कर्जदाराचे नाव / कर्ज खाते क्रमांक / शाखा | ज्या तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या संदर्भात हितसंबंध निर्माण करण्यात आला आहे, तिचे वर्णन | मागणी सूचना पाठवल्याची तारीख आणि थकबाकीची रक्कम | ताब्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| 1 | भीमलता राजेश गजभिये, राजेश सुखदेव गजभिये, शुभम राजेश गजभिये, / MHL00060035599/Nagpur | गावठाण मौजा- नाकाडोंगरी निवासी घर / मालमट्टा क्रमांक 1003 एकूण जमीन मोजणी क्षेत्र 1160 चौ. फिट. RCC बांधकाम असल्याने, त्यावर कार्यक्षेत्र ग्रामपंचायत-नाकाडोंगरी मु. पोस्ट. प्रभाग क्र.१ नाकाडोंगरी ता. तुमसर जिल्हा भंडारा, महाराष्ट्र, पिन: 441907. पूर्व-सिमेंट रस्ता, विजय बनसोड यांचे पश्चिम-घर, धनेश सुकाराम घोडीचोर यांचे दक्षिण-घर, जिवलंग खोब्रागडे यांचे उत्तर-घर | १४-०३-२०२६ आणि रु. ७२३३६१/- | ०९-०६-२०२६ |

दिनांक: १३ जून २०२६ | ठिकाण: महाराष्ट्र सही/- अधिकृत अधिकारी, मनाप्पुरम होम फायनान्स लि.

# भारताचा तेलसाठा ३९ लाखांवरुन थेट ३ कोटी बॅरलपर्यंत जाणार

## भारत जगाचे समीकरण बदलणार; बनवणार ऊर्जा सुरक्षेचा 'अभेद्य कवच'

**नवी दिल्ली : दि. १२ वृत्तसंस्था**

पश्चिम आशियातील युद्धामुळे जग तेलाच्या चिंतेमुळे पाणी-पाणी झाले होते. भारत आणि चीन यांसारख्या तेलाच्या आयातीवर अवलंबून असणाऱ्या देशांना विशेषतः या युद्धामुळे अपुऱ्या पुरवठ्याला सामोरे जावे लागले. अमेरिका आणि इस्रायल यांनी इराणच्या तळांना लक्ष्य केले तर, इराणने देखील प्रत्युत्तरात आखाती देशांमधील तेल आणि गॅस रिफायनरीजना लक्ष्य केले.

यामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली असून या दरम्यान, भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्यांनी किमान ऑगस्टपर्यंत मागणी पूर्ण करण्यासाठी कच्च्या तेलाचा साठा केला केल्याचे रॉयटर्सच्या वृत्तावरून समोर आले आहे. त्याचप्रमाणे, जुलैच्या मध्यापर्यंत पुरेसा एलपीजीचा पुरवठा सध्या देशात उपलब्ध आहे.




त्याचवेळी, अलीकडच्या दिवसांतील वाढते भू-राजकीय तणाव आणि कच्च्या तेलाच्या किंमतीतील चढ-उताराच्या पार्श्वभूमीवर भारत ने ऊर्जेची गरज भागवण्यासाठी मोठे आणि धोरणात्मक पाऊल उचलले आहे. पंतप्रधान मोदींच्या नुकत्याच झालेल्या दौऱ्यानंतर काही दिवसांतच दोन्ही देश मिळून भारताचा सामरिक तेलसाठा ३० दशलक्ष बॅरलपर्यंत वाढवण्याच्या दिशेने हालचाल करत आहेत. या संदर्भात दोन्ही देशांमध्ये सामंजस्य करार केला गेला असून जगातील तिसरा सर्वात मोठा ग्राहक, भारत, कच्च्या तेलाच्या गरजेपैकी अंदाजे ८८% आयात करतो.

मध्यपूर्वेतील सुरक्षा धोक्यांच्या पार्श्वभूमीवर गेल्या महिन्यात पंतप्रधान मोदींच्या दौऱ्यावेळी जाहीर केलेल्या योजनांची अंमलबजावणी सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे. या योजनांमध्ये केवळ धोरणात्मक तेलाचा साठा वाढवणेच नव्हे, तर मजबूत गॅस साठा संरचना तयार करण्याचाही समावेश आहे. दोन्ही देश भारतातील संबंधित कच्च्या तेलाची साठवण क्षमता सध्याच्या ५.८ दशलक्ष बॅरलवरून ३ कोटी बॅरलपर्यंत थेट वाढवण्यासाठी काम करत आहेत.

अशाप्रकारे, नवीन तेल आणि गॅसचा साठा आधीच अस्तित्वात असलेल्या भूमिगत गुहांमध्ये ठेवले जातील तसेच, नवीन पायाभूत सुविधा प्रकल्प उभारले जातील. मात्र यासाठी अनेक वर्षी लागू शकतात आणि या प्रकल्पात केवळ तेल साठवणुकीचा समावेश नाही तर, दोन्ही देशांकडून मोठी गुंतवणूकही केली जाईल.

भारत आणि संयुक्त अरब अमिराती सध्या विविध साठवणूक पर्याय आणि प्रारूपांचा विचार करत आहेत, ज्यानुसार देशातील कच्च्या तेलाच्या साठ्यापैकी काही क्रूड विशिष्ट परिस्थितीत विकलेही जाऊ शकते. गेल्या महिन्यात अबू धाबी नॅशनल ऑइल कंपनी ने देशाच्या सामरिक पेट्रोलियम साठ्यामधील त्यांच्या सहभागाच्या भविष्यातील विस्तारामध्ये मंगळुरू येथील सध्याच्या साठवणूक सुविधा, तसेच भारताच्या पूर्व किनाऱ्यावर बंगालच्या उपसागराजवळील विशाखापट्टणम आणि चंडीखोल येथील संभाव्य नवीन जागांचा समावेश असेल, असे संकेत दिले होते.

सध्या मंगळुरु येथील फॅसिलिटीमध्ये जवळपास ५८.६ लाख बॅरल तेलाचा साठा जमा क्षमता उपलब्ध आहे. केवळ क्रूडच नव्हे तर दोन्ही देश सामरिक गॅस साठाही तयार करण्याच्या दिशेने काम करत असून भारताने गेल्या दशकात सामरिक वायू साठा प्रकल्प विकसित करायची सुरूवात केलेली तर, आता गॅस साठा करण्याच्या दिशेनेही काम करत असून यासाठी अतिरिक्त पर्यायांचाही विचार केला जात आहे, ज्यामध्ये विद्यमान एलपीजी साठवण गुंफांचा वापर करणे आणि नवीन साठवण पायाभूत सुविधा विकसित करण्याचा समावेश आहे.

पश्चिम आशियातील युद्धामुळे अलीकडेच सुरळीत पुरवठा चालू राहण्यासाठी कच्च्या तेलाचा राखीव साठा तयार करण्याची गरज तीव्र वाढली. इराणमधील युद्ध आणि होर्मुझ सामुद्रधुनी ठप्प पडल्यामुळे जगातील अनेक मोठ्या अर्थव्यवस्थांची ऊर्जा सुरक्षेतील त्रुटी उघड झाल्या.

## महत्त्वाचे

### सुंदर लोकेशन अन् निसर्गरम्य कुंड प्री-वेडिंग शूटवेळी अर्जुनचा शेवट

**जयपूर:** लग्न अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेलं. घरात लगीनघाई सुरू होती. नातेवाईकांना फोनाफोनी सुरू होती. सुखी आयुष्याची स्वप्नं पाहिली जात होती. पण एका सुंदर फोटोचा शोध कुटुंबासाठी काळ बनून आला. राजस्थानच्या राजसमंद जिल्ह्यातील गोरी धाम परिसरात प्री-वेडिंग फोटोशूट दरम्यान होणाऱ्या नवरदेवाचा दुर्दैवी शेवट झाला. त्याच्या अकाली निधनानं कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला. लग्नघरात आक्रोश सुरू झाला.चित्तौडगढचा रहिवासी असलेला अर्जुन दमामी त्याची होणाऱ्या पत्नी सोबत फिरायला आणि प्री-वेडिंग फोटोशूटला गेला होता. काही अविस्मरणीय फोटो टिपण्यासाठी अर्जुन राजसमंद येथील गोरी धामला गेला होता. हा परिसर अतिशय निसर्गरम्य आहे. इथे नैसर्गिक कुंड, हिरवळ, डोंगरातून वाहणारं पाणी पाहायला मिळतं. या भागात फोटोशूटसाठी, रील्स चित्रित करण्यासाठी बरीच गर्दी असते.

अर्जुन त्याच्या होणाऱ्या पत्नीला आणि तिच्या काकांना घेऊन गेला होता. मंदिर परिसरापर्यंत सगळं काही नीट होतं. पण त्यानंतर एकाएकी सगळं बदललं.

### अहमदाबाद अपघाताने एरोप्लेन बॉयचे आयुष्य एकाएकी बदलले, लग्नात काय घडले?

**गांधीनगर:** गुजरातच्या अहमदाबादमधून लंडनला जाण्यासाठी निघालेल्या एअर इंडियाच्या विमानाला गेल्या वर्षी अपघात झाला. गेल्या वर्षी याच दिवशी (१२ जून) एअर इंडियाचं विमान अहमदाबादमध्ये उड्डाणानंतर अवघ्या मिनिटभरात कोसळलं. या अपघातात २६० जणांचा जीव गेला. या दुर्घटनेनंतर एका शाळकरी मुलाची कहाणी समोर आली. विमान अपघातानंतर त्याचं आयुष्य एकाएकी बदललं.

ही कहाणी १८ वर्षांच्या आर्यनची आहे. तो वर्षभरापूर्वी गुजरातच्या अरावली जिल्ह्यातील एका लहानशा गावात शिकणारा एक सर्वसाधारण मुलगा होता. त्यानं वर्षभरापर्यंत विमान कधीही इतक्या जवळून पाहिलं नव्हतं. १२ जून २०२५ रोजी त्यानं अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या विमानाचा अपघात पाहिला. त्यानंतर संपूर्ण परिसरात आर्यन एरोप्लेन बॉय म्हणून ओळखला जाऊ लागला.१२ जून २०२५ च्या दिवशी एअर इंडियाच्या विमानाला अपघात झाला. तेव्हा आर्यन अहमदाबामध्ये होता. तो पहिल्यांदाच अहमदाबादला गेला होता. त्याचे वडील लष्करातून निवृत्त होऊन मेट्रो स्टेशनवर सुरक्षा रक्षक म्हणून नोकरीला लागले होते. आर्यन बारावीची पुस्तकं खरेदी करण्यासाठी आणि वडिलांसाठी वेळ घालवण्यासाठी अहमदाबादला आला होता.आर्यनच्या वडिलांनी मेघानीनगरमध्ये विमानतळाच्या जवळच एक घर भाड्यानं घेतलं होतं.

# एकीकडे करार झाल्याचा दावा; दुसरीकडे इराणवर हल्ल्याची तयारी

## ट्रम्प यांच्या दाव्यांवरून मोठा संभ्रम, युद्ध थांबणार की भडकणार?

**नवी दिल्ली : दि. १२ वृत्तसंस्था**

अमेरिका आणि इराणमधील यद्ध एका अत्यंत संवेदनशील वळणार पोहोचले असून, गुरुवारी घडलेल्या नाट्यमय घडामोडींमुळे संपूर्ण जग चक्रावून गेले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प एकीकडे युद्ध तात्काळ थांबून शांतता करार यशस्वी होत असल्याचा दावा ककरत आहेत, तर दुसरीकडे प्रत्यक्ष परिस्थिती पाहता युद्धाचा धोका आधीपेक्षा कितीतरी पटीने वाढल्याचे दिसत आहे. ट्रम्प यांच्या या परस्परविरोधी विधानांमुळे आतंरराष्ट्रीय पातळीवर मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

गुरुवारी सकाळी कमांडर-इन-चीफ डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या खार्ग बेट या मुख्य तेल निर्यात केंद्रावर थेट लष्करी हल्ला करण्याची आणि तिथे घुसण्याची उघड धमकी दिली. हा लष्करी थरार झाला असता, तर अनेक अमेरिकन सैनिकांचे प्राण धोक्यात येऊ शकले असते आणि जागतिक स्तरावर कच्च्या तेलाचा पुरवठा पूर्णपणे ठप्प झाला असता. पण अवघ्या काही तासातच ट्रम्प यांनी ओव्हल कार्यलयातून



अमेरिका आणि इराण यांच्यात एका सामंजस्य करारावर शिक्कामोर्तब होणार असून, युद्ध थांबण्याच्या उंबरठ्यावर आहे. ट्रम्प यांनी हा करार थोडा विचार करायला लावणारा आहे असे म्हटले, ज्यामुळे संभ्रम अधिक वाढला आहे.दरम्यान, अमेरिकेच्या बायडेन प्रशासनात हवाई दलाचे सचिव राहिलेले फ्रँक केंडल यांनी सीएनसीएनशी बोलताना सांगितले की, ट्रम्प यांच्या या दाव्यांकडे फार गांभार्याने घेण्याची गरज नाही. हा युद्ध संपवणारा कोणताही अंतिम करार नाही. हा केवळ पुढील ६० दिवसांसाठी युद्धविराम वाढवण्याचा एक प्रयत्न असू शकतो, जेणेकरून इराणच्या अणू कार्यक्रमावर पुढील चर्चा करता येईल.

दुसरीकडे, अमेरिकेतील उजव्या विचारसरणीचे रिपब्लिकन नेते आणि फॉक्स न्यूज वृत्तवाहिनीचे विश्लेषक मार्क लेविन यांनीही ट्रम्प यांना घेरले आहे. ते म्हणाले, जोपर्यंत हा करार अधिकृतपणे समोर येत नाही आणि पुढील ४८ ते ७२ तासात त्यावर स्वाक्षऱ्या होत नाहीत, तोपर्यंत ट्रम्प यांच्या दाव्यांवर विश्वास ठेवता येणार नाही.दरम्यान, इराणसोबत सुरू असलेल्या या युद्धात आतापर्यंत १३ सैनिकांचा मृत्यू झाला आहे, तर कोट्यवधि डॉलर्सची लष्करी शस्त्रे आणि विमान उद्ध्वस्त झाली आहेत. या युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला आहे. त्यामुळे अमेरिकन जनताच ट्रम्प यांच्या विरोधात जाऊ लागीली आहे. आता माजी अध्यक्ष बराक ओबामा यांनी २०१५ मध्ये इराणसोबत केलेला ऐतिहासिक अणू करार ट्रम्प यांनी २०१८ मध्ये स्वतःच्या हट्टापायी मोडीत काढला होता. मग एवढे युद्ध करून, निष्पापांचे बळी घेऊन त्यांना काय मिळणार आहे?, असा प्रश्न ट्रम्प यांना विचारला जात आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनी असाही दावा केला आहे की, इराणच्या सर्वोच्च नेत्यांनी या कराराला मंजुरी दिली आहे.

# भारताकडून पहिल्यांदाच १२ मिसाईल्स तैनात

## अख्खा पाकिस्तान टप्प्यात, शेजारी दहशतीत

**नवी दिल्ली : दि. १२ वृत्तसंस्था**

यावेळी भारताच्या शक्तिला पाकिस्तानच नाही तर; लंडन, युरोप, वॉशिंग्टन हे पाश्चिमात्ये देशही हादरले आहेत. भारत आता केवळ दक्षिण आशियापुरता मर्यादित नसून, एक ग्लोबल सुपरपावर बनण्याच्या दिशेने वळत आहे. असे वक्तव्य स्वतःच घाबरलेल्या पाकिस्तानने केला आहे. पाकिस्तानच्या एका वरिष्ठ संरक्षण अधिकाऱ्याने, नुकत्याच भारताने विकसित केलेल्या आणि सध्या प्रगत टप्प्यात असलेल्या लांब पल्ल्याच्या क्षेपणांस्त्रांची शक्ती पाहता हा दावा केला आहे. या क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाच्या मदतीने भारताने जागतिक स्तरावर आपला दबदबा निर्माण केला असून, पाकिस्तानासह पाश्चिमात्य देशांनाही घाम फोडणाऱ्या हे क्षेपणास्त्र कोणते आहे आणि याची ताकद काय आहे, ते जाणून घेऊया.

सेंटर फॉर इंटरनेशनल स्ट्रॅटेजिक स्टडीज तर्फे आयोजित केलेल्या पाकिस्तानच्या अणूकार्यक्रमावरील एका कार्यक्रमात राष्ट्रीय कमान



प्राधिकरणाचे सल्लागार लेफ्टिनेंट जनरल मजहर जमील यांनी एक वक्तव्य केले. त्यांनी दावा केला की, भारताच्या इंटरकॉन्टिनेंटल बॅलिस्टिक मिसाइलचा उद्देश भारताला अशी जागतिक अणूशक्ती बनवणे आहे ज्याच्या टप्प्यात प्रमुख पाश्चिमात्य देशांच्या राजधान्या देखील येऊ शकतील.

तसेच मजहर यांनी पाश्चिमात्य देशांच्या सरकारांना भारताच्या या वाढत्या लष्करी आधुनिकीकरणाची गंभीर दखल घेण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी स्पष्ट केले की, भारताच्या या क्षेपणास्त्र प्रणाल्या पाश्चिमात्य देशांच्या राजधान्यांपर्यंत पोहोचू शकतात. हे भारताच्या लष्करी आधुनिकीकरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यांनी पाश्चिमात्य देशांना या बाबतीत सावध राहण्याचा सल्ला दिला आहे.

पाकिस्तानी जनरलच्या या वक्तव्यावरून स्पष्ट होते की, भारताने विकसित केलेल्या आणि सध्या प्रगत टप्प्यात असलेल्या लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांमुळे पाश्चिमात्य जगाची झोप उडाली आहे. भारताच्या ताकदीची झलक दाखवणाऱ्या काही प्रमुख क्षेपणास्त्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे:

अग्नि-५ : अधिकृतपणे ५,५०० किमी रेंज असलेली ही मिसाइल संरक्षण तज्ज्ञांच्या मते ८,००० किमीपर्यंत लक्ष्य करू शकते. यात वापरण्यात आलेले एमआयआरव्ही तंत्रज्ञान एकाच वेळी अनेक शहरांवर अचूक अणू हल्ला करण्यास सक्षम आहे.

अग्नि-६ : हे भारताचे नवीन सुपर अस्त्र बनवण्याचे काम शेवटच्या टप्प्यात आले आहे. जून २०२६ मध्ये ओडिशा समुद्रकिनाऱ्यावर त्याची चाचणी होणार असल्याने तिथे सतर्कता बाळगण्यात आली आहे.

# पेंटागॉनमध्ये हाय-ड्रामा! लष्करी मुख्यालयात लॉकडाऊन

**नवी दिल्ली : दि. १२ वृत्तसंस्था**

जगातील सर्वात शक्तिशाली देशाचे आणि अमेरिकेच्या संरक्षण विभागाचे मुख्यालय असलेल्या 'पेंटागॉन' इमारतीत नुकताच एक असा प्रसंग घडला, ज्याने काही काळासाठी संपूर्ण अमेरिकन प्रशासनाला हादरवून सोडले. इमारतीमधील अत्याधुनिक सुरक्षा प्रणालीने अचानक हवेच्या गुणवत्तेत बिघाड झाल्याचा संकेत दिला. हा इशारा मिळताच कोणतीही जोखीम न पत्करता संपूर्ण इमारतीमध्ये तातडीने सुरक्षा प्रोटोकॉल लागू करण्यात आला. अत्यंत संवेदनशील समजल्या जाणाऱ्या या मुख्यालयात अचानक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्याने जगभरातील माध्यमांचे लक्ष वॉशिंग्टनकडे वेधले गेले.

काय आहे 'हॅझमॅट' घटना? ज्याने वाढवले टेन्शन!

पेंटागॉनच्या अंतर्गत सुरक्षा यंत्रणेकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, ही घटना 'हॅझमॅट' म्हणजेच धोकादायक रासायनिक किंवा जैविक पदार्थांशी संबंधित होती. हॅझमॅट अंतर्गत असे घातक वायू, रसायने किंवा जैविक घटक येतात जे मानवी जीवन, पर्यावरण आणि मालमत्तेचे



अपरिमित नुकसान करू शकतात. पेंटागॉनसारख्या अतिसुरक्षित इमारतीत अशा पदार्थांचा वावर असणे किंवा तसा इशारा मिळणे हा थेट राष्ट्रीय सुरक्षेला धोका मानला जातो. भूतकाळातील अँथ्रॅक्स सारख्या जैविक हल्ल्यांचा इतिहास पाहता, अशा इशाऱ्यांना अमेरिकन सुरक्षा यंत्रणा अत्यंत गांभीर्याने घेतात. यामुळेच हा संदेश धडकताच संपूर्ण यंत्रणा हाय-अलर्टवर आली.सुरक्षेचा अलार्म वाजताच पेंटागॉनमध्ये तैनात असलेल्या 'पेंटागॉन फोर्स प्रोटेक्शन एजन्सी' आणि शेजारील आर्लिंग्टन काउंटी अग्निशामक दलाच्या हॅझमॅट पथकाने तातडीने इमारतीचा ताबा घेतला.

# स्थलांतरितांविरुद्धच्या हिंसक निदर्शनांमुळे चिंता वाढली

## भारतीयांचे 'युरोपियन स्वप्न' धोक्यात?

**बेलाफास्ट : दि. १२ वृत्तसंस्था**

युरोपीय देश आयर्लंडची राजधानी बेलाफेस्ट येथे एका आयरिश व्यक्तीवर चाकू हल्ल्यानंतर तीव्र हिंसाचार उफाळला आहे. स्थलांतरितांविरोधात तीव्र निदर्शने सुरु असून त्यांच्या घरावर हल्ले केले जात आहे. वाहनांची जाळफोळ सुरु आहे. यामुळे प्रचंड अस्थिरता निर्माण झाली आहे. मात्र, यामुळे युरोपमध्ये शिक्षण, नोकरी आणि स्थायिक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारतीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहेत.

प्रचंड हिंसक परिस्थिती

ब्रिटन, आयर्लंड, जर्मनी आणि नेदरलँड्ससारख्या देशांमध्ये



स्थलांतराच्या मुद्द्यावरुन राजकीय आणि सामाजिक तणाव वाढत आहे. अनेक ठिकाणी हिंसक निदर्शने सुरु असून सरकारकडून व्हिसा नियम कडक केले जात आहे. उत्तर आयर्लंडची राजाधानी बेलाफेस्टमध्ये सुरु असलेल्या हिंसक निदर्शनांमुळे परिस्थिती अधिक तणावपूर्ण बनली आहे. याचे अनेक थरारक व्हिडिओ देखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यांवर उतरले असून स्थलांतरितांच्या घरांवर, दुकानांवर आणि वाहनांवर हल्ले केले जात आहेत. स्थलांतर लोकांविरोधात तीव्र घोषणाबाजी केली जात असून सरकारच्या धोरणांविरोधातही तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. डब्लिन, लंडन आणि ग्लासगोससारख्या शहरांमध्येही वातावरण तापले आहे. वाढती महागाई, घराची टंचाई, रोजगाराच्या कमी संधी, सार्वजनिक सुविधांवर ताण यासाठी स्थलांतरितांना जबाबदार धरले जात आहे. युरोपीय देशांमध्ये निर्वासितांची संख्या वाढत असून हा मुद्दा राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

भारतीयांवर होणार परिणाम?

या हिंसाचासाराचा परिणाम भारतीयांवरही होण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे. युरोमध्ये मोठ्या प्रमाणावर भारतीय विद्यार्थी, डॉक्टर, आयटी इंजिनियर्स आणि व्यावसायिक कार्य करत आहे. मात्र, वाढत्या विरोधामुळे भविष्यात विद्यार्थी व्हिसा, वर्क परमिट आणि स्थायी नागरिकत्वावर युरोपीय देशांच्या सरकारकडून अधिक कठोर नियम लागू होण्याची शक्यता आहे.

युरोपमध्ये कुश मनुष्यबळाची गरज अजूनही आहे. परंतु वाढता हिंसाचार लक्षात घेता भारतीयांसाठी ही संधी पूर्णपणे बंद होऊ शकते.

## इतिहास

### असा होता कैलाशनाथ मंदिर बांधण्यामागचा 'प्रापोगंडा'!

# 'कैलाशनाथ मंदिर' होते राष्ट्रकुटांच्या शाही 'प्रचाराचे तंत्र'?

**नवी दिल्ली : दि.१२ वृत्तसंस्था**

भारत इतिहास काळापासूनच मंदिरांनी, वास्तुशिल्पांनी संपन्न असा भाग राहिलेला आहे. आपल्या या भारताच्या भूमीवर अनेक राज्यं, साम्राज्य, सल्तनती होऊन गेल्या; तेव्हा राजेशाही-हुकूमशाही होती आता लोकशाही आहे. पण बऱ्याच अंशी काही गोष्टी बदलत नसतात. इतिहासात जे राजे सम्राट होऊन गेले. त्यांनी आपल्या राज्याची साम्राज्याची ख्याती दूरपर्यंत पसरावी. आपली प्रबळता, आपल्या राज्याचा प्रचार आणि शक्ती प्रदर्शन करण्यासाठी वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब केला. किंबहुना तो आजही केला जातो आणि प्रत्येक क्षेत्रात केला जातो. या प्रचार आणि शक्ती प्रदर्शनालाच आजच्या वेळेत



प्रॉपगेंडा असं म्हटलं जातं, जो सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक अशा वेगवेगळ्या माध्यमांतून धोरणात्मक दृष्टीने पसरवला जातो. प्रत्येक धोरणांमध्ये विशिष्ट कारण लपलेली असतात.

भारताच्या प्राचीन, मध्ययुगीन काळात वेगवेगळे राजवंश उदयाला आले; समृद्धीच्या शिखरावर पोहोचले आणि लयास गेले. मग त्यामध्ये गुप्त, चोल, सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट अशा बऱ्याच मोठ्या राजवंशांची नावे घेता येतील. प्रत्येकाच्या महत्त्वकांक्षांनी आपसी वैरांनी, एकमेकांबरोबर युद्ध करून आपापल्या राजवंशाची अस्तित्व टिकवण्याच्या चळवळीत बरीच हानी करून घेतली. या सगळ्यात मात्र, प्रत्येकाने आपली शक्ती संपत्ती दाखवण्याचा कसून प्रयत्न केला, ज्यामध्ये खूप जण यशस्वीही ठरले. भारतात प्राचीन आणि पूर्व मध्ययुगीन काळात जे शक्तिप्रदर्शन केलं जायचं ते मोठमोठे बलाढ्य मंदिर बांधून. त्या मंदिरांची संपन्नता, ऐश्वर्य, रीती रिवाज, स्थापत्य पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनसमुदाय यायचा. प्रदेशातील प्रवासही यायचे. या माध्यमातून त्या मंदिरांची, वास्तुशिल्पांची ख्याती तर पसरायचीच पण बरोबरच त्या राजाची, राज्याची समृद्धीची चर्चा दूरपर्यंत पसरायची.

याचाच एक उत्तम उदाहरण म्हणजे वेरूळचे कैलाशनाथ मंदिर ई.स. ७५७ ते ७७५ मध्ये म्हणजे जवळपास आठव्या शतकात राष्ट्रकुट राजा कृष्ण पहिला यांनी या मंदिराची निर्मिती केली. १८व्या शतकात चालुक्य आणि राष्ट्रकूट राज्यातील युद्धांमध्ये राजा दंतीदुर्गाने चालुक्यांचा पराभव केला. या विजयाच्या स्मरणार्थ आपल्या धोरणात्मक गोष्टींना लक्षात ठेवून राष्ट्रकूट राजाच्या राजवंशाचा विस्तार करण्यासाठी वेरूळच्या लेण्यांमधील हे कैलाशनाथाचे मंदिर, राजा दंतीदुर्गाचा उत्तराधिकारी राजा कृष्ण पहिला याने बांधले. हे मंदिर स्वतःमध्ये एक आश्चर्य आहे. एकाश्म, म्हणजे एकाच दगडात वरून खाली पर्यंत कोरलेले हे मंदिर शिल्पकलेचा आणि प्राचीन वास्तू कलेचा अनन्यसाधारण उदाहरण म्हणून उभं आहे. या मंदिरा द्वारे राष्ट्रकूट राजा कृष्ण पहिला यांना एका प्रकारे आपल्या सत्तेचं धोरणात्मक शक्ती प्रदर्शन केलं. कैलासनाथ मंदिर जे हिंदू देवता भगवान शंकरांना समर्पित आहे. या दैवी शक्तीशी आपल्या राजवंशाची नाळ जोडून, आपल्या सत्तेला देवतांचा आशीर्वाद आहे असं बिंबवण्याचा प्रयत्न यातून केलेला दिसतो. कैलासनाथ मंदिर फक्त धार्मिक प्रतीक नसून राष्ट्रकूट साम्राज्याच्या एकतेचे ही प्रतिक म्हणून सिद्ध झालं. या मंदिराचा निर्माण करून मोठ्या हिंदू समुदायाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक प्रथा परंपरांना, रीतीरीवाजांना छत्र छाया देऊन राजा कृष्ण पहिला, याकडे धर्मरक्षकाच्या नजरेने पाहण्यात येऊ लागलं.कैलासनाथ मंदिरांसारख्या वास्तू बांधून सांस्कृतिक आणि कलाक्षेत्रातील सर्वोच्चता दाखवण्याचाही प्रयत्न केला गेला असावा.


# प्रियकरसाठी चाळिशीच्या सुमाने नवऱ्याला संपविले

**बेळगाव : दि. १२ वृत्तसंस्था**

मार्च महिन्यात कर्नाटकात झालेल्या आणखी एक हत्या प्रकरणाचे गूढ अखेर उलगडले आहे. बंगळुरुतील वेन्नेला नामक तरुणीच्या खून प्रकरणाची उकल झाल्यानंतर काही दिवसांतच पोलिसांसमोर पेच निर्माण करणाऱ्या एका माजी सैनिकाच्या संशयास्पद मृत्यूचे प्रकरण सोडवण्यातही आता यश आले आहे.

घटनाक्रम आणि तपासादरम्यान बारकाईने केलेल्या निरीक्षणाच्या आधारे, बेळगाव पोलिसांनी ४६ वर्षीय माजी सैनिक संदीप मंजरगी यांच्या मृत्यूचे प्रकरण उघडकीस आणले. पत्नी आणि तिचा प्रियकर कचाट्यात सापडले आहेत.

यामागील मुख्य कारण म्हणजे, संदीप मंजरगी यांची ४० वर्षीय पत्नी सुमा हिला आपल्या पतीला संपवायचे होते, जेणेकरुन ती आणि तिचा २६ वर्षीय प्रियकर



पुंडलिक डोंबर हे दोघेही कोणत्याही अडथळ्याविना एकत्र आयुष्य जगू शकतील; तसेच, संदीपच्या २ कोटी रुपयांच्या विमा रकमेवरही तिचा डोळा होता. या दोघांनीही गुन्हा केल्याची कबुली दिल्याचे समजते. त्यांना अद्याप अटक करण्यात आलेली नाही.

सुमाचा प्रियकर पुंडलिक हा तिचा पती संदीप याच्या हॉटेल व्यवसायातील भागीदार होता. जेव्हा तो व्यवसाय बंद पडला, तेव्हा पुंडलिक त्या कुटुंबाकडेच चालक म्हणून काम करु लागला. हुक्केरी तालुक्यातील घोडागेरी गावचा रहिवासी असलेल्या संदीपला, १३ मार्च रोजी गोकाक तालुक्यातील घटप्रभा शहरांजवळ झालेल्या दुचाकी अपघातात किरकोळ दुखापत झाली.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी डी. बी. कार्पोरेशन लिमिटेड, दिव्य मराठी, एन.एच.६, बनारसी धाब्याजवळ, बोरगाव मंजू, अकोला - ४४४००१ येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन, बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला- ४४४००१ येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले साहित्य या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## तृणमूलची साडेसाती!

यंदाच्या विधानसभा निवडणूक निकालानंतर पश्चिम बंगालमध्ये आलेले ममतांविरोधातील वादळ शमण्याचे नावच घेत नाही. गेल्या आठवड्यामध्ये तृणमूल काँग्रेसच्या आमदारांचे बंडाचे नाट्य देशाने पाहिले. आता ममता बॅनर्जी 'इंडिया' आघाडीच्या बैठकीसाठी दिल्लीत असताना पक्षाच्या सुमारे २० खासदारांनी बंड करीत भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) पाठिंबा देण्याबाबत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र पाठवण्याचा निर्णय घेतला. तृणमूलचे ज्येष्ठ खासदार सुखेंदू शेखर रॉय यांच्या पुढाकाराने झालेल्या या गुप्त बैठकीनंतर यातील काही खासदारांनी प. बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी व भाजप नेते भूपेंद्र यादव यांची दिल्लीत भेट घेऊन संसदीय पक्षाच्या फुटीवर शिक्कामोर्तब केले. बंडखोर खासदारांमध्ये शताब्दी रॉय, काकोली घोष दस्तीदार, अबू ताहिर, प्रसून बॅनर्जी आणि शर्मिला सरकार आदी प्रमुख चेहऱ्यांचा समावेश आहे. त्यांनी राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था, चुकीचे प्रशासन आणि भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांवरून पक्ष नेतृत्वावर जाहीर टीका केली. कोलकाता येथील आर. जी. कर रुग्णालयातील घटनेनंतर पक्षावर नाराज असलेले राज्यसभा खासदार सुखेंदू शेखर रॉय यांनी खासदारकीचा आणि पक्षाचा राजीनामा दिला आहे. जहाज बुडू लागल्यानंतर प्रवासी उड्या मारून बाहेर पडू लागतात, तशी स्थिती आज तृणमूलची आहे. विधिमंडळ आणि संसदेतील लोकप्रतिनिधींनी नेतृत्वाविरोधात जाहीर भूमिका घेण्याची घटना तृणमूल काँग्रेसच्या इतिहासात पहिल्यांदाच दिसली. काँग्रेसमधून बाहेर पडून १ जानेवारी १९९८ रोजी ममता बॅनर्जी यांनी ऑल इंडिया तृणमूल काँग्रेसची स्थापना केली. तेव्हापासून गेल्या तीन दशकांत या पक्षाने लोकसभेत अनेक चढ-उतार पाहिले. १९९८ मधील लोकसभा निवडणुकीत तृणमूलने २९ जागा लढवून ७ जागा जिंकत राष्ट्रीय राजकारणात स्वतःचे अस्तित्व निर्माण केले. त्यानंतर वर्षभरात म्हणजेच १९९९ च्या १३ व्या लोकसभा निवडणुकीत टीएमसीने ८ जागा जिंकल्या आणि वाजपेयी यांच्या रालोआ सरकारमध्ये सहभाग घेतला. या काळात ममता रेल्वेमंत्री होत्या. तथापि, २००४ मधील १४ वी लोकसभा निवडणूक तृणमूलसाठी निराशाजनक ठरली. या निवडणुकीत स्वतः ममता बॅनर्जी या एकमेव प्रमुख विजयी उमेदवार होत्या; मात्र सिंगूर आणि नंदीग्राम येथील शेतकरी आंदोलनाचा फायदा घेत २००९ पासून तृणमूलची जी घोडदौड सुरू झाली ती २०२६ पर्यंत कायम राहिली. १५ व्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेससोबत युती करून तृणमूलने १९ जागा जिंकत मनमोहन सिंग सरकारमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. २०१४ मध्ये देशात भाजपची लाट असतानाही तृणमूलने प. बंगालमधील ४२ पैकी ३४ जागा जिंकल्या होत्या. लोकसभेत बहुमताचा आकडा गाठण्यासाठी किंवा मजबूत विरोधी आघाडीसाठी हा पक्ष नेहमीच केंद्रस्थानी राहिला. त्यामुळे ममतादीदींच्या राष्ट्रीय महत्त्वाकांक्षांना धुमारे फुटले होते. संघर्षातून मिळालेल्या यशातून एकप्रकारचा अहंकार ममतादीदींसह प. बंगालमधील तृणमूलच्या नेत्या-कार्यकर्त्यांमध्ये भरला होता; पण यंदा निवडणुकांमध्ये बंगाली जनतेनेच ममतांचे गर्वहरण केले. त्यामुळे आता त्या विरोधी ऐक्यासाठी आग्रही भूमिका घेत दिल्लीतील महत्त्वाच्या बैठकीत सहभागी झाल्या. सध्याच्या कठीण परिस्थितीत राजकीयदृष्ट्या एकटे पडणे पक्षाच्या अस्तित्वासाठी अधिक घातक ठरू शकते, याची जाणीव ममतांना आहे. लोकसभेच्या जागावाटपावरून किंवा नेतृत्वाच्या मुद्द्यावरून काँग्रेससोबत सातत्याने वाद घालणाऱ्या ममता काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीत स्वतःला सामावून घेण्यासाठी आग्रही दिसत आहेत. राष्ट्रीय पातळीवर 'इंडिया' आघाडीचे सुरक्षा कवच मिळवणे आणि भाजपविरोधात संघटित राहणे ही सध्या त्यांची राजकीय गरज आहे. पूर्वी 'एकला चलो रे'चा नारा देणाऱ्या ममतांनी 'विरोधी पक्षांनी एकमेकांवर टीका करणे टाळावे' असा सल्ला देणे हा काळाचा उलटफेर किंवा परिस्थिती शरणता आहे. पंधरा वर्षांची एकहाती सत्ता गमावल्यानंतर पक्ष ज्या गतीने विस्कळीत होत आहे, ते पाहता हा वर्षानुवर्षे पक्षात साचत गेलेल्या असंतोषाचा आणि केंद्रीकृत सत्तेविरोधातील संतापाचा स्फोट असल्याचे स्पष्ट होते. ही अधःपतनाची सुरुवात म्हणावी लागेल. प. बंगालच्या राजकारणात सत्ताबदलानंतर पक्ष कमकुवत होण्याची परंपरा नवीन नाही; मात्र तृणमूलच्या बाबतीत ही प्रक्रिया ज्या वेगाने घडत आहे, त्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. या राज्यात १९७७ मध्ये सत्ता गमावल्यानंतर काँग्रेस अनेक वर्षे प्रभावी राजकीय शक्ती म्हणून टिकून राहिली. २०११ मध्ये सत्तेवरून पायउतार झालेल्या डाव्या आघाडीनेही काही काळ आपले संघटनात्मक अस्तित्व कायम ठेवले; परंतु तृणमूलबाबत परिस्थिती वेगळी दिसते. या पक्षाच्या संघटनात्मक संरचनेलाच हादरा बसला. भारतात अनेक पक्षांनी गंभीर संकटांनंतर पुनरागमन केले; मात्र त्यासाठी नेतृत्वाला वास्तव स्वीकारावे लागते. संघटनात्मक सुधारणा कराव्या लागतात आणि जनतेचा विश्वास पुन्हा मिळवावा लागतो. तृणमूलसमोरही हेच आव्हान आहे. पक्षाने नेतृत्व, कार्यपद्धती आणि जनाधार या तिन्ही स्तरांवर आत्मपरीक्षण केले नाही, तर सध्याचे संकट आणखी गडद होऊ शकते. लोकसभेतील फुटीर खासदारांनी काकोली घोष दस्तीदार यांना नेत्या म्हणून मान्यता देण्याची मागणी केली आहे. या खासदारांच्या अधिकृत फुटीमुळे लोकसभेतील रालोआचा बहुमताचा आकडा ३०० च्या पार जाऊ शकतो. तसेच ममता यांच्या हातातून मूळ पक्ष आणि अधिकृत निवडणूक चिन्ह निसटणार, हे स्पष्ट होत चालले आहे. मोदी सरकारचा अश्वमेध रोखण्यासाठी एकजुटीने उभ्या राहिलेल्या 'इंडिया' आघाडीसाठी तृणमूलची वाताहत हादरा देणारी आहे. द्रमुकने आधीच या आघाडीतून बाहेर पडल्याची घोषणा केली आहे. उद्धव ठाकरेही वेगळा विचार करत असल्याची चर्चा आहे. राजकीय बलाबलाच्या दृष्टीने आतापर्यंत त्यातल्या त्यात तृणमूल काँग्रेस वरचढ होता; पण आता ममता स्वतःच राजकीय अस्तित्वाच्या शोधात मैदानात उतरल्या आहेत. वर्तमानकाळात घडणाऱ्या राजकीय घडामोडींवरून भविष्यातील राजकीय चित्राचा अंदाज लावणे फारसे कठीण नसते. त्यादृष्टीने सध्याच्या संघर्षामध्ये ममता बॅनर्जी विजयी होण्याच्या शक्यता धूसर आहेत. सत्तेचा गैरवापर करून स्वतःला सर्वसत्ताधीश समजण्याची चूक ममता बॅनर्जी आणि त्यांचे पुतणे अभिषेक बॅनर्जी यांच्या अजूनही लक्षात आली नाही, तर भविष्यात उरलेसुरले नेते-कार्यकर्तेही सोडचिठ्ठी देण्याचा धोका आहे. राजकीय सत्ता हातातून गेल्यानंतर निर्माण होणारे हे अस्तित्वाचे संकट तृणमूल काँग्रेसला कोणत्या वळणावर घेऊन जाते, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

## ।। अभंगवाणी ।।

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

भ्रम हा भ्रमाचा
ना असे कुणाचा ।
भ्रम 'मी' पणाचा
भूल देई ।।

भुरळी आकाश
भ्रम ना प्रकाश ।
होयील विनाश
शनार्धात ।।

भ्रमात फुलला
भ्रमात फुगला ।
क्षणात फुटला
भ्रम सारा ।।

सांगतो प्रवीण
नाहीच नवीन ।
भ्रमास ना विन
विचारांत ।।

# पावसाच्या चाहुलीत पेरणीचे नियोजन : बदलत्या वातावरणात शेतकऱ्यांची सज्जता

प्रासंगिक

डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२

भारतीय कृषी व्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी आजही मोठ्या प्रमाणात निसर्गावर अवलंबून आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रगतीची अनेक शिखरे गाठली असली, तरी शेतीच्या बाबतीत पाऊस हा अजूनही सर्वांत महत्त्वाचा घटक मानला जातो. विशेषतः महाराष्ट्रासारख्या राज्यात खरीप हंगामाची सुरुवात ही मान्सूनच्या आगमनाशी निगडित असते. जून महिन्याच्या सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागलेल्या असतात. काळे ढग दाटून येतात, वाऱ्यांची दिशा बदलते आणि वातावरणात ओलावा वाढू लागतो. ही केवळ ऋतूची चाहूल नसते, तर ती लाखो शेतकरी कुटुंबांच्या आशा-आकांक्षांची सुरुवात असते. बी-बियाण्यांच्या पिशव्या, नांगरलेली शेतजमीन, खतांची उपलब्धता आणि आर्थिक नियोजन या साऱ्या गोष्टी पावसाच्या वेळेवर आणि स्वरूपावर अवलंबून असतात. त्यामुळे पेरणीसाठी योग्य वेळ निश्चित करणे ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची बाब ठरते.

सन २०२६ च्या खरीप हंगामाकडे पाहिले असता, हवामानातील बदल आणि मान्सूनच्या अनिश्चित स्वरूपामुळे शेतकऱ्यांसमोर नवी आव्हाने उभी राहिली आहेत. भारतीय हवामान विभागाने यंदा मान्सून समाधानकारक राहण्याची शक्यता व्यक्त केली असली, तरी पावसाचे भौगोलिक वितरण, त्याची तीव्रता आणि कालावधी यामध्ये असमानता आढळण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही भागांत अतिवृष्टी, तर काही ठिकाणी दीर्घकालीन पावसाचा खंड अशा परिस्थितींना सामोरे जाण्याची तयारी शेतकऱ्यांना ठेवावी लागत आहे. त्यामुळे केवळ पाऊस सुरू झाला म्हणून पेरणी करण्याऐवजी, त्याची सातत्यता आणि जमिनीत साचणारी ओल यांचा विचार करून निर्णय घेणे आवश्यक ठरते.

महाराष्ट्रातील खरीप हंगामात प्रामुख्याने सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग, भात, मका आणि बाजरी यांसारख्या पिकांची लागवड केली जाते. राज्यातील विदर्भ, मराठवाडा, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण या विभागांमध्ये पर्जन्यमान आणि जमिनीचा प्रकार वेगवेगळा असल्याने पेरणीचा कालावधीही बदलतो. कोकणात जूनच्या पहिल्या पंधरवड्यात पेरणी सुरू होते, तर मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत पावसाच्या नियमिततेनुसार जूनच्या उत्तरार्धात किंवा जुलैच्या प्रारंभी पेरणी केली जाते. कृषी तज्ज्ञांच्या मते, सलग काही दिवस पुरेसा पाऊस झाल्यानंतर जमिनीत आवश्यक ओल निर्माण झाल्यासच पेरणी करणे अधिक फायदेशीर ठरते. घाईघाईने केलेली पेरणी आणि त्यानंतर पडलेला पावसाचा खंड यामुळे दुबार पेरणीची वेळ येऊ शकते, ज्याचा थेट परिणाम उत्पादन खर्चावर होतो.

बदलत्या हवामानामुळे शेती क्षेत्रात निर्माण होणाऱ्या समस्यांचे गांभीर्य दिवसेंदिवस वाढत आहे. तापमानातील वाढ, अवेळी पाऊस, गारपीट, दीर्घकाळ दुष्काळी परिस्थिती किंवा अचानक होणारी अतिवृष्टी या घटना आता अपवाद राहिलेल्या नाहीत. हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम हा कृषी क्षेत्रावर होत असून, त्याचा फटका सर्वसामान्य शेतकऱ्यांना बसत आहे. शेतीमालाच्या उत्पादनात घट, रोग-किडींचे वाढते प्रमाण आणि उत्पादन खर्चातील वाढ यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिकच डळमळीत होत आहे. त्यामुळे हवामानाशी सुसंगत शेती व्यवस्थापन विकसित करणे ही काळाची गरज बनली आहे.

आजच्या काळात हवामानाचा अंदाज आणि कृषी नियोजन यांचा परस्परसंबंध अधिक दृढ झाला आहे. भारतीय हवामान विभाग, कृषी विद्यापीठे आणि कृषी विज्ञान केंद्रांकडून वेळोवेळी शेतकऱ्यांना हवामानविषयक सल्ला दिला जातो. मोबाईल संदेश, विविध ॲप्स, रेडिओ, दूरदर्शन आणि सामाजिक माध्यमांच्या माध्यमातून हवामानविषयक माहिती सहज उपलब्ध होत आहे. तथापि, या माहितीचा उपयोग करून वैज्ञानिक पद्धतीने निर्णय घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण वाढविण्याची गरज आहे. हवामानाचा अंदाज, पिकांची निवड, पेरणीचा कालावधी आणि खत व्यवस्थापन यांचा योग्य समन्वय साधल्यास संभाव्य नुकसान टाळता येऊ शकते.

आजच्या काळात कृषी सल्लागारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची बनली आहे. कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे, तालुका कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी आणि विविध संशोधन संस्था या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीविषयक माहिती उपलब्ध करून दिली जाते. मोबाईल तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे हवामान अंदाज, बाजारभाव, रोग-किडींची माहिती आणि पीक व्यवस्थापनाचे सल्ले शेतकऱ्यांपर्यंत सहज पोहोचू लागले आहेत. तथापि, माहितीची विश्वासार्हता आणि तिचा योग्य वापर याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कृषीविषयक निर्णय घेताना प्रमाणित स्रोतांवर आधारित माहितीचा वापर करणे ही आजच्या शेतकऱ्याची गरज बनली आहे.

शासनाच्या विविध योजनाही शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात. प्रधानमंत्री पीक विमा योजना, मृदा आरोग्य पत्रिका योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, कृषी यांत्रिकीकरण योजना आणि विविध राज्यस्तरीय अनुदान योजना यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. पीक विमा योजना ही नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण देणारी महत्त्वाची योजना मानली जाते.

शेतकरी उत्पादक कंपन्या आणि स्वयं-सहाय्यता गट हे ग्रामीण विकासाचे प्रभावी माध्यम ठरू शकतात. सामूहिक खरेदी, सामूहिक विक्री आणि तांत्रिक सल्ल्याच्या माध्यमातून लहान शेतकऱ्यांनाही स्पर्धात्मक बाजारपेठेत टिकून राहण्याची संधी मिळू शकते. एकट्याने संघर्ष करण्यापेक्षा समूहाच्या माध्यमातून पुढे जाण्याची मानसिकता विकसित होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील युवकांनी कृषी उद्योजकतेकडे वळल्यास शेती क्षेत्रात नवे बदल घडू शकतात.

पेरणीसाठी योग्य वेळ निश्चित करणे ही केवळ तांत्रिक बाब नसून ती शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित प्रक्रिया आहे. योग्य वेळी घेतलेला निर्णय उत्पादन वाढवू शकतो, तर चुकीच्या वेळेवर केलेली पेरणी मोठ्या आर्थिक नुकसानीस कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे हवामान अंदाज, जमिनीतील ओलावा, बियाण्यांची उपलब्धता आणि संसाधनांची तयारी या सर्व बाबींचा विचार करूनच पेरणी करणे आवश्यक आहे. कृषी तज्ज्ञांच्या मते, संयम आणि नियोजन या दोन गोष्टी खरीप हंगामातील यशस्वी शेतीचे मूलमंत्र आहेत.

महाराष्ट्रातील शेतकरी अनेक संकटांना तोंड देत असतानाही नव्या उमेदीने शेती करीत आहे. नैसर्गिक आपत्ती, आर्थिक अडचणी आणि सामाजिक बदल यांच्या छायेतही त्याची जिद्द अबाधित आहे. प्रत्येक खरीप हंगाम हा त्याच्यासाठी नव्या आशांचा, नव्या शक्यतांचा आणि नव्या संघर्षांचा प्रवास असतो. पावसाच्या पहिल्या सरी जमिनीला जशा नवसंजीवनी देतात, तशाच त्या शेतकऱ्यांच्या मनातही नव्या विश्वासाची पालवी फुलवतात.

आज आवश्यकता आहे ती शेतीकडे केवळ उपजीविकेचे साधन म्हणून न पाहता, ती एक महत्त्वपूर्ण राष्ट्रीय जबाबदारी म्हणून स्वीकारण्याची. अन्नसुरक्षा, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य यांचा पाया शेतीवरच उभा आहे. शेतकऱ्यांना सक्षम बनविण्यासाठी शासन, संशोधन संस्था, समाज आणि ग्राहक यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या श्रमांचा सन्मान करीत त्यांना आवश्यक सुविधा, योग्य बाजारपेठ आणि तांत्रिक मदत उपलब्ध करून देणे ही काळाची मागणी आहे.

# धोंडफयं

हिंद्यान

चंद्रशेखर अ. महाजन
मो. ९६२३२३८०९६

'' रूखमाबाई , तुमाले पांढरा बोक्या दिसला काय वं..?''
'' कामून वं नंदादुध पाजतं काय त्याले.''
'' माह्या घरी गाय ना म्हैस, त्याले कुठचं दूध पाजू .''
'' येवळी कामून धावपय करून राह्यली मंग..''
'' त्या बोक्यानं लय घोर करून ठेवला ना माय.''
'' काय झालंभाजीत तोंड घातलं काय ?''
'' नाही ना..ते चाललं असतं एकडावचं..पन..''
'' पन काय.. जरासक सांग तं खरी धिरानं.''
'' तुमाले सांगू की बोक्याले पाहू , तुमीच संगा.''
'' अवं तू सांगशील तं, मी पाहू लागतो ना..''
'' बाली येल हाय ना अधिक मयन्यासाठी.''
'' हाव. मंग तीलेई आवाज देतं काय पायाले.''
'' अवं नाई नातीले पावनचार होता ना आज.''
'' एकटीलेच ? पावने बॉ ले नाई बलावलं काय ?''
'' बलावलं ना. राह्यलं सगळं अन् हेच धस्कट आलं.''



'' काय झालं ते निदान पस्ट करून तं सांग.''
'' बालीचा पह्यलाच अधिक मयना होता ना.''
'' हाव.मंग तयारी तं चांगलीच केली असन.''
'' नाही तं काय. सगळा घोर केला या बोक्यानं..''
'' काय केलं हेच तं नाई समजलं मले अजून.''
'' पावन्यासाठी करेल मुंदी लांबोली ना या बोक्यानं..''
'तो काय चोर होय काय मुंदी लांबोयील तुह्यी'
'साजरी पाच गीरॅम ची केलती म्हटलं जाळीजटक'
'तू कशी काय म्हनतं की बोक्यानच नेली म्हनून'
'' अवं म्या साजरे धोंडफयं केले होते पुरनाचे.''
'' मंग काय झालं. चांगलच तं केलं तुह्या..''
'' तुमाले काय सांगू ,अतीच तं सगळा घोर झाला.''
'' त
सांगशील ताच माहित पळील ना वं मायमाजे.''
'' म्या एक मस्त पेशल धोंडफय केलं होतं अल्लग.''
'' ते अल्लग कायच्या साठी केलं वं माय तुह्या.''
'' कुकळून डोक्शात घुसलं तं त्यात मुंदी लपोलती.''
'' लयच हौशीपना केला वं, मंग देली काय पावन्याले.''
'' ततीच तं सगळं बिघळलं ना, मुंदी गेली ना.''
'' कुठी गेली मुंदी. तीले काय पाय फुटले काय..''
'' तयारी झालती,आरतीचं ताट काळाव म्हटलं.''
'' पुळे काय झालं ते तं सांग पटकन..''
'' तेवळ्यात मुंदीवालंच धोंडफय लाबोलं ना या बोक्यानं''
'' काय सांगतंलयच अकात झाला मंग तं..''
'' बुहाऱ्या वाऱ्याच्यानं झळपच घातली अन् खो झाला.''
'' नस्तच काम लावलं मंग तं या बोक्यानं माय .''
'' म्हनूनच तं पाहून राह्यलो ना सगळे झनं त्याले..''
'' पन मुंदी भेटली पाह्यजे ना आजच्या आज..''
'' ते पाहू मंग.पयले बोक्या तं सापळू द्या ना..'' '' ते पाय.तो सुरेसनं आनला धरून.सापळ्ळा बोक्या.'' '' कावं सापळलं त्याच्या तोंडातलं धोंडफय, मुंदी ?'' '' धोंडफयई खाल्ल.. त्याच्यासंगं मुंदी गीवली बोक्यानं.''
'' घेव्वं नंदा.. ! आता तं लयच घोर झाला वं माय..''
'' पन मुंदी कशी काळाव आता त्याच्या पोटातली''
'' सट खाऊ घाला लागते त्याले दोन तीन दिवस.''
'' मुंदी तं आजच पायजे होती पावन्याले द्या साठी''
'' मंग तं एकच इलाज हाये त्याले..पटिल तं पा ?''
'' सांगा ना पटकन.. मुंदी भेटली पाह्यजे ना आज.''
'' मंग बलावा डाक्टरले. करा आपरेशन.''
'' ऑ डायरेक आपरेशन..''
'' मंग.. मुंदी नाई पाह्यजे काय?''

# महसूलाच्या मोहात हरवलेला समाज आणि व्यसनांचा विळखा...

वास्तव

सतीश दामोदर
अकोला. मो. ९३७२९६६९३६

अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यातील विझोरा येथे घडलेली घटना अंतर्मन हादरवून टाकणारी आहे. दारूच्या नशेत एका मुलाने स्वतःच्या आईची गळा आवळून हत्या केली, ही केवळ एक गुन्हेगारी घटना नाही; तर ती समाजाच्या विदारक वास्तवाची, ढासळलेल्या संस्कारांची आणि व्यसनाधीनतेच्या भयावह परिणामांची जिवंत साक्ष आहे. ज्या आईने जन्म दिला, वाढवले, संकटात छातीचा ढाल बनून उभी राहिली, त्याच आईचा जीव दारूच्या नशेने घेतला यापेक्षा मोठी शोकांतिका कोणती असू शकते?

दारू ही केवळ एक पेय नसते; ती अनेक कुटुंबांच्या सुखाचा गळफास ठरते. एका व्यक्तीचे व्यसन संपूर्ण घर उद्ध्वस्त करते. घरातील आर्थिक कणा मोडतो, नात्यांमध्ये संशय वाढतो, हिंसा जन्म घेते आणि शेवटी संसाराची राख होते. ग्रामीण भागात तर ही परिस्थिती अधिक गंभीर आहे. हातावर पोट असणाऱ्या कुटुंबांमध्ये दिवसाची कमाई दारूच्या दुकानात वाहते आणि घरातील लेकरांच्या शिक्षणापासून ते औषधोपचारापर्यंत सर्वच गोष्टी दुय्यम ठरतात. आज अनेक राज्यांनी दारूबंदीचा मार्ग स्वीकारला आहे. काही ठिकाणी कठोर निर्बंध आहेत. मग महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात दारूबंदीबाबत ठोस भूमिका का घेतली जात नाही, हा प्रश्न सामान्य नागरिकांच्या मनात उभा राहतो. शासनाकडून महसूलाचे कारण पुढे केले जाते. परंतु महसूल मिळवण्याचे मार्ग फक्त दारू आणि व्यसनांवरच अवलंबून असावेत का? उद्योग, तंत्रज्ञान, पर्यटन, शेतीपूरक व्यवसाय, रोजगारनिर्मिती, निर्यात ङ्क असे असंख्य पर्याय असताना समाजाच्या जखमेवर महसूलाचे मलम लावण्याचा प्रयत्न कितपत योग्य आहे?

मीयाच धर्तीवर गुटख्याचा प्रश्नही अधिक गंभीर आणि चिंताजनक बनला आहे. आज सर्वसामान्य नागरिकांच्या मनात एक साधा पण अत्यंत महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो ङ्क जर गुटख्याचे उत्पादनच बंद केले, तर अवैध गुटखा बाजारात येणार तरी कुठून? दर काही दिवसांनी ङ्कअमुक ठिकाणी लाखो रुपयांचा गुटखा पकडलाङ्क, ङ्कतमुक




भागात धाडङ्क, ङ्कअवैध साठा जप्तङ्क अशा बातम्या सातत्याने समोर येतात. परंतु या पकडापकडीच्या पलीकडे जाऊन मूळ प्रश्नावर प्रहार करण्याची तयारी दिसत नाही. सामान्य माणसाला असे वाटणे साहजिक आहे की, फक्त कारवायांची आकडेवारी वाढवण्यापेक्षा उत्पादनच थांबवले, तर समाजाला या विषारी विळख्यातून बाहेर काढण्याचा खरा मार्ग मोकळा होईल.

गुटखा हा केवळ तंबाखूजन्य पदार्थ नाही; तो संथ गतीने शरीर पोखरणारे विष आहे. कर्करोग, हृदयरोग, तोंडाचे विकार, मानसिक ताण, आर्थिक हानी अशा असंख्य संकटांना तो आमंत्रण देतो. आज अनेक तरुण, कामगार, शेतकरी आणि अगदी अल्पवयीन मुलांपर्यंतही हे व्यसन पोहोचलेले दिसते. अर्थात, समाजातील प्रत्येक व्यक्ती गुटखा खातो असे नाही; अनेक जण त्याला विरोधही करतात. परंतु तंबाखूवर प्रक्रिया करून तयार होणारी ही उत्पादने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे जीवघेणी आहेत, हे वास्तव कुणीही नाकारू शकत नाही.

एका बाजूला शासन आरोग्यविषयक जनजागृती मोहिमा राबवते, कर्करोगमुक्त भारताचे स्वप्न दाखवते; तर दुसऱ्या बाजूला व्यसनांच्या मुळावर घाव घालण्याऐवजी केवळ कारवायांचा दिखावा होत असल्याची भावना समाजात वाढताना दिसते. महसूलाच्या नावाखाली समाजाच्या आरोग्याशी तडजोड करणे ही कोणत्याही संवेदनशील राज्यव्यवस्थेसाठी चिंतेची बाब आहे.

अर्थात, केवळ कायदे करून समस्या संपणार नाहीत. समाजालाही आत्मपरीक्षण करावे लागेल. पालकांनी मुलांमध्ये संस्कार रुजवले पाहिजेत, शिक्षणसंस्थांनी व्यसनमुक्तीचे प्रबोधन वाढवले पाहिजे आणि गावपातळीवर सामाजिक दबाव निर्माण झाला पाहिजे. व्यसन हे प्रतिष्ठेचे नव्हे तर विनाशाचे प्रतीक आहे, ही जाणीव समाजमनात रुजवणे काळाची गरज आहे.

विझोऱ्यातील ही घटना उद्या दुसऱ्या कोणत्या गावात घडू नये, यासाठी केवळ शोक व्यक्त करून चालणार नाही. शासन, समाज आणि कुटुंबव्यवस्था या तिन्ही स्तरांवर कठोर आणि संवेदनशील पावले उचलावी लागतील. अन्यथा महसूलाच्या आकड्यांमध्ये वाढ होत राहील आणि दुसऱ्या बाजूला उद्ध्वस्त संसारांची संख्या देखील.

व्यसनातून मिळणारा पैसा तिजोरी भरू शकतो; पण तो समाजाचे भविष्य कधीच घडवू शकत नाही.

# देव मंदिरात असता तर, मंदिराबाहेर बसून भीक मागण्याची वेळ कोणावरही आली नसती..!!

चर्चा

प्रविण बागडे
नागपूर, मो. 9923620919

भारतीय समाजात धर्म, श्रद्धा आणि देवस्थाने यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. गावोगावी उभ्या असलेल्या मंदिरांच्या उंच शिखरांपासून ते महानगरांतील भव्य देवालयांपर्यंत भक्तीचा अखंड प्रवाह वाहताना दिसतो. लाखो-कोट्यवधी रुपयांच्या देणग्या, सोन्या-चांदीचे मुकुट, महाप्रसाद, उत्सव आणि यात्रांमधून श्रद्धेचे वैभव अनुभवायला मिळते. परंतु या वैभवाच्या सावलीत एक वेदनादायी वास्तव कायम उभे असते, मंदिराच्या पायरीवर बसलेला भिकारी, देवाच्या दर्शनासाठी आलेल्या भक्तांच्या रांगा आणि त्याच देवाच्या दारात उपाशीपोटी मदतीची याचना करणारा माणूस यांच्यातील विरोधाभास समाजाच्या अंतरंगावर अनेक प्रश्नचिन्हे निर्माण करतो. आज भारत जगातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक मानला जातो. अवकाश संशोधन, तंत्रज्ञान, उद्योग आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात देशाने मोठी झेप घेतली आहे. पण या विकासाच्या झगमगाटामागे अजूनही लाखो लोक दारिद्र्य, उपासमार आणि बेरोजगारीशी झुंज देत आहेत. मंदिरांच्या गाभाऱ्यांमध्ये सुवर्णमंडित देवता दिसतात, पण मंदिराबाहेरच्या रस्त्यावर अन्नासाठी हात पसरलेली माणसेही दिसतात. ही केवळ आर्थिक विषमता नाही, ही सामाजिक संवेदनशीलतेची परीक्षा आहे.

धर्म माणसाला नैतिकता, करुणा आणि परोपकाराची शिकवण देतो. प्रत्येक धर्म मानवसेवेला सर्वोच्च स्थान देतो. मग देवाचे दर्शन घेऊन बाहेर पडणारा भक्त मंदिराच्या पायरीवर बसलेल्या वृद्धाकडे, अपंगाकडे किंवा उपाशी मुलाकडे दुर्लक्ष का करतो? देवाला लाखो रुपयांचे दान देताना समाज उदार असतो, पण एखाद्या गरिबाच्या शिक्षणासाठी, उपचारासाठी किंवा पुनर्वसनासाठी त्याच उदारतेने पुढे येतो का? हा प्रश्न धर्माचा नाही, तो मानवी संवेदनांचा आहे. भारतातील अनेक प्रसिद्ध देवस्थानांकडे प्रचंड आर्थिक संसाधने आहेत. भक्तांच्या श्रद्धेतून निर्माण झालेली ही संपत्ती नक्कीच पवित्र आहे. परंतु त्या संपत्तीचा काही भाग समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी, शिक्षणासाठी, आरोग्यासाठी आणि रोजगारनिर्मितीसाठी अधिक व्यापकपणे वापरला गेला, तर त्यातून श्रद्धेचे सामाजिक सामर्थ्य अधिक प्रभावीपणे दिसून येईल. कारण देवाला अर्पण केलेली संपत्ती शेवटी माणसाच्या कल्याणासाठीच उपयोगी पडली, तरच तिचे खरे सार्थक होईल.

दारिद्र्य हा कोणत्याही व्यक्तीचा अपराध नसतो. तो अनेकदा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विषमतेचा परिणाम असतो. शिक्षणाचा अभाव, रोजगाराच्या मर्यादित संधी, ग्रामीण भागातील असमान विकास, अपुरी सामाजिक सुरक्षा आणि वाढती महागाई यांमुळे अनेकांना जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो. अशा परिस्थितीत भीक मागणारा माणूस हा केवळ एक व्यक्ती नसतो; तो समाजव्यवस्थेच्या अपयशाचा जिवंत पुरावा असतो.

समाजसुधारकांनी आणि विचारवंतांनी याच प्रश्नांवर सातत्याने भाष्य केले आहे. महात्मा फुले यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन मानले. राजर्षी शाहू महाराजांनी वंचितांना संधी देण्याचा मार्ग दाखविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण, संघटन आणि संघर्षाचा मंत्र दिला. त्यांनी माणसाच्या स्वाभिमानाला सर्वोच्च स्थान दिले. त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू हा माणूस होता. समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळाल्याशिवाय प्रगती पूर्ण होऊ शकत नाही, हा त्यांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. श्रद्धा ही माणसाच्या आयुष्याचा आधार असते. संकटात सापडलेल्या अनेकांना मंदिर, मशिद, गुरुद्वारा किंवा चर्च यांमधून मानसिक बळ मिळते. त्यामुळे धर्म किंवा श्रद्धेवर टीका करणे हा या चर्चेचा उद्देश नाही. उलट श्रद्धा आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर संगम घडविणे हा हेतू आहे. मंदिरातील घंटानादाबरोबरच समाजातील उपाशी पोटांचा आवाजही ऐकू येणे आवश्यक आहे. भक्ती आणि मानवता यांच्यातील दुवा अधिक मजबूत झाला पाहिजे.

आज दानधर्माच्या संकल्पनेलाही नव्याने समजून घेण्याची गरज आहे. भिकाऱ्याच्या हातावर काही नाणी ठेवणे ही तात्पुरती मदत असू शकते, पण त्याला शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे ही कायमस्वरूपी मदत ठरते. एखाद्या विद्यार्थ्याची फी भरणे, एखाद्या रुग्णाच्या उपचारासाठी मदत करणे, एखाद्या कुटुंबाला स्वावलंबी बनविणे किंवा एखाद्या युवकाला रोजगार उपलब्ध करून देणे हीच खरी समाजसेवा आहे. अशा कृतींमध्ये धर्माचा आत्मा अधिक जिवंत दिसतो. भारतीय संतपरंपरेनेही हाच संदेश दिला आहे. संत तुकारामांनी दया आणि




करुणेला महत्त्व दिले. संत कबीरांनी बाह्य आडंबरांपेक्षा अंतःकरणाच्या शुद्धतेवर भर दिला. संत गाडगेबाबांनी स्वच्छता, शिक्षण आणि मानवसेवा यांनाच खरी पूजा मानले. त्यांनी मंदिरांपेक्षा समाजातील दुःख दूर करण्याला अधिक महत्त्व दिले. आजच्या काळात त्यांच्या विचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. समाज म्हणून आपण अनेकदा धार्मिकतेचे प्रदर्शन करतो, परंतु मानवतेची खरी परीक्षा आली की मागे पडतो. उत्सवांमध्ये लाखो रुपये खर्च होतात, पण शेजारी राहणाऱ्या गरजू कुटुंबाच्या अडचणींकडे दुर्लक्ष केले जाते. भव्य मिरवणुका काढल्या जातात, पण रस्त्यावर पडलेल्या जखमी व्यक्तीला मदत करण्यासाठी अनेकजण थांबत नाहीत. धर्माचा खरा अर्थ जर करुणा, दया आणि सेवा असेल, तर या मूल्यांचे प्रतिबिंब आपल्या कृतीत दिसणे आवश्यक आहे.


मंदिराबाहेर बसलेला भिकारी हा समाजाला प्रश्न विचारतो ङ्कतुमच्या विकासात माझे स्थान कुठे आहे?ङ्क ङ्कतुमच्या श्रद्धेने माझ्या जीवनात काय बदल घडवला?ङ्क ङ्कमाझ्या मुलालाही शिक्षण, रोजगार आणि सन्मानाचे जीवन मिळणार आहे का?ङ्क या प्रश्नांची उत्तरे केवळ भाषणांमध्ये किंवा तत्त्वज्ञानात नाहीत, ती आपल्या सामाजिक धोरणांमध्ये, प्रशासनाच्या कार्यक्षमतेत आणि नागरिकांच्या संवेदनशीलतेत दडलेली आहेत. आज देशाला अधिक भव्य मंदिरांइतकीच गरज अधिक सक्षम माणसे घडविण्याची आहे. अधिक सोन्याचे कळस उभारण्याबरोबरच अधिक शाळा, वसतिगृहे, रुग्णालये, कौशल्य विकास केंद्रे आणि रोजगारनिर्मितीची साधने उभी राहिली पाहिजेत. श्रद्धा आणि विज्ञान, धर्म आणि सामाजिक न्याय, पूजा आणि सेवा यांचा समतोल साधला गेला तरच विकासाला खरे मानवी रूप प्राप्त होईल. विकासाचे मोजमाप केवळ जीडीपी, महामार्ग किंवा उंच इमारतींनी होत नाही. समाजातील सर्वात दुर्बल व्यक्ती किती सन्मानाने जगते, यावरच कोणत्याही राष्ट्राची खरी प्रगती अवलंबून असते.

मंदिराबाहेर भीक मागणारा माणूस दिसत असेपर्यंत समाजाच्या प्रगतीचे दावे अपूर्णच राहतील. कोणत्याही सभ्य समाजाची महानता त्याच्या मंदिरांच्या उंचीने किंवा संपत्तीने ठरत नाही; ती समाजातील सर्वात दुर्बल व्यक्तीच्या जीवनातील सन्मानाने ठरते. देवावर श्रद्धा ठेवणे हा प्रत्येकाचा वैयक्तिक अधिकार आहे; पण माणसावर प्रेम करणे आणि त्याच्या सन्मानासाठी उभे राहणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे. शेवटी प्रश्न देवाचा नाही, तर माणुसकीचा आहे. मंदिरातील देवापर्यंत पोहोचण्यापूर्वी मंदिराबाहेर बसलेल्या माणसापर्यंत आपण पोहोचलो, तरच समाज अधिक न्याय्य, संवेदनशील आणि समतामूलक बनेल. त्या दिवशी मंदिराच्या पायरीवरची भीक कमी होईल आणि मानवतेची श्रीमंती अधिक वाढेल. हाच खऱ्या अर्थाने धर्माचा विजय आणि समाजव्यवस्थेच्या यशाचा मापदंड ठरेल. मंदिरातील देवापर्यंत पोहोचण्याची घाई आपण नेहमीच करतो, पण मंदिराबाहेर बसलेल्या माणसापर्यंत पोहोचण्याची संवेदना किती जपतो, हा खरा प्रश्न आहे. कारण धर्माचे अंतिम ध्येय देवापर्यंत पोहोचणे नसून माणुसकीपर्यंत पोहोचणे हेच असते. मंदिराच्या पायरीवरची भीक संपली आणि प्रत्येक हाताला काम, प्रत्येक पोटाला अन्न व प्रत्येक व्यक्तीला सन्मान मिळाला, तर तोच समाजव्यवस्थेचा खरा विजय आणि श्रद्धेचा सर्वोच्च उत्सव ठरेल.



राजकारण
शिवाजी चौगुले
कागल-कोल्हापूर

# कार्यकाळ कोणाचा मोठा यापेक्षा कर्तृत्त्व महत्वाचे



...भारतीय राजकीय इतिहासात दीर्घकाळ देशाचे नेतृत्व करणारे आणि जनमानसावर स्वतःचा अमिट प्रभाव पाडणारे नेते कमी नाहीत. आधुनिक भारताच्या इतिहासात पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर नरेंद्र मोदी हे असे नेते ठरले आहेत, ज्यांनी लागोपाठ तीनवेळा सार्वत्रिक निवडणुका जिंकून देशाचे नेतृत्व केले आहे. नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाची १२ वर्षे पूर्ण होत असताना, त्यांची तुलना भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कार्यकाळाशी केली जात आहे. पंडित नेहरू यांनी तीन निवडणुकांमध्ये विजय मिळवला होता, तर १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी अंतरिम पंतप्रधानपद सांभाळलेले होते. तीन सार्वत्रिक निवडणुकांचा विजय आणि पहिल्या निवडणुकीपूर्वी अंतरिम पंतप्रधान असे १७वर्षे ते देशाचे पंतप्रधान राहिले. त्यातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या कार्यकाळाची बरोबरी नरेंद्र मोदींनी केली आहे. कार्यकाळाची बरोबरी केल्यामुळे दोन नेत्यांची तुलना होऊ शकत नाही. कारण दोन्ही नेत्यांचा काळ, विचारसरणी आणि आव्हाने पूर्णपणे वेगळी होती. पंडित नेहरूंनी भारताच्या जडणघडणीत आणि जागतिक प्रतिमेत आपले अढळ स्थान निर्माण केले आहे. जवाहरलाल नेहरू यांचा वैचारिक पाया समाजवादी होता. ते राजकीय तत्वज्ञानपंडित होते. पंडित नेहरूंचा दृष्टिकोन 'लोकशाही समाजवाद' धर्मनिरपेक्षता आणि अलिप्ततावाद यावर आधारित होता.

फाळणीच्या दुःखातून बाहेर पडणाऱ्या देशाला एकत्र बांधून ठेवणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे हे त्यांचे मुख्य ध्येय होते. मोदींचे नेतृत्व सांस्कृतिक राष्ट्रवाद, मजबूत अंतर्भाव उदाहरणार्थ सबका साथ, सबका विकास अशा घोषणा आणि उजव्या विचारसरणीवर आधारित आहे. नेहरूंच्या 'समाजवादा'च्या जागी मोदींनी 'कल्याणकारी भांडवलशाही' आणि थेट लाभ हस्तांतरण यावर भर दिला. आर्थिक धोरणे आणि पायाभूत सुविधांचा अभाव असलेल्या काळात नेहरूंनी पंतप्रधानपद सांभाळले. स्वातंत्र्यानंतर देशात सुई-टाचणीही तयार होत नव्हती. अशा वेळी नेहरूंनी आयआयटी, आयआयएम, इस्रोची पार्श्वभूमी तयार केली होती, आणि भाक्रा नांगलसारखी मोठी धरणे उभारली. यातून देशाच्या हरितक्रांतीचा पाया रचला गेला. त्यांनी या प्रकल्पांना 'आधुनिक भारताची मंदिरे' म्हटले. मोदींच्या १२ वर्षांच्या काळात अशी कोणती मंदिरे उभी करण्यात आली. पंडित नेहरूंचा भर उद्योग उभारणे आणि उद्योग सरकारी नियंत्रणाखाली आणणे होता. मोदींच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात भारत सरकारच्या निर्गुतवणूक आणि खासगीकरण धोरणात मोठा बदल करण्यात आला.

या काळात सरकारने धोरणात्मक निर्गुतवणुकीवर भर दिला, ज्याचा अर्थ केवळ शेअर्स विकणे नाही, तर कंपनीचे व्यवस्थापन आणि मालकी पूर्णपणे खासगी हातात सोपवण्यात आली. भारताने रस्ते, महामार्ग, विमानतळ आणि वंदे भारतसारख्या आधुनिक रेल्वेचे जाळे विस्तारले. भारत जगातील ११ व्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेतून ५ वी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला. मात्र हा मान फार काळ ते टिकवू शकले नाहीत. आता भारताची पुन्हा घसरण झाली. डॉलरच्या तुनलेत रुपया शंभरी पार करताना याच काळात दिसणार अशी स्थिती आहे. परराष्ट्र धोरणात नेहरू काळात जगाचे लक्ष भारताकडे राहात होते. अलिप्ततावादी चळवळ आणि पंचशील तत्वे भारताने स्वीकारली होती. मोदींच्या काळात आता देशाने बहु-आघाडीय धोरण आणि राष्ट्रीय हित सर्वोपरी तत्व स्वीकारले. मोर्दी समर्थक आणि भाजप नेत्यांकडून मोदींच्या काळात देशाचा ग्लोबल आवाज आणि म जबूत आर्थिक शक्ती म्हणून उदय होत असल्याचा दावा करण्यात येतो. नेहरूंच्या काळात गरिबी निर्मूलनासाठी मोठ्या योजनांपेक्षा संस्थात्मक उभारणीवर भर देण्यात आला होता. प्रशासकीय कारभार मजबूत करण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. पंडित नेहरूंनी या देशाचा पाया रचला त्यावर त्यांच्या नंतर येणाऱ्या सर्वच पंतप्रधानांनी देशाला मजबूतपणे उभे करण्याचे काम केले आहे. यात लालबहादूर शास्त्री, इंदिरा गांधी, राजीव गांधी, नरसिंह राव, डॉ. मनमोहन सिंह या सर्व पंतप्रधानांनी आपापल्या काळात देशाला विकासाच्या वाटेवर आणि आर्थिक आघाडीवर नेत जागतिक राजकारणात वेगळी छाप निर्माण केली. राजीव गांधी यांनी नवतंत्रज्ञानावर त्यांच्या काळात भर दिला, त्यामुळेच आज आपण डिजिटल इंडिया म्हणून मिरवत आहोत.

नरसिंह राव पंतप्रधान आणि डॉ. मनमोहन सिंग अर्थमंत्री असतानाच्या काळात देशाने आर्थिक उदारीकरणाचा निर्णय घेऊन जागतिक स्पर्धेत देशाला पोहचवले. १९९० च्या दशकात भारताच्या खालावलेल्या आर्थिक स्थितीवर या जोडगोळीने मात केली. भविष्यातील महासत्तेचा पायाही रचला. लोकशाही संस्था आणि नेतृत्व शैली संसदीय लोकशाहीचा विचार केला तर पंडित नेहरू हे संसदेतील चर्चेला आणि विरोधकांच्या मताला प्रचंड मान देत असत. त्यांच्या काळात संस्थांना स्वायत्तता दिली गेली. तर म ोदींचे नेतृत्व हे अधिक केंद्रीभूत मानले जाते, जिथे निर्णय घेण्याची गती एका व्यक्तीकडे केंद्रित झालेली. मोदींच्या १२ वर्षांत अनेक धाडसी आणि ऐतिहासिक निर्णय घेतले गेले, जसे की कलम ३७० रद्द करणे, राम मंदिर निर्माण, जीएसटी लागू करणे. नेहरूंच्या काळात राज्यांची पुनर्रचना आणि हिंदू कोड बिल हे ऐतिहासिक निर्णय होते.

मोदींच्या कार्यकाळात बेरोजगारी, वाढती महागाई आणि सामाजिक ध्रुवीकरण या मुद्द्यांवर विरोधकांकडून सातत्याने टीका केली जाते. पंडित नेहरू हे आधुनिक भारताचे 'शिल्पकार' होते, ज्यांनी लोकशाहीचा पाया रचला आणि देशाला संस्थात्मक रूप दिले. टीकेलाही सकारात्मक घेतले. वय देशाचे, देशाच्या स्वातंत्र्याचे वाढतच जाणार आहे. या संपूर्ण काळात नवनवीन पंतप्रधान येत राहतील, कोण किती काळ सत्तेत होतं याची आकडेमोड करण्यापेक्षा कोणाच्या काळात देशाचा, नागरिकांचा किती विकास झाला, याची इतिहास नोंद घेत असतो. कार्यकाळ कोणाचा मोठा यापेक्षा कर्तृत्त्व कसे राहिले याची नोंद इतिहास नक्कीच घेईल.

## 'काला हिरण- द बॅटल फॉर लेगेसी' विरोधात सलमान खान उच्च न्यायालयात!



'काला हिरण - द बॅटल फॉर लेगेसी' या चित्रपटावरून नवा वाद निर्माण झाला आहे. अभिनेता डरश्रारप घहरप यांनी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल करत चित्रपटाचा टीजर आणि प्रदर्शन रोखण्याची मागणी केली आहे. चित्रपटामुळे आपल्या प्रतिमेला धक्का पोहोचू शकतो, असा दावा त्यांनी केल्याची चर्चा आहे. या प्रकरणाकडे आता बॉलिवूडसह चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

'काला हिरण-बॅटल फॉर लेगसी' चित्रपटाविरोधात सलमान खानने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. तो म्हणतो की, चित्रपट आणि त्याच्या जाहिरातींमुळे चालू कामकाजावर परिणाम होऊ शकतो आणि त्याची प्रतिष्ठा खराब होऊ शकते. वादग्रस्त चित्रपट 'काला हिरण- द बॅटल फॉर लेगेसी'चे फर्स्ट लुक आज शुक्रवार जारी झाले आहे. हा चित्रपट रिलीज आधी वादात सापडला आहे. सलमान खानने निर्मात्यांना कायदेशीर नोटीस आधीच बजावली आहे. दरम्यान, निर्मात्यांनी फर्स्ट लूक प्रदर्शित केला. आता, दबंग खानने चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगिती देण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्याने चित्रपटाच्या रिलीजवर स्थगितीची मागणी केली आहे. सलमान खानच्या काळवीट प्रकरणाशी संबंधित काला हिरण-द बॅटल ऑफ लेगेसी चित्रपट येणार आहे. त्यामुळे सलमानखानने यावर स्थगिती आणण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. तसेच टीजर आणि प्रदर्शनावर स्थगिती आणण्याची मागणी केली आहे. चित्रपट 'काला हिरण'च्या आज प्रदर्शित करण्यात आलेल्या फर्स्ट लुकमध्ये मुख्य भूमिकेचे नाव देखील सलमान खानशी मिळतेजुळते आहे. लूक देखील अभिनेत्यासारखा आहे. त्या पात्राने सलमान खानसारखेच ब्रेसलेट घातले आहे. दरम्यान, याविरोधात सलमान खान दिल्ली उच्च न्यायालयात पोहोचला. एका वृत्तसंस्थेनुसार, सलमान खानने 'काला हिरण: द बॅटल फॉर लेगसी' नावाच्या प्रस्तावित चित्रपटाच्या निर्मात्यांविरुद्ध अंतरिम दिलासा मिळवण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

## लाल परी

गावाकडच्या मातीचा.
सुगंध घेऊन येणारी!
डोंगर दर्या पार करत.
अगदी वेळेवर पोचणारी!!१!!

रंग तिचा लाल भडक.
मनाला तो भूरड पाडते!
म्हणूनच ती लाल परी.
प्रत्येकाच्या मनात राहते!!२!!

कोणाच्या सुखाचे अश्रू.
कोणाच्या आशाची गाठ!
एसटीच्या प्रवासात.
मिळते साऱ्या जगाची वाट!!३!!

कधी खिडकीतून दिसणारी.
ती झाडे आणि शेते!
कधी गर्दीच्या मांदियाळीत.
नव्या ओळख्याही होते!!४!!

शाळा असो वा कॉलेज.
नोकरी असो लग्नाचे गाव!
एसटी शिवाय पूर्ण होत नाही.
महाराष्ट्राचा प्रवास राव!!५!!

अति दुर्गम भागातही.
जिच्या हक्काचा असतो फेरा!
ती धावत राहते अविरत.
सोसून उन पाऊस वारा!!६!!

- सौ. शारदा ज्ञानेश्वर बरडे, मोर्शी
अमरावती.
मो.९८६००१०९१८



## आकाश साप्ताहिकी

### दि. १३ ते १९ जून २०२६.

**अधिक मास समाप्ती आणि गुरुपूष्यामृत.**

दि.१५ जूनला अधिक ज्येष्ठ महिना संपत असून निज ज्येष्ठ सुरु होईल. एका महिन्यात पूर्ण राशीचक्र आणि २७ नक्षत्रांचे भ्रमण करणारा चंद्र एका राशीत सव्वा दोन दिवस तर एका नक्षत्रात सुमारे एक दिवस असतो.चंद्र पुष्य नक्षत्रात असून त्या दिवशी जर गुरुवार असेल तर गुरुपूष्यामृत हा शुभ योग मानतात.

दि.१८ला अशी स्थिती आहे.वर्षातील प्रत्येक दिवस हा चांगला असतो.

अशी असेल आकाश स्थिती

दि.१३.चंद्र कृत्तिका नक्षत्रात.

दि.१४.चंद्र रोहिणी नक्षत्रात, इंटरनॅशनल स्पेस स्टेशन पहाटे ४-४१ ते ४-४७.दक्षिण ते पूर्वेला

दि.१५.चंद्र मृग नक्षत्रात, अधिक मास सम ाप्ती.चंद्र पृथ्वीच्या जवळ.सूर्य मिथुन राशीत प्रवेश.

दि.१६.चंद्र आर्द्रा नक्षत्रात

इंटरनॅशनल स्पेस स्टेशन पहाटे ४-४२ ते ४-४९ वा.पच्छिम ते उत्तरेकडे.

बुध सूर्य अंतर अधिक.




दि.१७.चंद्र पुनर्वसु नक्षत्रात, बुध व गुरु ग्रहाच्या जवळ.

दि.१८ चंद्र पुष्य नक्षत्रात.शूक्राच्या जवळ.

दि.१९.चंद्र आश्लेषा नक्षत्रात, बुध ग्रह पोलूक्स ताऱ्याच्या जवळ.

असे होईल ग्रह दर्शन


सध्या पश्चिम आकाशात एकमेकांच्या जवळ असलेली गुरु आणि शूक्र ग्रहाची जोडी प्रमुख आकर्षण असून जरा खाली बुध ग्रहाचे अधिक वेळ व अधिक चांगले दर्शन होत आहे.तसेच पहाटे पूर्व आकाशात शनी आणि मंगळ पाहता येईल.पावसाळ्यातही या ग्रहतारे व ढगांचा लपंडाव बघता येईल.

## क्रिती सेनॉनच्या कुटुंबाने मुंबईतील चार फ्लॅट्स विकून कमावले दुप्पट पैसे

अभिनेत्री क्रिती सेनॉन आणि तिच्या कुटुंबाने मुंबईतील रिअल इस्टेटमधील गुंतवणुकीतून मोठा आर्थिक फायदा मिळवला आहे. क्रिती सेनॉन, तिची बहीण नुपूर सेनॉन आणि आई गीता सेनॉन यांनी अंधेरी पश्चिम येथील चार फ्लॅट्स एकूण ८.९ कोटी रुपयांना विकले आहेत. विशेष म्हणजे, या म ालमत्तांच्या विक्रीतून सेनॉन कुटुंबाला सुमारे १०७ टक्के भांडवली नफा मि ळाला आहे. मालमत्ता नोंदणीसंबंधी उपलब्ध माहितीनुसार, हे चारही फ्लॅट्स चित्रपट निर्माता आणि कास्टिंग डायरेक्टर मुकेश छाब्रा यांनी खरेदी केले आहेत. या व्यवहारांची नोंदणी २४ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आली. सेनॉन कुटुंबाने २०१३ ते २०१७ या कालावधीत हे चार फ्लॅट्स एकूण सुमारे ४.३१ कोटी रुपयांना खरेदी केले होते. आता त्यांची विक्री ८.९ कोटी रुपयांना झाल्याने कुटुंबाला जवळपास ४.६ कोटी रुपयांचा नफा झाला आहे. जवळपास नऊ ते तेरा वर्षांच्या कालावधीत ही गुंतवणूक दुपटीहून अधिक वाढली. अंधेरी पश्चिमेतील 'रहेजा क्लासिक' या निवासी संकुलातील दोन मोठे फ्लॅट प्रत्येकी ३.२३ कोटी रुपयांना विकण्यात आले. या फ्लॅट्सचे बांधकाम क्षेत्रफळ ६५४.२३ चौरस फूट असून प्रत्येक फ्लॅटसोबत एक कार पार्किंगची सुविधा आहे. या व्यवहारांवर प्रत्येकी १९.४१ लाख रुपयांचा मुद्रांक शुल्क आणि ३० हजार रुपये नोंदणी शुल्क भरले गेले. याच इमारतीतील उर्वरित दोन लहान फ्लॅट्स प्रत्येकी १.२१ कोटी रुपयांना विकले गेले. या फ्लॅट्सचे बांधकाम क्षेत्रफळ २४६.०६ चौरस फूट आहे. प्रत्येक व्यवहारावर ७.२९ लाख रुपयांची स्टॅम्प ड्युटी आणि ३० हजार रुपये नोंदणी शुल्क आकारण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, गीता सेनॉन यांनी जुलै २०१३ मध्ये दोन मोठे फ्लॅट्स एकूण १.४० कोटी रुपयांना खरेदी करून या गुंतवणुकीची सुरुवात केली होती.


## ओळख पक्ष्यांची : मोर



या चित्रात एक भारतीय मोर (Pavo cristatus), जो सामान्यतः मोर म्हणून ओळखला जातो, आपली आकर्षक शेपटीची पिसे दाखवत आहे.नर आपली चकाकणारी निळी मान आणि शेपटीच्या पिसांचा प्रचंड झुबका दाखवतो, ज्याच्या टोकांवर डोळ्यांसारखे चमकदार नक्षीकाम असते.भारतीय उपखंडात मूळचे असलेले हे पक्षी, माद्यांना प्रभावित करण्यासाठी असे संपूर्ण प्रदर्शन करण्याकरिता प्रसिद्ध आहेत.

(छायाचित्र : चंद्रकांत पाटील)

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 422



संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे शब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः—**

**दोन अक्षरी**
आद्य, कार, कैद, गज, गळ, गार, गीता, टका, टप्, टर, टेका, तर, तोय, दल, दंश, नग, नवा, नस, पाच, पाट, पारा, पास, बाद, बेत, मद्य, माग, मानी, रत, रम, रस, वट, व्याधी, साग, स्तंभ

**तीन अक्षरी**
अमृत, उतार, उर्वशी, गरज, कसोटी, काजवा, कानन, कुमार, कैकयी, जटायू, तलाव, नकल, पंकज, पियूष, भरण, मारिच, यमक, रजनी, वनज, वाजवी, वाटप, वाटीका, वानर, शासन, षटक, समाधी, सराव, सोवळा, हरण, हातोटी

**चार अक्षरी**
अनुराग, आभरण, गजानन, जयस्तंभ, जलाशय, तरबेज, दरवेश, दशानन, नराधम, नवागत, पंचवटी, भेदभाव, रामटेक, लंकाधीश, वनवास, वीतराग, वेगवान, शहामृग, समाधान, सारवान, हनुमान

**पाच अक्षरी**
अनुनासिक, आदरणीय, चपलाहार, तळतळाट, दरवळणे, भरत भेट

**अन्य अक्षरी**
गीत रामायण, वासरात लंगडी, गाय शहाणी


(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Udav Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 805



**आडवी विधाने :—**
1) हृदय फाडणारे (दृश्य,)
5) संसार, कुटूंब, विस्तार
7) अधिकारी माणसाची मध्यस्ती, संधान
9) गाय
10) श्रीकृष्णाचे सोबती
11) देशातील लोकांचे विचार
12) नदीचा किनारा, बाजू
14) सरकारला देणे असलेली रक्कम
15) रजनी, निशा
16) महात्मा गांधींना पुण्यातील या ठिकाणी नजरकैदेत ठेवले होते. याच ठिकाणी कस्तुरबांचे निधन झाले
18) घात करणारे, हानिकारक
21) मालाची मोठी खरेदी विक्री होणारी बाजारपेठ
24) स्मरण, आठवण
26) एक प्रकारची घोडागाडी
28) अरण्य, वणवा लागलेले रान
29) स्तुती, प्रशंसा
30) एक सुवासिक वनस्पती
32) कमिटी, छोटखानी मंडळ
33) चांगले वागणे, शिष्टाचार
38) मनुष्य, पुरुष 39) लहान मोठे
41) वाळा किंवा वाळ्याचे अत्तर
43) गर्दभ, गाढव (सं.)
45) मनापासून प्रेम, कृपा
47.) सर्वजण, सगळे
49) पदार्थाची रुची बघण्यासाठी घेतलेला थोडा अंश, नमुना
51) पाणी काढण्याचे चक्रयंत्र
53) नेहमी, निरंतर 55) द्रव, आवड
56) तेलाने बरबटलेले, खूप तेल असलेले
58) शोभिवंत, कमान
59) घ्यावयाची रक्कम, आगमन करणे
60) अकरा बोटे असलेला, ठेवलेल्या बाईपासून झालेला मुलगा
63) अमेरिका व रशियामध्ये करार करून दोन महाशक्तीतील वातावरण सौम्य करणारे अमेरिकेचे माजी अध्यक्ष
64) जडत्व, जडपणा
66) तीर्थक्षेत्री केलेली हजामत
69) खूप मनधरणी करणारा, आर्जव करणारा
70) फुटक्या नशीबाचा, दुर्दैवी
72) कंबरपट्टा, कटिसूत्र
73) धान्यावरचे टरफल (हिं)
74) अंधःकार, काळोख
76) दर्भ, रामायणात श्रीरामाचा एक पुत्र
77) व्यासपीठ
79) साजेसा, शोभणारा, यथायोग्य
81) फुलांची माळ 82) परमेश्वर
84) दगडाचे काम करणारा
86) फळाची साल
88) रामायणातील लंकाधिपती
88) पूर्वीच्या काळी शाईत बुडवून लिहिण्याची लेखणी
90) वंदन, नमस्कार 91) दिवस, वासर
92) किरकोळ किराणा मालाचा विक्रेता
93) एक शेंग भाजी प्रकार

**उभी विधाने :—**
1) माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्रीजींच्या समाधीस्थळाचे नाव
2) देणगी
3) एक मद्यप्रकार
4) कचरा, तुकडे (हिं.)
5) पृच्छा, सवाल
6) पाव भाग, एक चतुर्थांश
8) रंगपंचमी
10) गाईपासून उत्पन्न झालेले दूध, गोमुत्र, शेण इत्यादी
13) सुंदर डोळे असलेली स्त्री
14) मृतदेह, शव
16) स्मरण, याद
17) मुद्दाम योजलेले, विशेष
19) अंधार, काळोख
20) व्याजाचा हिशोबाचा एक प्रकार
21) खिन्न, कष्टी
22) दाराची किंवा खिडकीची काच
23) पुढील येणारे 25) चाल, रुढी
27) बुद्धी, अक्कल
31) पडल्यासारखे होणे, क्षीण होणे, थकणे
34) ओबडधोबड, तीक्ष्ण
35) शक्ती, उत्साह (इं) 36) राखड, रक्षा
37) श्रीकृष्णाचा अत्याचारी मामा
39) ............. भेद, एखाद्याला अनुकूल करण्याचे चार प्रकार
40) रुची, चव, आवड 42) प्रश्न ( हिं)
43) तामसी, क्रोधी, संतापी
44) उणीव भरून काढणारी गोष्ट
46) जखमेतून वाहणारा घाणेरडा द्रव
48) हस्त, हात
50) प्रत करणारा, अनुकरण करणारा
52) हजर, उपस्थित
54) नदीचे पाणी अडविणारा बांध
56) आडकाठी, अढी 57) रात्र, यामिनी
60) एकापेक्षा जास्त, अधिक
61) लाकडाच्या फळ्यांचे छत
62) कैफी, अंमली नशा आणणारे
63) अमेरिकेचे एक माजी अध्यक्ष
64) गुंतागुंत झालेले डोक्यावरील केस
65) प्रेमाचे प्रतीक असलेली भारतातील एक जगप्रसिद्ध वास्तु
67) अभिनेता अजिंक्य देवचे अभिनेता पिता
68) आर्थिक व्यवहारात कमिशन घेऊन मध्यस्थी करणारा
71) सैन्यात नव्यानेच भरती झालेला
75) मोत्यांची माळ, जिंकणे
76) व्यभिचारिणी, छिनाल
77) घुसळणे, चर्चा 78) शेवटचा, अंत्य
79) शर्त, पण 80) उद्यानंतर येणारा दिवस
83) जंगलात पेटलेली आग
85) रान, जंगल
87) खवाट्याचे हाड, खवाटा
88) राजाची पत्नी (उत्तर पुढी अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Udav Munde - 8446302691

# नागपुरात दोन 'सीईटी' माहिती केंद्र
## अभ्यासकर्त्या विद्यार्थ्यांना आता मिळणार अचूक मार्गदर्शन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर, दि. १२ :** राज्यातील विद्यार्थ्यांना सीईटी परीक्षा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती योजना आणि प्रवेश प्रक्रियेसंदर्भात अचूक माहिती व योग्य मार्गदर्शन त्यांच्या जिल्ह्यातच उपलब्ध व्हावे, यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात 'सीईटीसेलचे विद्यार्थी सहाय्यता केंद्र'सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नागपुरात दोन केंद्रांची सुविधा मिळणार असल्याचे माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी म्हटले आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यासाठी प्रवेश प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यावर विश्वासार्ह माहिती, अचूक मार्गदर्शन सहजपणे त्यांच्या जिल्ह्यातच उपलब्ध व्हावे, यासाठी विद्यार्थी सहाय्यता केंद्र सुरू करण्यात आली आहेत. तसेच, ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियासंदर्भातील कामांसाठी वारंवार मोठ्या शहरांमध्ये जाण्याची आवश्यकता भासू नये, त्यांना प्रवेश प्रक्रियाची सविस्तर माहिती, विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती व आवश्यक मार्गदर्शन त्यांच्या जिल्ह्यातच उपलब्ध व्हावे, या हेतूने ही केंद्र कार्यान्वित करण्यात आली आहेत, अशी माहिती मंत्री पाटील यांनी दिली.

**सहाय्यता केंद्राचा उद्देश**

जिल्ह्यातील शैक्षणिक संस्था, कक्षाच्या अधिनस्त कार्यरत असलेले परीक्षा केंद्र व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा यांच्यात समन्वय व संवाद साधणे,राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील विषय आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया संबंधित आवश्यक ती सर्व तांत्रिक व इतर माहिती देणे, शंकांचे निरसन करणे, तक्रारीचे निवारण करणे, प्रलंबित तक्रारींचा निपटारा करणे, त्यांच्या आवडी, पात्रता व क्षमतेनुसार योग्य अभ्यासक्रम, पदवी व शैक्षणिक संस्थांची निवड करण्याबाबत मार्गदर्शन करणे, उएळ परीक्षा व उअढ फे०यांशी संबंधित अभ्यासक्रम, पात्रता निकष, परीक्षा पद्धत, वेळापत्रक आणि अर्ज प्रक्रियेची सविस्तर माहिती उपलब्ध करून देणे, जिल्ह्यातील शैक्षणिक संस्था, कक्षाच्या अधिनस्त कार्यरत असलेलेल परीक्षा केंद्र व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा यांच्यात समन्वय व संवाद साधणे, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील विषय आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया संबंधित आवश्यक ती सर्व तांत्रिक व इतर माहिती देणे, शंकांचे निरसन करणे, तक्रारीचे निवारण करणे, प्रलंबित तक्रारींचा निपटारा करणे, विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी, पात्रता व क्षमतेनुसार योग्य अभ्यासक्रम, पदवी व शैक्षणिक संस्थांची निवड करण्याबाबत मार्गदर्शन करणे,विविध शिष्यवृत्ती योजना, त्यासाठी पात्रता निकष आदींबाबत माहिती देणे. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर, प्रवेश निश्चितीबाबतचे शंकांचे निराकरण करणे अशा सेवा २० जूनपासून सुरू होणार आहेत.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, तसेच जिल्हास्तरीय समन्वयक ऑनलाईन बैठकीत उपस्थित होते.

# कापूस उत्पादकता वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करा
## कृषी विभागाचे आवाहन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**✦ उल्हास मेश्राम**

**कुही/ नागपूर, दि. १२ :** सघन कापूस लागवड व क्लोजर स्पेसिंग तंत्रज्ञानासाठी मिळणार हेक्टरी अनुदान कापूस श्रेडर खरेदीसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन नागपूर केंद्र व राज्य पुरस्कृत "कापूस उत्पादकता अभियान (कपास क्रांती)" सन २०२६-२७ या वर्षात जिल्ह्यात प्रभावीरित्या राबविण्यात येत आहे.

या अभियानाचा मुख्य उद्देश कापसाची उत्पादकता वाढविणे आणि शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करणे हा आहे. यासाठी जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी कृषी विभागाने शिफारस केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा व यांत्रिकीकरणाचा अवलंब करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या वतीने करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत प्रामुख्याने खालील चार महत्त्वाच्या घटकांवर भर देण्यात येत असून शेतकऱ्यांसाठी विविध सवलती व अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे:

**१. सघन कापूस लागवड पद्धती प्रात्यक्षिके :**

पारंपरिक लागवड पद्धतीमध्ये झाडांची संख्या कमी असते. याउलट, 'सघन लागवड पद्धती' मध्ये कापसाची लागवड ९० × १५ सें.मी. अंतरावर केली जाते. यामुळे प्रति हेक्टर रोपांची संख्या पारंपरिक पद्धतीपेक्षा जवळपास तिप्पट होते, ज्यामुळे उत्पादनात लक्षणीय वाढ होते. वनस्पतींची अतिरिक्त कायिक वाढ रोखण्यासाठी यामध्ये 'कॅनोपी व्यवस्थापन' व वाढ नियंत्रकांचा वापर केला जातो. या प्रात्यक्षिकासाठी शासनातर्फे रु. १८,५००/- प्रति हेक्टर



**अधिकारी रविंद्र मनोहरे, जिल्हा अधिक्षक कृषी**

(निविष्टांसाठी रु. १८,०००/- आणि शेती दिन आयोजनासाठी रु. ५००/-) अनुदान दिले जाते.

**२. क्लोजर स्पेसिंग लागवड तंत्रज्ञान :** मध्यम-खोल ते सुपीक काळ्या जमिनीत कापसाची उत्पादकता वाढवण्यासाठी मध्यम घनतेचा उपाय म्हणून ९० × ३० सें.मी. अंतरावर कापूस लागवड करण्याची शिफारस करण्यात आली आहे. पारंपरिक पद्धतींच्या तुलनेत या अंतरामुळे प्रति हेक्टर रोपांची संख्या वाढून रचना अनुकूल होते. कमी किंवा खात्रीशीर पावसाच्या भागात हे तंत्रज्ञान अत्यंत फायदेशीर ठरते. या घटकांतर्गत कापूस प्रात्यक्षिकांसाठी रु. १४,०००/- प्रति हेक्टर (निविष्टांसाठी रु. १३,५००/- आणि शेती दिन आयोजनासाठी रु. ५००/-) आर्थिक सहाय्य दिले जाते.

**३. एकात्मिक पीक व्यवस्थापन :**

कापूस पिकाचे कीड व रोगांपासून संरक्षण करणे, जमिनीची सुपीकता टिकवणे आणि खतांचा संतुलित वापर करणे याकरिता एकात्मिक पीक व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे. सघन लागवड आणि क्लोजर स्पेसिंग प्रात्यक्षिकांसोबतच शेतकऱ्यांना योग्य बीजप्रक्रिया, कामगंध सापळे, जैविक कीटकनाशकांचा वापर आणि योग्य अन्नद्रव्य व्यवस्थापनाचे प्रशिक्षण व मार्गदर्शन कृषी विभागामार्फत दिले जात आहे.प्रति हेक्टर रु.७५०० अनुदान दिले जाते.

**४. कापूस श्रेडर यांत्रिकीकरणास चालना :** कापूस वेचणी झाल्यानंतर शेतात उरलेल्या पराट्या (कापसाचे अवशेष) उपटून न जाळता, शेतातच त्यांचे बारीक तुकडे करून मातीत सेंद्रिय खत म्हणून गाडण्यासाठी 'कापूस श्रेडर'चा वापर करणे आवश्यक आहे. यामुळे जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढून जमीन सुपीक होते व पर्यावरणाचे रक्षण होते.

**अनुदान रचना :** कृषी यांत्रिकीकरण उप-अभियानाच्या धर्तीवर महाडीबीटी पोर्टलद्वारे या घटकाची अंमलबजावणी केली जाईल. या अंतर्गत अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी ५०% (कमाल रु. ७५,०००/-) आणि सर्वसाधारण प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी ४०% (कमाल रु. ६०,०००/-) अनुदान देय आहे.

**महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन:**

या अभियानांतर्गत कापूस श्रेडर तसेच इतर घटकांचा लाभ घेण्यासाठी इच्छुक वैयक्तिक शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या यांनी 'महाडीबीटी' पोर्टलवर जाऊन ऑनलाईन अर्ज करावा. लाभार्थ्यांची निवड 'प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर केली जाईल. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या गावातील कृषी सहाय्यक, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. रविंद्र मनोहरे यांनी केले आहे.

## थोडक्यात

### नागपूरकरांनो, घरातील ई-कचरा बाहेर काढा !

**नागपूर :** जागतिक पर्यावरण दिन ते २१ जून या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने नागपूर शहरात 'मेगा स्वच्छता मोहीम' राबवली जात आहे. नागपूर महानगरपालिकेने नागरिकांना एकत्र आणून परिसर स्वच्छ आणि हिरवागार बनवण्यासाठी या १५ दिवसांच्या विशेष मोहिमेची सुरुवात केली आहे. या मोहिमेचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणून, महापौर व मनपा आयुक्त यांच्या आदेशानुसार, येत्या १४ जून २०२६ रोजी शहरात मनपा मुख्यालयमध्ये एक, मनपाचे १० क्षेत्रीय कार्यालय, मनपाच्या शाळा मध्ये २९, ग्रंथालय मध्ये २५ व RRR (Reduce, Reuse, Recycle) Centre येथे १० असे एकूण ७५ ई-कचरा (E-Waste) संकलन केंद्र उभारण्यात येत आहेत. एकाच दिवशी, विशेष मोहीम दिनांक १४.०६.२०२६ (रविवार) वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत तुमच्या जवळच्या 'या' ७५ केंद्रांवर जमा करा ई-कचरा नागरिकांच्या सोयीसाठी शहराच्या विविध भागांत एकूण ७५ संकलन केंद्र (E-Waste Collection Centers) तयार करण्यात आली आहेत. आपला परिसर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यासाठी सुरक्षित ठेवण्यासाठी नागरिकांनी आपल्या घरातील, कार्यालयातील सर्व निरुपयोगी इलेक्ट्रॉनिक वस्तू/ साहित्य कचऱ्यात न फेकता किंवा घरात साठवून न ठेवता, १४ जून रोजी आपल्या परिसरातील मनपाच्या 'E-Waste Collection Center' वर जमा करून या महा-स्वच्छता मोहिमेत आपले योगदान द्यावे.

### जलपर्णी निर्मूलनाचे काम त्वरित पूर्ण करा

**नागपूर :** अंबाझरी तलावातील जलपर्णी निर्मूलन कामाची पाहणी मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी केली. तलावातून जलपर्णी काढण्याच्या कामाला गती देण्यासाठी दोन्ही बाजूंनी अतिरिक्त पोकलेन मशीनचा वापर करून काम त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. आतापर्यंत तलावातून ८० हजार टन जलपर्णी काढण्यात आली आहे. मनपा पदाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार ही मोहीम सुरू असून, पोकलेन व वीड हार्वेस्टरच्या सहाय्याने दररोज ४०० टन जलपर्णी काढली जात आहे. या पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त श्री. अंकित, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, उपायुक्त श्री. राजेश भगत, कार्यकारी अभियंता श्री. उज्वल लांजेवार व इतर अधिकारी उपस्थित होते.

# फुटाळा तलावात विविध यंत्रणांची थरारक 'मॉक ड्रिल'

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १२ :** जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कार्यालयाच्या निर्देशानुसार आज सकाळी ८ वाजता नागपूरच्या ऐतिहासिक फुटाळा तलाव येथे विविध सुरक्षा यंत्रणांच्या वतीने एक संयुक्त 'रेस्क्यू मॉक ड्रिल' (आपत्कालीन प्रात्यक्षिक) अत्यंत यशस्वीरीत्या राबवण्यात आले. एखाद्या मोठ्या आपत्तीच्या वेळी विविध विभागांमध्ये समन्वय कसा असावा आणि तत्परतेने बचावकार्य कसे करावे, याचे थेट सादरीकरण यादरम्यान करण्यात आले.

मोहिमेत नागपूर महानगरपालिकेचा अग्निशमन विभाग, एन.डी.आर.एफ., एस.डी.आर.एफ., एम.ए.डी सी. आणि 'आपदा मित्र' च्या पथकांनी संयुक्तपणे सहभाग

## ६ जणांना सुखरूप बाहेर काढले



घेतला. मॉक ड्रिल दरम्यान सर्व विभागांना वेगवेगळ्या आपत्कालीन परिस्थितीचे 'टास्क' देण्यात आले होते. यामध्ये नागपूर अग्निशमन विभागाच्या जवानांनी अत्यंत कौशल्याने दोन बचाव बोटींच्या साहाय्याने पाण्यात अडकलेल्या ६ नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढले. बाधित व्यक्तींचा तपशील: बचाव करण्यात आलेल्या ६ बाधितांमध्ये हृदयविकाराचा त्रास असलेला १ हार्ट पेशंट, १ सर्पदंश झालेली व्यक्ती, आणि ४ वृद्ध व्यक्तींचा समावेश होता. पाण्यातून बाहेर काढताच या सर्वांना पुढील तातडीच्या उपचारासाठी घटनास्थळी सज्ज असलेल्या 'मेडिकल फर्स्ट रिस्पॉन्स टीम'च्या स्वाधीन करण्यात आले. सदर अंगावर काटा आणणारे प्रात्यक्षिक मुख्य अग्निशमन अधिकारी तुषार बाराहाते, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कार्यालयाचे. अंकुश गावंडे, एम.ए.डी.सी. चे मुख्य अग्निशमन अधिकारी गणेश खरटमल, एन.डी.आर.एफ. चे ब्रिजेश यादव आणि एस.डी. आर.एफ.चे श्री. सोनटक्के साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

याप्रसंगी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी दिलीप चव्हाण, प्र. उप मुख्य अधिकारी रवी मरसकोल्हे, सुरेश आत्राम, . रुपेश मानके यांच्यासह आपत्ती व्यवस्थापन टीमचे सर्व कर्मचारी व जवान मोठ्या संख्येने उपस्थित होते. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर प्रशासनाने घेतलेल्या या सज्जतेचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

## CAPTION हौशी पर्यावरणप्रेम...



**नागपूर : काल-परवा जागतिक पर्यावरण दिन आटोपला काही जागरुक व्यक्तींची पर्यावरणविषयक कामे वर्षभर गाजावाजा न करता अखंड असतात काही मात्र भूछत्र्यासारखे जून महिन्याच्या १-२ तारखेला उगवतात तीन ते चार फुटांच्या रोपट्यांसोबत छायाचित्र काढून सोशल मीडियात फिरवत राहतात खामला गाव परिसरातील अगदी रस्त्यात असलेल्या या झाडाची मुळे सर्व बाजूंनी उघडी पडली आहेत त्याकडे या तथाकथित पर्यावरणप्रेमींचे लक्ष नाही.**

# व्यावसायिक संकुल, भाजीबाजारात स्वच्छता अभियान
## पर्यावरण संवर्धन पंधरवड्यानिमित्त मनपाचे विशेष अभियान

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १२ :** पर्यावरण संवर्धन पंधरवड्यानिमित्त नागपूर महानगरपालिकेच्या वतीने ५ ते २१ जून या कालावधीत संपूर्ण शहरात विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत विविध बाजारपेठ, व्यावसायिक संकुल, मॉल्स व भाजीबाजार परिसरात स्वच्छता करण्यात आली. तसेच कचऱ्याचे वर्गीकरण, योग्य विल्हेवाट आणि प्लास्टिकऐवजी कापडी पिशव्या वापरण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.



महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्षनेते नरेंद्र बोरकर, विरोधी पक्षनेता संजय महाकाळकर, एमआयएम गटनेता शकील पटेल, मुस्लीम लीग गटनेता अस्लम मुल्ला खान आणि शिवसेनेचे गटनेता गणेश चर्लेवार यांच्या निर्देशानुसार हे अभियान यशस्वी करण्यात आले. यात घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी व स्वयंसेवी संस्थांनी सहभाग घेतला.

**विविध झोनमधील मोहीम :**

खामला मार्केट (लक्ष्मीनगर झोन): महापौर ठाकरे आणि शिवानी दाणी-वखरे यांनी येथे भेट देऊन कापडी पिशव्यांचे आवाहन केले. यावेळी व्यापारी संघटनेचे मोहन चावला, विनोद जेठानी, श्रुती देशपांडे, श्रीकांत भोरे, विनोद चावला, पंकज वर्धानी, उदय माहुरे, अधिकारी ऋषीकेश इंगळे व डी. एस. गजभिये उपस्थित होते.

**गोकुळपेठ व नेताजी मार्केट (धरमपेठ झोन) :** सहायक आयुक्त राजकुमार मेश्राम, लोकेश बासनवार, जयवंत जाधव, मनपा ब्रँड ॲम्बसेडर व तेजस्विनी महिला मंचच्या किरण मुंदडा व सदस्यांनी जनजागृती केली.

**बुधवार बाजार, सक्करदरा (हनुमाननगर झोन):**

सहायक आयुक्त नरेंद्र बावनकर, डॉ. गजेंद्र महल्ले, दिनेश कलोडे, ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे कौस्तव चॅटर्जी, नाना गिरड, राजेश काळे व एनडीएस पथकाने सहभाग घेतला.

**महात्मा फुले कॉटन मार्केट (धंतोली झोन):** नगरसेविका सुजाता कोंबाडे, नगरसेवक सुहास नानवटकर आणि राजेश गायधनी यांच्या उपस्थितीत साफसफाई झाली.

**महाल, गांधीबाग व संत्रा मार्केट (गांधीबाग झोन):** सहायक आयुक्त घनश्याम पंधरे, सुरेश खरे आणि व्यापारी संघटनांच्या प्रतिनिधींनी यात सक्रिय सहभाग घेतला.

**कमाल मार्केट (आशीनगर झोन):** झोन सभापती आसिफ शेख, अभिषेक शंभरकर, नगरसेविका द्रोणकर, भोला खोब्रागडे व संजय जयस्वाल यांनी मोहीम राबवली.

**मंगळवारी झोन:** बाजारपेठ व व्यावसायिक ठिकाणी झालेल्या मोहिमेत नगरसेविका प्रमिला माथरानी यांच्यासह स्थानिक नागरिक व कर्मचाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदविला.

## मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण... पशुसंवर्धन विभागाचे काटेकोर नियोजन
# आजारापासून पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी सज्ज

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १२ : पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पशुधनाला विविध संसर्गजन्य आजारांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने कंबर कसली आहे. राज्यात 'मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम' युद्धपातळीवर व मोहीम स्वरूपात सुरू करण्यात आली आहे. राज्यातील पशुधनाचे आरोग्य राखणे व शेतक०यांचे आर्थिक नुकसान टाळणे हे आपले मुख्य ध्येय असून, निश्चित केलेल्या लक्ष्यांकित उद्दिष्टांच्या शंभर टक्के पूर्तीसाठी विभागाने काटेकोर नियोजन केले आहे,**



> **पावसाळ्यात जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते व संसर्ग पसरण्याचा धोका वाढतो. त्यामुळे ऐनवेळी येणारे संकट आणि होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पशुपालकांनी आपल्या गाई, म्हशी, शेळ्या व मेंढ्यांचे मान्सूनपूर्व लसीकरण करून घ्यावे. यासाठी आपल्या जवळच्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा.**
>
> **डॉ. किरण पाटील**
> **पशुसंवर्धन आयुक्त**

अशी माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिली. या मोहिमेत सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

पावसाळ्याआधी होणा०या घटसर्प व फ०या यांसारख्या घातक आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी लसीची गुणवत्ता टिकून राहणे अत्यंत महत्त्वाचे असते. लसीचा प्रभाव उत्तम राहण्यासाठी शीतसाखळी व्यवस्थापन अत्यंत चोख ठेवण्यात आले आहे. राज्यस्तरापासून ते थेट ग्रामीण भागातील उपकेंद्रांपर्यंत लस पोहोचवताना आवश्यक तापमान राखले जाईल, यासाठी अद्ययावत कोल्ड बॉक्सचा वापर केला जात आहे, असे पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी सांगितले.

मोहीम यशस्वी करण्यासाठी विभागामार्फत सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत जिल्हा व तालुका पातळीवर आवश्यकतेनुसार लसींचा पुरेसा साठा आधीच वितरित करण्यात आला आहे. पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचा०यांची पथके तयार करण्यात आली असून, ती प्रत्यक्ष गावागावांत आणि गोठ्यांपर्यंत पोहोचून 'डोअर स्टेप' पद्धतीने लस टोचणी करत आहेत. एकाही जनावराचे लसीकरण सुटणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

**तत्काळ नोंदणी**

मोहिमेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे लसीकरणाचे पारदर्शक डिजिटल ट्रॅकिंग होय. प्रत्येक पशुधनाला लस टोचल्यानंतर त्याची नोंद 'भारत पशुधन प्रणाली' या केंद्र सरकारच्या अधिकृत पोर्टलवर रिअल-टाइम (तत्काळ) करणे आवश्यक आहे. पशुधनाचे टॅगिंग (१२ अंकी बिल्ला) करूनच ही नोंदणी केली जावी, जेणेकरून मोहिमेच्या प्रगतीवर थेट देखरेख ठेवता येईल व बोगस नोंदींना आळा बसेल.

महत्त्वाचे

## ऑस्ट्रेलियाचा सुपडासाफ; बांग्लादेशचा विजय

**नवी दिल्ली:** आज बांग्लादेश आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात तीन वनडे सामन्यांच्या मालिकेतील दूसरा सामना पार पडला. या सामन्यात बांग्लादेशच्या संघाने ऑस्ट्रेलिया संघाचा ५ विकेट्सने पराभव केला आहे. या विजयासोबत बांग्लादेशने २-० ने मालिका आपल्या खिशात घातली आहे. दरम्यान सौम्य सरकारने बांग्लादेशकडून सर्वाधिक रन्स केल्या. डीएलएस सिस्टिमने बांग्लादेशचा विजय झाला आहे. ऑस्ट्रेलियाने बांग्लादेशला १८८ रन्सचे टार्गेट दिले होते. त्या रन्सचा पाठलाग करण्यासाठी तन्झिद हसन तमीम आणि सौम्य सरकारने बांग्लादेशच्या डावाची सुरुवात केली. मात्र तन्झिद हसन तमीम शून्यावर आउट झाला. तर सौम्य सरकारने ४२ रन्सची शानदार खेळी केली. नजमुल हुसेन शांतोने देखील ४१ रन्सची खेळी केली. लिटन दासने २१ रन्सची खेळी केली. तौहीदने ४० रन्सची खेळी करत बांग्लादेशचा विजयाचा मार्ग सुकर केला.दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

## सानियाच्या गोलंदाजीवर साराने घेतला सचिनचा कॅच

**नवी दिल्ली:**'क्रिकेटचा देव' मानला जाणारा भारताचा महान फलंदाज सचिन तेंडुलकर याचे या खेळावरील प्रेम आजही तसूभरही कमी झालेले नाही. वयाच्या १६ व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करून ४० व्या वर्षापर्यंत जगावर राज्य करणाऱ्या मास्टर ब्लास्टरने व्यावसायिक क्रिकेट नक्कीच सोडले आहे, पण क्रिकेटने त्याला अजूनही सोडलेले नाही. नुकताच सचिन तेंडुलकरचा एक अतिशय अनोखा आणि रंजक व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला असून, यामध्ये तो चक्क हवेत उडणाऱ्या विमानात क्रिकेट खेळताना दिसत आहे. विशेष म्हणजे, यावेळी त्याची लेक सारा तेंडुलकर आणि सून सानिया चंडोक या दोघींनी त्याला मैदानावर टक्कर दिली.सचिनने हा मजेशीर व्हिडिओ शेअर करत एक भन्नाट कॅप्शन दिले आहे. त्याने लिहिले, ''अल्टिट्युड (उंची) काहीही असो, ॲटिट्युड बदलला नाही पाहिजे.

# विलियमसनची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती




## न्यूझीलंड क्रिकेटमधील एका युगाचा अंत

**नवी दिल्ली: दि.१२ वृत्तसंस्था**

न्यूझीलंडचा संघ सध्या इंग्लंडच्या दौऱ्यावर असून तिथे तीन सामन्यांची कसोटी मालिका सुरू आहे. या मालिकेतील पहिला सामना न्यूझीलंडने आधीच गमावला आहे. अशा परिस्थितीत, न्यूझीलंडचा स्टार फलंदाज केन विल्यमसनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली असून, यासह त्याच्या १६ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीची सांगता झाली आहे.न्यूझीलंड क्रिकेटने जारी केलेल्या निवेदनात, आपल्या निवृत्तीबाबत बोलताना विल्यमसन म्हणाला, ''मी याबद्दल बऱ्याच काळापासून विचार करत होतो, पण गेल्या काही दिवसांत हे स्पष्ट झाले आहे की आता हीच योग्य वेळ आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटबद्दल माझ्या मनात नेहमीच तीव्र आवड आणि जिद्द राहिली आहे. न्यूझीलंडसाठी खेळलेल्या प्रत्येक सामन्यात मी माझे सर्वोत्तम योगदान दिले, याचा मला अभिमान वाटतो. यापेक्षा कमी काहीही करणे योग्य ठरले नसते आणि माझ्या अटींवर निवृत्त होणे ही मी एक मोठी संधी किंवा सन्मान मानतो.''तो पुढे म्हणाला, ''या संघाच्या भविष्याबद्दल मी आशावादी आहे. या न्यूझीलंड संघात प्रचंड गुणवत्ता आहे आणि काहीतरी विशेष साध्य करण्याची खरी जिद्द आहे. हा संघ माझ्या अत्यंत प्रिय आहे आणि इतका काळ त्याचा भाग राहता आले, याबद्दल मी स्वतः ला खूप नशीबवान समजतो. हा संघ नेहमीच माझ्या हृदयाच्या जवळ राहील.''आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील केन विल्यमसनच्या कामगिरीचा विचार करता, त्याच्या नेतृत्वाखाली 'कीवी' संघाने (न्यूझीलंड संघाने) २०१९ च्या एकदिवसीय विश्वचषकाची अंतिम फेरी गाठली आणि त्याला 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' म्हणून गौरवण्यात आले. याव्यतिरिक्त, विल्यमसनने २०१९ मध्ये 'आयसीसी टेस्ट प्लेयर ऑफ द इयर' हा पुरस्कारही जिंकला. त्याच्या कारकिर्दीतील आकडेवारीवर नजर टाकल्यास, त्याने कसोटी क्रिकेटमध्ये ९,५१५ धावा, एकदिवसीय सामन्यांमध्ये ७,२५६ धावा आणि टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये २,५७५ धावा केल्या आहेत. तसेच, त्याच्या नेतृत्वाखाली न्यूझीलंड संघाने 'वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप'चे विजेतेपदही पटकावले.केन विल्यमसनने तिन्ही प्रकारच्या क्रिकेटमध्ये न्यूझीलंडचे नेतृत्व केले आहे. त्याच्या नेतृत्वाखाली संघाने ४० कसोटी सामन्यांपैकी २२ सामने जिंकले, १० गमावले आणि ८ सामने अनिर्णित राहिले. एकदिवसीय सामन्यांमधील त्याच्या कर्णधारपदाची आकडेवारी पाहता, ९१ सामन्यांपैकी ४६ विजय आणि ४० पराभव झाले आहेत; तसेच एक सामना बरोबरीत सुटला आणि चार सामने 'अनिर्णित' राहिले. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्याने ७५ सामन्यांत न्यूझीलंडचे नेतृत्व केले, ज्यामध्ये ३९ विजय आणि ३४ पराभव झाले, तर एक सामना बरोबरीत सुटला आणि एका सामन्याचा निकाल लागला नाही.

## भारतीय शूटिंगचा 'गोल्डन बॉय' हरपला; जसपाल राणा यांचे ४९ व्या वर्षी निधन




**नवी दिल्ली: दि.१२ वृत्तसंस्था**

भारताचे प्रसिद्ध नेमबाज आणि प्रशिक्षक जसपाल राणा यांचे शुक्रवारी (दि.१२ जून) निधन झाले. ते ४९ वर्षांचे होते. मिळालेल्या माहितीनुसार, ते नुकतेच भारतीय संघासोबत जर्मनीतील म्युनिक येथून परतत होते. प्रवासादरम्यान त्यांची प्रकृती खालावली.

दिल्लीत पोहोचल्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले. दिल्लीतील मॅक्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या अचानक झालेल्या निधनाच्या बातमीने क्रीडा जगताला धक्का बसला आहे. जसपाल राणा यांनी खेळाडू आणि प्रशिक्षक या दोन्ही भूमिकांमधून देशाला गौरव मिळवून दिला. त्यांनी अनेक तरुण खेळाडूंना प्रोत्साहन देण्यातही महत्त्वाची भूमिका बजावली.जसपाल राणा नुकतेच म्युनिकहून मायदेशी परतत होते. ते आयएसएफ विश्वचषक स्पर्धेत सहभागी झालेल्या भारतीय संघाचे उच्च-कार्यक्षमता प्रशिक्षक होते. भारतीय संघाच्या प्रभावी कामगिरीनंतर ते म्युनिकहून नवी दिल्लीला परतत होते. मायदेशी परतत असताना, विमानातच त्यांना अस्वस्थ वाटू लागले आणि जसपाल राणा यांची प्रकृती बिघडली. त्यांना तातडीने दिल्ली विमानतळावरून थेट साकेत येथील मॅक्स रुग्णालयात नेण्यात आले. तपासणीनंतर, डॉक्टरांनी त्यांच्या हृदयातील ब्लॉकेज दूर करण्यासाठी स्टेंट शस्त्रक्रिया केली. मात्र, उपचारादरम्यान शुक्रवारी सकाळी त्यांचे निधन झाले.जसपाल राणा हे भारतातील सर्वात यशस्वी नेमबाजांपैकी एक मानले जात होते. त्यांनी जागतिक नेमबाजी स्पर्धा आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत देशासाठी अनेक पदके जिंकली. नेमबाजीला लोकप्रिय करण्यातही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

## फिफा वर्ल्डकप:गोल नाही तर रेड कार्डमुळे रंगली चर्चा






**नवी दिल्ली: दि.१२ वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेची सुरूवात यजमान मेक्सिको आणि दक्षिण अफ्रिका सामन्याने झाली. हा सामना पाहण्यासाठी मेक्सिको सिटीच्या प्रसिद्ध अझ्केटा स्टेडियममध्ये ८५ हजाराहून अधिक प्रेक्षक उपस्थित होते. या स्पर्धेत मेक्सिकोनो दक्षिण अफ्रिकेला २-० ने मात दिली. तसेच मैदानात उपस्थित असलेल्या आपल्या चाहत्यांना खूश केलं. या स्पर्धेत यजमान मेक्सिकोने विजयी सुरूवात केली. पण हा हा सामना वेगळ्या कारणानेही चर्चेत राहिला. कारण या सामन्यात रेफरीने खेळाडूंना त्यांच्या चुकांसाठी इंगा दाखवला. मैदानात बेशिस्तपणे वागणाऱ्या खेळाडूंना रेड कार्ड दाखवलं. पंचांनी एक दोन नाही तर तीन खेळाडूंना रेड कार्ड दाखवून मैदानाबाहेर पाठवलं. त्यामुळे फिफा वर्ल्डकप स्पर्धेच्या पहिल्याच सामन्यात एक नकोसा विक्रम नोंदवला गेला आहे. फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील मेक्सिको आणि दक्षिण अफ्रिका यांच्यातील सामना गोलपेक्षा खेळाडूंच्या बेशिस्तपणामुळे चर्चेत राहिला. या सामन्यात मेक्सिकोने विजय मिळवला, पण रेड कार्डमुळे अधिक चर्चा झाली. या सामन्यात एकूण २३ फाउल झाले. यात मेक्सिकोने १२, तर दक्षिण अफ्रिकेने ११ फाउल केले. पण गंभीर फाउलचा प्रश्न आला तेव्हा पंचांना कोणतीही दयामाया दाखवली नाही. दक्षिण अफ्रिकेच्या खेळाडूला या स्पर्धेतील पहिलं रेड कार्ड दाखवण्यात आलं. या सामन्यातील ५० मिनिटाला दक्षिण अफ्रिकेचा मिडफिल्डर याया सिथोले याला रेड कार्ड दाखवून मैदानाबाहेर काढलं.सामन्याच्या ८४व्या मिनिटाला दक्षिण अफ्रिकेच्या थेम्बा झ्वानेला याला रेड दाखवण्यात आलं. थेम्बाने ६०व्या मिनिटांनंतर मैदानात एन्ट्री घेतली होती. पण अवघ्या २४ मिनिटात रेड कार्ड मिळालं आणि मैदानाबाहेर पडला. दुसरीकडे, मेक्सिकोन या सामन्यात २ गोल मारत आघाडी घेतली होता.

## मेस्सीचा पहिला सामना अल्जेरिया विरुद्ध

**नवी दिल्ली: दि.१२ वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक २०२६ (२०२६) ची शानदार सुरुवात झाली आहे. स्पर्धेच्या उद्घाटन सामन्यात मेक्सिकोने दक्षिण आफ्रिकेला २-० ने पराभूत केले, तर दुसऱ्या सामन्यात दक्षिण कोरियाने चेक रिपब्लिकला २-१ ने हरवून विश्वचषकाची विजयी सुरुवात केली. या वर्षीच्या विश्वचषकात एकूण ४८ संघ सहभागी झाले असून, त्यांची प्रत्येकी चार संघांच्या १२ गटांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत, जगभरातील फुटबॉलप्रेमींचे लक्ष आता अर्जेंटिना आणि पोर्तुगालच्या पहिल्या सामन्यांकडे लागले आहे. मेस्सी आणि रोनाल्डो यांच्यासाठी हा अखेरचा विश्वचषक ठरू शकतो, त्यामुळे चाहते लिओनेल मेस्सी आणि क्रिस्टियानो रोनाल्डो यांना मैदानात पाहण्यासाठी उत्सुक आहेत.गतविजेता अर्जेंटिना संघाला 'जे' गटात स्थान मिळाले आहे. लिओनेल मेस्सीचा संघ आपल्या मोहिमेची सुरुवात १६ जून रोजी करणार आहे. या गटात अर्जेंटिनासोबत जॉर्डन, ऑस्ट्रिया आणि अल्जेरिया हे संघ आहेत. १७ जून रोजी अर्जेंटिनाचा सामना अल्जेरियाशी होईल, तेव्हा मेस्सी पहिल्यांदाच मैदानात उतरेल. हा सामना अमेरिकेतील ॲरोहेड स्टेडियमवर खेळला जाईल. अर्जेंटिनाचा पुढील सामना २२ जून रोजी ऑस्ट्रियाविरुद्ध, तर गटातील शेवटचा सामना २८ जून रोजी जॉर्डनविरुद्ध होईल. मेस्सीच्या नेतृत्वाखालील अर्जेंटिना संघ पुन्हा एकदा विजेतेपदाच्या शर्यतीत प्रबळ दावेदार मानला जात आहे. अर्जेंटिनाने २०२२ मध्ये कतार फिफा विश्वचषक जिंकाल होता.क्रिस्टियानो रोनाल्डोच्या पोर्तुगाल संघाला 'क' गटात स्थान देण्यात आले आहे. या गटात पोर्तुगालसोबत कोलंबिया, उझबेकिस्तान आणि डीआर काँगो हे संघ आहेत. पोर्तुगालचा पहिला सामना १७ जून रोजी अमेरिकेतील ह्यूस्टन येथे डीआर काँगोविरुद्ध होईल. त्यानंतर २३ जून रोजी पोर्तुगालचा सामना उझबेकिस्तानशी होईल. २८ जून रोजी पोर्तुगालचा सामना कोलंबियाशी होईल. रोनाल्डोच्या नेतृत्वाखाली पोर्तुगाल संघाकडे अनेक दर्जेदार खेळाडू आहेत. युरोपियन फुटबॉलमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या या संघाकडून विश्वचषकातही मोठ्या अपेक्षा आहेत.



## नेपाळमध्ये भारतीय आंब्यांवर बंदी?

**नवी दिल्ली:** भारतात उन्हाळ्याचा हंगाम हा केवळ उन्हाळा म्हणूनच नाही तर खास आंब्याचा सीझन म्हणून ओळखला जातो. 'फळांचा राजा' मानल्या जाणाऱ्या आंब्याचे महत्त्व इतके मोठे आहे की, परदेशातही त्याला मोठी मागणी असते. मात्र, अलीकडेच नेपाळमधून अशी एक बातमी समोर आली जिने आंबाप्रेमींची विशेषतः भारतात नव्हे, तर नेपाळमध्ये राहणाऱ्या आंबाप्रेमींनाही निराश केलं. आता मात्र सरकारने या बातमीबाबत स्पष्टता देत विधान केलं आहे.नेपाळमध्ये भारतीय आंब्यांवर बंदी घालण्यात आल्याच्या बातम्या पसरल्या होत्या. जपाननंतर नेपाळनेही भारतातून होणाऱ्या आंब्यांच्या आयातीवर बंदी घातल्याचे वृत्त अवघ्या गेल्या मंगळवारी समोर आले होते. भारतीय आंब्यांमध्ये कीटकनाशकांचे प्रमाण अधिक असल्याने ते आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतात, असे कारण यासाठी दिले गेले होते. मात्र, सरकारने आता या बातम्या फेटाळून लावल्या आहेत.भारत आणि नेपाळ या दोन्ही सरकारांनी आता आपली प्रतिक्रिया दिली आहे.

ही बातमी पूर्णपणे दिशाभूल करणारी असल्याचे सांगत, केंद्र सरकारने बुधवारी स्पष्ट केले: ''काही प्रसारमाध्यमांच्या वृत्तांमध्ये असा दावा केला जात आहे की नेपाळने भारतीय आंब्यांच्या आयातीवर बंदी घातली आहे; हा दावा पूर्णपणे चुकीचा आणि दिशाभूल करणारा आहे. विद्यमान नियमांनुसार 'फायटो-सॅनिटरी' अटींची पूर्तता केली जात असल्यास, आयात सुरूच आहे.

# दोन औषधांच्या होणार किमती कमी

**नवी दिल्ली: दि.१२ वृत्तसंस्था**

### कॅन्सरच्या औषधांसाठी घेतला मोठा निर्णय




देशभरातील कर्करोगग्रस्त रुग्णांना काही काळापासून जीवनरक्षक औषधांच्या तुटवड्याचा सामना करावा लागत आहे. ही परिस्थिती, विशेषतः सरकारी रुग्णालयांमध्ये उपचार घेत असलेल्या रुग्णांसाठी, चिंतेचा विषय बनली होती. आता, या समस्येचे निराकरण करण्यासाठी सरकारने एक मोठे पाऊल उचलले आहे. खरे तर, सरकारने कर्करोगावर उपचार करणाऱ्या दोन महत्त्वाच्या औषधांच्या, सिस्प्लॅटिन आणि कार्बोप्लॅटिनच्या, कमाल किंमत मर्यादेत ५० टक्क्यांनी वाढ केली आहे. यामुळे औषध कंपन्यांना उत्पादन वाढविण्यात आणि बाजारात या औषधांची उपलब्धता सुधारण्यास मदत होईल, अशी आशा आहे.राष्ट्रीय औषध किंमत प्राधिकरणाने ११ जून रोजी जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे की, या दोन औषधांच्या कमाल किंमत मर्यादा वाढवण्याचा निर्णय जनहितार्थ घेण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या मंजुरीनंतर विशेष तरतुदींनुसार हा निर्णय घेण्यात आला. एनपीपीएच्या मते, सिस्प्लॅटिन आणि कार्बोप्लॅटिनसारख्या अत्यावश्यक कर्करोगविरोधी औषधांच्या पुरवठ्यात वारंवार व्यत्यय येत होता. या औषधांची अखंड उपलब्धता सार्वजनिक आरोग्यासाठी अत्यावश्यक आहे, त्यामुळे हस्तक्षेप करणे आवश्यक होते. नवीन प्रणालीनुसार, सिस्प्लॅटिनची कमाल किंमत ₹७.२६ प्रति मिली वरून ₹१०.८९ प्रति मिली पर्यंत वाढवण्यात आली आहे. कार्बोप्लॅटिनची किंमत ₹६०.४९ प्रति मिली वरून ₹९०.७४ प्रति मिली पर्यंत वाढली आहे. या दरांमध्ये करांचा समावेश आहे. सरकार या औषधांच्या किमती नियंत्रित करते, त्यामुळे कंपन्या निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त दराने त्यांची विक्री करू शकत नाहीत.सिस्प्लॅटिन आणि कार्बोप्लॅटिन ही कर्करोगाच्या उपचारात मोठ्या प्रमाणावर वापरली जाणारी औषधे आहेत. त्यांचा उपयोग अंडाशय, फुफ्फुस आणि मूत्राशयाच्या कर्करोगासह अनेक प्रकारच्या कर्करोगांवर उपचार करण्यासाठी केला जातो. परिणामी, त्यांच्या तुटवड्याचा रुग्णांच्या उपचारांवर थेट परिणाम होत होता.वाढता खर्च आणि नियंत्रित किमतींमुळे अनेक औषध कंपन्यांसाठी या औषधांचे उत्पादन आर्थिकदृष्ट्या आव्हानात्मक बनले होते. उद्योग क्षेत्रातील सूत्रांनुसार, काही उत्पादकांनी तात्पुरते उत्पादन कमी केले होते किंवा थांबवले होते, ज्यामुळे बाजारातील तुटवडा आणखी वाढला होता. ही औषधे देशातील सिप्ला, इंटास फार्मास्युटिकल्स, नॅप्रॉड लाईफ सायन्सेस आणि व्हीनस रेमेडीज यांसारख्या अनेक प्रमुख कंपन्यांद्वारे उत्पादित केली जातात.




## ...तर भारत पुन्हा रोखीतील व्यवहारांकडेच वळण्याचा धोका; पहिले इंडिया फाऊंडेशनकडून श्वेतपत्रिका प्रसिद्ध

**नवी दिल्ली: दि.१२ वृत्तसंस्था**

पहिले इंडिया फाऊंडेशनने प्रसिद्ध केलेल्या एका नवीन श्वेतपत्रिकेनुसार, भारताच्या प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट (पीपीआय) आराखड्यात प्रस्तावित बदल काळजीपूर्वक न केल्यास, डिजिटल पेमेंटचा स्वीकार, आर्थिक समावेशन आणि दैनंदिन ग्राहक व्यवहारांवर त्याचे अनपेक्षित परिणाम होऊ शकतात. 'प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स आणि भारताची डिजिटल पेमेंट परिसंस्था: नियामक उद्दिष्टांचा अवलंब, समावेश आणि नवोपक्रमाशी समतोल साधणे' या शीर्षकाच्या श्वेतपत्रिकेत, भारताच्या डिजिटल



अर्थव्यवस्थेतील पीपीआयच्या वाढत्या भूमिकेचे आणि सध्या सुरू असलेल्या नियामक घडामोडींच्या संभाव्य परिणामांचे परीक्षण केले आहे.आरबीआयच्या सहा वर्षांहून अधिक काळाच्या पेमेंट सिस्टम डेटाच्या आधारे केलेल्या या अभ्यासात असे आढळून आले आहे की, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये पीपीआयची संख्या ९८,६९९ लाखांपर्यंत पोहोचली असून, ते भारताच्या डिजिटल पेमेंट पायाभूत संरचनेचा एक महत्त्वपूर्ण घटक बनले आहे. ही श्वेतपत्रिका एका प्रमाणबद्ध आणि जोखीम-आधारित नियामक चौकटीची शिफारस करते, जी अनुपालन आवश्यकतांना वास्तविक जोखमीच्या पातळीशी जुळवून घेईल. तसेच, कमी-मूल्याच्या, उच्च-वारंवारतेच्या वापराच्या प्रकरणांचे जतन करणे, मोठ्या धोरणात्मक हस्तक्षेपांपूर्वी नियामक परिणाम मूल्यांकन करणे, ग्राहक संरक्षण आणि सुलभ उपलब्धता यांचा समतोल साधणे, आणि महत्त्वपूर्ण नियामक बदलांसाठी टप्प्याटप्प्याने अंमलबजावणीचे दृष्टिकोन स्वीकारणे, अशी मागणीही यात केली आहे.

या अभ्यासात असेही आढळून आले आहे की, पीपीआय अनेकदा पहिल्यांदा वापरणाऱ्यांसाठी डिजिटल अर्थव्यवस्थेत प्रवेशाचे माध्यम म्हणून काम करतात आणि भारताच्या व्यापक डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांना पूरक असे सुलभ पेमेंट सोल्यूशन्स प्रदान करतात, ज्यामुळे औपचारिक डिजिटल अर्थव्यवस्थेत सहभागी होण्याचा एक सोपा आणि सुलभ मार्ग उपलब्ध होतो. त्यांच्या सुलभ उपलब्धतेमुळे ते गिग वर्कर्स, छोटे व्यापारी आणि आर्थिकदृष्ट्या वंचित लोकांसाठी विशेषतः उपयुक्त ठरले आहेत.

## चीन करतेय पोती भरुन सोन्याची खरेदी

**नवी दिल्ली: दि.१२ वृत्तसंस्था**

सध्याच्या जागतिक परिस्थिती बरीच बिकट होत आहे याची सगळ्यांनाच कल्पना आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील तणावामुळे जगभरातील अर्थव्यवस्थांवर परिणाम होत असून, भविष्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत, इतर देशांच्या हालचालींकडेही बारकाईने लक्ष दिले जात आहे. उदाहरणार्थ, चीनने अलीकडेच मोठ्या प्रमाणात सोने साठवण्यास सुरुवात केली आहे.चीनची मध्यवर्ती बँक, 'पीपल्स बँक ऑफ चायना' (), सलग १९ महिन्यांपासून आपल्या सोन्याच्या साठ्यात वाढ करत आहे. मे २०२४ मध्ये या बँकेने



सुमारे १० टन सोने खरेदी केले, ज्यामुळे चीनचा एकूण अधिकृत सोन्याचा साठा २,३३१.५ टनांवर पोहोचला आहे. याव्यतिरिक्त, चीनचा परकीय चलन साठा ३.४४ ट्रिलियन डॉलर्सवर पोहोचला आहे. जो एप्रिलच्या तुलनेत ३१.७ अब्ज डॉलर्सने अधिक आहे. नोव्हेंबर २०१५ नंतरची ही परकीय चलन साठ्याची सर्वोच्च पातळी आहे. गेल्या १० महिन्यांपासून चीनचा परकीय चलन साठा सातत्याने ३.३ ट्रिलियन डॉलर्सच्या वर राहिला आहे.चीनच्या परकीय चलन नियामक संस्थेच्या () मते, अमेरिकन डॉलरचे बळकट मूल्य आणि जागतिक स्तरावर मालमत्तेच्या किमतीत झालेली वाढ यांमुळे ही वाढ झाली आहे. चीनची दमदार निर्यात हा देखील परकीय चलन साठा वाढण्यामागचा एक प्रमुख घटक आहे. जानेवारी ते एप्रिल २०२६ या काळात, चीनच्या एकूण परकीय व्यापारात सुमारे १५% वाढ होऊन तो २.३९ ट्रिलियन डॉलर्सवर पोहोचला.

# जागतिक बालकामगार विरोधी दिन विशेष



## मुलांना शिक्षण,संरक्षण,सन्मान हवा



आज बालमजुरी विरोधी दिन साजरा करत असताना आपण सर्वांनी एक महत्त्वाचा प्रश्न स्वतःला विचारला पाहिजे ज्या हातात पुस्तक असायला हवे, त्या हातात कामाची साधने का आहेत?

बालपण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत हक्क आहे. शिक्षण, खेळ, स्वप्ने आणि आनंद यांचा काळ असलेले बालपण जर उपजीविकेच्या ओझ्याखाली दबले, तर तो केवळ त्या मुलाचा नाही तर संपूर्ण समाजाचा पराभव असतो. बालमजुरी ही गरिबी, अशिक्षितपणा आणि सामाजिक असमानतेचे विदारक वास्तव आहे.

आजही अनेक मुले हॉटेल, कारखाने, बांधकामे, दुकाने आणि विविध ठिकाणी काम करताना दिसतात. त्यांच्या डोळ्यांत शिक्षणाची आस आहे, पण परिस्थिती त्यांना मजुरीकडे ढकलते. ही परिस्थिती बदलणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजातील प्रत्येक संवेदनशील नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून माझे ठाम मत आहे की, प्रत्येक मुलाला शिक्षण, संरक्षण आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळालाच पाहिजे. बालमजुरीमुक्त समाज घडविण्यासाठी आपण सर्वांनी जागरूक राहून बालमजुरीला प्रोत्साहन देणाऱ्या कोणत्याही कृतीला विरोध केला पाहिजे. एखादे मूल काम करताना दिसल्यास त्याच्या शिक्षणासाठी आणि पुनर्वसनासाठी प्रयत्न करणे हीच खरी समाजसेवा आहे. आज या दिनानिमित्त मी सर्व पालक, शिक्षक, सामाजिक संस्था, उद्योग क्षेत्र आणि नागरिकांना आवाहन करतो की, ''बालमजुरीला नाही, शिक्षणाला होकार'' हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचवूया. कारण मुलांचे हात कामासाठी नव्हे, तर त्यांच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने साकार करण्यासाठी आहेत.चला, आपण सर्वजण मिळून असा समाज निर्माण करूया जिथे कोणतेही मूल मजूर नसेल, तर प्रत्येक मूल विद्यार्थी असेल. ''बालपण वाचवा, भविष्य घडवा!''

**- डॉ. सुगत ग्यानेश्वर वाघमारे**
**सामाजिक कार्यकर्ता, शिक्षण व बालहक्क समर्थक.**

## बालक हा दयेचा विषय नसून अधिकाराचा विषय आहे!



बालमजुरी ही केवळ गरिबीची परिणती नाही, तर ती बालकांच्या घटनात्मक आणि मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. प्रत्येक बालकाला शिक्षण, संरक्षण, आरोग्य आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार भारतीय संविधानाने दिला आहे. या अधिकारांपासून एखाद्या बालकाला वंचित ठेवणे म्हणजे राष्ट्राच्या भविष्यातील एका नागरिकाला त्याच्या संधींपासून दूर ठेवणे होय.आजही अनेक मुले विविध उद्योग, आस्थापना, हॉटेल्स, बांधकामे आणि असंघटित क्षेत्रात काम करताना दिसतात. हे वास्तव आपल्या विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. बालमजुरीविरोधी कायदे अस्तित्वात असूनही त्यांची प्रभावी अंमलबजावणी, जनजागृती आणि सामाजिक सहभाग यांची आवश्यकता कायम आहे.माजी सदस्य म्हणून बालहक्क संरक्षणाच्या कामात मला अनेक प्रकरणे हाताळण्याची संधी मिळाली. त्या अनुभवातून एक गोष्ट स्पष्ट झाली की, बालमजुरी रोखण्यासाठी केवळ प्रशासनाची जबाबदारी नाही, तर समाजातील प्रत्येक घटकाने सतर्क प्रहरी म्हणून भूमिका बजावली पाहिजे. जेव्हा एखादे मूल कामावर दिसते, तेव्हा आपण ग्राहक म्हणून, नागरिक म्हणून आणि पालक म्हणूनही आपली जबाबदारी ओळखली पाहिजे.बालमजुरीमुक्त भारत घडविण्यासाठी शिक्षणाची उपलब्धता, कुटुंबांचे आर्थिक सक्षमीकरण, कायद्यांची कठोर अंमलबजावणी आणि बालसंरक्षण यंत्रणांचे बळकटीकरण आवश्यक आहे. बालक हा दयेचा विषय नसून अधिकारांचा विषय आहे, ही जाणीव समाजमनात रुजली पाहिजे.या बालमजुरी विरोधी दिनानिमित्त आपण सर्वांनी असा निर्धार करूया की, कोणत्याही बालकाचे शोषण होणार नाही, त्याचे शिक्षण थांबणार नाही आणि त्याचे हक्क हिरावले जाणार नाहीत.''बालकांचे संरक्षण ही केवळ सामाजिक जबाबदारी नाही, तर ती संविधानाने आपल्यावर सोपविलेली सामूहिक बांधिलकी आहे.''

**- ॲड. संजय सेंगर**
**माजी सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग**

## बालकांची स्वप्ने हिरावू नका!



बालमजुरी हा केवळ कायद्याचा विषय नाही, तर तो मुलांच्या बालपणावर, मानसिक आरोग्यावर आणि त्यांच्या भवितव्यावर होणारा गंभीर अन्याय आहे. प्रत्येक मूल हे स्वप्न, प्रतिभा आणि अमर्याद शक्यतांचा खजिना असते. परंतु जेव्हा एखादे मूल शिक्षण, खेळ आणि प्रेमळ वातावरणाऐवजी श्रमाच्या ओझ्याखाली दबले जाते, तेव्हा त्याच्या व्यक्तिमत्त्व विकासावर खोल परिणाम होतो.बाल मानसशास्त्राचा अभ्यासक म्हणून मी असे ठामपणे सांगू इच्छितो की, बालपणातील अनुभव मुलाच्या संपूर्ण आयुष्याची दिशा ठरवतात. सततचे श्रम, तणाव, असुरक्षितता आणि शोषण यामुळे मुलांमध्ये आत्मविश्वासाची कमतरता, भीती, नैराश्य, भावनिक अस्थिरता आणि सामाजिक कौशल्यांमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात. बालमजुरी मुलांच्या हातातील केवळ पुस्तके हिरावून घेत नाही, तर त्यांच्या मनातील स्वप्ने आणि आशादेखील हिरावून घेते.

बालहक्क कार्यकर्ता म्हणून माझा विश्वास आहे की प्रत्येक मुलाला शिक्षण, संरक्षण, आरोग्य, सन्मान आणि आनंदी बालपणाचा अधिकार आहे. मुलांकडे मदतीची अपेक्षा करणारे हात म्हणून नव्हे, तर उद्याचे जबाबदार नागरिक म्हणून पाहिले गेले पाहिजे. समाजातील प्रत्येक व्यक्ती, पालक, शिक्षक, उद्योगपती आणि प्रशासन यांनी बालमजुरी रोखण्यासाठी संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करण्याची गरज आहे.आज बालमजुरी विरोधी दिनानिमित्त आपण एक संकल्प करूया आपल्या परिसरात, गावात किंवा शहरात कोणतेही मूल मजुरी करताना दिसल्यास त्याकडे दुर्लक्ष करणार नाही. त्या मुलाच्या शिक्षणासाठी, संरक्षणासाठी आणि पुनर्वसनासाठी प्रयत्न करू. कारण एका मुलाचे वाचलेले बालपण म्हणजे एका उज्ज्वल समाजाचा पाया असतो.लक्षात ठेवा, ''मुलांच्या हातात कामाची साधने नव्हे, तर ज्ञानाची पुस्तके असली पाहिजेत; कारण बालपण वाचवणे म्हणजे भविष्य घडवणे होय.बालमजुरीमुक्त, शिक्षणसमृद्ध आणि संवेदनशील भारत घडविण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊया.

धन्यवाद!

**डॉ. प्रदीप अवचार**
**बालहक्क कार्यकर्ते** (Child Rights Activist)
**बाल मानसशास्त्र अभ्यासक** (Child Psychology Scholar)

# मुले हे देशाचे भविष्य



## जर देशाचे भविष्यच अंधारात असेल, तर देश प्रगती कसा करणार?

**बालकामगार प्रथा केवळ कायदे करून थांबवता येणार नाही, त्यासाठी बहुआयामी आणि कठोर पावले उचलणे गरजेचे आहे: भारतात शिक्षणाचा अधिकार कायदा आहे, ज्याअंतर्गत ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण दिले जाते. या कायद्याची अंमलबजावणी केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष जमिनीवर झाली पाहिजे. प्रत्येक मूल शाळेत जात आहे की नाही, यावर ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रशासनाने लक्ष ठेवले पाहिजे. जोपर्यंत गरिबी दूर होत नाही, तोपर्यंत बालमजुरी पूर्णपणे थांबणार नाही. गरीब कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, शासकीय योजनांचा लाभ थेट त्यांच्यापर्यंत पोहोचवणे आणि महिला बचत गटांना बळ देणे आवश्यक आहे. बालमजुरी करून घेणाऱ्या मालकांवर, हॉटेल चालकांवर किंवा कारखानदारांवर केवळ किरकोळ दंड न करता, त्यांना थेट तुरुंगवासाची शिक्षा झाली पाहिजे. कायद्याचा धाक निर्माण झाल्याशिवाय ही प्रवृत्ती थांबणार नाही. ''माझ्या घरात काम करणारा मुलगा हा कोणाचा तरी लहान भाऊ किंवा मुलगा आहे,'' ही भावना प्रत्येकाच्या मनात जागी झाली पाहिजे. आपण स्वतः कोणत्याही हॉटेलमध्ये, दुकानात किंवा गॅरेजमध्ये बालकामगार पाहिला, तर तिथे सेवा घेणे नाकारले पाहिजे आणि चाईल्डलाईन (१०९८) वर त्याची तक्रार केली पाहिजे. बालमजुरीच्या गर्तेतून बाहेर काढलेल्या मुलांचे पुनर्वसन करणे खूप महत्त्वाचे असते. त्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांच्या पालकांचे समुपदेशन करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेतली पाहिजे. बालकामगार ही केवळ एका कुटुंबाची किंवा मुलाची समस्या नसून ती संपूर्ण राष्ट्राची समस्या आहे. आजची मुले हे देशाचे भविष्य आहेत. जर देशाचे भविष्यच अंधारात असेल, तर देश प्रगती कसा करणार? हा कलंक पुसण्यासाठी सरकार, समाज आणि आपण स्वतः जागरूक होणे गरजेचे आहे. चला, आपण सर्वांनी मिळून एक संकल्प करूया ''बालमजुरीला पूर्णविराम देऊया आणि प्रत्येक मुलाला शाळेची वाट दाखवूया!'' जेव्हा देशातील प्रत्येक मुलाच्या हातात पुस्तके असतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने हा समाज या कलंकातून मुक्त होईल.**

## परिस्थितीमुळे बालकांवर ओढवते बालमजुरीची वेळ



बालमजुरी ही समाजाला लागलेली मोठी कीड आहे. वास्तविक, कोणत्याही बालकाला लहान वयात काबाडकष्ट करण्याची हौस नसते. परंतु, गरिबी, शिक्षणाचा अभाव किंवा कौटुंबिक संकट यांसारख्या गंभीर परिस्थितीमुळे बालकांवर लहान वयातच काम करण्याची वेळ ओढवते, ही अत्यंत खेदजनक बाब आहे.

अशी बालके जेव्हा समितीसमोर येतात, तेव्हा त्यांच्या समस्येची पाळेमुळे शोधली जातात. समितीचे सदस्य बालकांशी आपुलकीने चर्चा करून त्यांना विश्वासात घेतात. त्यांच्या शिक्षणात गरिबीमुळे व्यत्यय येत आहे की अन्य काही कारण, हे तपासून सर्व पर्यायी उपायांचा सखोल विचार केला जातो. त्यानुसार बालकाच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि गरजेनुरूप योग्य व ठोस निर्णय घेतले जातात.

**ॲड. अनिता गुरव**
**(अध्यक्षा, जिल्हा बाल कल्याण समिती, अकोला)**

## बालकांचे जीवनमान उंचविणे गरजेचे



दरवर्षी १२ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय बाल कामगार विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाची सुरुवात आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने २००२ पासून सुरू केली. यातून बालकांचे होणारे शोषण, शिक्षणापासून वंचित बालकांना त्यांचे अधिकार प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने या दिनाचे महत्त्व आहे. बाल मजुरी ही अत्यंत गंभीर बाब असून ती रोखण्यासाठी देशभरात प्रयत्न होणे गरजेचे आहे. बालकांना अधिकार मिळावेत असे सर्वांना वाटते. तशा चर्चा ही होतात परंतु बालकांचे अधिकार कोणते आहेत हे फारच कमी लोकांना माहिती आहे. आपण ते अधिकार बालकांना मिळवून देत त्यांच्या जिवनाचा विकास करू शकतो. प्रत्येक बालकाचा जीवन जगणे व जीवनमान उंचवण्याचा मुलभूत अधिकार आहे. आज अनेक ठिकाणी बालकांचे शिक्षणाचे स्वप्न भंग होतांना दिसत आहे. तेव्हा एक जबाबदार नागरिक म्हणून आपली भूमिका ही महत्वाची आहे. प्रत्येक बालकाला स्वप्न पाहण्याचा आणि ते स्वप्न सत्यात उतरवण्याचा अधिकारी आहे. त्यामुळे त्यासाठी आपण सर्व स्तरावून कार्य केले पाहिजे. या दिनाचे अवचित्य साधून एक मुल तरी आपण दत्तक घेतले पाहिजे, त्यांच्या स्वप्नासाठी लढले पाहिजे. त्याची संपूर्ण जबाबदारी आपल्यावर आहे. आपण प्रयत्नशिल असले पाहिजे. तेव्हाच हा जागतिक बाल कामगार विरोधी दिन महत्वाचा ठरू शकतो.

**-विष्णू मोंडोकार (सचिव, तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी, अकोला)**



## बालमजुरीमुक्त समाज निर्माण करणे सामूहिक जबाबदारी



बालमजुरी ही केवळ सामाजिक समस्या नसून ती बालकांच्या मूलभूत हक्कांचे गंभीर उल्लंघन आहे. आज अनेक मुले गरिबी आणि कौटुंबिक परिस्थितीमुळे या विळख्यात अडकली आहेत. मुलांच्या हातात कामाची साधने नव्हे, तर शिक्षणाची पुस्तके असली पाहिजेत. त्यामुळे बालमजुरीमुक्त समाज निर्माण करणे ही केवळ शासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे,असे प्रतिपादन बालस्नेही अधिवक्ता ॲड. दिनेश कवाडे यांनी केले. जागतिक बालमजुरी विरोधी दिनानिमित्त ते बोलत होते. संविधानाच्या कलम २१-अ नुसार प्रत्येक बालकाला शिक्षणाचा हक्क असून १४ वर्षांखालील मुलांना कामावर ठेवणे हा कायद्याने दंडनीय अपराध आहे. बालहक्कांचे संरक्षण आणि शिक्षणाद्वारेच याचे उच्चाटन शक्य आहे. ''प्रत्येक बालकाला सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि शिक्षणप्रधान बालपण मिळावे, हीच या दिनानिमित्त मुख्य अपेक्षा आहे.''

**ॲड. दिनेश कवडे (बालस्नेही अधिवक्ता, अकोला)**

## बालमजुरीमुक्त समाजासाठी सामूहिक संकल्प करूया!

जागतिक बाल कामगार विरोधी दिनानिमित्त मी सर्व नागरिकांना आवाहन करतो की, बालमजुरी ही आपल्या समाजाला लागलेला एक कलंक आहे. प्रत्येक मुलाला शिक्षणाचा, सुरक्षिततेचा आणि आनंदी बालपणाचा अधिकार आहे. गरिबी किंवा इतर कोणत्याही कारणास्तव मुलांच्या हातातील पाटी जाऊन जर काम करण्याची वेळ येत असेल, तर ते आपल्या सर्वांचे अपयश आहे.

सहायक कामगार आयुक्त कार्यालय बालमजुरीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आणि बालकांचे हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी सदैव कटिबद्ध आहे. कायद्याची कडक अंमलबजावणी करणे हे आमचे कर्तव्य आहेच, परंतु केवळ कायद्याने हा प्रश्न सुटणार नाही. यासाठी प्रत्येक नागरिकाने जागरूक राहणे गरजेचे आहे. जर आपल्याला कुठेही बालकामगार आढळल्यास, त्याची त्वरित प्रशासनाला माहिती द्या. चला, आपण सर्वांनी मिळून बालमजुरीमुक्त आणि सुशिक्षित भारताची निर्मिती करण्याचा दृढ संकल्प करूया.

**- रा. रा. काळे, सहायक कामगार आयुक्त**

## बालपण हा प्रत्येक मुलाचा जन्मसिद्ध हक्क



बालपण हा प्रत्येक मुलाचा जन्मसिद्ध हक्क असून शिक्षण, खेळ आणि सुरक्षित वातावरण मिळणे ही त्यांची मूलभूत गरज आहे. परंतु आजही अनेक मुले बालमजुरीच्या विळख्यात अडकलेली दिसतात, ही अत्यंत चिंतेची बाब आहे,असे प्रतिपादन शिक्षणतज्ज्ञ प्रा. वैभव कनोजे यांनी केले. जागतिक बालमजुरी विरोधी दिनानिमित्त प्रतिक्रिया देताना ते म्हणाले की, बालमजुरीमुळे मुलांचा सर्वांगीण विकास बाधित होतो. अशा मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी समाजाने पुढाकार घेतला पाहिजे. पालक, शिक्षक, सामाजिक संस्था आणि शासनाने संयुक्तपणे काम केल्यास बालमजुरीमुक्त समाज नक्कीच निर्माण होऊ शकतो. प्रत्येकाने बालहक्कांच्या संरक्षणासाठी कटिबद्ध होणे गरजेचे आहे.बालमजुरीला विरोध करून प्रत्येक मुलाला सन्मानाने जगण्याची आणि शिक्षणाची संधी मिळवून देण्यासाठी आपण सर्वांनी संकल्प करूया.

**प्रा. वैभव रामचंद्र कनोजे,शिक्षणतज्ज्ञ, अकोला**

## बालकामगार मुक्त जिल्हा बनविणे मुख्य ध्येय



अकोला जिल्हा बालकामगार मुक्त करणे हे आमचे मुख्य ध्येय असून, बालमजुरी लावणाऱ्या मालकांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल,'' असा इशारा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी लक्ष्मण हगवणे यांनी दिला. जागतिक बालमजुरी विरोधी दिनानिमित्त जिल्ह्यात विशेष शोध मोहीम व जनजागृती राबवली जात आहे.

जिल्ह्यात आतापर्यंत १४ बालमजुरांची यशस्वी सुटका करण्यात आली आहे. यामध्ये चाईल्ड लाईन व एनकरेज एज्युकेशन सोसायटीने प्रत्येकी १ गुन्हा आणि कामगार विभागाने १२ गुन्ह्यांची नोंद केली आहे. सुटका केलेल्या मुलांचे शिक्षण व पुनर्वसनाची संपूर्ण जबाबदारी विभाग उचलत आहे. बाल शोषणाची माहिती मिळाल्यास नागरिकांनी १०९८ या हेल्पलाईनवर संपर्क साधावा.

बालमजुरीच्या विळख्यातून सुटका केलेल्या बालकांच्या पुनर्वसनाची आणि त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी आमचा विभाग पूर्णपणे उचलत आहे. गरिबीमुळे मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून शासकीय योजना थेट त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यावर आमचा भर आहे.

**–लक्ष्मण हगवणे (जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, अकोला)**

## बालकामगारांच्या प्रश्नाच्या मुळाशी जाणे गरजेचे



जागतिक बाल कामगार मजूर विरोधी दिनाच्या निमित्ताने हा दिवस साजरा करण्याची वेळ आपल्यावर आली आहे हेच खरे दुर्दैव आहे. एक दिवस साजरा करून होणार नाही तर ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. बालकांना त्यांचे अधिकार प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने आपण कार्य केले पाहिजे. बालपण हा प्रत्येक मुलाचा जन्मसिद्ध अधिकार आहे. म्हणून मुलांना त्यांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी झटले पाहिजे. मुलं नेमके कशामुळे मजुरी करतात याच्या खोलाशी गेले पाहिजे. फक्त थोडक्यापुरती कारवाई करून चालणार नाही तर त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी तपासणे महत्त्वाचे ठरेल . बालकामगारांच्या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन कार्य करणे आणि त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे हेच खरे ध्येय असले पाहिजे.

**डॉ. विनय दांदळे**
**( सदस्य बालकल्याण समिती,अकोला)**

## मोठी उमरी रस्त्यावरील मुख्य जलवाहिनी तातडीने बदला

**अकोला:** महानगरपालिकेच्या पूर्व झोन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या मोठी उमरी रोडवर सध्या रस्त्याचे काम सुरू आहे. मात्र, या विकासकामादरम्यान रस्त्याच्या मध्यभागी असलेली मुख्य जलवाहिनी नादुरुस्त झाली असून, याचा थेट फटका परिसरातील नागरिकांच्या पाणीपुरवठ्याला बसत आहे. या पार्श्वभूमीवर, आमदार रणधीर सावरकर यांनी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या कार्यकारी अभियंत्यांना पत्र लिहून ही मुख्य जलवाहिनी तातडीने बदलण्याचे निर्देश दिले आहेत.
मोठी उमरी रोडवरील मुख्य वाहिनी फुटल्यामुळे नागरिकांना नियमित आणि सुरळीत पाणी मिळण्यात मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. भविष्यात पाणीपुरवठ्याचा हा खोळंबा कायमस्वरूपी दूर व्हावा आणि नागरिकांचे हाल थांबावेत, यासाठी जुनी नादुरुस्त वाहिनी बदलून त्याठिकाणी तातडीने नवीन जलवाहिनी टाकण्याची गरज असल्याचे आ. सावरकर यांनी पत्रात नमूद केले आहे.

### महत्त्वाचे

## मनसेचे ठिय्या आंदोलन

**अकोला:** वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर ३० जून २०२६ पूर्वी शाळा सुरू करू नयेत, या मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशाचे अकोल्यातील अनेक शाळा उल्लंघन करत असल्याचा आरोप करत मनसेने शुक्रवारी शिक्षण विभागासमोर आक्रमक ठिय्या आंदोलन केले. मनसेच्या या आंदोलनानंतर प्रशासनाने तातडीने पावले उचलत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या काही शाळांना नोटिसा बजावल्या आहेत.मनसेचे संपर्क अध्यक्ष हेमंत गडकरी यांच्या नेतृत्वाखाली पंकज साबळे (जिल्हाध्यक्ष), सौरभ भगत (शहराध्यक्ष) व सतीश फाले (जिल्हा उपाध्यक्ष) यांनी शिक्षण विभागाला मागण्यांचे निवेदन दिले. न्यायालयाने ३० जूनपूर्वी शाळा न उघडण्याचे स्पष्ट निर्देश दिलेले असतानाही अकोल्यातील अनेक शाळांनी वर्ग सुरू करून विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ मांडल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. अकोला जिल्ह्यातील अशा शाळांची तात्काळ तपासणी करून व्यवस्थापनावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी मनसेने केली आहे..या आंदोलनात मोहन मते, मुकेश धोंडफळे, सौरभ फाले, प्रदीप मस्तुद यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. विद्यार्थी हितासाठी न्यायालयीन आदेशाची काटेकोर अंमलबजावणी न झाल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी मनसे नेत्यांनी दिला.

## उद्यापासून दोन दिवसीय कृषी धोरणावर विचारमंथन

**अकोला :** देशातील कृषी धोरणावर विचारमंथन करून केंद्र सरकारसमोर ठोस उपाययोजना मांडण्यासाठी, भारतीय किसान संघ परिसंघ (सिफा) यांच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील बैठकीचे आयोजन अकोल्यात करण्यात आले आहे. ही बैठक १४ व १५ जून २०२६ रोजी कान्हेरी येथे होणार आहे. या बैठकीला विविध राज्यांतील सिफाचे पदाधिकारी, कृषी शास्त्रज्ञ, विचारवंत आणि अभ्यासक उपस्थित राहणार आहेत.भारतीय किसान संघ परिसंघाचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष झाल्यानंतर शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांनी कृषी मूल्य आयोगाच्या ३ बैठकांना हजेरी लावली होती. त्यानंतर आता अकोल्यात ही महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. यात ग्रामीण भागातील समस्या, शेतकरी व शेतमजुरांचे प्रश्न, बाजारपेठ, उद्योग-कारखानदारी, पर्यावरण, जलस्रोत, तसेच सरकारी धोरणांमुळे संकटात आलेली शेती आणि वाढती बेरोजगारी या विषयांवर देशभरातील विचारवंत आपले मनोगत व्यक्त करणार आहेत. शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांनी हमीभावासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली जनहित याचिका, तसेच कृषी मूल्य आयोगाच्या हमीभाव धोरणावर साधलेला निशाणा देशभरात लक्षवेधी ठरला आहे.

# ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला मिळणार नवी उभारी-खा.धोत्रे

## ‘माझं गाव आरोग्य संपन्न गाव’ अभियान कार्यशाळा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १२ :** निरामय आरोग्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, स्वच्छता, पोषण आणि जनजागृती यांचा समन्वय साधत गावोगावी आरोग्यक्रांती घडवण्यासाठी ‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ हे अभियान महत्त्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वास खासदार अनुप धोत्रे यांनी आज येथे व्यक्त केला.
‘माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव’ अभियानाच्या जिल्हास्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन खासदार श्री. धोत्रे यांच्या हस्ते जि. प. कर्मचारी भवनातील संविधान सभागृहात झाले. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे आदी उपस्थित होते.
जिल्ह्यात सध्या ३१ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि १७६ आरोग्य उपकेंद्रे कार्यरत आहेत. ग्रामीण रुग्णालये व सामुदायिक आरोग्य केंद्रांमार्फत नागरिकांना आरोग्य सेवा दिली जात आहे. या सर्व यंत्रणांच्या समन्वयातून गावपातळीवर विविध आरोग्य उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील ५३४ ग्रामपंचायतींनी या अभियानासाठी नोंदणी केली आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी दिली.श्री. धोत्रे म्हणाले की, ग्रामीण महाराष्ट्राच्या आरोग्य चित्रात आमूलाग्र बदल घडवण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने या अभियानाची सुरुवात केली आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील अनेक गावे या अभियानात सहभागी होणार असल्याने ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला नवी उभारी मिळणार आहे.
अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा व ग्रामपातळीवर समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. गावपातळीवरील या समित्या आरोग्य निर्देशांकांचे मूल्यमापन करून प्रत्यक्ष अंमलबजावणीस दिशा देतील.

तालुका स्तरावर तालुका आरोग्य अधिकारी व गटविकास अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली प्रत्येक गावाचे स्वच्छता, लसीकरण, मातृ-शिशू आरोग्य, कुपोषण निर्मूलन, पाण्याची गुणवत्ता व रोगनियंत्रण या निकषांवर मूल्यमापन करण्यात येणार आहे. यामध्ये ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या गावांना ‘आरोग्यसंपन्न गाव’ म्हणून सन्मानित करण्यात येणार असून, त्यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात येईल.

## अकोला वाढीव पाणीपुरवठा योजनेचा ‘जागतिक बँक’ प्रकल्पात समावेश करा

### आमदार सावरकर यांची शासनाकडे मागणी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १२ :** महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांची भविष्यातील पाण्याची वाढती गरज लक्षात घेता, अकोला शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेचा समावेश जागतिक बँक पुरस्कृत महाराष्ट्र शहरी पाणीपुरवठा, स्वच्छता व पुनर्वापर कार्यक्रम अंतर्गत करण्यात यावा, अशी मागणी आमदार रणधीर सावरकर यांनी शासनाकडे केली आहे.
शहरात सध्या अमृत २.० अभियानांतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे. मात्र, या योजनेचा पूर्ण क्षमतेने उपयोग होण्यासाठी आणि आगामी काळातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता, ही वाढीव पाणीपुरवठा योजना राबवणे अत्यंत आवश्यक असल्याचे आ. सावरकर यांनी सांगितले. जागतिक बँकेच्या या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमांतर्गत मंजुरी मिळाल्यास शहरातील पाणीपुरवठा यंत्रणा अधिक सक्षम आणि दर्जेदार करणे शक्य होणार आहे. शहरातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी तोडगा काढणे हा या मागणीचा मुख्य उद्देश आहे. जागतिक बँकेच्या सहकार्याने चालणाऱ्या या प्रकल्पामुळे केवळ शुद्ध पाणीपुरवठाच होणार नाही, तर पाण्याचा पुनर्वापर आणि सांडपाणी व्यवस्थापनालाही मोठी गती मिळणार आहे.
या संदर्भात महापौर शारदा खेडकर आणि स्थायी समितीचे सभापती विजय अग्रवाल यांनीही मनपा आयुक्तांशी चर्चा करून पत्रव्यवहार केला आहे.

## पालखी मार्गावरील खड्डे व घाण साफ करा; शिवसेनेतर्फे मनपा उपायुक्तांना निवेदन

अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. १२ :** श्री संत गजानन महाराज यांचा पालखी सोहळा २२ जून रोजी अकोला शहरात येत असून, दोन दिवस पालखीचा मुक्काम शहरात असणार आहे. या पार्श्वभूमीवर, अकोला शहर शिवसेनेतर्फे उपआयुक्त (प्रशासन) विजय पारतवार यांना निवेदन सादर करून पालखी मार्गावरील समस्या तात्काळ सोडवण्याची मागणी करण्यात आली आहे.
पालखी ज्या मार्गावरून जाणार आहे, त्या डाबकी रोड परिसरातील मुख्य रस्त्यावर सध्या घाणीचे साम्राज्य पसरले आहे. तसेच या मार्गावर रस्त्याचे रुंदीकरण व दुरुस्तीचे काम अपूर्ण आहे. त्यामुळे मनपा प्रशासनाने संबंधित कंत्राटदाराला तात्काळ आदेश देऊन २० जूनपर्यंत डाबकी रोडच्या रुंदीकरणाचे काम पूर्ण करावे, अशी मागणी शिवसेनेतर्फे करण्यात आली. पालखी सोहळा सुरळीत पार पडण्यासाठी संपूर्ण पालखी मार्गावरील खड्डे भरून रस्ता पूर्णपणे स्वच्छ करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. याप्रसंगी शिवसेना महानगरप्रमुख राजेश मिश्रा, गजानन बोराडे, डॉ. अशोक ओळंबे, तरुण भाऊ, माजी नगरसेवक गजानन चव्हाण, युवा सेना महानगरप्रमुख योगेश ढोरे, पवार भाऊ, अनंत सबधे, रवी मडावी यांच्यासह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

## शासनाचे आदेश डावलून नारायणा स्कूल सुरू; शिक्षणाधिकाऱ्यांनी बजावली नोटीस

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १२ :** शासकीय नियमांचे आणि उच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन करून कौलखेड येथील नारायणा ई-टेक्नो स्कूल ही शाळा सुरू ठेवण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळा व्यवस्थापनाला नोटीस बजावून शाळा तात्काळ बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. आदेशाचे पालन न केल्यास आणि विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळ झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी शाळा प्रशासनाची राहील, असा कडक इशाराही यात देण्यात आला आहे.
आपले सरकार पोर्टलवर १० जून २०२६ रोजी कौलखेड येथील नारायणा ई-टेक्नो स्कूलविरुद्ध एक तक्रार प्राप्त झाली होती. या तक्रारीमध्ये सदर शाळा ८ जून २०२६ पासून सकाळी ७ ते दुपारी ३ वाजेपर्यंत सुरू ठेवली जात असल्याचे नमूद करण्यात आले होते. यापूर्वी देखील १६ एप्रिल २०२६ रोजी माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून पत्राद्वारे शाळेच्या वेळांबाबत व्यवस्थापनाला कळविण्यात आले होते. वास्तविक पाहता, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातील रिट याचिका क्र. ४०६७/२०२६ मधील १० जून २०२६ च्या आदेशान्वये आणि शासन निर्णय २० एप्रिल २०२३ नुसार राज्यातील शाळा ३० जून २०२६ पासून सुरू करण्याचे निर्देश आहेत. तसेच जर त्या दिवशी सुटी आल्यास, त्याच्या पुढील दिनांकापासून शाळा सुरू कराव्यात, असे स्पष्ट आदेश देण्यात आलेले आहेत. असे असतानाही नारायणा स्कूलने सकाळी ७ ते दुपारी ३ या वेळेत शाळा सुरू ठेवून न्यायालयाच्या आदेशांचे प्रथमदर्शनी उल्लंघन केल्याचे दिसून आले आहे. सध्याच्या तीव्र उष्णतेच्या पार्श्वभूमीवर, दुपारच्या सत्रात शाळा सुरू ठेवल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यास किंवा जिवाशयास काही धोका पोहोचल्यास, त्याला केवळ शाळेचे प्राचार्य आणि व्यवस्थापनच वैयक्तिकरीत्या जबाबदार राहतील, अशी समज अकोला जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. अरविंद मोहरे यांनी पत्राद्वारे दिली आहे. तसेच उच्च न्यायालयाच्या आदेशाचे काटेकोर पालन करून सद्यस्थितीत शाळा सुरू ठेवू नये, असे कडक निर्देशही या नोटीसद्वारे देण्यात आले आहेत.

## अटी रद्द करून विनाअट शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या

### राष्ट्रवादीची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक


अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १२ :** राज्य शासनाच्या ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने’तील जाचक व गुंतागुंतीच्या अटींमुळे राज्यातील लाखो शेतकरी या लाभापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे कोणत्याही जाचक अटींशिवाय सर्व शेतकऱ्यांना विनाअट कर्जमाफी देण्यात यावी, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) तर्फे शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. महानगराध्यक्ष रफीक सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना यासंबंधीचे मागण्यांचे निवेदन सादर केले.
या योजनेनुसार, १ एप्रिल २०१९ ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असलेले आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत कर्ज फेडू न शकलेले शेतकरी २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीसाठी पात्र आहेत. मात्र, यातील किचकट निकषांमुळे जिल्ह्यात आधीच्या योजनांमधील ८१ हजार ३३५ शेतकरी अद्यापही वंचित राहिले आहेत. सततची नैसर्गिक आपत्ती, पिकांचे नुकसान आणि हमीभावाचा अभाव यामुळे शेतकरी आधीच आर्थिक संकटात असून, शासनाने कोणताही भेदभाव न करता सर्व पात्र शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी रफीक सिद्दीकी यांनी केली.
यावेळी प्रदेश संघटक सचिव जावेद जकरिया, फिरोज खान, अल्ताफ खान, सरला वरगट, बाबासाहेब घुमरे, ॲड. संदीप तायडे, शाहिद सिद्दीकी यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- २०१९ च्या कर्जमाफीतील ५० हजारांची मर्यादा रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत थेट कर्जमाफी द्यावी.
- एकरकमी कर्ज परतफेड योजनेतील अटी शिथिल कराव्यात आणि प्रोत्साहन अनुदानासाठी सलग चार वर्षे नियमित कर्जफेडीची जाचक अट रद्द करावी.
- २०१७ च्या कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ लाभ द्यावा.
- एक रुपयात पीक विमा योजना पुन्हा सुरू करावी आणि पेरणीपूर्वी शेतकऱ्यांना आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी.

## महापालिकेच्या नाकावर टिच्चून अतिक्रमण!

### शहराचा मुख्य परिसर विळख्यात



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १२ :** शहराचा मुख्य भाग मानला जाणारा मध्यवर्ती बसस्थानक, रेल्वे स्टेशन आणि मुख्य बाजारपेठेचा परिसर सध्या अतिक्रमणाच्या विळख्यात सापडला असून, यामुळे अकोलेकरांना प्रचंड कोंडीचा सामना करावा लागत आहे. वर्षानुवर्षे सुरू असलेल्या या समस्येकडे महापालिका प्रशासन जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.
विशेष म्हणजे, अतिक्रमण निर्मूलनासाठी पालिकेकडे ८० कर्मचाऱ्यांची तगडी फौज असतानाही कारवाई शून्य आहे. त्यामुळे हे कर्मचारी नेमके कोणासाठी काम करतात? असा संतप्त सवाल उपस्थित होत असून, कारवाई न करण्याच्या बदल्यात केवळ खिसे भरले जात असल्याचा थेट आरोप आता जाहीरपणे होऊ लागला आहे. मध्यवर्ती बसस्थानकाच्या संरक्षक भिंतीला लागूनच मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले आहे. त्यामुळे मुख्य रस्ता अर्धाच शिल्लक राहिला असून वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे.

### खाजगी ट्रॅव्हल्सची अरेरावी

उरलेल्या अर्ध्या रस्त्यावर खाजगी वाहतूक करणाऱ्या बसेस अनधिकृतपणे उभ्या राहतात. यामुळे आधीच अरुंद झालेला मार्ग अधिकच गुदमरून गेला आहे.

### रेल्वे स्टेशन परिसराला ग्रहण

रेल्वे स्टेशन परिसरात हातगाड्या, अनधिकृत हॉटेल्स, चहाचे स्टॉल्स आणि अस्ताव्यस्त पार्किंगमुळे प्रवाशांना आत-बाहेर पडताना मोठी कसरत करावी लागत आहे.

### मुख्य बाजारपेठेत चालणेही असह्य

शहराच्या मुख्य बाजारपेठेत अतिक्रमणाची स्थिती इतकी भयावह झाली आहे की, पादचाऱ्यांना साधे चालणेही कठीण झाले आहे. सणासुदीच्या काळात तर येथील परिस्थिती आणखी गंभीर होते.

### प्रशासकीय अनास्था आणि बघ्याची भूमिका

हा सगळा प्रकार गेल्या कित्येक वर्षांपासून सुरू आहे. मात्र, महापालिका प्रशासन कोणतीही ठोस कारवाई न करता केवळ मूग गिळून बघ्याची भूमिका घेत आहे.

### ८० कर्मचाऱ्यांची फौज कुणाच्या कामाची?

महापालिकेच्या अतिक्रमण विभागात तब्बल ८० कर्मचारी कार्यरत आहेत. एवढी मोठी यंत्रणा असताना शहराचे हृदय मानले जाणारे भाग जर अतिक्रमणमुक्त होत नसतील, तर उर्वरित शहराची काय अवस्था असेल? हा मोठा प्रश्नचिन्ह आहे.

### नागरिकांचा थेट सवाल

जर महापालिका आपले मूळ कर्तव्यच बजावू शकत नसेल, तर या पांढऱ्या हत्ती ठरलेल्या अतिक्रमण विभागाचा खर्च जनतेच्या पैशातून का करायचा? ही यंत्रणा केवळ वसुलीसाठीच कार्यरत आहे का, असा थेट आरोप आता अकोलेकर करत आहेत.

**असंतोष** | डॉ. छाया देशमुख यांचा गंभीर आरोप

# न्यायालयाचे आदेश डावलून मनपाची तोडफोड कारवाई

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १२ :** अकोला महापालिकेने छाया हॉस्पिटलच्या कथित अतिक्रमणावर केलेल्या कारवाईवर डॉ. छाया देशमुख यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. मनपा प्रशासनाने न्यायालयाच्या जैसे थे आदेशाचा अवमान करून हेतूपूर्वक आणि बेकायदेशीरपणे ही तोडफोड केल्याचा गंभीर आरोप डॉ. देशमुख यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केला आहे.
डॉ. छाया देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर बांधकामाचा आणि रस्त्याचा वाद न्यायालयात प्रलंबित असून, मनपाच्या संभाव्य कारवाईविरुद्ध स्थगिती मिळवण्यासाठी न्यायालयात रीतसर अर्ज दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाची सुनावणी सुरू असतानाच, १० जून २०२६ रोजी मनपाने अचानक कारवाईचे सत्र सुरू केले. यावेळी पीडित पक्षाने अधिकाऱ्यांना न्यायालयात सुनावणी सुरू असल्याचे सांगून आणि आवश्यक कागदपत्रे दाखवून काही वेळ थांबण्याची विनंती केली. मात्र, मनपा अधिकाऱ्यांनी या विनंतीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. विशेष म्हणजे, त्याच दिवशी दुपारी न्यायालयाने या प्रकरणात जैसे थे परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिले होते; तरीही मनपाने संध्याकाळपर्यंत संपूर्ण बांधकाम उद्ध्वस्त करून टाकले.
या कारवाईदरम्यान रस्त्याशी किंवा अतिक्रमणाशी कोणताही संबंध नसलेली संरक्षक भिंत आणि परिसराचा भागही जमीनदोस्त करण्यात आला. वास्तविक पाहता, हे बांधकाम पूर्णपणे खाजगी हद्दीत असून गेल्या ३० वर्षांपासून तिथे आहे; यामुळे रस्त्याला कोणतीही अडचण निर्माण झालेली नाही. रस्ता रुंदीकरणासाठी एमआरटीपी कायद्याच्या कलम १२७ नुसार पर्चेस नोटीस दिलेली असताना, खाजगी जमीन विनामोबदला हडपण्याचा मनपाचा हा डाव असल्याचा आरोप डॉ. देशमुख यांनी केला आहे. न्यायालयाचा अवमान करून आणि घाईघाईने करण्यात आलेल्या या कारवाईमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, या बेकायदेशीर कृत्याविरोधात आता कायदेशीर बाजू अधिक भक्कम केली जाईल, असे डॉ. छाया देशमुख यांनी स्पष्ट केले आहे.

# रुग्णालयातील मेडिकलमधून औषध खरेदीची सक्ती आता बेकायदेशीर

## अन्न व औषध प्रशासनाचा कडक इशारा; रुग्णालयांमध्ये माहिती फलक लावणे बंधनकारक

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर : दि. १२ :** सध्याच्या वैद्यकीय क्षेत्रात उपचारापेक्षा औषध खर्चाचाच ताण सर्वसामान्य रुग्णांवर अधिक पडत असल्याचे विदारक वास्तव आहे. मल्टिस्पेशालिटीच्या नावाखाली रुग्णालयांमध्येच औषध दुकाने थाटून, तेथूनच औषधी खरेदी करण्याची केली जाणारी सक्ती आता रुग्णालयांना महागात पडणार आहे. ''रुग्ण किंवा त्यांचे नातेवाईक कोणत्याही परवानाधारक औषध विक्रेत्याकडून औषधे खरेदी करण्यास स्वतंत्र आहेत, असा स्पष्ट आदेश



अन्न व औषध प्रशासनाने जारी केला आहे. मात्र, मंगरुळपीर तालुक्यातील बहुतांश रुग्णालयांना आणि औषध विक्रेत्यांना अद्याप या शासकीय आदेशाची पुसटशीही कल्पना नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

रुग्णालयाशी संलग्न दुकानांमधूनच औषधे घेण्याची सक्ती होत असल्याच्या तक्रारी राज्यभरातून एफडीएकडे गेल्या होत्या. याची दखल घेत प्रशासनाने परिपत्रक जारी केले आहे. डॉक्टरांनी लिहून दिलेली विशिष्ट ब्रँडची औषधे बाजारात इतरत्र मिळत नसल्याचा भ्रम निर्माण केला जातो. परिणामी, रुग्णांची आर्थिक लूट होते. या लुटमारीला लगाम घालण्यासाठी एफडीएने ही सक्ती नियमबाह्य ठरवली असून तातडीने अंमलबजावणीचे निर्देश दिले आहेत.

जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी छोट्या दवाखान्यांपासून ते मोठ्या हॉस्पिटल्सपर्यंत फार्मसी पार्टनरशिप किंवा भाडेतत्त्वावर चालवल्या जातात. डॉक्टरांच्या फीपेक्षा या व्यवसायातील नफ्याची टक्केवारी अधिक असल्याने हा अलिखित नियम बनला आहे. आता या नव्या आदेशामुळे रुग्णांना मोठा दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत.

> 'रुग्णांवर विशिष्ट मेडिकलमधूनच औषधे घेण्याची सक्ती नाही. नातेवाईक कोणत्याही परवानाधारक दुकानातून औषधे घेऊ शकतात,' असा स्पष्ट व ठळक मराठीतील फलक रुग्णालयाच्या मुख्य आवारात लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. या नियमाचे उल्लंघन झाल्यास थेट परवाना रद्द करण्याची कारवाई होऊ शकते.

# मूर्तिजापूरात बियाणे महोत्सवाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर: दि. १२ :** कृषी विभाग आणि आत्मा यंत्रणेच्या वतीने शेतकऱ्यांना उत्कृष्ट दर्जाचे व उगवण क्षमता तपासलेले घरगुती बियाणे उपलब्ध व्हावे, या उद्देशाने आयोजित दोन दिवसीय बियाणे महोत्सवाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये १० व ११ जून रोजी हा महोत्सव पार पडला. आमदार हरीश पिंपळे यांनी या महोत्सवाला सदिच्छा भेट देऊन विविध स्टॉल्सची पाहणी केली व शेतकऱ्यांशी संवाद साधला.आमदार पिंपळे यांच्या विशेष पाठपुराव्यामुळेच या महोत्सवाचे यशस्वी आयोजन शक्य झाल्याचे कृषी विभागातर्फे सांगण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमात पारंपरिक शाल-श्रीफळाऐवजी मान्यवरांना छोटे रोपटे देऊन करण्यात आलेल्या पर्यावरणपूरक सत्काराने सर्वांचे लक्ष वेधले.याप्रसंगी बाजार समितीचे सभापती भैय्यासाहेब तिडके, नगराध्यक्ष हर्षल साबळे, उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार, तहसीलदार शिल्पा बोबडे, बीडीओ मिलिंद मोरे, तालुका कृषी अधिकारी दीपक तायडे, विलास वाशिमकर, कुलदीप देशमुख, डॉ. गोपाल मंजुळकर, संघपाल वाहुरवाघ, भाजपा तालुकाध्यक्ष नंदकिशोर राऊत, त्रिशूल इंगळे, भूपेंद्र पिंपळे, राम जोशी आदींसह कृषी अधिकारी व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### क्रीडा प्रशिक्षक पदासाठी अकोल्यात अर्ज आवाहन

**अकोला :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत मिशन लक्षवेध योजनेअंतर्गत अकोला जिल्ह्यात जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्र सुरू करण्यात येत आहे. या केंद्रासाठी मैदानी व वेटलिफ्टिंग क्रीडा प्रकाराकरिता क्रीडा प्रशिक्षकांची कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती केली जाणार असून, यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

या पदासाठी इच्छुक उमेदवारांकडे मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आणि बी.पी.एड./एम.पी.एड. किंवा क्रीडा विज्ञानातील पदवी असणे आवश्यक आहे. तसेच संबंधित खेळातील डिप्लोमा किंवा समतुल्य अभ्यासक्रम, वर्ल्ड ॲथलेटिक्स संघटनेचा कोर्स अथवा सर्टिफिकेट कोर्स पूर्ण असणे गरजेचे आहे. उमेदवारांना किमान एक वर्षाचा राज्यस्तरीय प्रशिक्षणाचा अनुभव असावा आणि त्यांचे वय २१ ते ४५ वर्षांच्या दरम्यान असावे. याशिवाय मराठी भाषा अनिवार्य असून इंग्रजीचे ज्ञान, संगणक प्राविण्य आणि वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळाडूंना निवडीत प्राधान्य दिले जाईल.पात्र आणि इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रांसह दिनांक १९ जून २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वसंत देसाई स्टेडियम, अकोला येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट यांनी केले आहे.

### अकोला जिल्ह्यात घरगणना १०० टक्के पूर्ण

**अकोला:** राष्ट्रीय जनगणना कार्यक्रमात अकोला जिल्ह्याने बाजी मारत पहिल्या टप्प्यातील घरगणनेचे काम १०० टक्के पूर्ण केले आहे. जिल्हाधिकारी तथा मुख्य जनगणना अधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनात ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत अचूक, नियोजनबद्ध आणि जलद गतीने राबविण्यात आली.

जिल्ह्यात एकूण १४ चार्ज अधिकाऱ्यांच्या थेट नियंत्रणाखाली हे काम चालले. गावोगाव प्रगणक (गणक) कर्मचाऱ्यांनी घरोघरी जाऊन माहिती गोळा केली. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील एकूण २ हजार ३९९ घरगटांचे हे काम निर्धारित मुदत संपण्याच्या दोन दिवस आधीच यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले आहे.

या पहिल्या टप्प्यात घरांची सद्यस्थिती, कुटुंबांना उपलब्ध असलेल्या मूलभूत सुविधा (उदा. पिण्याचे पाणी, वीज, शौचालय) आणि मालमत्ता यांची नोंद अधिकृत मोबाईल ॲपद्वारे थेट डिजिटल पद्धतीने करण्यात आली.

### जलालाबाद विद्युत उपकेंद्राला आयएसओ मानांकन

**अकोला:** बार्शी टाकळी तालुक्यातील ३३/११ केव्ही जलालाबाद विद्युत उपकेंद्राचे उत्कृष्ट सक्षमीकरण केल्याबद्दल या उपकेंद्राला आयएसओ ९००१:२०१५ प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. ''विद्युत उपकेंद्राची गुणवत्ता थेट ग्राहक सेवेशी निगडित असते. उपकेंद्रातील या सुधारणांमुळे ग्राहकांना आता अधिक दर्जेदार व अखंडित वीजपुरवठा मिळेल,'' असा विश्वास मुख्य अभियंता नाईक यांनी यावेळी व्यक्त केला. ग्राहकांचे जीवनमान उंचावण्यासाठी दर्जेदार वीज देणे ही महावितरणची जबाबदारी असल्याचे ते म्हणाले. अकोला जिल्ह्यातील आयएसओ मानांकन मिळवणारे हे पाचवे उपकेंद्र ठरले आहे.

# संत गाडगेबाबा चौक फलकाचे अनावरण



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर : दि. १२ :** संत गाडगेबाबा यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या मूर्तीजापूर शहरातील मुख्य चौकातील अतिक्रमण हटवून तेथे श्री संत गाडगेबाबा चौक फलकाचे पूजन व अनावरण करण्यात आले. या कारवाईबद्दल स्मारक समितीने नगर परिषद व प्रशासनाचे आभार मानले; तर उर्वरित अवैध मांस विक्री न थांबल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.काही वर्षांपूर्वी या चौकात अवैध मांस विक्रीची दुकाने थाटण्यात आली होती. यामुळे वृंदावन नगर व प्रतीक नगर येथील रहिवासी त्रस्त होते. चौकाला संत गाडगेबाबांचे नाव असूनही येथे दुर्गंधी आणि भटक्या कुत्र्यांचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. संत गाडगेबाबा स्मारक समितीने सातत्याने निवेदने व आंदोलने केल्यानंतर प्रशासनाने ही दुकाने हटवली. मात्र, अजूनही काही विक्रेते छुप्या पद्धतीने मांस विक्री करत असल्याने समितीने संताप व्यक्त केला आहे.

या चौकाच्या सुशोभीकरणासाठी आमदार हरीश पिंपळे व नगराध्यक्ष हर्षल साबळे यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या कार्यक्रमाला समितीचे अध्यक्ष राहुल तिडके, अरविंद तायडे, अनिल डाहेलकर, बाबांचे पणतू सतीश सोनोने, प्रकाश नांदेकर, उज्ज्वल ठाकरे, भूषण कोकाटे, गजानन चौधरी, राम जोशी यांच्यासह अनेक विचारप्रेमी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विश्वबंधुत्वासाठीच संतांनी दिली काल्याची शिकवण : ज्ञानेशप्रसाद महाराज



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट : दि. १२ :** ''प्रत्येक सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने करण्याची परंपरा सर्व संतांनी एकमुखाने सुरू केली. यामागील मुख्य उद्देश विश्वबंधुत्व व सर्वधर्मसमभाव हाच आहे,'' असे प्रतिपादन ह.भ.प. ज्ञानेशप्रसाद महाराज पाटील यांनी केले.

श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, श्री क्षेत्र श्रद्धासागर (अकोट) द्वारे आयोजित तीर्थक्षेत्रीय सप्ताह श्री क्षेत्र पैठण येथील श्री संत एकनाथ महाराज समाधी मंदिरात उत्साहात संपन्न झाला. त्याप्रसंगी काल्याच्या कीर्तनातून ते बोलत होते. ''शिदोऱ्यांचा करू काला, एक वाटती एकाला'' या न्यायाने आपसातील भेदभाव नष्ट करण्याचा दिव्य संदेश यातून मिळतो, असे सांगत त्यांनी पैठण क्षेत्राचे महात्म्य विशद केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष वासुदेवराव महल्ले यांनी सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानले. कीर्तनकार ज्ञानेशप्रसाद महाराज, नाथ महाराजांचे वंशज प्रमोद महाराज गोसावी व उमेश महाराज मोहोकार यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास महाराज मानकर यांनी केले. या सोहळ्याला संस्थेचे विश्वस्त, हिंगणी येथील महिला सेवाधारी मंडळी व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भव्य महाप्रसादाने सप्ताहाची सांगता झाली. पुढील वर्षी अयोध्या येथे सप्ताह घेण्याची मागणी भाविकांनी केली.

### गोदावरी आरती व क्षेत्र प्रदक्षिणा

सप्ताहादरम्यान गोदावरी घाटावर वासुदेव महाराजांच्या पादुकांचे पूजन करून करण्यात आलेली गोदामाता महाआरती भक्तांचे आकर्षण ठरली. काल्याच्या दिवशी पहाटे एकनाथ महाराज समाधी मंदिरापासून ते त्यांच्या वाड्यापर्यंत निघालेली पालखी, दिंडी व क्षेत्र प्रदक्षिणेदरम्यान भाविकांनी फुगड्या खेळत मोठा आनंदोत्सव साजरा केला.

### नाथ चरित्र प्रकाशनाचा संकल्प

श्री संत वासुदेव महाराज रचित ओवीबद्ध श्री संत एकनाथ महाराज चरित्र ग्रंथाचे पुनर्प्रकाशन करण्याचा संकल्प या सप्ताहात जाहीर करण्यात आला. या ज्ञानपर्वणीसाठी भाविकांनी उत्स्फूर्तपणे देणगी दिली. तसेच पारायण समाप्तीनिमित्त ज्ञानेश्वरीचा अभिषेक करून आम्ररस-पुरणपोळीचा महाप्रसाद वितरित करण्यात आला.

# मळसूर येथील गॅस एजन्सीच्या कारभाराविरुद्ध जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**पातूर : दि. १२ :** तालुक्यातील मळसूर येथील एका एलपीजी गॅस एजन्सीच्या कामकाजात मोठ्या प्रमाणात अनियमितता सुरू असून, तेथे सुरक्षा नियमांची पायमल्ली केली जात असल्याचा आरोप एका निवेदनाद्वारे करण्यात आला आहे. या संदर्भात मळसूर येथील सामाजिक कार्यकर्ते शुभम थिटे यांनी १२ जून रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करून सखोल चौकशीची मागणी केली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या तक्रारीनुसार, संबंधित गॅस एजन्सी चालकाकडून सुरक्षेच्या कायदेशीर नियमांचे उल्लंघन केले जात आहे. अधिकृत गोदामाव्यतिरिक्त अन्य व्यावसायिक दुकानात गॅस सिलिंडरची कथित साठवणूक केली जात असून, यामुळे सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, असा दावा तक्रारदाराने केला आहे. तसेच परिसरात पुरेशी अग्निशमन यंत्रणा उपलब्ध नसल्याचेही निवेदनात म्हटले आहे. ग्राहकांना घरपोच सेवा न मिळणे, सिलेंडरचे वजन व गळतीची तपासणी न करणे अशा विविध त्रुटी तक्रारीत निदर्शनास आणून देण्यात आल्या आहेत.या प्रकरणी पुरवठा विभाग, वजन-माप व संबंधित नियंत्रण विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत तातडीने चौकशी करून प्रशासनाने योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

> संबंधित गॅस एजन्सीच्या कारभारात अनेक त्रुटी असून सुरक्षा नियमांचे उल्लंघन होत असल्याचा संशय आहे. प्रशासनाने या गंभीर बाबीची तातडीने चौकशी करून नागरिकांच्या सुरक्षेसाठी योग्य ती पावले उचलावीत.
>
> **- शुभम थिटे**
> (तक्रारदार, मळसूर)

# दिग्रस ते तुलंगा रस्त्याची अवघ्या दोन महिन्यांतच दुरवस्था; मनसेचा रास्ता रोकोचा इशारा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**पातूर : दि. १२ :** सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत पातूर तालुक्यातील दिग्रस बुद्रुक ते तुलंगा या रस्त्याची थातूरमातूर डागडुजी करण्यात आल्याने अवघ्या दोन महिन्यांतच रस्त्याची दुरवस्था झाल्याचा दावा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्याने अपघातांचे प्रमाण वाढले असून, अनेक प्रवाशांना दुखापत झाल्याचा आरोप मनसेने केला आहे. या रस्त्यावरील दुरुस्तीच्या दर्जाबाबत मनसे कार्यकर्ते आक्रमक झाले असून, तातडीने डांबरीकरण न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.या रस्त्याची दर्जेदार दुरुस्ती करावी, अन्यथा दिग्रस ते तुलंगा मार्गावरच रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, अशा मागणीचे निवेदन मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी ११ जून रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाला सादर केले. मनसेचे जिल्हा संपर्क अध्यक्ष हेमंत गडकरी व जिल्हाध्यक्ष राजेश काळे यांच्या सूचनेनुसार हे निवेदन प्रशासनाला देण्यात आले. यावेळी जिल्हा प्रसिद्धीप्रमुख प्रेम पाटील, विकास शेवलेकर, सागर ठाकरे, सुनील ढोले व गोविंदा शेवलेकर आदी उपस्थित होते. डागडुजीनंतरही रस्ता उखडल्याने शासकीय निधीचा योग्य विनियोग झाला नसल्याचा संशय व्यक्त करत, या कामाची दखल घेण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

## आंबे शौकिनांसाठी यंदा मोठी पर्वणी | जून उजाडला तरी बाजारात गोडवा कायम

# पावसाच्या विलंबामुळे आंब्यांची बाजारपेठ अजूनही बहरात!



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**उमरा : दि. १२ :** साधारणपणे मे महिन्याच्या अखेरीस किंवा जूनच्या सुरुवातीला पावसाचे आगमन होत असल्याने आंब्याचा हंगाम ओसरू लागतो. पहिल्या-दुसऱ्या पावसानंतर आंब्यांची चव बदलते आणि त्यांची बाजारातील आवकही घटते. मात्र, यंदा मान्सूनच्या आगमनाला विलंब झाल्याने अकोला जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये आंब्यांची आवक आणि विक्री दोन्हीही मोठ्या प्रमाणात सुरू आहे. जूनचा दुसरा आठवडा संपत आला तरी आंब्याचा हंगाम टिकून असल्याने आंबे शौकिनांसाठी ही एक आनंदाची पर्वणी ठरत आहे.

दरवर्षी पाऊस सुरू होताच आंबे खाण्याचे प्रमाण कमालीचे घटते. पावसाच्या दिवसांत आंबे खाल्ल्याने पचनाचे विकार किंवा डायरियाचा धोका वाढू शकतो, अशी सर्वसामान्य धारणा असल्याने अनेक नागरिक आंबे खाणे टाळतात. परिणामी, दरवर्षी जूनच्या सुरुवातीला मागणी घटून आंब्यांचे भाव घसरतात. मात्र, यंदा पाऊस लांबल्याने बाजारातील चित्र अगदी उलटे पाहायला मिळत आहे.

अकोट तालुक्यासह उमरा परिसरातील मुख्य बाजारपेठांमध्ये, गल्लीबोळांत आणि प्रमुख चौकांमध्ये आंब्यांची दुकाने तसेच हातगाड्या अजूनही सजलेल्या दिसत आहेत. हापूस, केशर, दशहरी, लंगडा अशा विविध जातींचे आंबे ग्राहकांना सहज उपलब्ध होत असून विक्रेत्यांनाही ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. जून महिना सुरू होऊनही कडक ऊन आणि उकाडा कायम असल्याने, रसाळ आंब्यांच्या खरेदीसाठी बाजारात गर्दी होत आहे. पावसाने ओढ दिल्यामुळे आंब्यांचा हंगाम अपेक्षेपेक्षा अधिक काळ टिकला आहे. त्यामुळे आंबे प्रेमींना आपल्या आवडीचे फळ मनसोक्त खाण्याची संधी मिळत असून, यंदाचा लांबलेला उन्हाळा आंबे शौकिनांसाठी मात्र गोड लाभदायक ठरत आहे.

### जावयांना रसाच्या जेवणाची मेजवानी!

यंदा अधिकमास (धोंड्याचा महिना) आणि लग्नकार्यांचे मुहूर्त यामुळे अनेक ठिकाणी जावयांना घरी आमंत्रित करून पारंपरिक पद्धतीने आंब्याच्या रसाचे जेवण देण्याची प्रथा उत्साहात सुरू आहे. पाऊस नसल्याने रस खराब होण्याची भीती नसल्यामुळे घराघरांमध्ये आजही आंब्याच्या रसाच्या पंगती उठत आहेत. परिणामी, किरकोळ बाजारात आंब्याला मोठी मागणी असून दरातही तेजी कायम आहे.

**-रामेश्वर कावरे, उमरा (ता. अकोट)**

# रक्तदानातून नवजीवनाचा संदेश; मूर्तिजापुरात १८ जून रोजी भव्य रक्तदान शिबीर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



मूर्तिजापूर, दि. १२ : 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान'' हा मानवतावादी संदेश देत येथील श्याममित्र परिवाराच्या वतीने गुरुवार, १८ जून २०२६ रोजी जागतिक रक्तदाता दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबीर मुरली रोडवरील श्री श्याम धाम, मुरली मंदिर येथे संपन्न होईल.

रक्ताला कोणताही कृत्रिम पर्याय उपलब्ध नसल्याने प्रत्येक रक्तदात्याचे योगदान अमूल्य ठरते. अपघातग्रस्त, गंभीर आजारी रुग्ण किंवा शस्त्रक्रियेसाठी रक्ताची निकड असलेल्या रुग्णांना तुमच्या रक्तदानामुळे नवीन जीवन मिळू शकते. हीच सामाजिक जबाबदारी आणि सेवेची भावना डोळ्यासमोर ठेवून श्याममित्र परिवाराने हा लोककल्याणकारी उपक्रम हाती घेतला आहे. एखाद्या गरजूचे प्राण वाचवणे हीच खरी मानवतेची सेवा असून यामुळे अनेक कुटुंबांच्या आशा जिवंत राहतात, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. ''तुमचे एक युनिट रक्त एखाद्याच्या जीवनात नवीन प्रकाश निर्माण करू शकते,'' या भावनेतून सर्व श्याम भक्त, मित्र परिवार आणि मूर्तिजापूर शहरवासीयांनी या उदात्त कार्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन श्याममित्र परिवाराने केले आहे.

अजिंक्य भारत

# आपलं वाशिम

अकोला, शनिवार, दि. १३ जून २०२६ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### अन्न सुरक्षा योजनेचा वाढीव 'कोटा' मंजूर; गरजू कुटुंबांना दिलासा

**वाशिम :** राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना धान्य मिळण्याचा लाभ अधिक प्रभावीपणे मिळावा, यासाठी वाशिम जिल्ह्याला शासनाकडून वाढीव मंजूर संख्या (कोटा) प्राप्त झाला आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील अनेक गरजू कुटुंबांना अन्नसुरक्षेच्या कक्षेत येण्याचा मार्ग मोकळा झाला असून, पात्र लाभार्थ्यांसाठी ही मोठी दिलासादायक बातमी ठरली आहे. जिल्ह्यासाठी अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत ५१ हजार २९८ तर प्राधान्य कुटुंब योजनेसाठी ८ लाख ५३ हजार ९०१ इतका वाढीव कोटा मंजूर झाला आहे. हा वाढीव कोटा जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या गरजेनुसार विभागून देण्यात आला असून, त्यानुसार पात्र लाभार्थ्यांची निवड करून त्यांना योजनेचा लाभ देण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत लाभ देताना विशेषतः दिव्यांग व्यक्ती, शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विधवा महिला आणि समाजातील अत्यंत गरजू घटकांना प्राधान्य दिले जाणार आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील अन्नसुरक्षा अधिक बळकट होण्यास मोठी मदत होणार आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी दीपक बाजड यांनी दिली आहे. आता खऱ्या अर्थाने गरजूंपर्यंत धान्याचा लाभ पोहोचण्यास गती मिळणार आहे.

### जिल्हा परिषदेची अनुकंपा प्रतीक्षा यादी प्रसिद्ध

**वाशिम :** जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत अनुकंपा नियुक्तीधारक उमेदवारांची जून २०२६ अखेरची तात्पुरती प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर यादी जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, प्रतीक्षा यादीबाबत संबंधित उमेदवारांना काही आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यांनी आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रे व पुराव्यांसह हस्तलिखित स्वरूपात सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद वाशिम येथे सादर कराव्यात. निर्धारित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित उमेदवारांनी प्रसिद्ध करण्यात आलेली यादी काळजीपूर्वक तपासून आवश्यक असल्यास विहित कालावधीत हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन जिल्हा परिषद प्रशासनाने केले आहे. अधिक माहितीसाठी उमेदवारांनी जिल्हा परिषद वाशिमच्या अधिकृत संकेतस्थळ ला भेट द्यावी, असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद वाशिम यांनी कळिवले आहे.

# रिसोड बाजार समितीत ११ कोटींचा 'भूखंड घोटाळा'

## शासकीय टीव्ही सेंटरची जागा लपवून हडपले भूखंड : भाडेपट्टा करार रद्द

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १२ :** जिल्ह्यातील रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीने केवळ वैयक्तिक आर्थिक फायद्यासाठी तब्बल ११ कोटी रुपयांच्या जमिनीची विल्हेवाट लावल्याचा धक्कादायक प्रकार चव्हाट्यावर आला आहे. बाजार समितीच्या मुख्य यार्डमधील ११ भूखंड भाडेपट्ट्याने देण्याच्या प्रक्रियेत मोठा भ्रष्टाचार झाल्याचे सिद्ध झाल्याने, पणन संचालनालयाने ही संपूर्ण मान्यताच रद्द करून भ्रष्ट कारभाराला दणका दिला आहे. या कारवाईमुळे रिसोडसह संपूर्ण वाशिम जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या कारवाईने बाजार समितीच्या पदाधिकारी आणि अधिकार्यांचे धाबे दणाणले आहेत.

बाजार समितीच्या मुख्य यार्डमधील जागा खुल्या असल्याचे भासवून, २९ वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्याचा घाट समितीने घातला होता. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी या प्रक्रियेला मान्यता मिळाली होती. मात्र, या भूखंडांच्या वाटपात नियमांची पायमल्ली झाल्याच्या तक्रारी संचालक डॉ . चंद्रशेखर (सी. के.) देशमुख, संतोष सानप, विठ्ठल आरू, इंदुबाई तेजराव वानखेडे, भीमराव वामन शेजुळ, घनश्याम मापारी, डॉ. रामेश्वर नरवाडे व इतर नागरिकांनी केल्या होत्या. तपासात असे निष्पन्न झाले की, ज्या जागा 'मोकळ्या' असल्याचे खोटे प्रतिज्ञापत्र देण्यात आले, त्यापैकी काही जागेवर नगर परिषदेचे टीव्ही सेंटर गेली अनेक वर्षे शासकीय निधीतून उभ्या असलेल्या इमारतीत कार्यरत आहे. ही महत्त्वाची माहिती बाजार समितीने संचालनालयापासून जाणीवपूर्वक लपवून ठेवली, हा एक गंभीर फसवणुकीचा प्रकार आहे.




या गैरव्यवहाराची गंभीर दखल घेत सहाय्यक निबंधक सचिन पतंगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती. या समितीने सादर केलेला अहवाल बाजार समितीचा बुरखा फाडणारा आहे. ले-आऊटमध्ये कोणतीही कायदेशीर दुरुस्ती न करता ११ भूखंडांचे मनमानी विभाजन करण्यात आले. सर्वात संतापजनक बाब म्हणजे, या भूखंड वाटपाची जाहिरात राज्यस्तरीय किंवा मोठ्या प्रसारमाध्यमांत देण्याऐवजी, अत्यल्प वाचकसंख्या असलेल्या एका स्थानिक वृत्तपत्रात देऊन १८ ऑक्टोबर २०२५ रोजी अत्यंत घाईने लिलाव प्रक्रिया उरकण्यात आली. ही प्रक्रिया पारदर्शक नव्हती, तर ती ठराविक लोकांसाठी रचलेला एक 'गेम' होता, असा ठपका समितीने ठेवला आहे. नगर परिषदेला भाडेतत्त्वावर दिलेल्या जागेचे बाजारमूल्य अंदाजे ११ कोटी रुपये असताना, केवळ बाजार समितीच्या पदाधिकार्यांच्या आर्थिक फायद्यासाठी ही जमीन कवडीमोल भावाने लाटण्याचा कट होता. खोटे दस्ताऐवज तयार करून जनतेच्या मालमत्तेची विल्हेवाट लावल्याप्रकरणी आता फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या प्रकरणावरून उच्च न्यायालयातही याचिका दाखल असून, या घोटाळ्यामुळे बाजार समितीचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे.

सर्व पुराव्यांची शहानिशा केल्यानंतर पणन संचालक शरद जरे यांनी १०/२ सर्व्हे क्रमांकातील १० आणि १०/६ सर्व्हे क्रमांकातील १ अशा एकूण ११ भूखंडांच्या भाडेपट्ट्याला दिलेली मान्यता तात्काळ प्रभावाने रद्द केली आहे. या निर्णयाने भ्रष्ट कारभार करणाऱ्यांच्या गोटात चिंतेचे वातावरण पसरले आहे. आता यापुढे या फसव्या कारभाराला जबाबदार असणाऱ्यांवर नेमकी कायदेशीर कारवाई होणार, याकडे संपूर्ण रिसोडवासियांचे लक्ष लागले आहे.

## अनसिंग येथील कोट्यवधींची पाणीपुरवठा योजना रेंगाळली

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अनसिंग, दि. १२ :** शासनाने मंजूर केलेल्या ८ कोटी १३ लाख रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेचे ढिसाळ नियोजन आणि दिरंगाईमुळे अनसिंग येथे तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. योजनेची अधिकृत मुदत संपूनही नागरिकांच्या घरांपर्यंत पाण्याचा एक थेंबही पोहोचलेला नाही. जनतेच्या हक्काच्या पैशांचा अपव्यय होत असताना वरिष्ठ प्रशासन यावर काय कारवाई करणार, असा संतप्त सवाल आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. योजनेचे काम करताना गावात ठिकठिकाणी खड्डे खोदण्यात आले असून, पाईपलाईन गळतीचे (लीकेज) प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. कंत्राटदाराच्या या ढिसाळ



■ अनसिंगसारख्या पाणीटंचाई असलेल्या गावात कोट्यवधी रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर होऊनही आज गाव तहानलेले राहणे अत्यंत खेदजनक आहे. या परिस्थितीला केवळ कंत्राटदार आणि अधिकारीच नव्हे, तर ग्रामपंचायतीमधील सत्ताधारी पक्षही तितकाच जबाबदार आहे. गावकऱ्यांना तात्काळ पाणीपुरवठा सुरू झाला पाहिजे.

**- सिंधु विठ्ठल सातव,** माजी सरपंच, अनसिंग

कारभारामुळे योजनेची दुरवस्था झाली असूनही संबंधित विभागाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. निकृष्ट दर्जाचे काम होऊनही कंत्राटदाराची बिले कशी मंजूर होतात, असा प्रश्न उपस्थित करत कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांमध्ये आर्थिक साठलोट झाल्याचा थेट संशय नागरिकांनी व्यक्त केला आहे.

या संपूर्ण प्रकरणात एका परगावच्या रहिवाशाचा (गुणवंता) या योजनेच्या कामात मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेप वाढल्याचे समोर येत आहे. स्थानिक नागरिक नसतानाही या योजनेचा सर्वेसर्वा असल्यासारखा त्याचा चालणारा वावर कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, तो मूळ ठेकेदार आहे की या योजनेतील भागीदार, अशी शंका गावकऱ्यांनी उपस्थित केली असून या साखळीची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. या गंभीर प्रकरणाची तात्काळ चौकशी करून दोषी कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी यश सतीश चव्हाण यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. कामाची मुदत संपल्यानंतरही अद्याप कोणतीही चौकशी का झाली नाही, तसेच कंत्राटदाराला दिलेल्या निधीचे संपूर्ण ऑडिट (लेखापरीक्षण) करून ते जनतेसमोर मांडावे, असे त्यांनी आपल्या मागणीत म्हटले आहे.

या योजनेत झालेल्या कथित गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत आणि गावात तात्काळ पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## शेतकरी पुत्राच्या आंदोलनाने वेधले प्रशासनाचे लक्ष

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा (लाड), दि. १२ :** ऐन पेरणीच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या वाढत्या आर्थिक अडचणींकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी पुत्र भारत भगत यांनी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी त्यांची प्रकृती खालावल्याची माहिती समोर आली असून, या आंदोलनामुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.



पेरणीचा हंगाम जवळ आला असताना बँकांकडून पीक कर्ज वाटपात होत असलेला विलंब आणि कर्जमाफी प्रक्रियेतील जाचक अटींमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. अनेक पात्र शेतकरी अद्याप लाभापासून वंचित असल्याने भारत भगत यांनी प्रशासनाला जाग आणण्यासाठी उपोषणाचे हत्यार उपसले आहे. उन्हाचा तडाखा असतानाही अत्यंत साध्या परिस्थितीत त्यांनी हे आंदोलन सुरू ठेवले आहे.

आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी भारत भगत यांचा रक्तदाब कमी झाल्याने त्यांची प्रकृती बिघडली आहे. वैद्यकीय तपासणीनंतर त्यांच्या आरोग्याची स्थिती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. भारत भगत यांच्या शारीरिक स्वास्थ्याची काळजी घेत प्रशासनाने या गंभीर प्रश्नांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा आणि उपोषणावर तोडगा काढावा, अशी मागणी आता सर्व स्तरातून जोर धरू लागली आहे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी सुरू असलेल्या या आंदोलनाची दखल घेऊन प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा परिसरातील शेतकरी व नागरिक व्यक्त करत आहेत. भारत भगत यांच्या प्रकृतीकडे लक्ष देण्यासह त्यांच्या मागण्यांची पूर्तता झाल्यासच या परिस्थितीवर नियंत्रण मिळवणे शक्य होणार आहे.

## महाशिवपुराण कथेचा प्रारंभ; शिव-पार्वती विवाह सोहळ्याने भाविक भारावले

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**उंबर्डा बाजार, दि. १२ :** येथील श्री महाकाल मित्र मंडळाच्या वतीने आयोजित महाशिवपुराण कथेला ८ जूनपासून मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात सुरुवात झाली. या धार्मिक महोत्सवाच्या निमित्ताने पंचक्रोशीतील भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळत असून, परिसर शिवभक्तीत न्हाऊन निघाला आहे.



महोत्सवाच्या सुरुवातीच्या सत्रात ह.भ.प. ज्योतीताई धनाडे यांनी आपल्या अमृत वाणीतून भगवान शिव आणि माता पार्वती यांच्या विवाह सोहळ्याची कथा भाविकांना सांगितली. यावेळी शिव-पार्वती यांच्या विवाहाची आकर्षक झाकी सादर करण्यात आली होती, ज्याने उपस्थितांचे मन जिंकले. कथेच्या निमित्ताने श्री गजानन महाराज मंदिरातून भगवान शंकराची भव्य मिरवणूक काढण्यात आली. 'हर हर महादेव'च्या जयघोषात निघालेली ही मिरवणूक भक्तीच्या वातावरणात सभागृहापर्यंत पोहोचली. तिथे कथाकार ह.भ.प. ज्योतीताई धनाडे यांच्या उपस्थितीत शिव-पार्वती विवाह सोहळा मोठ्या थाटात आणि धार्मिक विधींनुसार संपन्न झाला. या मंगलमय सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी परिसरातील हजारो महिला व पुरुष भाविक उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

## रुग्णालयाला चक्क दगडांचा विळखा आणि रुग्णांचा जीवघेणा संघर्ष

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कामरगाव, दि. १२ :** 'रुग्णालयात उपचार मिळतात, पण आरोग्याला जीवघेणा धोका मिळेल असे कधी वाटले नव्हते,' अशी हतबल भावना कामरगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या एका वृद्ध रुग्णाने व्यक्त केली. कारंजा तालुक्यातील सुमारे २० हजार लोकसंख्या असलेल्या कामरगाव आणि आसपासच्या ४० गावांच्या आरोग्याची भिस्त ज्या ग्रामीण रुग्णालयावर आहे, तिथे आज मृत्यूशी झुंज देणाऱ्या रुग्णांना उपचारासाठी चक्क 'दगडांचा आधार' घ्यावा लागत आहे. हे दृश्य केवळ धक्कादायक नाही, तर संपूर्ण आरोग्य व्यवस्थेचे लक्तरे वेशीवर टांगणारे आहे.




कामरगाव ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात सर्वत्र खडी आणि अस्ताव्यस्त दगड पसरलेले आहेत. रुग्णालयात पाऊल ठेवल्यापासून ते औषधे घेईपर्यंतचा प्रवास म्हणजे एखाद्या भीषण संघर्षासारखा झाला आहे. ओपीडीची चिठ्ठी काढण्यासाठी रांगेत उभे राहताना वृद्ध, दिव्यांग आणि गर्भवती महिलांना दगडांवर पाय रोवून तासनतास वाट पाहावी लागते. अनेकदा उन्हाच्या तडाख्यामुळे चक्कर येऊन रुग्ण या दगडांवर कोसळतात. गंभीर आजारी रुग्णांना स्ट्रेचरवरून नेणे हे तर नातेवाईकांसाठी मोठे दिव्य बनले आहे. स्ट्रेचरची चाके या दगडांमध्ये अडकून रुग्ण उलटण्याची भीती नेहमीच असते. अशा परिस्थितीत उपचार घेण्यासाठी येणे म्हणजे सुदृढ माणसाच्या आरोग्याशी खेळ खेळण्यासारखे झाले आहे.

एकीकडे 'आरोग्यदायी महाराष्ट्र' आणि 'गोरगरिबांना उत्तम उपचार' अशा घोषणांचा पाऊस पडत असताना, कामरगाव रुग्णालयातील हे वास्तव शासनाच्या दाव्यांना थेट छेद देत आहे. तापलेल्या उन्हात डोक्यावर आग ओकत असलेला सूर्य आणि पायाखाली टोचणारे दगड... या दुहेरी संकटात सापडलेला रुग्ण जेव्हा उपचारासाठी येथे येतो, तेव्हा त्याला आरोग्याऐवजी अधिक यातनाच मिळतात. 'जर रुग्णालयात साधी चालण्याची वाटही सुरक्षित नसेल, तर आमच्या जीवाचे रक्षण कोण करणार?' असा संतप्त सवाल येथील नागरिक विचारत आहेत.

गेल्या अनेक दिवसांपासून परिसरातील ग्रामस्थ या असुविधांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत आहेत, परंतु बधिरांच्या नगरीत कोणालाही पाड पडत नाही. एखाद्या दिवशी मोठा अपघात होऊन एखादा रुग्ण कायमचा अपंग झाला किंवा जीवितहानी झाली, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? हा प्रश्न आता गंभीर रूप धारण करत आहे. आरोग्य सुविधा म्हणजे केवळ डॉक्टर आणि औषधे नव्हे, तर रुग्णाला सुरक्षित वाटेल असे वातावरण निर्माण करणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी आता तरी केवळ कागदी घोडे नाचवणे थांबवून जमिनीवरील वास्तव पाहावे.

**राजकारणापलीकडची माणुसकी!** महापौर रितू तावडे आणि शुभदा नायक यांची हृदयस्पर्शी भेट

## ऋणानुबंध; विकासकामांचे मंथन आणि जुन्या आठवणींना उजाळा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १२ :** राजकारणाच्या गजबजलेल्या आणि धावपळीच्या विश्वात अनेकदा कठोर संघर्ष पाहायला मिळतात, मात्र काही नाती ही पद, प्रतिष्ठा आणि राजकारणाच्या पलिकडे जाऊन मैत्री आणि विश्वासाच्या घट्ट धाग्यांनी विणलेली असतात. असाच एक भावनिक, प्रेरणादायी आणि हृदयस्पर्शी सोहळा नुकताच मुंबई येथे पाहायला मिळाला. भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव सौ. शुभदा मुकुंदराव नायक यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विद्यमान महापौर सौ. रितू राजेश तावडे यांची सदिच्छा भेट घेतली. ही भेट केवळ एक राजकीय औपचारिकता नव्हती, तर अनेक वर्षांपासून जपलेल्या घट्ट ऋणानुबंधांना उजाळा देणारा एक सुखद क्षण होता.



राजकारणातील कामाच्या व्यापात आणि जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली दबलेल्या वातावरणातही, या दोन्ही नेत्यांनी एकमेकींसाठी खास वेळ काढला. गेल्या अनेक वर्षांपासून शुभदा नायक आणि महापौर सौ. रितू राजेश तावडे यांच्यात मैत्रीचे घट्ट बंध आहेत. वैचारिक साम्य आणि समाजकार्याची ओढ यामुळे या दोघींमधील मैत्री काळाच्या कसोटीवर अधिक वृद्धिंगत झाली आहे. या भेटीदरम्यान, भूतकाळातील अनेक आठवणींना उजाळा देण्यात आला. जेव्हा या दोन नेत्यांनी एकमेकींच्या सुख-दुःखाच्या क्षणांची आठवण काढली, तेव्हा उपस्थितांनाही त्या मैत्रीतील जिव्हाळा आणि ऊब प्रकर्षाने जाणवली.

**सदिच्छा भेटीचा उद्देश: जुन्या ऋणानुबंधांना उजाळा देणे आणि संघटनात्मक बळकटीकरण. लोकहिताला प्राधान्य: विकास प्रकल्प आणि जनतेच्या प्रश्नांवर महापौर सौ. रितू राजेश तावडे यांच्याशी झालेली चर्चा महत्त्वपूर्ण ठरली. प्रेरणादायी संवाद: पक्षीय निष्ठा आणि जनसामान्यांची सेवा यावर आधारित झालेल्या या संवादाने कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह निर्माण केला आहे.**

या भेटीचे विशेष आकर्षण म्हणजे, या दोन्ही नेत्यांनी लोकहिताच्या कामांवर साधलेला सविस्तर संवाद. दिनांक ९ जून २०२६ रोजी महापौर सौ. रितू राजेश तावडे यांच्याकडे नगरसेवक, पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते आणि सामान्य जनतेने सदिच्छा भेट दिली होती. या भेटीदरम्यान अत्यंत सकारात्मक वातावरणात झालेल्या चर्चेत आगामी काळातील विकास प्रकल्प, प्रभागातील प्रलंबित प्रश्न आणि सर्वसामान्यांच्या हिताच्या योजनांवर मंथन झाले. भाजपची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत कशी करता येईल आणि तळागाळातील कार्यकर्त्यांना बळ कसे देता येईल, यावर शुभदा नायक आणि सौ. रितू राजेश तावडे यांनी सविस्तर चर्चा केली.

महिला सक्षमीकरणावर भर देताना शुभदा नायक यांनी वाशिममधील महिलांच्या संघटित शक्तीचे कौतुक केले, तर महापौर सौ. रितू राजेश तावडे यांनी मुंबईसारख्या महानगरात महिला कशा प्रकारे नेतृत्व करत आहेत, याचे अनुभव कथन केले. 'महिलांच्या संघटित शक्तीतूनच समाजाचा खऱ्या अर्थाने विकास शक्य आहे,' असा ठाम विश्वास या दोन्ही नेत्यांनी व्यक्त केला.

## उपसरपंच अविश्वास प्रस्तावाचे प्रकरण जिल्हाधिकाऱ्यांच्या दरबारी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. १२ :** रोहणा ग्रामपंचायतीचे उपसरपंच रवींद्र राऊत यांच्याविरुद्ध मंजूर करण्यात आलेला अविश्वास ठराव वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. या प्रक्रियेत कायदेशीर नियमांचे उल्लंघन झाल्याचा दावा करत, उपसरपंच राऊत यांनी या निर्णयाला जिल्हाधिकारी वाशिम यांच्या कार्यालयात आव्हान दिले आहे.

रोहणा ग्रामपंचायतीतील काही सदस्यांनी उपसरपंचांविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणला होता. त्यानंतर नियमानुसार विशेष सभा बोलावून हा ठराव मंजूर करण्यात आला. मात्र, ही संपूर्ण प्रक्रिया नियमबाह्य असल्याचा आरोप उपसरपंच राऊत यांनी केला आहे. विशेष सभेची नोटीस देण्यापासून ते प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेपर्यंत विविध टप्प्यांवर नियमांची पायमल्ली झाली असल्याचे राऊत यांचे म्हणणे आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल केलेल्या अपीलात, अविश्वास ठरावाची संपूर्ण प्रक्रिया, सभेचे इतिवृत्त, उपस्थिती नोंद आणि मतदानाची पद्धत यांची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. कायदेशीर प्रक्रियेत त्रुटी आढळल्यास हा अविश्वास ठराव रद्द करावा, अशी विनंतीही त्यांनी केली आहे.

या घडामोडींमुळे रोहणा ग्रामपंचायतीच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. सत्ताधारी आणि विरोधी गटांकडून आपापल्या भूमिकेचे समर्थन केले जात असल्याने, आता सर्व लक्ष जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निर्णयाकडे लागले आहे.

**महत्त्वाचे**

## भरधाव चारचाकीने मजुरांना चिरडले, तीन गंभीर



**अकोला :** अकोला-पातूर रस्त्यावरील हिंगणा फाटा परिसरात आज दुपारी चार वाजेच्या सुमारास एक भीषण अपघात घडला. अकोल्याकडून पातूरच्या दिशेने जाणाऱ्या एका भरधाव चारचाकी वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने, हे वाहन रस्त्यालगत स्वच्छता व दुरुस्तीचे काम करणाऱ्या मजुरांच्या अंगावर गेले. या अपघातात एका चिमुरडीसह चार मजूर जखमी झाले असून, त्यापैकी तिघांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे. फूलवती, मीरा, लक्ष्मी आणि स्वर्णा (लहान मुलगी) अशी अपघातातील जखमींची नावे आहेत. हे सर्व मजूर मूळचे मध्य प्रदेशातील रहिवासी असून ते येथे रस्त्याचे काम करत होते. अपघात घडताच आजूबाजूच्या नागरिकांनी घटनास्थळाकडे धाव घेत जखमींना तातडीने उपचारासाठी अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात (सर्वोपचार रुग्णालय) दाखल केले. या अपघातात तीन मजूर गंभीर जखमी असल्याने त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. अपघातानंतर महामार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ धाव घेत वाहतूक सुरळीत केली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## गिनीज रेकॉर्डसाठी अकोलेकरांना ऑनलाईन योगासनांचे आवाहन

**अकोला :** आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून आयुष मंत्रालय भारत सरकार अंतर्गत आयोजित ऑनलाईन योग सत्राच्या माध्यमातून थेट 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' प्रस्थापित करण्याचा महत्त्वपूर्ण मानस जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने व्यक्त केला आहे. या ऐतिहासिक जागतिक विक्रमाचे भागीदार होण्यासाठी अकोला जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी, शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांनी, शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आणि खेळाडूंनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

हा विशेष ऑनलाईन योग वर्ग दिनांक १४ जून २०२६ रोजी सकाळी ६:१५ ते ७:१५ या वेळेत आयोजित केला असून, याचे थेट प्रक्षेपण आयुष मंत्रालयाच्या अधिकृत युट्युब प्लॅटफॉर्मवर केले जाईल. उपक्रमात सहभागासाठी नागरिकांनी सर्वप्रथम १८००-३१५-७००८ या टोल फ्री क्रमांकावर 'मिस कॉल' देऊन आपली पूर्व नोंदणी करणे अनिवार्य आहे. नोंदणीनंतर मोबाईलवर योग सत्राची लिंक व आवश्यक सूचना संदेशाद्वारे पाठवल्या जातील. गिनीज रेकॉर्डच्या निकषांनुसार प्रत्येक सहभागी व्यक्तीने स्वतःच्या स्वतंत्र मोबाईल, लॅपटॉप किंवा टॅबवरून सत्रात लॉग-इन करणे आवश्यक राहील. नोंदणीकृत प्रत्येक उपकरणाची स्वतंत्र नोंद गृहीत धरली जाणार असल्याने अकोलेकरांनी यात उपस्थित राहून हा जागतिक विक्रम यशस्वी करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# अकोला जिल्ह्यात 'गाव तिथे गोदाम' योजनेला वेग; जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

## जगातील सर्वात मोठी धान्य साठवणूक योजना; शासकीय जागा उपलब्ध करून देणार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि १२ :** शेतकऱ्यांचा शेतीमाल सुरक्षित राहावा आणि त्यांना हक्काची साठवणूक व्यवस्था मिळावी, यासाठी सहकार व महसूल विभागामार्फत 'गाव तिथे गोदाम' आणि 'जगातील सर्वात मोठी धान्य साठवणूक योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी संस्थांना गावपातळीवर गोदाम बांधकामासाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यादृष्टीने संस्थांचे प्रस्ताव, जागेचा शोध व इतर प्रशासकीय कार्यवाही तातडीने व गतीने पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित 'जिल्हा सहकार विकास समितीच्या' महत्त्वपूर्ण बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीला जिल्हा उपनिबंधक हितेशचंद्र साबळे, उपजिल्हाधिकारी निखील खेमनार, अभय कटके यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.



जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, ग्रामीण भागात गावातच सुरक्षित धान्य साठवणूक व्यवस्था निर्माण करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. जिल्ह्यात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी सहकार विभागाने विविध विकास संस्थांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव तातडीने तपासावेत. महसूल व तहसील कार्यालयाशी योग्य समन्वय ठेवून जागेचा शोध घ्यावा आणि परिपूर्ण माहिती सादर करून या संपूर्ण प्रक्रियेला गती द्यावी, जेणेकरून शेतकऱ्यांना याचा तात्काळ लाभ मिळेल.

जिल्ह्यात गोदाम योजनेसाठी सध्या ६७ प्राथमिक कृषी सहकारी संस्थांचे प्रस्ताव प्राप्त झाले असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. याशिवाय बैठकीमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेत अपात्र ठरलेल्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांची सुधारित यादी सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले. तसेच राष्ट्रीय सहकारी डेटाबेस अद्ययावतीकरण करण्याबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली.

### शेतकऱ्यांना होणार मोठा फायदा!

ग्रामीण भागात अनेकदा गोदामांची सोय नसल्याने शेतकऱ्यांना आपला शेतीमाल बाजारात येईल त्या भावात विकावा लागतो किंवा पावसाने माल खराब होतो. 'गाव तिथे गोदाम' या जगातील सर्वात मोठ्या साठवणूक योजनेमुळे आता शेतकऱ्यांचा माल गावातच सुरक्षित राहील. मालाचे नुकसान टळल्यामुळे शेतकऱ्यांना योग्य भाव मिळेपर्यंत धान्य साठवून ठेवता येईल, ज्यामुळे त्यांची आर्थिक कोंडी फुटण्यास मदत होणार आहे.

## बालपण वाचवण्यासाठी अकोल्यात बालकामगार विरोधी मोहीम




अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १२ :** जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा प्रशासन, महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय आणि 'जस्ट राईट्स फॉर चिल्ड्रन'च्या भागीदारीत 'इंडियन सोशल वेलफेअर सोसायटी'तर्फे अकोल्यात संयुक्त जनजागृती मोहिमेचा प्रारंभ झाला. जिल्हाधिकारी वर्षा मिना यांच्याशी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी लक्ष्मण हगवणे, चाईल्ड लाईन समन्वयक हर्षाली गजभिये व जिल्हा प्रकल्प समन्वयक शंकर वाघमारे यांनी बाल तस्करीविरोधात चर्चा करून मोहिमेचे उद्घाटन केले. त्यानंतर बसस्थानक, टॉवर चौक व रेल्वे स्टेशनवर रॅली आणि पथनाट्यांद्वारे बालहक्क व शिक्षण अधिकाराची जनजागृती करण्यात आली.

जून 'ॲक्शन मंथ' अंतर्गत दुकाने व आस्थापनांमधून बालकामगारांची शोध मोहीम राबवून, त्यांची सरकारी कामगार कार्यालयामार्फत सुटका केली जाईल. ही संस्था गोंदिया, अकोला, जालना व भंडारा जिल्ह्यात बालसंरक्षणाचे काम करते. मोहीम यशस्वीतेसाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजू लाडुलकर, समन्वयक पूजा पवार, पूजा मनवर, सोशल वर्कर रवींद्र सावरकर, परमानंद मुरमकार, संजीवनी गवई, रेल्वे चाईल्ड लाईन सुपरवायझर पद्माकर सदानशिव, अपर्णा सहारे, रेल्वे सुरक्षा बलाचे ए.पी.आय रजनीकांत, रेल्वे पोलीस स्टेशनचे हेड कॉन्स्टेबल अशोक चांदूरकर आणि हर्षा सरदार परिश्रम घेत आहेत.

## क्रीडा शिक्षक बी. एस. तायडे यांना राष्ट्रीय पुरस्कार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बोरगाव मंजू , दि. १२ :** येथील जय बजरंग विद्यालय, कुंभारी येथील स्काऊट मास्टर तथा क्रीडा शिक्षक बबलू (बी. एस.) तायडे यांना त्यांच्या ज्ञान, कला, क्रीडा आणि स्काऊट गाईड अशा शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

नाशिक येथील ज्ञानदीप सामाजिक संस्थेच्या वतीने नुकताच नाशिक येथील समुद्रा लॉन्स येथे या भव्य पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराज आंबेडकर आणि उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते तायडे यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.




पुरस्कार स्वीकारल्यानंतर तायडे यांनी संस्थेचे संस्थापक माजी आमदार स्वर्गीय प्रा. तुकाराम भाऊ बिरकड यांच्या स्मृतींना अभिवादन केले. तसेच आपल्या या यशाचे श्रेय त्यांनी संस्थेचे अध्यक्ष नारायणराव गावंडे, श्रीकृष्ण बिरकड गुरुजी, चंद्रभानजी अतकरे, मार्गदर्शक प्रकाश बिरकड, शत्रुघ्न बिरकड, विलास इंगळे, प्राचार्य डॉ. सूर्यभान नागुलकर, पर्यवेक्षक प्रा. श्रीराम पालकर यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिले आहे.

त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## अधिकमासात जावयाचा 'मान' राखताना बळीराजाची 'कसरत'!

### प्रतिष्ठेला फाटा; यंदा कपडे अन् कौतुकावरच भर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. १२ :** हिंदू धर्मात जावईबापूंच्या आदरातिथ्याचा काळ असलेला 'अधिकमास' (धोंड्याचा महिना) सध्या सुरू आहे. सासरच्या मंडळींसाठी हा सण कौतुकाचा असला, तरी यंदा मंगरुळपीर तालुक्यातील शेतकरी कुटुंबांसाठी तो आर्थिक कसरतीचा ठरत आहे.

एकीकडे सोन्या-चांदीच्या दरांनी गगनभरारी घेतली आहे, तर दुसरीकडे शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्याने बळीराजा पुरता होरपळला आहे. अशा स्थितीत लेकी-जावयाचा मान कसा राखायचा, या विवंचनेत ग्रामीण भागातील शेतकरी अडकला आहे. ग्रामीण भागात लग्नकार्यानंतर येणाऱ्या पहिल्या 'धोंड्याला' मोठे सामाजिक महत्त्व आहे. जावयाला काय मानपान मिळाला, याला प्रतिष्ठेचा प्रश्न मानले जाते. त्यामुळे शेतकरी कुटुंबांवर मोठा मानसिक दबाव आहे. यंदा खते, बियाणे, मजुरी आणि फवारणीचा खर्च दुप्पट झाला आहे. हातात पैसा नसल्याने जावयाला आहेर करण्यासाठी अनेक शेतकऱ्यांना कर्ज काढावे लागत आहे, तर काहींवर नातेवाईकांकडून हातउसने पैसे घेण्याची वेळ आली आहे. सोन्या-चांदीचे भाव आवाक्याबाहेर गेल्याने चांदीची अंगठी किंवा ताट-वाटी खरेदी करतानाही बजेट कोलमडत आहे. शेतकरी दुकानात केवळ दराची चौकशी करून हताशपणे परतत आहेत. काही जण नाईलाजास्तव घरातील जुने सोने मोडून सण साजरा करत आहेत. परिस्थिती बेताची असलेले गरीब व अल्पभूधारक शेतकरी मात्र मौल्यवान दागिन्यांना पूर्णपणे फाटा देत आहेत. केवळ नवीन कपडे आणि पारंपरिक पुरणाचे धोंडे भरवून परंपरा पाळण्यावर त्यांचा भर दिसत आहे.




### पंतप्रधानांचे आवाहन ठरले 'दिलासा'

देशहित आणि आर्थिक शिस्तीसाठी नागरिकांनी सोने खरेदी टाळावी, असे आवाहन शासकीय पातळीवरून करण्यात आले आहे. या विधानामुळे विवंचनेत असलेल्या सासरच्या मंडळींना मानसिक दिलासा मिळाला असून, यंदा प्रतिष्ठेऐवजी जावयाला सोन्याला पर्याय म्हणून हलक्या वजनाच्या किंवा इतर उपयुक्त वस्तू देण्याकडे लोकांचा कल लक्षणीय वाढला आहे.

## अकोल्यात ७१ वर्षीय नटवरलाल जिवाणी यांचे मरणोत्तर नेत्रदान

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १२ :** स्थानिक राम नगर येथील रहिवासी नटवरलाल देवचंद जिवाणी (वय ७१) यांचे गुरुवारी (दि. ११ जून) निधन झाले. जीवनाचा प्रवास संपल्यानंतरही इतरांच्या आयुष्यात प्रकाश पडावा, या उदात्त हेतूने त्यांनी घेतलेला मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प त्यांच्या कुटुंबियांनी पूर्ण केला. त्यांच्या या निर्णयामुळे दोन अंध व्यक्तींच्या आयुष्यातील अंधार दूर होणार आहे. नटवरलाल जिवाणी यांनी हयात असतानाच मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केला होता. त्यांच्या निधनानंतर कौटुंबिक डॉक्टर सतीश गुप्ता यांनी जिवाणी यांच्या इच्छेची पूर्तता करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांनी तातडीने 'रोटरी नेत्रदान केंद्रा'चे प्रमुख व नेत्रतज्ज्ञ डॉ. जुगल चिरानिया यांच्याशी संपर्क साधला. डॉ. जुगल चिरानिया यांनी त्यांचे सहाय्यक रोहित भिमटे यांच्यासह जिवाणी यांच्या निवासस्थानी पोहोचून अत्यंत आदराने मृतकाचे नेत्रगोलक संकलित केले. हे नेत्रगोलक पुढील प्रक्रियेसाठी आणि अंधत्व निवारणार्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे (जीएमसी) सुपूर्द करण्यात आले आहेत. नेत्रगोलक संकलनाच्या या अत्यंत संवेदनशील प्रसंगी नटवरलाल जिवाणी यांच्या पत्नी जयश्री जिवाणी, पुत्र विजय व संदीप जिवाणी, मुलगी वंदना हिंडोचा, सून, नातवंडे यांच्यासह बहुसंख्य नातेवाईक व आप्तेष्ट उपस्थित होते. जिवाणी कुटुंबियांनी दुःखाच्या प्रसंगी दाखवलेल्या या सामाजिक भान आणि धैर्याबद्दल परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे.



## बार्शीटाकळी ग्रामीण रुग्णालयात नेत्रदान व डोळ्यांच्या काळजीविषयी जनजागृती

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १२ :** स्थानिक ग्रामीण रुग्णालयात आज, १२ जून रोजी नेत्रदान जनजागृती आणि डोळ्यांची काळजी या विषयावर विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'नेत्रदान हेच श्रेष्ठ दान' हा संदेश तळागाळापर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने या मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.



या प्रसंगी नेत्रदान समुपदेशक डॉ. खुशबू सोमानी व नंदन चौरपगार यांनी उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. 'मरणोत्तर नेत्रदानामुळे अंध व्यक्तींच्या आयुष्यात नवा प्रकाश येऊ शकतो, म्हणूनच प्रत्येकाने या सामाजिक कार्यात पुढाकार घ्यावा,असे आवाहन समुपदेशकांनी केले. तसेच बदलत्या जीवनशैलीत डोळ्यांचे आरोग्य कसे जपावे, डिजिटल स्क्रीनचा वापर करताना कोणती काळजी घ्यावी, याबद्दलही त्यांनी महत्त्वपूर्ण टिप्स दिल्या.

या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. शीतल म्हस्के, नेत्रचिकित्सा अधिकारी अर्चना पाटील, अधिपरिचारिका संकेत ढाले यांच्यासह रुग्णालयातील सर्व कर्मचारी व परिचारक वर्गाने मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.

**अजब कारभार!** निधी लाटण्यासाठी शासकीय योजनेला चुना लावल्याचा आरोप

## आधीच सिमेंट रस्ता असलेल्या ठिकाणी पुन्हा कॉंक्रिटीकरण?

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. १२ :** तालुक्यातील तपोवन येथे आधीच अस्तित्वात असलेल्या सिमेंट रस्त्यावर केवळ थातूरमातूर कोटिंग करून नवीन काम दाखवण्याचा आणि जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीडीसी) निधीचा अपव्यय करण्याचा प्रयत्न होत असल्याची लेखी तक्रार समोर आली आहे. तपोवन येथील रहिवासी भाग्येश विनायकराव येवले यांनी संबंधित प्रशासनाकडे यासंदर्भात रीतसर तक्रार दाखल केली असून, या कथित बोगस कामाची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

तक्रार निवेदनात नमूद केल्यानुसार, ग्राम तपोवन येथे डी.पी.डी.सी. अंतर्गत एका सिमेंट रस्त्याचे काम सुरू आहे. मात्र, हा रस्ता खरोखरच जिथे गरज आहे तिथे न बनवता, खर्च वाचवण्यासाठी जुन्याच सिमेंट रस्त्यावर नवीन कोटिंग करून ते पूर्ण झाल्याचे भासवले जात आहे. गाव जोडण्यासाठी व नागरिकांच्या सोयीसाठी ज्या आवश्यक भागातून रस्ता जाणे अपेक्षित होते, त्या मूळ जागेला बगल देऊन काही घटकांकडून मनमानी पद्धतीने हे काम रेटले जात असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.



या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरून तात्काळ दखल घेण्यात यावी, सुरू असलेले काम थांबवून रस्त्याचे योग्य ठिकाण व कामाचा दर्जा निश्चित करावा आणि त्यानंतरच कामाला मंजुरी द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या संशयास्पद कामाची चौकशी करून शासकीय निधीचा गैरवापर रोखण्यात यावा, यासाठी भाग्येश येवले यांनी संबंधित वरिष्ठ विभागांना निवेदनाच्या प्रती पाठवून न्याय मागितला आहे. आता यावर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

> शासकीय निधीचा वापर जनतेच्या खऱ्या गरजांसाठी व्हायला हवा. मात्र, तपोवन येथे जुन्याच रस्त्यावर काम दाखवून निधीचा अपव्यय केला जात असल्याचा संशय आहे. या कामाची पारदर्शक चौकशी होऊन दोषींवर तात्काळ कारवाई व्हावी, यासाठी आम्ही प्रशासनाकडे रीतसर दाद मागितली आहे.
> - **भाग्येश येवले,** तक्रारदार, तपोवन.

## दहीहंडा येथील पूर संरक्षण भिंत बांधकामाची चौकशी करण्याची नागरिकांची मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. १२ :** तालुक्यातील मौजे दहीहंडा येथील कोळीपुरा परिसरात उभारण्यात आलेल्या पूर संरक्षण भिंतीच्या बांधकामात कथित अनियमितता झाल्याचा दावा करत, या प्रकरणाची तांत्रिक व सखोल चौकशी करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आलेल्या या निवेदनानुसार, सदर पूर संरक्षण भिंतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा संशय स्थानिकांनी व्यक्त केला आहे. नियमानुसार कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावणे आवश्यक असताना, कोणताही फलक लावण्यात आलेला नाही. परिणामी, हे काम कोणत्या विभागामार्फत सुरू आहे, यासाठी निधी किती मंजूर झाला आणि संबंधित कंत्राटदार कोण, याची कोणतीही अधिकृत माहिती ग्रामस्थांना मिळालेली नाही. यामुळे कामाच्या पारदर्शकतेबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून, संबंधित यंत्रणेकडून समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. दहीहंडा परिसरात पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होत असल्याने रहिवाशांच्या सुरक्षेसाठी ही भिंत अत्यंत महत्त्वाची आहे. यापूर्वी पुरामुळे काहींची घरे वाहून गेल्याच्या घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, भविष्यातील संभाव्य धोका टाळण्यासाठी प्रशासनाने या बांधकामाची उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करावी, कामाची गुणवत्ता तपासावी आणि निविदा प्रक्रियेसह खर्चाची चौकशी करून योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा
बुलडाणा, शनिवार, दि.१३ जून २०२६


**महत्त्वाचे**

## शहरातून एकाच कुटुंबातील चौघे बेपत्ता

**खामगाव :** शहरातील चांदमारी फुकटपुरा परिसरातून एकाच कुटुंबातील आई आणि तीन मुलांनी घरातून अचानक काढता पाय घेतल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी खामगाव शहर पोलिसांत मिसिंगची नोंद करण्यात आली असून, पोलीस प्रशासनाने त्यांचा शोध सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, श्रीकृष्ण सूर्यभान गायकवाड (४७) हे चालक म्हणून काम करतात. १० जून रोजी रात्री साडे नऊच्या सुमारास ते आपल्या कामावरून घरी परतले. मात्र, घरी आल्यावर त्यांना आपली पती सौ. रंजना श्रीकृष्ण गायकवाड (४०) आणि त्यांची तीन मुले पवन (१४), आईसह तीन मुलांचा समावेश पायल (१२) आणि आशीष (९) हे घरी नसल्याचे दिसले. फिर्यादीने आपल्या पत्नीला आणि मुलांना आवाज दिला, मात्र कोणीही प्रतिसाद दिला नाही. घर सोडून ते नेमके कुठे आणि का गेले, याचे कोणतेही कारण त्यांनी मागे ठेवले नाही. त्यानंतर फिर्यादीने परिसरार्ताल शेजाऱ्यांकडे नातेवाईकांकडे विचारपूस केली, मात्र त्यांचा काहीही थांगपत्ता लागला नाही. कुठेही शोध न लागल्याने अखेर ११ जून रोजी दुपारी श्रीकृष्ण गायकवाड यांनी खामगाव शहर पोलीस स्टेशन गाठून तक्रार नोंदवली. बेपत्ता झालेल्यांमध्ये सौ. रंजना श्रीकृष्ण गायकवाड (४०), रंग सावळा, उंची ५.५ फूट, उजव्या हातावर गोंदलेले, पवन श्रीकृष्ण गायकवाड (१४) रंग गोरा, उजव्या हातात कडा घातलेला, पायल श्रीकृष्ण गायकवाड (१२) उंची ४.५ फूट, रंग सावळा, टी-शर्ट आणि लोअर घातलेली, आशीष श्रीकृष्ण गायकवाड (९): रंग सावळा, उंची ४ फूट, पँट-शर्ट घातलेला आहे. पुढील तपास पोलीस पोहेकाँ संतोष इटमल्लू करीत आहे.

## चार्जिंगला लावलेला २० हजारांचा मोबाइल लंपास

**खामगाव :** शहरातील मुख्य असलेल्या शिवाजी चौकातून कत्तलीसाठी अतिशय निर्दयपणे नेले जाणारे दोन बैल शेगाव शहर पोलिसांनी जप्त केले आहेत. या कारवाईत दोन जणांना अटक करण्यात आली असून, या घटनेमुळे पशुपालक आणि नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ११ जून रोजी सायंकाळी ५:५४ च्या सुमारास शेगाव शहर पोलीस स्टेशनचे हेड कॉन्स्टेबल योगेश चोपडे हे आपल्या सहकाऱ्यांसह गस्तीवर होते. यावेळी त्यांना शिवाजी चौकात एक संशयास्पद दोघांना अटक टाटा एस (क्रमांक ४७ ०१०२) वाहन दिसून आले. पोलिसांनी हे वाहन थांबवून तपासणी केली असता, त्यामध्ये दोन बैल अत्यंत दाटीवाटीने कोंबलेले आढळले. आरोपींनी या बैलांना आखूड दोरीने बांधले होते आणि त्यांच्या खाण्यापिण्याची किंवा पाण्याची कसलीही व्यवस्था केली नव्हती. बैलांना अशा अवस्थेत कत्तलीसाठी नेले जात असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. जप्त करण्यात आलेल्या दोन बैलांची किंमत अंदाजे ८० हजार रुपये इतकी आहे. या प्रकरणी पोलिसांनी वाहनचालक आणि त्याांच्या साथीदाराला ताब्यात घेतले आहे. आरोपींमध्ये शेख सलीम शेख अजिज (४०) आणि शेख अफसर शेख अक्तर (३१), दोन्ही रा. बावणबीर, ता. संग्रामपूर यांचा समावेश आहे. शेगाव शहर पोलिसांनी याप्रकरणी कलम. ५ (अ) ५ (ब), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सह कलम ११ (१) (घ) (ड) (च) प्राणी निंदयतेने वागविणे नुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल गणेश वाकेकर करीत आहे.

## इसमाचा झोपेत मृत्यू

**खामगाव :** तालुक्यातील लाखनवाडा येथील रहिवासी सुरेश महादेव गोरे (५०) हे घरासमोरील ओसरीत बाजीवर झोपलेले असतांना झोपेतच त्यांचा मृत्यू झाला. ही घटना काल ११ जून २६ रोजी सकाळी ७.३० वाजताच्या सुमारास उघडकीस आली. याप्रकरणी संतोष लक्ष्मण हिंगे यांनी हिवरखेड पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये कलम १९४ नुसार मर्ग दाखल केला आहे.

# विना-पदवीधारक नर्स आणि फार्मासिस्ट नसलेली मेडिकल्स रडारवर येणार का?

**तुकाराम मुंडेंच्या धडक कारवाईची प्रतीक्षा**

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर दि. १२ :** संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या शिस्तबद्ध आणि धडक कारवाईसाठी ओळखले जाणारे धडाडीचे आयएएस अधिकारी तुकाराम मुंडे यांनी सध्या राज्यभरात बेकायदेशीर बाबींवर कारवाईचा धडाका लावला आहे. मात्र, ''महाराष्ट्रात मुंडे पॅटर्नचा सपाटा सुरू असताना,विदर्भाच्या प्रवेशद्वारी मलकापूर शहराला अशा धडक कारवाईची प्रतीक्षा कधी संपणार?'' असा संतप्त सवाल आता सामान्य नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. शहरातील आरोग्य व्यवस्था आणि औषध विक्री दुकानांमध्ये (मेडिकल्स) सध्या नियमांची सर्रास पायमल्ली होत असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे.

**नामवंत रुग्णालयांत विना-पदवीधारक नर्सचा सुळसुळाट!** मलकापूर शहरात गल्लोगल्ली खाजगी दवाखाने आणि भव्य रुग्णालये थाटली गेली आहेत. मात्र, यातील बहुतांश रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या जिवाशी खेळ सुरू असल्याचा खळबळजनक प्रकार समोर येत आहे. रुग्णालयात काम करणाऱ्या परिचारिका या मान्यताप्राप्त संस्थेतून ए एन एम, जी एन एम किंवा बीएससी नर्सिंग ची पदवी घेतलेल्या आणि महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडे नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. मलकापूरमधील अनेक दवाखान्यांमध्ये अवघ्या काही हजारांच्या पगारावर कोणत्याही प्रकारची वैद्यकीय पदवी नसलेल्या, अप्रशिक्षित मुली आणि महिलांना नर्स म्हणून कामावर ठेवले गेले आहे. त्याांच्याकडून सलाईन लावणे, इंजेक्शन देणे, आणि गंभीर रुग्णांची देखभाल करणे,ईसीजी काढणे इतकेच नव्हे तर अतिदक्षता विभागातही काम करणे यांसारखी संवेदनशील कामे या अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून करून घेतली जात आहेत. यामुळे रुग्णांच्या जिवाला थेट धोका निर्माण झाला आहे.

**चालकांकडूनच औषधांची खैरात!** तर दुसरीकडे, शहरातील औषध दुकानांची स्थितीही अत्यंत गंभीर आहे.औषध व सौंदर्य प्रसाधने कायद्यानुसार,कोणत्याही मेडिकल स्टोअरमध्ये नोंदणीकृत फार्मासिस्ट हजर असणे आणि त्यांच्याच देखरेखीखाली औषध विक्री घेणे कायदेशीरदृष्ट्या अनिवार्य आहे. ''मलकापूरमधील अनेक नामांकित आणि छोट्या मेडिकल स्टोअर्समध्ये फार्मासिस्ट केवळ कागदावरच आहेत. प्रत्यक्ष दुकानात मात्र औषधांची कोणतीही जाण नसलेले चालक किंवा मुले सर्रासपणे डॉक्टरांच्या चिठ्ठ्या वाचून औषधे देत आहेत. मात्र रुग्णाला ''चुकीचे औषध दिल्यामुळे रुग्णाचे काय हाल होऊ शकतात, याची साधी जाणीवही या दुकानदारांना व प्रशासनाला नसल्याचे दिसते. शहरातील प्रत्येक खाजगी रुग्णालयाची अचानक तपासणी करून तिथल्या नर्स स्टाफच्या पदव्यांची पडताळणी करण्यात यावी.तसेच प्रत्येक मेडिकल स्टोअरमध्ये फार्मासिस्ट हजर असतो की नाही,याची बायोमेट्रिक किंवा अचानक तपासणी मोहीम राबवण्यात यावी.तर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या डॉक्टरांवर आणि मेडिकल मालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत. मलकापूर शहरातील जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या रॅकेटवर तुकाराम मुंडे स्टाईल धडक कारवाई कधी होणार,की प्रशासन एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे? याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# जन्म-मृत्यू नोंदी बाबतची कार्यपद्धती निश्चित करा; जिल्हा वकील संघाचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.१२:** जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व संदर्भात विलंबाने करायच्या सुधारणा अधिनियम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यू नोंदी बाबतची जिल्ह्यात कार्यपद्धती निश्चित करा अशी मागणी जिल्हा वकील संघाच्या वतीने मंगळवार दिनांक ९ जुन रोजी जिल्हाधिकारी बुलढाणा यांना एका निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी कवळे, मोताळा तहसीलदार सरिता पाटील यांच्या सोबत विजय सावळे अध्यक्ष बुलढाणा जिल्हा वकील संघ व सदस्यांची सविस्तर चर्चा पार पडली.

जिल्हाधिकारी यांच्या सोबत लवकरच एका बैठकीचे आयोजन करुन सदरच्या मुद्द्यांवर तोडगा काढणार असल्याची माहिती अप्पर जिल्हाअधिकारी खांदे यांनी उपस्थिताना दिली. वकील संघाच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात नमुद आहे. की मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्यात विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यू नोंदीबाबत १३ ही तालुक्यात विविध प्रकारची कार्यपद्धती स्थानिक तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांनी निश्चित केली आहे. त्यामुळे सदरचे प्रकरण हाताळता विधीज्ञ यांना १३ ही तालुक्यात वेगवेगळ्या कार्यपद्धती चा वापर करावा लागतो. जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या बुलढाणा येथील तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांनी गेल्या अनेक महिन्या पासुन त्यांच्या कार्यालयात दाखल असलेल्या जन्म-मृत्यू ची विलंबाने नोंद करण्यासाठी असलेल्या प्रकरणात कोणत्याही प्रकारची कारवाई न करता महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या दिनांक १२ मार्च २०२५ रोजी शासन निर्णया नुसार तहसीलदार बुलढाणा यांच्या कार्यालयात दाखल प्रकरण संबंधित नगरपालिका व ग्रामपंचायत यांच्या कडे वर्ग करत अहवाल ची मागणी केली. तर नवीन प्रकरण सुद्धा संबंधित नगरपालिका अथवा ग्रामपंचायत यांच्या कडे दाखल करण्याचे सांगितले आहे. सदरचे प्रकरण विधीत कालावधीत निकाली निघणे आवश्यक असतांना जिल्ह्यातील प्रत्योक तालुक्यात वेगवेगळ्या कार्यपद्धती मुळे सदरची प्रकरणे निकाली काढण्यास विधीज्ञ व पक्षकार यांना मोठ्या अडचणी निर्माण होत आहे. तरी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व संदर्भात विलंबाने करायच्या सुधारणा अधिनियम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यू नोंदी बाबतची संपूर्ण जिल्ह्यात एकच कार्यपद्धती निश्चित करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश जिल्ह्यातील तहसीलदार यांना देण्यात यावे अशी मागणी निवेदनाच्या अंती करण्यात आली आहे. निवेदनावर अध्यक्ष ॲड. विजय सावळे, सचिव ॲड.अमर इंगळे, उपाध्यक्ष ॲड. आरिफ सैय्यद, ॲड. धिरजकुमार गोठी, ॲड सादिक सैय्यद, ॲड.प्रवीण सुरडकर, ॲड.राजेश काशीकर, ॲड.निलेश सवडतकर, ॲड.एस एस सुरडकर, ॲड.मदन मगर, ॲड.धिरज वावरे, ॲड.उमेश गाडेकर, ॲड.रहीम शाह, ॲड. पवन सरकटे यांच्या सह वकील मंडळींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जिल्ह्यातील दहा वर्षीय सिद्धीच्या धाडसी कार्याचा गौरव

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.१२:** माउंट एवरेस्ट बेस कॅम्प , कळसबाई शिखर, शितकडा , कोकणकडा केदारकंठां सर करून तेथे तिरंगा ध्वज आणि भगवा ध्वज फडकवणाऱ्या दहा वर्षीय धाडसी सिद्धीचा केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि राज्याचे गृह महसूल ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम यांच्या हस्ते काल गौरव करण्यात आला

बुलडाणा तालुक्यातील साखळी बुद्रुक या लहानशा गावात राहणारे विठ्ठल ज्ञानदेव सोनवणे यांची दहा वर्षीय कन्या सिद्धी हीने जिद्द धैर्य आणि सहासीपणा दाखवून वयाच्या सातव्या वर्षा कळसुबाईचे शिखर सर केलं त्यानंतर केदारकंठा कोकण कडा आणि नुकताच माउंट एवरेस्ट बेस्ट कॅम्प सर केला आहे प्रत्योक शिखरावर जाऊन तिने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा भगवा ध्वज आणि तिरंगा फडकून राष्ट्रगीताने मान मानवंदना दिली आहे अवघ्या दहा वर्षाच्या सिद्धीच धाडस हे कौतुकास्पद असून जिल्ह्यासाठी अभिमानाच आहे सिद्धीच्या या धाडसी आणि पराक्रमी सहासाबद्दल केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे खासदार प्रतापराव जाधव आणि या राज्याचे गृह महसूल ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम यांनी मेहकर पंचायत समितीच्या उद्घाटन कार्यक्रमात सिद्धीचा सत्कार केला . याच वेळी सिद्धीने उपस्थितांसमोर मनोगत व्यक्त करण्याची इच्छा मंत्री महोदयासमोर व्यक्त केली दोन्ही मंत्र्यांनी तिच्या या धाडसी पणाला वाव देऊन माईक तिच्या हातात दिला . यावेळी सिद्धीने आतापर्यंत केलेल्या सहासी कामाचा लेखाजोखा उपस्थितांसमोर मांडला त्यावेळी उपस्थितांनी तिचं टाळ्या वाजवून कौतुक केलं. याशिवाय सिद्धीने आतापर्यंत २ राज्यस्तरीयसह २५ मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला आहे .

# गो. से. महाविद्यालयात दृष्टिदान जनजागृती उपक्रम

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**खामगाव दि.१२ :** जागतिक नेत्रदान दिनानिमित्त गो. से. महाविद्यालय, खामगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना पथक व बुलढाणा जिल्हा नेत्र सर्जन संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने 'दृष्टिदान जनजागृती अभियान' आयोजित करण्यात आले. यानिमित्ताने विद्यार्थ्यांसाठी दृष्टिदान विषयावरील पोस्टर, घोषवाक्य (स्लोगन) तसेच व्हिडिओ/रील्स निर्मिती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर होते. त्यांनी उपस्थितांना नेत्रदानाचे महत्व, त्यातून अंध व्यक्तींना मिळणारा प्रकाश आणि समाजामध्ये जनजागृतीची आवश्यकता याविषयी मार्गदर्शन केले. व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. देवनंदन अढाऊ, प्रा. उमेश खंदारे तसेच प्रा. डॉ. मोहम्मद रागीब देशमुख (अध्यक्ष, उर्दू अभ्यास मंडळ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती तथा विभागप्रमुख, गो. से. महाविद्यालय, खामगाव) उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. देवनंदन अढाऊ यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. उमेश खंदारे यांनी केले. या प्रसंगी प्रा. डॉ. बाळासाहेब टकले, प्रा. सिडाम, डॉ. सचिन खंडारे, प्रा. नप्ते, रोहित भोजने तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेतील प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यांना पुरस्कार देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# पुणे विषारी दारू कांडाचा नांदुरा पोलिसांनी घेतला धसका; आतापर्यंत तीन गावठी दारूचे अड्डे केले उद्ध्वस्त

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**नांदुरा दि.१२ :** मागील महिन्यात पुणे व पिंपरी चिंचवड परिसरात दिनांक २८ व २९ मे ला विषारी दारूमुळे २२ लोकांना आपले प्राण गमवावे लागले. त्याचा धसका नांदुरा पोलिसांनी घेतला असुन आतापर्यंत तिन गावठी दारू बनविनारे अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ग्राम अवधा शेत शिवारातील आरोपीच्या शेतामध्ये पंचा समक्ष धाड टाकली.

यावेळी आरोपी प्रकाश बळीराम जमेवार वय ३३ वर्ष राहणार खोलखेड तालुका खामगाव याला ताब्यात घेण्यात आले. यावेळी पोलिसांनी वीस लिटर गुळ मिश्रित मोह सडवा किंमत दोन हजार रुपये, प्लास्टिक कॅन मध्ये १५ लिटर हातभट्टी दारू किंमत पंधराशे रुपये,उकळता मोह सडवा किंमत पंधराशे रुपये, प्लॅस्टिकच्या नळ्या ,दारू गाळण्याचे टीन पत्र्याचे साहित्य, प्लास्टिक कॅन किंमत ३४० रुपये असा एकूण ५३४० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा ६५(क),(फ),(ड) कलमाखाली गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक फौजदार गजानन इंगळे करीत आहे.

# बहुरूप्याची धाड पडताच सेतू केंद्रचालकांची पळापळ

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**सिंदखेड राजा दि.१२ :** येथील सेतू केंद्रांवर १२ जून रोजी अचानक एका इन्स्पेक्टरने धाड टाकल्याने प्रचंड खळबळ उडाली. स्वतःला इन्स्पेक्टर सांगणाऱ्या या व्यक्तीने येथील गुरुदत्त मल्टी सर्विसेस या केंद्रावर जाऊन अचानक कागदपत्रांची कडक तपासणी सुरू केली. शासकीय अधिकाऱ्याची ही अनपेक्षित धाड पाहून परिसरातील इतर सेतू केंद्रचालकांचे धाबे दणाणले.

कोणतीही कारवाई होऊ नये या भीतीने इतर चालकांनी घाईघाईत आपली दुकाने बंद केली आणि तेथून पळ काढला. इन्स्पेक्टर नाही, तो तर बहुरूपी! गुरुदत्त मल्टी सर्विसेसवर तपासणीचा हा सगळा ड्रामा सुरू असताना, काही वेळातच तिथे उपस्थित असलेल्यांना आणि केंद्रचालकांना एक धक्कादायक पण तितकाच रंजक प्रकार समजला. समोर उभे राहून कडक आवाजात चौकशी करणारे ते गृहस्थ खरेखुरे पोलीस इन्स्पेक्टर नसून, अरुण सावंत (विलास सावंत) हे बहुरूपी कलाकार होते! त्यांनी हुबेहूब इन्स्पेक्टरचे सोंग वठवले होते. हा प्रकार लक्षात येताच आधी घाबरलेले सर्वजण चक्रावून गेले आणि परिसरात एकच हशा पिकला. लोकरंजन आणि जनजागृतीचा अनोखा प्रयत्न अरुण सावंत हे आपल्या कलेच्या माध्यमातून लोकांचे मनोरंजन तर करतातच, पण त्याचसोबत प्रशासकीय सतर्कता आणि नागरिकांच्या हक्कांबद्दल मोठ्या प्रमाणावर जनजागृतीही करत असतात. त्यांच्या या अचूक अभिनयाने काही काळासाठी का होईना, पण पूर्ण बाजारपेठेत घबराट आणि नंतर कौतुकाचे वातावरण निर्माण केले होते.

**विकास** | **पावसाळ्याआधी रोड व नाल्याची घाण पूर्णपणे साफसफाई हे आमचे लक्ष- अब्दुल ऊबेद**

# प्रभागाची साफसफाई करणे हेच आमचे कर्तव्य- मिरा मापारी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी





**लोणार दि.१२ :** शहराच्या प्रत्येक प्रभागाची साफसफाई करणे हेच आमचे ध्येय आहे. लोणार शहराच्या प्रत्येक प्रभागाची साफसफाई पावसाळ्या आधीच पासून सुरुवात करण्यात आली आहे. सौ मीरा ताई भुषण मापारी नगराध्यक्षा.डॉ. आशिष बोबडे. मुख्याधिकारी. माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक भुषण मापारी. नगर परिषद उपाध्यक्ष आबीद खान मोमीन खान. आरोग्य सभापती अब्दुल ऊबेद हाजी अब्दुल मुनाफ. पाणी पुरवठा इंजिनिअर महेश राठोड. स्वच्छता सहाय्यक सुनिल इरतकर. लोणार शहराच्या प्रत्येक प्रभागाची परिस्थिती खूपच खराब होती कारण कि नगर परिषदेची निवडणूक दोन वर्षा ने झाल्याने रोड व नाल्या पुर्ण पणे भरलेल्या अवस्थेत होत्या. लोणार शहराच्या प्रत्येक विभागात साफसफाई युद्ध पातळीवर करण्यात आले. लोणार शहराच्या विकासासाठी नगर परिषदेच्या प्रत्येक विभाग आप आपल्या परीने काम करत आहेत.

पावसाळ्याच्या पाण्यामुळे लोणार शहर भागातील रहिवाश्यांनी खुपच त्रास सहन करावा लागत होता. पावसाळ्याचे पाणी पुर्ण पणे रोडवरच वहायचे ज्या मुळे लोणार शहराच्या प्रत्येक प्रभागात लोकांना खुपच त्रास सहन करावा लागत होता लोणार शहराची परिस्तिथी पाहून लोणार नगर परिषद चे आरोग्य सभापती अब्दुल ऊबेद हाजी अब्दुल मुनाफ नगर सेवक जमील कुरेशी यांनी या प्रश्नावर विशेष लक्ष केंद्रित करून प्रत्येक प्रभागा ची समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशिल आहे. सध्या धार रोड नई नगरी समोरील मोठी नाली ची साफसफाई करुन घेण्यात आली व अता पिंपळखुटा रोड नई नगरीसह शहराच्या प्रत्येक नाल्यांचा उपसा सुरू आहे. नगराध्यक्षा मीरा ताई भुषण मापारी. मुख्याधिकारी डॉ आशिष बोबडे. यांच्या कामा मुळे लोणार शहराची जनता उत्साहीत आहे. पावसाळ्या आधी खांब्यावरचे लाईट लावणे. घाणीच्या साफसफाई वर विशेष लक्ष केंद्रित करून दमदार पाऊस आला तरी दमदार कामा मुळे शहराची परिस्तिथी आता नियंत्रणात ठेवण्यासाठी नगराध्यक्षा व आरोग्य सभापती विशेष लक्ष देत आहे. आता रोड वर येणारा घाणेरडा पाणी रोड वर वाहणार नाही याची ही काळजी घेतली जाते. लोणार नगर परिषदेचे अध्यक्षा मीरा ताई भूषण मापारी. माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक भुषण मापारी. मुख्याधिकारी डॉ आशिष बोबडे. नगर परिषद उपाध्यक्ष आबीद खान मोमीन खान. आरोग्य सभापती अब्दुल ऊबेद अब्दुल हाजी अब्दुल मुनाफ. लोणार शहराच्या सगळ्या प्रभागातील समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करत आहे. लोणार शहराच्या जनतेची समस्या कसी दूर करता येईल या साठी नगर परिषदेचे माजीनगराध्यक्षवनगरपरिषदसदस्यप्रत्येक नगर सेवकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी त्यांच्या प्रभागातील समस्या सोडविण्यासाठी नगरसेवकांच्या सोबत आहे. नगराध्यक्षांचे पती अनुभवी असल्याने व माजी नगराध्यक्ष भुषण मापारी यांच्या संकल्पनेतून आरोग्य सभापती अब्दुल ऊबेद हाजी अब्दुल मुनाफ हे शहराच्या जनतेच्या आरोग्य साठी आपले मोलाचे योगदान देत आहेत. नगर परिषद कर्मचारी नगराध्यक्षा मीरा ताई भुषण मापारी. माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक भूषण मापारी, नगर परिषद उपाध्यक्ष आबेद खान मोमीन खान. मुख्याधिकारी डॉ आशिष बोबडे. आरोग्य सभापती अब्दुल ऊबेद हाजी अब्दुल मुनाफ. पाणी पुरवठा इंजिनिअर महेश राठोड. स्वछता साहाय्यक सुनील इरतकर व इतर सर्व विभागाचे सभापती नगरसेवक व कर्मचारी शहराच्या साफसफाई कडे विशेष लक्ष देत आहेत.

# डोणगाव बसथांबा बनला अवैध वाहनांचा पार्किंग झोन; प्रवासी वाहतूक रामभरोसे!

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**डोणगाव दि. १२ :** येथील मुख्य बसथांब्याला सध्या पार्किंग झोनचे स्वरूप आले असून, परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध प्रवासी वाहतुकीने थैमान घातले आहे. यामुळे अधिकृत बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना जीव मुठीत धरून रस्त्यावर उभे राहावे लागत असून, स्थानिक प्रशासनाचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.

डोणगाव येथील बसथांब्यावरून दररोज शेकडो नागरिक, विद्यार्थी आणि महिला प्रवास करतात. मात्र, गेल्या काही दिवसांपासून बसथांब्याच्या मुख्य परिसरातच खाजगी वाहने, अवैध प्रवासी वाहतूक करणारी लक्झरी जीप, आणि इतर वाहने अनधिकृतपणे पार्क केली जात आहेत. मुख्य रस्त्यावर ही खाजगी वाहने उभी राहत असल्याने राज्य परिवहन मंडळाच्या (एसटी) बसेस थांब्यावर कोठे उभ्या कराव्या असा प्रश्न बस चालकांना पडतो तर चालकांना बस उभी करण्यासाठी राज्य महामार्गावर मोठी कसरत करावी लागते.

बस मुख्य रस्त्यावरच उभी करावी लागत असल्याने प्रवाशांना धावपळ करत बस गाठावी लागते. यामुळे येथे केव्हाही मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एसटी महामंडळाच्या उत्पन्नाला खिळ बसवत या परिसरात अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्यांचे धाडस कमालीचे वाढले आहे. बसथांब्याच्या आवारातच वाहने उभी करून प्रवाशांची ओढाताण केली जाते. नियमांची कोणतीही पायमल्ली न करता राजरोसपणे सुरू असलेल्या या व्यवसायामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. त्यामुळे ''अवैध वाहतूकदार आणि बेशिस्त पार्किंग करणाऱ्यांमुळे बसथांब्यावर पाय ठेवायला जागा उरलेली नाही. महिला आणि लहान मुलांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. पोलिसांनी आणि वाहतूक शाखेने यावर तातडीने कारवाई कारवाई करणे गरजेचे आहे तर स्थानिक नागरिक आणि प्रवाशांमधून आता तीव्र संताप व्यक्त होत आहे. डोणगाव बसथांब्याला लागलेले हे पार्किंग झोनचे ग्रहण सुटणार कधी, असा सवाल उपस्थित केला जात आहे. संबंधित पोलीस प्रशासन आणि वाहतूक विभागाने या परिसरात कायमस्वरूपी पोलीस बंदोबस्त ठेवून अवैध वाहतूक करणाऱ्यांवर आणि अनधिकृत पार्किंगवर दंडात्मक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

## महत्त्वाचे

### पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन

**खामगाव :** घाटपुरी येथील श्री सदगुरु श्रीधर महाराज संस्थानच्या वतीने २७ वर्षापासून आषाढी एकादशी निमित्या तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे विठोबा रुख्माईच्या दर्शनाकरीता पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यावर्षी २९ जून २६ रोजी दिंडीचे प्रस्थान होणार असुन पंढरपुर येथे २० जुलै २६ रोजी पोहचणार आहे. २२ जुलै रोजी पंढरपूर येथे श्रीमद् भागवत कथेचे आयोजन केले आहे. भागवत कथेचा काला करून २९ जुलै २६ रोजी खामगावकडे प्रस्थान करणार आहे. पायी दिंडीमध्ये वारकरी, भजनी मंडळ, महिला भजन मंडळ यांना सहभागी व्हायचे असल्यास त्यांनी सद्गुरू श्रीधर महाराज मंदिर येथे नोंदणी करावी. यासाठी कोणत्याही प्रकारचा शुल्क नसुन जेवण व राहण्याची व्यवस्था संस्थानतर्फे करण्यात आली आहे.

### सोन्याची पोत चोरणारी महिला जेरबंद



**शेगाव :** संत नगरी शेगाव येथे दर्शनासाठी आलेल्या एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत चोरणाऱ्या महिलेला शेगाव शहर पोलिसांनी अवध्या काही वेळात रंगेहाथ पकडून चोरीचा मुद्देमाल जप्त केल्याची घटना घडली, पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे चोरीस गेलेला दागिना त्वरित परत मिळाल्याने फिर्यादी महिलेला मोठा दिलासा मिळाला आहे. या प्रकरणी शेगाव शहर पोलीस ठाण्यात अप. क्र. ३६६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी अनुसया सखाराम डुकरे पाटील (७०) रा. सावरगाव, ता. चिखली, जि. बुलढाणा या ११ जून रोजी गजानन महाराजांच्या दर्शनासाठी शेगाव येथे आल्या होत्या. दर्शन आटोपून त्या दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास संभाजीनगरकडे जाणाऱ्या बसमध्ये चढ़त असताना गर्दीचा फायदा घेत एका महिलेने त्यांच्या गळ्यातील अंदाजे तीन ग्रॅम वजनाची व सुमारे ४५ हजार रुपये किमतीची सोन्याची मन्यांची पोत हिसकावली, त्यानंतर संबंधित महिला गर्दीत मिसळून बसमध्ये चढली. घटनेची माहिती मिळताच शेगाव शहर पोलिसांनी तातडीने संबंधित बस पोलीस ठाण्यात आणली, महिला पंच व महिला पोलिसांच्या उपस्थितीत बसमधील सर्व महिलांची झडती घेण्यात आली. या झडतीदरम्यान सपना उर्फ किर्ती रोहीत गायकवाड (२४) रा. भोनगाव, ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा हिच्याकडे फिर्यादींची सोन्याची पोत आढळून आली. पोलिसांनी तत्काळ ती जाम करून आरोपी महिलेला ताब्यात घेतले. या प्रकरणी महिला पोलीस कॉन्स्टेबल अर्चना उमाळे यांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार शाम आघाव करीत आहेत. शेगाव शहर पोलिसांच्या जलद आणि प्रभावी कारवाईमुळे चोरीचा गुन्हा अल्पावधीत उघडकीस आला असून नागरिकांनी पोलिसांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

### अल्पसंख्यांक तालुकाध्यक्षपदी साबीरखान पठाण

**संग्रामपूर :** तालुक्यातील बोडखा येथील रहिवासी तथा नॅशनल डायनामा दुरुस्ती सेंटरचे संचालक साबीर खान साहेब खान पठाण यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षा (शरदचंद्र पवार गटाच्या अल्पसंख्यांक विभागाच्या संग्रामपूर तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष ॲड. अब्दुल करिम खान यांनी अधिकृत नियुक्तीपत्राद्वारे जाहीर केली. पक्षाची विचारधारा, ध्येय-धोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासोबतच अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी आणि पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी ते प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला आहे.

# प्रसिद्ध शेगाव कचोरी संशयाच्या भोवऱ्यात

## अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**शेगाव दि १२ :** राज्यभर सुरू असलेल्या भेसळमुक्त अन्न मोहिमेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनाने शेगावातील प्रसिद्ध तीर्थराम करमचंद शर्मा कचोरी सेंटरवर अचानक धाड टाकत तपासणी केली. या कारवाईमुळे शेगावच्या प्रसिद्ध कचोरीबाबत चर्चांना उधाण आले असून, ग्राहकांमध्येही उत्सुकता निर्माण झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कचोरी तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विविध कच्च्या मालाचे नमुने प्रशासनाच्या पथकाने जप्त केले आहेत. हे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असून त्याचा अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाणार आहे. नमुन्यांमध्ये कोणत्याही प्रकारची भेसळ किंवा दर्जाहीन घटक आढळल्यास संबंधित प्रतिष्ठानाविरुद्ध अन्न सुरक्षा कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. शेगाव हे धार्मिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्वाचे ठिकाण असल्याने येथे दररोज हजारो भाविक व पर्यटक भेट देतात. अशा परिस्थितीत खाद्यपदार्थांची गुणवत्ता आणि सुरक्षितता राखणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. विशेष म्हणजे, शेगाव कचोरीची ख्याती राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचली असून अनेक पर्यटक या चवीचा आस्वाद घेण्यासाठी आवर्जून येथे येतात. दरम्यान, ही कारवाई केवळ नियमित तपासणी मोहिमेचा भाग असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. तपासणी अहवाल येईपर्यंत कोणताही निष्कर्ष काढू नये, असे आवाहनही करण्यात आले आहे. मात्र या घटनेमुळे अन्न सुरक्षा, गुणवत्तचे निकष आणि भेसळमुक्त खाद्यपदार्थांचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

## मलकापूर न.प. मध्ये नगरसेविकांच्या पतींचा हस्तक्षेप? नागरिकांमध्ये चर्चेला उधाण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापूर दि.१२ :** शासनाने महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षण देऊन त्यांना राजकीय व सामाजिक क्षेत्रात सक्षम करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आज महिला विविध क्षेत्रांत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून यशस्वीपणे कार्यरत असून नेतृत्वाची जबाबदारीही समर्थपणे सांभाळत आहेत. मात्र, मलकापूर नगर परिषदेमध्ये काही ठिकाणी नगरसेविकांच्या नावावर निवडून आलेल्या जागांवर त्यांच्या पतींचाच प्रभाव अधिक दिसून येत असल्याची चर्चा शहरात सुरू आहे.

नगर परिषदेच्या बैठका, विविध प्रशासकीय कामे तसेच नागरिकांच्या प्रश्नांबाबत काही नगरसेविकांऐवजी त्यांच्या पतींची उपस्थिती आणि हस्तक्षेप दिसून येत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. महिलांना आरक्षण देण्यामागील उद्देश त्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून सक्षम नेतृत्व निर्माण करणे हा असताना, प्रत्यक्षात ''पतीराज'' संस्कृती कायम असल्याचे चित्र दिसून येत असल्याची भावना व्यक्त होत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींनी स्वतः पुढाकार घेऊन नागरिकांच्या समस्या मांडाव्यात, विकासकामांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा आणि लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी पार पाडावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. मलकापूर नगर परिषदेमधील या प्रकाराकडे जिल्हा प्रशासन आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन वास्तव परिस्थितीची पडताळणी करावी, अशी मागणीही काही नागरिकांकडून करण्यात येत आहे. महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाला खऱ्या अर्थाने न्याय मिळणार का आणि नगर परिषदेतील ''पतीराज'' पद्धतीला आळा बसणार का, याकडे आता मलकापूरकरांचे लक्ष लागले आहे.

## साकेगाव हल्ला प्रकरणातील 'त्या' गावगुंडांना अटक करा

### पारधी विकास परिषदेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**रायपूर दि.१२ :** बुलडाणा तालुक्यातील रायपूर पोस्टे. हद्दीतील साकेगाव येथे ९ जून रोजी पिण्याच्या पाण्याच्या वादातून काही गावगुंडांनी रात्रीच्या सुमारास फासे पारधी समाजातील महिला, पुरुष व लहान मुलांवर हल्ला चढवित महिलांना लाठीकाठ्यांनी जबर मारहाण केली.

याप्रकरणी रायपूर पोलिसांनी १९ जणांवर ॲट्रासिटीसह विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले आहे. सदर गंभीर गुन्ह्यातील आरोपी फरार असून त्यांना तत्काळ अटक करण्याची मागणी पारधी विकास परिषद, बुलढाणा यांच्यावतीने अध्यक्ष युवराज पवार यांच्या नेतृत्वात गुरुवार ११ जून रोजी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली रायपूर पोस्टे. हद्दीतील साकेगाव येथील फासे पारधी समाजातील २१ महिला पुरुष, लहान मुलांवर गावातील ४५ ते ५० गावगुंडानी ९ जून रोजी रात्री ८ ते ९ वाजेदरम्यान पिण्याच्या पाण्याच्या वादातून हल्ला चढविला. या हल्यात अर्चना भोसले यांच्या छातीवर वार करण्यात आले. ज्युली पवार हीचे दात पाडले, हात मोडले, लाठ्याकाठ्यांनी जबर मारहाण करण्यात आली. बिनोज भाई पवार यांच्या डोक्यावर कुऱ्हाडीने वार तर नितुसिन्हा पवार यांच्या पायावर व हातावर मारहाण करण्यात आली. शर्मिला पवार, निलम बागुल, रिता पवार, संध्या पवार, दऱ्या पवार, विजय युवराज पवार, यांच्यासह इतरांना लाठ्याकाठ्यांनी मारहाण करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करीत गंभीर मारहाण झालेल्या महिला सामान्य रुग्णालय, बुलडाणा येथे उपचार घेत आहे. उपचार घेऊन परतणाऱ्या महिलांना शारिरिक इजा करण्याची धमकी व शिवीगाळ करण्यात आली. रायपूर पोस्टेला १९ जणांविरूद्ध ॲट्रासिटी ॲक्ट प्रमाणे गुन्हे दाखल केले आहे, असे असतांना देखील अद्याप या गावगुंडाना पोलिसांनी अटक केली नाही. घराची व दुकानांची तोडफोड चारचाकी वाहनांची तोडफोड घरातील वस्तू व धान्य व रोख रक्कम नुकसान भरपाई देण्यात यावी, तसेच आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा फासे पारधी समाज संघटनेच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला. निवेदनावर पारधी विकास परिषद अध्यक्ष युवराज पवार, महासचिव रता पवार, उपाध्यक्ष राजेंद्र पवार यांच्यासह इंद्राज पवार, विक्की भोसले, वदंना पवार, संजय भोसले, अक्षय पवार, रेश्मा भोसले, राजा पवार, नरेश भोसले, अबेदान पवार, विरोद भाई पवार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## बिबट्याच्या हल्ल्यात दोन शेळ्या ठार; वन विभागाकडे नुकसान भरपाईची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मंगरूळ नवघरे दि.१२ :** मंगरूळ नवघरे गावाच्या उत्तरेस असलेल्या शेळीच्या गोठ्यात बिबट्याने हल्ला करून दोन मोठ्या शेळ्या ठार केल्याची घटना १२ जून २०२६ रोजी पहाटे उघडकीस आली. या घटनेत शेळीपालकाचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून वन विभागाकडे नुकसानभरपाईची मागणी करण्यात आली आहे.

याबाबत मुस्ताक खा मने का पठाण (वय ५८ वर्षे, व्यवसाय शेती व शेळीपालन, रा. मंगरूळ नवघरे) यांनी दिलेल्या माहितीनुसार, गावाच्या उत्तरेस त्यांचा शेळीचा गोठा असून तेथे अनेक वर्षांपासून शेळ्या बांधल्या जातात. गोठ्याजवळच त्यांचे राहते घर आहे. १२ जूनच्या रात्रीनंतर पहाटे सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास गोठ्यातील दोन मोठ्या शेळ्या व दोन पिल्ले मृत अवस्थेत आढळून आली. तसेच गोठ्याच्या परिसरातील चार कुत्रेही बेपत्ता असल्याचे निदर्शनास आले. घटनेनंतर परिसरात शोध घेतला असता कुत्र्यांचा कोणताही मागमूस लागला नाही. त्यानंतर त्यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून भ्रमणध्वनीद्वारे घटनेची माहिती दिली. प्राथमिक पाहणीत बिबट्याच्या हल्ल्यात शेळ्यांचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे शेळीपालक मुस्ताक पठाण यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून वन विभागाने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, परिसरात बिबट्याच्या वावरामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वन विभागाने योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणीही नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## शासनाचे आदेश न पाळणाऱ्या शाळांवर कारवाई करा - कैलास फाटे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.१२ :** विदर्भात सूर्य आग ओकत असतांना महाराष्ट्रातील शिक्षण मंत्रालयाने २२ जून व हायकोर्टाने ३० जून चे आदेश काढले असतांना शिक्षण संस्था चालक मात्र हट्टी व बिनडोक पानाचा आव आणत विध्यार्थ्यांना मात्र आगीच्या खाईत टाकण्याचा प्रयत करत आहे.

वर्षानुवर्ष निसर्ग आपले रूप बदलत आहे त्यामुळे पारंपरिक अनेक कार्यांमध्ये जनतेनेच नव्हे तर शासनानेसुद्धा बदल केलेले आहे. परंतू आज मनुष्यालाच असह्य होणारे तापमान छोट्या विध्यार्थ्यांना कसे सहन होणार, आपल्या पोटच्या गोळ्याला जन्मापासून जोपासत आलेले मातापिता आपल्या मुलांना आगीच्या खाईत कसे पाठवणार हे संस्था चालकांना व प्रशासनाला समजत नसावे एवढे नादान ते नाहीत. आजपर्यंत जनतेच्या खजानातला पैसा लुटारूंच्या घशात ओतला परंतु शासकीय शाळांमध्ये अश्या तापमानाच्या वेळी विध्यार्थ्यांचा बचाव करण्यासाठी साधे फॅन सुद्धा शाळांमध्ये बसवलेले नाहीत तर कोणत्या भरवश्यावर हे नाकर्ते त्या मातापित्यांच्या लाडल्यांना सुरक्षित ठेवणार. ज्या अर्थी कथित कोरोनाच्या काळात विध्यार्थ्यांना घरून ऑनलाईन शिक्षण दिले, त्या वेळी सुचलेले शहाणपण अश्या सत्या अग्नितांडवाच्या काळात ह्या नाकर्त्यांना समजू नये ? आज मुलांच्या आरोग्याला काही झाले तर त्याा मातापित्यांची भरपाई कोणत्याा स्वरूपात हे शिक्षण सम्राट करून देणार ह्याची सुद्धा घोषणा त्यांनी करावी आणि आमदार, खासदार, मंत्री व प्रशासनातील अधिकाऱ्यांनी आपले मुलांना सुद्धा सूर्य आग ओकने थंबवत नाही तोपर्यंत आपली मुले सुद्धा त्या असुविधा असलेल्या शाळेत पाठवावे असे आव्हान कॉंग्रेस पक्षाचे ओबीसी विभागाचे अमरावती विभाग प्रभारी समन्वयक व शेतकरी नेते कैलास फाटे यांनी केले. १५ जून शाळेच्या सुरवातीचा निर्णय संस्था चालकांनी बदलून शासनाने व हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाचे पालन करावे नाहीतर विद्यार्थ्यांच्या आरोग्याला बाधा झाली तर आम्हाला शाळेला ताला ठोक आंदोलने करावे लागतील त्याची जवाबदारी शासन, प्रशासन व संस्था चालकांची राहील असा इशारा कैलास फाटे यांनी दिला.

## मेहकर ते पालघर थेट बस सेवा सुरू करण्याची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मेहकर दि.१२ :** बुलडाणा जिल्ह्यातील मेहकर, लोणार तसेच सिंदखेड राजा तालुक्यातील मोठ्या प्रमाणातील नागरिक रोजगार, व्यवसाय, शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने पालघर, मनोर, बोईसर, कल्याण आणि ठाणे परिसरात वास्तव्यास आहेत. मात्र या भागासाठी थेट बससेवा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे मेहकर आगारामार्फत मेहकर ते पालघर एक्सप्रेस बस सेवा तात्काळ सुरू करण्यात यावी, अशी मागणी कपूर रामचंद्र शिपे यांनी केली आहे.

प्रस्तावित बस मार्ग मेहकर सिंदखेड राजा न्हावा जालना छत्रपती संभाजीनगर निपाणी नाशिक मस्तान नाका मनोर मार्गे पालघर असा ठेवण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात प्रवासी प्रवास करीत असल्याने बससेवा सुरू झाल्यास हजारो नागरिकांना दिलासा मिळणार असल्याचे सांगितले जात आहे.

सध्या मेहकर परिसरातील नागरिकांना पालघर किंवा बोईसर येथे जाण्यासाठी चार ते पाच वेळा गाड्या बदलाव्या लागतात. यामुळे विशेषतः महिला, वयोवृद्ध नागरिक, लहान मुले तसेच विद्यार्थ्यांची मोठी हेळसांड होत आहे. रात्रीच्या प्रवासादरम्यान सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होत असल्याचे प्रवाशांनी सांगितले. पालघर, बोईसर आणि मनोर परिसरात अनेक औद्योगिक कंपन्या असल्याने बुलढाणा जिल्ह्यातील असंख्य युवक तेथे नोकरीसाठी गेले आहेत. तसेच अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी कल्याण, ठाणे आणि पालघर परिसरात शिक्षण घेत आहेत. त्यामुळे या मार्गावर प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याचा दावा करण्यात येत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, थेट बससेवा सुरू झाल्यास वेळ आणि पैशांची बचत होणार असून प्रवास अधिक सुरक्षित आणि सोयीस्कर होईल. विशेषतः सणासुदीच्या काळात नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. दरम्यान, मेहकर आगार प्रशासनाने प्रवाशांची गरज लक्षात घेऊन या मागणीचा सकारात्मक विचार करावा आणि मेहकर ते पालघर एक्सप्रेस बस सेवा लवकरात लवकर सुरू करावी अशी मागणी गुलाबराव डोंगरे, कपूर शिपे , वकी भाई यांच्या सह शेकडो नागरिकांकडून करण्यात येत आहे.

**आयोजन** लाडू वाटून व आनंदात घोषणा देवून वर्धापन दिन उत्सवात

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त फळ वाटप

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगांव दि. १२ :** अजितदादा पवार गट राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष खामगाव शहर व तालुक्याच्या वतीने बुधवार दि.१० जून २०२६ रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा २७ वा वर्धापन दिन विविध विधायक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. स्थापना दिनानिमित्त राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा ज्योतीबा फुले सामान्य रुग्णालयातील रुग्णांना पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त फळ व बिस्कीटांचे वाटप करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते पंजाबरावदादा देशमुख, खामगांव राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाअध्यक्ष अध्यक्ष मनोज वानखडे, शहर अध्यक्षा श्रीमती सरस्वतीताई खासने, अल्पसंख्याक सेलचे तालुका अध्यक्ष बिलाल खॉ पठान, राष्ट्रवादी महिला कॉंग्रेसच्या शहरअध्यक्षा सौ.शारदाताई शर्मा, शेगाव पं.स. चे माजी सभापती विजय काटोले, कृ.उ.बा.स.चे माजी सभापती सुभाष पेसोडे,कृ.उ.बा.स.चे संचालक विलाससिंग इंगळे, शहर उपाध्यक्ष नरहरी टिकार, शहर कार्याध्यक्ष केशव कापले, नगरसेवक तहसीन शहा, अजीम कुरेशी, सलीमभाई पत्रकार,राष्ट्रवादी कॉंग्रेसचे खामगाव विधानसभा अध्यक्ष पुंजाजी टिकार आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी रुग्णांना फळ व बिस्कीटाचे वाटप केले तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त लाडु वाटप करुन त्यांचे तोंड सुध्दा गोड केले.यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा विजय असो-विजय असो, वर्धापन दिन चिरायु हो-चिरायु हो, अमर रहे-अमर रहे , स्व.अजितदादा पवार साहेब अमर रहे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा विजय असो, सुनेत्राताई पवार आगे बढो-हम तुम्हारे साथ है , हम सब एक है अश्या गगन भेदी घोषणा देण्यात आल्या.या कार्यक्रमाला सौ.प्रमिलाताई चोपडे, कृष्णा पाटील, अविनाश ढगे , आनंद गायगोळ, आनंद राणा , श्याम मोरे, धनंजय वानखडे,, पवन पवार, सैयद फारुख, मोहम्मद सहेलीम, शेख युनूस , जाकीर शाह, निलेश तासतोडे,शिवाजीराव पांढरे,निलेश इर्शिद,प्रफुल कुळकर्णी, सुर्या कापडे,प्रशांत धोटे,मदन गावंडे, सत्यानारायण शर्मा , यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

## कर्जमाफीतील जाचक अटी रद्द करा : राष्ट्रवादीची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेगांव दि.१२ :** राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार यांच्या वतीने शेगाव तालुक्यात शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी निवेदन देण्यात आले. तालुकाध्यक्ष संजय पहुरकर यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदारांमार्फत पाठविण्यातआलेल्या निवेदनात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेत अनेक अटी-शर्ती असल्यामुळे लाखो शेतकरी लाभापासून वंचित राहणार आहेत. विशेषतः २०१९ च्या महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच मर्यादित लाभ देण्यात येत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. तसेच एकवेळ समझोता योजनेत थकबाकीदार शेतकऱ्यांना आधी उर्वरित रक्कम भरण्याची अट अन्यायकारक असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. याशिवाय प्रोत्साहनपर अनुदानासाठी सलग चार वर्षे नियमित कर्जफेडीची अट रद्द करावी, २०१७ च्या कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना लाभ द्यावा, १ रुपयांत पीकविमा योजना पुन्हा सुरू करावी तसेच पेरणीपूर्वी कर्ज खात्यांचे पुनर्गठन करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशा मागण्याही करण्यात आल्या. गेल्या काही वर्षांतील नापिकी, नैसर्गिक आपत्ती व शेतमालाच्या घसरलेल्या दरामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून कोणत्याही अटी-शर्तीशिवाय सरसकट कर्जमाफी देण्याची मागणी राज्यभरातील शेतकऱ्यांकडून होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.या निवेदनावर संजय पहुरकर शेगाव तालुका अध्यक्ष, संगीतराव भोंगळ प्रदेश उपाध्यक्ष, पांडुरंग दादा पाटील सहकार नेते, देवलाल पाटील जिल्हा उपाध्यक्ष, सौ. नंदाताई पाऊलझगडे महिला विदर्भ अध्यक्ष, वर्षाताई सावदेकर शेगाव तालुका अध्यक्ष महिला, सुधीर इंगळे जिल्हा सरचिटणीस, निवृत्ती मोहे, विष्णू पहुरकर, अशोक शेळके शेगाव तालुका अध्यक्ष, सुधाकर ढोले, सतीश खोंड, अंकुश उन्हाळे, विजय कराळे आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## महत्त्वाचे

### कॉमन सर्विस सेंटर केंद्रांकडून होणारी आर्थिक लूट थांबविण्याची मागणी

**जालना :** जालना शहर व जिल्ह्यातील काही (कॉमन सर्व्हिस सेंटर) व मल्टिसर्व्हिसेस केंद्रांकडून विविध शासकीय दाखले व प्रमाणपत्रांसाठी निर्धारित शुल्कापेक्षा जादा रक्कम आकारली जात आहे, सामाजिक कार्यकर्ते राहुल करनाडे यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करून सखोल चौकशी व कठोर कारवाईची मागणी केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, उत्पन्न, रहिवासी, जात, नॉन-क्रीमिलेअर आदी प्रमाणपत्रांसाठी शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अनेक पटीने जादा शुल्क आकारले जात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे विद्यार्थी, पालक, शेतकरी, कामगार तसेच सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याची बाब गंभीर असून प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाने जालना शहर व जिल्ह्यातील सर्व व मल्टिसर्व्हिसेस केंद्रांची विशेष तपासणी मोहीम राबवावी, प्रत्येक केंद्रावर अधिकृत दरपत्रक लावणे बंधनकारक करावे, जादा शुल्क आकारणी करणाऱ्या दोषींवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी तसेच नागरिकांना शासनाच्या सेवा पारदर्शक व निर्धारित शुल्कामध्ये उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. सदर प्रकरणी निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी व भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते राहुल सत्यनारायण करनाडे यांनी केली आहे. या निवेदनाच्या प्रती विभागीय आयुक्त, निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत.

### महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाइन अर्ज सादर करण्याचे आवाहन



**जालना :** सन २०२६-२७ करिता केंद्र पुरस्कृत'' कापूस उत्पादकता अभियान (कपास क्रांती)'' या नव्या अभियानाला शासनाकडून पाच वर्षाकरिता मान्यता प्राप्त झाली आहे. अभियानाअंतर्गत १२५ लाख गाठी कापसाचे उत्पादन व ५५० किलो लिंट/हेक्टरी उत्पादकता साध्य करायचे आहेत. सदर अभियानाअंतर्गत पिक प्रात्यक्षिके (सघन कापूस लागवड), क्लोज स्पेसिंग प्रात्यक्षिके, एकात्मिक पिक उत्पादन पिक प्रात्यक्षिके), बायोचार युनिट ई. घटक राबविण्यात येणार आहे. सन २०२६-२७ करिता केंद्र पुरस्कृत ''कापूस उत्पादकता अभियान (कपास क्रांती) '' या योजनेअंतर्गत पीक प्रात्यक्षिकेसाठी (सघन कापूस लागवड, क्लोज स्पेसिंग प्रात्यक्षिके व स्थानिक पुढाकाराच्या बाबी बायोचार युनिट, कॉटन श्रेडर या घटकाचे लाभ घेण्याकरिता शेतकऱ्यांनी महा-डीबीटी प्रणालीद्वारे अर्ज करण्यासाठी प्रक्रिया सुरु झाली आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी mahadbt.maharashtra.gov.in या वेबसाईटवर पीक प्रात्यक्षिक बियाणे व स्थानिक पुढाकाराच्या बाबी बायोचार युनिट इ.घटकासाठी ऑनलाईन अर्ज करावेत व योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी जालना गहीनीनाथ कापसे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# जिल्ह्यात असंघटीत मजुरांच्या सर्वेक्षणास प्रारंभ

## रोजगार, बेरोजगारी व असंघटित क्षेत्राची माहिती संकलित होणार

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना : दि. १२ :** अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, महाराष्ट्र शासन यांच्या माध्यमातून भारत सरकारच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या Periodic Labour Force Survey (PLFS) आणि Annual Survey of Unincorporated Sector Enterprises (ASUSE) या दोन महत्त्वपूर्ण राष्ट्रीय स्तरावरील सर्वेक्षणांना जालना जिल्ह्यात शुक्रवार दिनांक १२ जूनपासून प्रारंभ झाला आहे. जून २०२६ ते डिसेंबर २०२६ या कालावधीत ही सर्वेक्षणे जिल्ह्यात राबविण्यात येणार असून रोजगार, बेरोजगारी तसेच असंघटित क्षेत्रातील उद्योग, व्यापार व सेवा क्षेत्रासंबंधीची अद्ययावत आणि विश्वासार्ह माहिती संकलित करण्यात येणार आहे.

या सर्वेक्षणांची सुरुवात अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी उपआयुक्त सुचित कुलकर्णी, सांख्यिकी अधिकारी संजय घोडके तसेच जिल्हा सांख्यिकी कार्यालय, जालना येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




**विकासात्मक धोरणांसाठी उपयुक्त ठरणार माहिती**

भारत सरकारतर्फे नियमितपणे राबविण्यात येणाऱ्या या सर्वेक्षणांद्वारे देशातील रोजगार व बेरोजगारीची स्थिती, असंघटित क्षेत्रातील उद्योगांची सद्यस्थिती, रोजगारनिर्मिती, उत्पादनक्षमता आणि आर्थिक घडामोडींची माहिती संकलित केली जाते. या आकडेवारीच्या आधारे केंद्र व राज्य शासन विविध विकासात्मक योजना, रोजगारविषयक धोरणे, कौशल्य विकास कार्यक्रम तसेच आर्थिक नियोजनाची आखणी करत असते.

**ASUSE मधून असंघटित क्षेत्राचा आढावा**

Annual Survey of Unincorporated Sector Enterprises (ASUSE) या सर्वेक्षणाद्वारे असंघटित क्षेत्रातील उत्पादन, व्यापार आणि सेवा क्षेत्रातील उद्योग आस्थापनांची संख्या, रोजगार, उत्पादनक्षमता, स्थूल मूल्यवर्धन, उत्पन्न तसेच इतर आर्थिक निर्देशांकांची माहिती गोळा केली जाणार आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत असंघटित क्षेत्राचा मोठा वाटा असल्यामुळे या क्षेत्राच्या विकासाचा अचूक आढावा घेण्यासाठी हे सर्वेक्षण अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. या सर्वेक्षणातून प्राप्त होणारी माहिती राज्य व जिल्हास्तरीय उत्पन्नाचे अंदाज तयार करण्यासाठी तसेच विविध विकास निर्देशांक निश्चित करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. जिल्हा प्रशासन व जिल्हा सांख्यिकी कार्यालयाने नागरिक, व्यावसायिक आणि उद्योग आस्थापनांनी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांना अचूक व आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे. या सर्वेक्षणांमधून मिळणारी माहिती राज्य आणि देशाच्या विकास नियोजनासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**PLFS सर्वेक्षणातून रोजगारस्थितीचे चित्र स्पष्ट होणार**

Periodic Labour Force Survey (PLFS) या सर्वेक्षणाद्वारे देशातील रोजगार व बेरोजगारीचे प्रमाण, महिला कामगारांचा सहभाग, स्वयंरोजगार, वेतनधारक रोजगार तसेच ग्रामीण आणि शहरी भागातील श्रमबाजाराची स्थिती याबाबतची माहिती संकलित केली जाणार आहे. या माहितीच्या आधारे रोजगारनिर्मिती, महिला सक्षमीकरण, कौशल्य विकास आणि सामाजिक-आर्थिक धोरणे अधिक प्रभावीपणे तयार करण्यास मदत होणार आहे.

**जिल्ह्यात १२० नमुना घटकांची निवड**

जालना जिल्ह्यात PLFS सर्वेक्षणासाठी ग्रामीण भागातील ४८ व शहरी भागातील २४ असे एकूण ७२ नमुना घटक निवडण्यात आले आहेत. तर सर्वेक्षणासाठी ग्रामीण भागातील १६ आणि शहरी भागातील ३२ असे एकूण ४८ नमुना घटक निश्चित करण्यात आले आहेत.

निवडलेल्या नमुना घटकांमध्ये प्रशिक्षित प्रगणक व पर्यवेक्षकांकडून नमुना पद्धतीने माहिती संकलित केली जाणार आहे. सर्वेक्षणासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी निवडलेल्या कुटुंबांना तसेच उद्योग आस्थापनांना प्रत्यक्ष भेट देऊन मुलाखतीद्वारे आवश्यक माहिती गोळा करणार आहेत.

# 'बोव्हाईन ब्रिडींग ऍक्ट'ची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना : दि. १२ :** राज्यातील गाई-म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा करण्यासाठी व प्रजनन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने ''महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३'' लागू केला आहे. मात्र, अद्यापही क्षेत्रीय स्तरावरील खाजगी कृत्रिम रेतन सेवादाता व संस्थांनी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणी केली नसल्याची बाब समोर आली असल्याने संबंधितांवर या अधिनियमांतर्गत नियमोचित कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त पशुसंवर्धन डॉ.किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी अधिकारी वर्गाला दिले आहेत. राज्यामध्ये या कायद्याची अंमलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून सुरू झाली आहे. उत्तम दर्जाच्या वळूचा वापर करून कृत्रिम रेतनाद्वारे दुधाळ जनावरांची पैदास वाढवणे आणि प्रजननाशी संबंधित गैरप्रकारांना आळा घालणे, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. या कायद्यांतर्गत राज्यातील सर्व रेज केंद्र, भ्रूण प्रत्यारोपण केंद्रे, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था आणि सेवा पुरवठादारांना प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक असून, त्यांना केवळ प्रमाणित व उच्च वंशावळीच्या वळूचेच रेत प्रजननासाठी वापरता येईल. या सर्व प्रक्रियांवर देखरेख ठेवण्यासाठी महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. प्राधिकरणाला केंद्रांची तपासणी, झडती व नियमबाह्य साहित्य जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. कायद्यातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई व दंडाची तरतूद करण्यात आली असल्याने संभाव्य कारवाई टाळण्यासाठी संबंधितांनी प्राधिकरणाकडे लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन आयुक्त पशुसंवर्धन यांनी केले आहे.

**दंड व शिक्षेच्या तरतुदी :**

कलम ४ व ५ अन्वये नोंदणी प्रमाणपत्रधारक व्यक्तीने विहित मानकांचे पालन न केल्यास. दोष सिद्ध झाल्यावर रु. ५०,०००/- पर्यंत दंड आकारण्यात येईल. नोंदणी प्रमाणपत्राविना गोजातीय प्रजनन क्रिया करणे, अथवा प्रमाणित वळूव्यतिरिक्त द्वार वळूपासून गोठवलेले रेत उत्पादन करणे किंवा अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास, दोष सिद्ध झाल्यावर रु. १,००,०००/- पर्यंत दंड आकारण्यात येईल. नोंदणी प्रमाणपत्रानुसार मंजूर सेवांबाबत चुकीची/दिशाभूल करणारी जाहिरात किवा प्रसिद्धी केल्यास, दोष सिद्ध झाल्यावर ६ महिन्यांपर्यंत साधा कारावास किया रु. २,००,०००/- पर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

**शेतकऱ्यांसाठी महत्वाचे:** फक्त प्रमाणित व अधिकृत विर्यामात्रांचाच वापर करा.सेवा घेण्यापूर्वी तंत्रज्ञाचा नोंदणी क्रमांक तपासा व नोंदणीकृत तंत्रज्ञांकडूनच सेवा घ्या.कोणतीही अनियमितता आढळल्यास त्वरित तक्रार नोंदवून आपल्या पशुधनाचे संरक्षण करा. शेतकऱ्यांना होणारे फायदे:सुधारित व उच्च उत्पादनक्षम वंशामुळे अधिक दूध उत्पादन. उत्तम प्रजनन कार्यक्षमतेमुळे जनावरांची संख्या व गुणवत्ता वाढ. वैज्ञानिक व नियंत्रित प्रजननामुळे दीर्घकालीन पशुधन विकास. दुग्ध व्यवसायात स्थैर्य व आर्थिक उत्पन्नात वाढ.

# मनपा शाळांच्या दयनीय अवस्थेची राज्य बालहक्क आयोगाने घेतली गंभीर दखल

## एक महिन्यात सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना : दि. १२ :** जालना महानगरपालिका क्षेत्रातील शाळांची दयनीय अवस्था, अपुऱ्या शैक्षणिक सुविधा, मोडकळीस आलेल्या इमारती, स्वच्छतागृहांचा अभाव, शिक्षकांची कमतरता आणि घटती विद्यार्थी संख्या या गंभीर मुद्द्यांवर महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगासमोर मंगळवारी महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली. या सुनावणीत आयोगाने जालना महानगरपालिका प्रशासन आणि शिक्षण विभागाला चांगलेच धारेवर धरत तातडीने सुधारणा करण्याचे निर्देश दिले. सुनावणीस जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संगीता भागवत, मनपा उपायुक्त सुप्रिया चव्हाण, एम. व्ही. मंडलिक, समीर भोईर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महानगरपालिका क्षेत्रातील १६ शाळांमध्ये सध्या केवळ सुमारे ११०० विद्यार्थी शिक्षण घेत असल्याची बाब समोर आली. अनेक शाळांच्या इमारती जीर्ण अवस्थेत असून त्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आलेले नाही. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्वच्छतागृह, क्रीडा सुविधा आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी उपलब्ध नसल्याची बाब आयोगाने अत्यंत गंभीर मानली.

मनपा शाळांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेला निधी पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने खर्च केला जात आहे का, याबाबत आयोगाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. गेल्या पाच वर्षांत शिक्षणासाठी करण्यात आलेली अर्थसंकल्पीय तरतूद, प्रत्यक्ष खर्च आणि त्याचे तपशील आयोगाने मागविले आहेत. तसेच सर्व १६ शाळांचे छायाचित्रांसह सविस्तर अहवाल, शाळांना उपलब्ध निधी व खर्चाचा तपशील, शैक्षणिक सुविधांची सद्यस्थिती, स्ट्रक्चरल ऑडिट, स्वच्छतागृहे, परिसरातील झोपडपट्ट्या व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांची प्रवेशसंख्या वाढविण्यासाठी तयार केलेला आराखडा तसेच शाळांमध्ये झालेल्या सकारात्मक बदलांची माहिती सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या प्रकरणाची पुढील सुनावणी एका महिन्यानंतर जालना येथे होणार असून त्यावेळी महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे सदस्य प्रत्यक्ष जालना दौरा करून मनपा शाळांची पाहणी करणार आहेत.

# अवैध वाळू उत्खननाविरोधात प्रशासन आक्रमक

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना : दि. १२ :** जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन, वाहतूक आणि साठवणुकीला आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कठोर भूमिका घेतली असून, या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि पोलीस अधीक्षक तेगबीर सिंग संधू यांनी गुरुवार दिनांक ११ जून रोजी ध्यरात्री अंबड तालुक्यातील गोंदी परिसराला अचानक भेट देऊन परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली.

या पाहणीदरम्यान अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीसंदर्भातील हालचालींचा आढावा घेण्यात आला. तसेच महसूल, पोलीस, परिवहन आणि इतर संबंधित विभागांकडून राबविण्यात येणाऱ्या कारवायांची माहिती घेण्यात आली. अवैध खनिज उत्खनन रोखण्यासाठी विविध विभागांमध्ये अधिक प्रभावी समन्वय साधून संयुक्तरीत्या कारवाई करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना संवेदनशील भागांमध्ये नियमित गस्त वाढविण्याचे निर्देश दिले. तसेच संयुक्त तपासणी मोहिमा आणि अचानक पाहणी मोहिमांना अधिक गती देऊन अवैध उत्खनन व वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यावर भर देण्यात आला. जिल्ह्यातील सर्व विभागांनी अधिक दक्षता बाळगत अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी सक्रियपणे काम करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रशासनाच्या माहितीनुसार, जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन, वाहतूक आणि साठवणुकीबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. अशा प्रकरणांतील प्रत्येक हालचालीवर जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक स्वतः लक्ष ठेवून आहेत. अवैध उत्खनन आणि वाहतुकीत सहभागी आढळणाऱ्या व्यक्ती, वाहनमालक तसेच संबंधित घटकांविरुद्ध प्रचलित कायदे व नियमांनुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# मूल्य साखळी भागीदार निवडीसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना : दि. १२ :** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - तेलबीया सन २०२६-२७ अंतर्गत जिल्ह्यात तेलबिया पिकांच्या उत्पादन, उत्पादकता, प्रक्रिया, मूल्यवर्धन व बाजारपेठ विकासास चालना देण्यासाठी मूल्य साखळी भागीदार यांची निवड करण्यात येणार आहे.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हा कार्यकारी समितीमार्फत मूल्य साखळी भागीदार निवडीची प्रक्रिया राबविण्यात येणार असून इच्छुक शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था तसेच पात्र सार्वजनिक व खाजगी संस्था यांनी विहित नमुन्यात दि. १७ जुन, २०२६पर्यंत अर्ज सादर करावेत.

**शेतकरी उत्पादक कंपनी, सहकारी संस्थांसाठी पात्रता निकष :** कंपनी कायदा किंवा सहकारी कायद्यानुसार नोंदणीकृत असणे आवश्यक.बंधित जिल्ह्यात किमान ३ वर्षे कार्यरत असणे आवश्यक. म्हणजेच नोंदणी माहे २०२३ पुर्वीची. किमान २०० शेतकरी सदस्य असणे आवश्यक.मागील ३ वर्षातील सरासरी वार्षिक उलाढाल किमान ९ लाख रुपयांपेक्षा जास्त असावी.तेलबिया पिकांमध्ये कामकाजाचा अनुभव असावा. FPO/FPC मध्ये शेतक-यांचा किमान ३ लाख रुपयांचा समभाग असावा. कमी उत्पादकता असलेल्या तालुक्यांमध्ये कार्यरत संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

सार्वजनिक / खाजगी संस्थांसाठी पात्रता निकष : किमान वार्षिक उलाढाल १० कोटी रुपये असावी.मागील ३ वर्षांत कोणतीही कर थकबाकी अथवा कर चुकवेगिरीची नोंद नसावी.बियाणे, खते अथवा खाद्यतेल क्षेत्रात किमान ५ वर्षांचा अनुभव असावा.तेलबिया व खाद्यतेल क्षेत्रातील मूल्य साखळी विकासाचा अनुभव असावा.

निवड प्रक्रिया : प्राप्त अर्जाची जिल्हा कार्यकारी समितीमार्फत छाननी करून गुणांकन पद्धतीने निवड करण्यात येईल. कार्यरत वर्षे, सरासरी महसूल/उलाढाल, तेलबिया व खाद्यतेल क्षेत्रातील अनुभव, समूह विकासातील अनुभव तसेच शेतकरी व मूल्य साखळीतील समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता या बाबींवर गुणांकन केले जाईल.

इच्छुक संस्थांनी आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जालना यांच्या कार्यालयात दि.१७ जुन २०२६ सादर करावेत. जिल्ह्यातील पात्र शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था, सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील संस्थांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ब्रिहित मुदतीत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, गहिनीनाथ कापसे यांनी केले आहे.

**चर्चासत्र** | कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेच्या (आत्मा) माध्यमातून मार्गदर्शन

# मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना : दि. १२ :** कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) जालना यांच्या माध्यमातून मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे करण्यात आले. या कार्यशाळेत मोसंबी पिकाशी संबंधित विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आत्माचे प्रकल्प संचालक अमोल आगवण हे होते. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, कृषि विज्ञान केंद्र बदनापूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ सचिन सोमवंशी, केव्हीके खरपुडीचे श्रीकृष्ण सोनूने, अजय मिटकरी तसेच नाबार्डचे डीडीएम साळवे यांची प्रमुख उपस्थिती होती.



कार्यशाळेत मोसंबी उत्पादन वाढ, कृषी प्रक्रिया उद्योग, साठवणुकीसाठी कोल्ड स्टोरेजची गरज, सध्याची परिस्थिती तसेच जालना जिल्ह्यात नव्याने फळबाग लागवडीसाठी उपलब्ध शासकीय योजना याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी व समस्यांबाबत थेट संवाद साधून त्यांची मते जाणून घेण्यात आली.

यावेळी मोसंबी महासंघाचे डोंगरे, गणेश पडूळ, सचिन गोल्डे यांच्यासह जिल्ह्यातील अनेक मोसंबी उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच आत्माचे दत्तात्रेय सूर्यवंशी, मुरलीधर गाढवे, पारडे, मुद्दलवार, खरात आदींचीही उपस्थिती होती.

या कार्यशाळेमुळे मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग व बाजारपेठेबाबत उपयुक्त मार्गदर्शन मिळाले असून, शेतकऱ्यांच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी सकारात्मक पावले उचलली जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, शनिवार १३ जून २०२६ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### चारचाकीच्या धडकेत इसम जखमी

अमरावती : अज्ञात चारचाकीच्या धडकेत महात्मा फुले सहकारी बँकेतील कर्मचारी गंभीर जखमी झाल्याची घटना मोर्शी टि पाईंट येथील अग्रवाल पेट्रोल पंपानजिक घडली. जखमीला जिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमीचे वडिल प्रल्हाद घाटोळे रा. नंदनवन कॉलनी यांच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात अज्ञात चारचाकी चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास सिटी कोतवाली पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहे.

### अपघातात पोलीस कर्मचारी जखमी

अमरावती : शेगाव-कठोरा मार्गावरील अभियांत्रिकी कॉलेजजवळ चारचाकी वाहनाने धडक दिल्याने यात गाडगेनगर पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस कर्मचारी हे जखमी झाले. अनुप असे जखमी कर्मचाऱ्याचे नाव आहे. याप्रकरणी त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात कार चालकाविरूध्द गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### दारू विक्रेत्यांवर पोलिसांची धाड

अमरावती : शहरात वेगवेगळया ठिकाणी देशी दारूची अवैध विक्री होत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी धाडी घाली आरोपींनी ताब्यात घेत मुद्देमाल हस्तगत केला. वलगाव पोलीस ठाणे हद्दीत रामदास रामुजी सोळंके याला ताब्यात घेत त्याच्याजवळून ५६० रूपयांच्या देशी दारू बॉटल्स जप्त केल्या. राहुल जुनघरे याला ताब्यात घेत त्याच्याजवळून १५०० रूपयांच्या देशी दारूच्या बॉटल्सचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी दोघांवरही कलम ६५ ई-मदाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. वलगाव पोलिसांनी ही कारवाई केली.

### शेतीच्या मोजणीवरून दोन गटात हाणामारी

आसेगाव पूर्णा : शेतीच्या मोजणीवरून वाद होवून यात युवकावर लोखंडी अँगल, काठीने हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. सावळी खुर्द येथे ही घटना ९ जून रोजी दुपारी घडली. अभिषेक राजेंद्र शेंडे वय २५ असे गंभीर जखमीचे नाव आहे. आसेगाव पोलीस ठाण्यात तक्रारीवरून प्रणय नंदकिशोर शेंडे वय २५, श्रीकांत बाळकृष्ण शेंडे वय ४८, व प्रशम गजानन शेंडे वय २० सर्व रा. सावळी खुर्द यांच्याविरूध्द खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. तर प्रणय नंदकिशोर शेंडे यांच्या तक्रारीवरून अभिषेक राजेंद्र शेंडे, राजेंद्र किशोर शेंडे यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### घरातून हजारोंची रोकड लंपास

शिरखेड : घराच्या गादीखाली ठेवलेली ६० हजार रूपयांची रोकड अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना वाघोली येथे घडली. संजय वानखडे यांच्या तक्रारीवरून शिरखेड पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### अल्पवयीन मुलाला फूस लावून पळविले

पथ्रोट : येथून एका अल्पवयीन मुलाला फूस लावून पळवून नेल्याची घटना ९ जून रोजी उघडकीस आली. याप्रकरणी वडिल महेश वामनराव राऊत यांच्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तीविरूध्द पळवून नेल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. शहरात अल्पवयीन मुलांना आणि मुलींना फूस लावून पळविण्याच्या घटनेत दिवसेंदिवस वाढत होत आहे.

# अॅपवर एसटीचे तिकीट निघेना, क्यूआरकोडने प्रवासी संभ्रमात!

## उन्हाळी सुट्ट्यांमुळे मध्यवर्ती बस स्थानकासह आठ आगारांत प्रवाशांची गर्दी

अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**अमरावती, दि.१२ :** सध्या उन्हाळी सुट्ट्यांचा हंगाम सुरू असल्याने नातेवाइकांकडे जाणारे, लग्नकार्यासाठी निघणारे आणि पर्यटनाला जाणाऱ्या प्रवाशांमुळे अमरावती मध्यवर्ती बस स्थानकासह बडनेरा, दर्यापूर, परतवाडा, चांदुर बाजार, मोर्शी, वरूड आणि चांदुर रेल्वे अशा ८ बस स्थानकांवर प्रवाशांची गर्दी वाढली आहे.

डिजिटल इंडियाच्या काळात प्रवाशांचा त्रास कमी व्हावा, म्हणून एसटी महामंडळाने ऑनलाइन तिकीट बुकिंग अॅप आणि बसमध्ये क्यूआर कोड पेमेंटची सुविधा सुरू केली खरी, मात्र सध्या डिजिटल यंत्रणा तांत्रिक बिघाडामुळे कोलमडत आहेत. अॅपवर तिकीट बुक करताना प्रवाशांना तांत्रिक अचडणींचा सामना करावा लागत असून, बसमधील ईटीआयएम मशीनवरील क्यूआर कोड स्कॅन करताना लिंकअभावी मोठा खोळंबा होत आहे.

उन्हाळ्यात सुट्ट्या आणि लग्नसराई एकाच वेळी आल्यामुळे जिल्ह्यातील ८ बस स्थानकांवर प्रवाशांची गर्दी वाढत आहे. बस स्थानकातून लांब, मध्यम आणि ग्रामीण भागातील एसटी बसमध्ये प्रवाशांची गर्दी दिसून येत आहे. विशेष म्हणजे कडक उन्हाळ्यातही प्रवाशांचा राबता बस स्थानकावर कायम आहे.

बसमधील वाहकांना दिलेल्या नवीन ईटीआयएम मशीनची मोठी डोकेदुखी सुरू आहे. ग्रामीण भागात किंवा महामार्गावर अनेक ठिकाणी नेटवर्क उपलब्ध नसते. त्यामुळे मशीनवर क्यूआर कोड जनरेट होत नाही किंवा तो स्कॅन केल्यानंतर बँक सर्व्हरशी लिंक होत नाही. यामुळे वाहक आणि प्रवाशांत खटके उडतात.

प्रवाशांनी गर्दी टाळण्यासाठी एसटी महामंडळाच्या अधिकृत मोबाइल अॅपचा आधार घेतला. मात्र, सध्या या अॅपमध्ये अनेक प्रवाशांना लॉगिन करणे कठीण झाले आहे. अत्यंत संतापजनक बाब म्हणजे काही प्रवाशांचे बँकेतून पैशांचे पेमेंट यशस्वीरीत्या कट झाले. तरीही, त्यांना तिकीट कन्फर्म झाल्याचा मेसेज किंवा पीडीएफ मिळाली नाही.

> सर्व वाहकांना नवीन स्वतंत्र ईटीआय मशीन दिल्या आहेत. मशीनमध्ये काही बिघाड झाल्यास दुरुस्तीनंतर या मशीनचा वापर केला जातो. **संदीप रायलवार, वि. वाहतूक अधिकारी,**

पैसे कापले गेले, पण हातात तिकीट नाही, अशा अडचणी येतात.तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी तक्रार करावयाची असल्यास जर प्रवाशांच्या बँक खात्यातून तिकीट बुकिंगचे किंवा बसमधील क्यूआर कोड पेमेंटचे पैसे कट झाले असतील आणि तिकीट मिळाले नसेल, तर घाबरून न जाता कापलेल्या रकमेचा स्क्रीनशॉट आणि बँक ट्रॉन्सॅक्शन आयडी जतन करून ठेवा.

डिजिटल पेमेंट रखडत असल्याने, बस सुटण्याची वेळ होत असल्याने वाहक थेट ऑनलाइन पेमेंट घेण्यास नकार देत आहेत. आम्हाला क्यूआर कोड पेमेंट नका करू थेट रोख (कॅश) पैसे द्या, अशी भूमिका वाहक घेत आहेत.

# विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी मिळणार आर्थिक मदत

अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**अमरावती, दि.१२ :** केंद्र सरकारच्या आरटीई कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. राज्यातील दुर्गम ग्रामीण तसेच घराजवळ शाळा नसलेल्या शहरी भागातील विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत प्रवासासाठी भत्ता देण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण अबाधित राहणार आहे.आव्हानात्मक असलेल्या जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थ्यांना या योजनेचा मोठा दिलासा मिळणार असून, यामुळे त्याची दुर्गम रस्त्यांवरील पायी चालण्याची कसरत थांबणार आहे. दुर्गम भागातील अनेक गोरगरीब मुले केवळ शाळा लांब असल्याने शिक्षणापासून वंचित राहतात किंवा अर्ध्यातून शाळा सोडतात. शासनाच्या या नव्या निर्णयामुळे आता दररोजची विद्यार्थ्यांची मैलोनमैल होणारी पायपीट कायमची थांबणार आहे. वाहतुकीचे साधन उपलब्ध झाल्याने मुलांचा वेळ आणि श्रम वाचणार असून विद्यार्थ्यांना दिलासाही मिळणार आहे.शिक्षण नाही सुटणार, पायपीटही थांबणार केंद्र शासनाच्या आरटीई कायद्याच्या अनुषंगाने २०११ मधील तरतुदीनुसार विद्यार्थ्यांना वाहतूक सुविधा भत्ता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे शिक्षणाची सोय होणार आहे.ज्या विद्यार्थ्यांच्या वस्ती निवासस्थानापासून ठराविक किलोमीटर अंतराच्या परिसरात शाळा नाही. त्या पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी वाहतूक भत्ता दिला जाणार आहे.गळती थांबण्यास मदतशासनाच्या या निर्णयामुळे जिल्ह्यातील मेळघाटातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची वाट सुकर होणार आहे. वाहतूक भत्ता सुविधा मिळणार असल्याने शैक्षणिक गळती थांबण्यास मदत होणार आहे.इयत्ता पहिली ते पाचवी- वस्तीपासून १ किमी अंतरात शाळा नसलेले विद्यार्थी, सहावी ते आठवी - वस्तीपासून ३ किमी अंतरावरील शाळा नसलेले विद्यार्थी, नववी आणि दहावी-वस्तीपासून ५ किमी अंतरात शाळा नसलेले विद्यार्थी.डीबीटीने थेट बँक खात्यात पैसे या योजनेतंर्गत लाभार्थी विद्यार्थ्यांना वितरित करावयाची मंजूर रक्कम ही लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट डीबीटीद्वारे जमा होणार आहे.

# सख्ख्या मावसभावानेच काढला काटा

## तपोवन जंगल परिसरातील थरारक मर्डर मिस्ट्री उलगडली

अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**अमरावती,दि.१२ :** शहरातील तपोवन संस्था परिसरातील जंगलात एका अनोळखी महिलेचा जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली होती. अत्यंत गुंतागुंतीच्या आणि आव्हानात्मक ठरलेल्या या मर्डर मिस्ट्रीचा तब्बल नऊ दिवसांनंतर छडा लावण्यात शहर गुन्हे शाखेला यश आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, सर्वांना आश्चर्यचकीत करत खुनाचा मुख्य आरोपी हा मृत तरुणीचा सख्खा मावसभाऊच निघाल्याचे निष्पन्न झाले आहे. चेतन सुनील थोरात (वय २३ वर्षे, रा. तेजस विहार, राजुरा, अमरावती) करण्यात आलेल्या असे अटक आरोपीचे नाव आहे.२ जून रोजी गाडगेनगर पोलिस स्टेशनच्या हद्दीतील विदर्भ महारोगी सेवा मंडळ, तपोवन संस्थेच्या पडीक जागेत एका महिलेचा अर्धवट जळालेला मृतदेह पोलिसांना आढळला होता. घटनास्थळ अत्यंत दुर्गम आणि झाडी-झुडपांचे असल्याने तिथे कोणताही प्रत्यक्षदर्शी किंवा सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नव्हते. त्यामुळे पोलिसांसमोर मृतदेहाची ओळख पटवणे आणि आरोपीचा शोध घेणे हे मोठे आव्हान होते.पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या चार पथकांनी अत्यंत गोपनीयतेने तपास सुरू केला. अमरावती शहर व ग्रामीण भागातील बेपत्ता महिलांची माहिती गोळा करतानाच, तांत्रिक विश्लेषण आणि खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे ती मृत तरुणी काजल जितेन्द्र इंगळे (२२, रा. विश्रोळी, ता. चांदुर बाजार, ह. मु तेजस विहार, राजुरा, अमरावती) असल्याचे स्पष्ट झाले.

गुन्ह्याचा पुरावा नष्ट करण्यासाठी आरोपी चेतनने काजलचा मृतदेह पेट्रोल टाकून जाळला होता, तसेच तिचा मोबाइल व इतर वस्तू घटनास्थळावरून दूर फेकून दिल्या होत्या. या प्रकरणात पोलिसांनी अनेक संशयितांची चौकशी केली. सुरुवातीला चेतन पोलिसांच्या संशयाच्या वर्तुळात कुठेच नव्हता. आरोपीने खुनाची कबुली दिली असली, तरी त्याने हत्येचे नेमके कारण अजूनही गुलदस्त्यात ठेवले आहे.

# पोटे आणि राणांचे 'राजकीय मनोमिलन'

## जुने वैर विसरून अमरावतीत महायुती एकत्र!

अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**अमरावती, दि.१२ :** अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या राजकारणातील सर्वात मोठी आणि धक्कादायक घडामोड समोर आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून एकमेकांचे कट्टर राजकीय वैरी मानले जाणारे भाजप नेते व महायुतीचे उमेदवार माजी मंत्री प्रवीण पोटे पाटील आणि आमदार रवी राणा यांच्यात अखेर राजकीय मनोमिलन झाले आहे. भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी या दोन्ही नेत्यांमधील क्रायसिस मॅनेजर (संकटमोचक) भूमिका बजावत हे जुने वैर संपवण्यात यश मिळवले आहे. गुरुवारी, ११ जून रोजी पोटे पाटील यांनी थेट आमदार रवी राणा यांच्या अमरावती येथील मुख्य जनसंपर्क कार्यालयात जाऊन त्यांची भेट घेतली. पोटे यांनी राणांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले, ज्यामुळे अमरावतीच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.प्रवीण पोटे पाटील आणि आमदार रवी राणा यांच्यातील टोकाचा राजकीय संघर्ष सर्वश्रुत आहे. आगामी विधान परिषद निवडणुकीत महायुतीला कोणताही फटका बसू नये, यासाठी खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी पुढाकार घेतला. त्यांनी अत्यंत गुप्ततेने दोन्ही नेत्यांमध्ये मध्यस्थी केली. बोंडे यांच्या प्रयत्नांमुळेच पोटे पाटील थेट राणांच्या कार्यालयात पोहोचले आणि दोन्ही नेत्यांमध्ये बंद दाराआड तब्बल पाऊण तास महत्त्वाची बैठक पार पडली.

निवडणुकीच्या तोंडावर समीकरणे बदलली स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत आमदार रवी राणा आणि माजी खासदार नवनीत राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाची मते निर्णायक मानली जातात. प्रवीण पोटे यांच्या उमेदवारीला राणा गटाकडून छुपा विरोध होण्याची शक्यता वर्तवली जात होती.

मात्र, या ऐतिहासिक बैठकीनंतर आता राणा गट अधिकृतपणे प्रवीण पोटे पाटील यांच्या पाठीशी उभा राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या मनोमिलनामुळे महायुतीची ताकद प्रचंड वाढली असून विरोधी महाविकास आघाडीच्या गोटात मात्र चिंतेचे वातावरण पसरले आहे.

## माजी कृषी मंत्री हर्षवर्धनजी देशमुख यांची दूरदृष्टी !

# घोडदेव सिंचन प्रकल्प ठरला संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान!

अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**मोर्शी, दि.१२ :** माजी कृषी मंत्री तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या दूरदृष्टीमुळे ड्राय झोन असलेल्या मोर्शी तालुक्यातील घोडदेव सिंचन प्रकल्पामुळे परिसरातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून हा प्रकल्प आज हजारो हेक्टर क्षेत्राच्या सिंचनाचा आधार बनला आहे. घोडदेव, दापोरी, डोंगर यावली, हिवरखेड तसेच परिसरातील अनेक गावांतील शेतकऱ्यांच्या शेतीला या प्रकल्पामुळे बारमाही पाण्याची उपलब्धता निर्माण झाली आहे. परिणामी संत्रा उत्पादनात लक्षणीय वाढ होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीला चालना मिळाली आहे.

मोर्शी तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीमध्ये महत्त्वाचा वाटा उचलणारा घोडदेव सिंचन प्रकल्प आज हजारो शेतकऱ्यांसाठी जीवनदायी ठरत आहे. दूरदृष्टी, प्रभावी नियोजन आणि शेतकरी हिताला प्राधान्य देणारे नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या माजी कृषी मंत्री हर्षवर्धनजी देशमुख यांच्या प्रयत्नांमुळे हा प्रकल्प साकार झाला असून त्याचा लाभ आज घोडदेव, डोंगर यावली, हिवरखेड, दापोरी, सालबर्डी तसेच परिसरातील अनेक गावांतील शेतकऱ्यांना होत आहे.

पूर्वी या भागातील शेती मोठ्या प्रमाणात पावसावर अवलंबून होती. पावसाच्या अनिश्चिततेमुळे संत्रा बागांची वाढ, उत्पादन आणि गुणवत्तेवर परिणाम होत होते. अनेक शेतकऱ्यांना पाण्याअभावी मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत होते. मात्र घोडदेव सिंचन प्रकल्पामुळे सिंचनासाठी मुबलक पाणी उपलब्ध झाले आणि परिसरातील शेतीला नवसंजीवनी मिळाली.

या प्रकल्पामुळे हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले असून मोर्शी तालुक्यात संत्रा लागवडीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले आहे. नियमित पाणीपुरवठ्यामुळे संत्रा बागांची उत्पादकता वाढली, फळांची गुणवत्ता सुधारली आणि शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढले आहे. अनेक शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून बागायती शेतीकडे वाटचाल केली असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली आहे.

शेतकऱ्यांच्या विकासासाठी केवळ घोषणा न करता प्रत्यक्षात विकासकामे उभी करण्याची क्षमता हर्षवर्धनजी देशमुख यांनी दाखवून दिली आहे. घोडदेव सिंचन प्रकल्प हे त्यांच्या दूरदृष्टीचे आणि शेतकरी हिताच्या बांधिलकीचे जिवंत उदाहरण मानले जात आहे. या प्रकल्पामुळे केवळ पाण्याची उपलब्धता वाढली नाही, तर हजारो कुटुंबांच्या जीवनमानातही सकारात्मक बदल घडून आला आहे.आज घोडदेव सिंचन प्रकल्पाकडे पाहताना परिसरातील शेतकरी कृतज्ञतेने सांगतात की, पाणी आले, हरितक्रांती आली आणि संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या आयुष्याला नवी दिशा मिळाली. मोर्शी तालुक्यातील कृषी विकासाचा हा महत्वाचा टप्पा मानला जात असून भविष्यातही या प्रकल्पाचा लाभ अनेक पिढ्यांना मिळत राहणार आहे.दूरदृष्टी असलेले नेतृत्व, शाश्वत सिंचन व्यवस्था आणि समृद्ध शेतकरी हेच घोडदेव सिंचन प्रकल्पाचे खरे यश आहे.



> घोडदेव सिंचन प्रकल्पामुळे आमच्या भागातील शेतीला नवे जीवन मिळाले आहे. पूर्वी पावसाच्या भरोशावर शेती करावी लागत होती. पाण्याअभावी संत्रा बागा टिकवणे कठीण होत होते. मात्र आज सिंचनासाठी नियमित पाणी उपलब्ध झाल्याने संत्रा उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले असून आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत झाली आहे. हा प्रकल्प माजी कृषी मंत्री हर्षवर्धनजी देशमुख यांच्या दूरदृष्टीचे उत्तम उदाहरण आहे.
> **अध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्ष, मोर्शी तालुका**

# घरातून पैसे चोरून नेणारे जेरबंद

## शिरखेड पोलीसांची कारवाई



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**शिरखेड, दि.१२ :** शिरखेड पोलीसांनी वाघोली येथील आजारी असलेल्या एका ईसमाच्या घरातुन पैसे चोरून नेणाऱ्या आरोपींना अटक करण्यात आली पोलीसांनी आरोपीकडुन चोशीला गेलेला मुददेमाल ६० हजार पैकी पंन्नास हजार जप्त करण्यात आले वाघोली येथिल रहिवासी असलेला संजय मानिकरावर वानखडे वय ५० वर्षे हे अपघात झाल्याने घरीच बेडवर पडुन होते. वडीलांनी शेती विकुन आणलेले पैसे बँकेत जमा केले होते मुलगा आजारी असल्यामुळे वडीलांनी बँकेतुन काढुन ८० हजार रूपये घरी घेवुन आले ज्या बेडवर मुलगा झोपला त्याच बेडवरच्या गादी खाली बँकेतुन आणलेली रक्कम ठेवून दिली काही दिवसानंतर फिर्यादीच्या वडिलांचा मृत्यु झाला वडिलांच्या अंत्यविधी करीता आणलेली ८० हजार रूपया मधुन २० हजार रूपये खर्च केले उर्वरीत ६० हजार रूपये बेडच्या गादी खाली फिर्यादीने ठेवुन दिले होते. फिर्यादी संजय वानखडे यास त्याचे मित्र दि ५ जून रोजी वाघोली येथील संजय वानखडेच्या घरी आले असता भेट झाल्यांनतर त्याच घरात फिर्यादी संजय पेशंट व मित्र यांनी दारू ढोसली संजय यास दारू जास्त झाल्याने तो तेथेच झोपला भेटण्या करीता आलेले त्याचे तिन मित्र तेथुन निघुन गेले त्यानंतर दुसऱ्या दिवशी फिर्यादी पेशंट यास जाग आल्यानंतर त्याचे लक्षात आले की बेड खाली ठेवलेले ६० हजार रूपये रात्रीच्या सुमारास कोणीतरी अज्ञात चोराने पैसे चोरून घेवुन गेले परंतु लाजेपोटी फिर्यादीने तिन दिवस घडलेली घटना कोणालाही न सांगता मनात ठेवली त्या नंतर दि ९ जून रोजी फिर्यादी संजय याने शेजारील इसमास २०० रूपये उसणे मागितले असता शेजाऱ्याने त्यास म्हटले तुझ्याकडे भरपुर पैसे आहेत तुला २०० रूपयाचेचे काय गरज मग फिर्यादी संजय याने त्याच्या सोबत झालेल्या सर्व घटने बाबत सर्व हकीकत शेजारच्याला सांगितली.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, शनिवार १३ जून २०२६ www.ajinkyabharat.com


## थोडक्यात

### शिंदी येथे घरातून शस्त्रसाठा जप्त

अचलपूर : दरोड्याचा प्रयत्न करण्याच्या संशयातून पोलिसांनी शिंदी बु. येथे एका घरावर धाड घालून दोन लोखंडी पाईप, मोटारसायकलचे चैनव्हिल वेल्डिंग केलेले घातक शस्त्र जप्त करण्यात आले. रहिमापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी सपोनि अनंतराव वडतकर यांच्या तक्रारीवरून शिवम धुर्वे, शंकर धुर्वे, मो. शफी मो. रफिक, एक अल्पवयीन यांच्या विरूध्द आर्म अ‍ॅक्ट अन्वये प्रथोट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यापैकी दोघांना अटक करण्यात आली.

### पथ्रोट येथे गोठ्यातून बॅटरी लंपास

पथ्रोट : येथील सदाफळे प्लॉट परिसरातील गुरांच्या गोठ्यातून बॅटरीसह कॉम्प्रेसर मशीनसह इतर साहित्य मिळून १२ हजार रूपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला. शेतकरी राहूल नरेटे यांच्या तक्रारीवरून पथ्रोट पोलिसांनी गुन्हा नोंदविला.

### फोटो व्हायरल करून बदनामी करण्याची धमकी

अंजनगाव सुर्जी : तू माझ्यासोबत बोलली, भेटली नाहीतर फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची तसेच जीवे मारण्याची धमकी देत असल्याने या त्रासाल कंटाळून पीडित परिवाराने पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. त्याआधारे दोन जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. मो. युनुस मो. युसुफ वय २५ या मुख्य आरोपीसह त्याचा सहकारी हकीम अ. रऊफ याच्याविरूध्द विनयभंगाचा अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पीडित महिलेने पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत मोहम्मद युनूस हा मुलीचा पाठलाग करून लग्न करण्यासाठी धमकी देत असल्याचे म्हटले आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहे.

### वाळूची वाहतूक करणाऱ्यावर कारवाई

ब्राम्हणवाडा थडी : ब्राम्हणवाडा थडी रस्त्यावर अवैधरित्या वाळूची वाहतूक करणारा ट्रॅक्टर पोलिसांनी पकडून त्यातील एक ब्रास वाळूसह वाहन असा ५.८५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. सपोनि मिठाराम दहिकर यांच्या फिर्यादीवरून अरविंद धोटे, तुषार चर्जन, गोलू पोकळे यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. यापैकी गोलू पोकळे याला अटक करण्यात आली आहे.

### वीट मारून केले वृध्देला जखमी

मंगरूळ दस्तगीर : रस्त्यावर टाकलेला लाकूडफाटा बाजूला कर असे हटकल्याने वृध्देला वीट मारून गंभीर जखमी केले. इंदबाई शिरके वय ७५ रा. गव्हानिपाणी असे जखमी वृध्देचे नाव आहे. मंगरूळ दस्तगीर पोलीस ठाण्यात तक्रारीवरून मंदा सोनवणे वय ६५ हिच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### कुऱ्हा हद्दीत महिलेचा विनयभंग

कुऱ्हा : सासूच्या घरी तिला बघायला गेलेल्या महिलेला मुलीला का मारले या कारणावरून वाद झाला. यातून तिला धक्काबुक्की करून साडी ओढून विनयभंग केला. याप्रकरणी ३० वर्षीय पीडित महिलेच्या तक्रारीवरून दोन जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. यापैकी एकाला अटक करण्यात आली आहे.

### समृध्दी मार्गावरील अपघातात इसम जखमी

धामणगाव रेल्वे : समृद्धी महामार्गावर भरधाव ट्रकने मागून धडक दिली. त्यात अजीममोद्दीन कादर अली समनानी (५५, रा. नागपूर) हे जखमी झाले. त्यांच्या तक्रारीवरून मंगरूळ दस्तगीर पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# १४ गटशिक्षणाधिकाऱ्यांना सीईओंनी बजाविली नोटीस

## शिक्षकांची वेतन देयके विहित मुदतीत सादर न करणे भोवले

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.१२ :** जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकाचे वेतन दरमहा १ तारखेला अदा होण्याच्या दृष्टीने वेतन देयके सादर करण्याचे वेळापत्रक शिक्षण विभागाने निश्चित करून दिले. मात्र, या वेळापत्रकांची अंमलबजावणी करण्यात कुचराई करणाऱ्या जिल्ह्यातील १४ समित्यांच्या पंचायत गटशिक्षणाधिकाऱ्यांना जिल्हा परिषद सीईओ सत्यम गांधी यांच्या स्वाक्षरीने जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागामार्फत शो कॉज नोटीस बजावल्या आहेत. सीईओंच्या या कारवाईमुळे शिक्षण विभागात एकच खळबळ उडाली आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा १ तारखेला अदा होण्याच्या दृष्टीने वेतन देयके सादर करण्याचे वेळापत्रक शिक्षण विभागाने तयार करून दिले आहे. विशेष म्हणजे, वेतन देयके सादर करण्यात कोणत्याही प्रकारचा




विलंब होऊ नये, याबाबत वारंवार सूचना व सक्त निर्देश गागात भाले भाले ग्रान १४ पंचागत समित्यांकडून वेतनाची देयके विहीत मुदतीत सादर करण्यात येत नसल्याची बाब समोर आली आहे.

वेतन देयके सादर करण्यात होणारा निष्काळजीपणामुळे व प्रशासकीय उदासीनतेमुळे प्राथमिक शिक्षकांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला अदा होण्यास विलंब होत आहे. परिणामी शिक्षक व कर्मचारी वर्गामध्ये तीव्र असंतोष निर्माण होत असून, विविध शिक्षक संघटनांकडून आंदोलने व निवेदने तसेच समाजमाध्यमातून जिल्हा परिषदेच्या कामकाजाबाबत नकारात्मक वातावरण पसरत आहे. ही बाब अत्यंत भगन तलि कार्गालगागा स्पष्ट आदेशाचे पालन न करणे, प्रशासकीय कामकाजात हलगर्जीपणा करणे, शासकीय कार्यात अकार्यक्षमता दाखविणे व शिक्षकांच्या वेतन वितरणास विलंब होण्यास कारणीभूत ठरणे हे गंभीर स्वरूपाचे कृत्य असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत आहे. आपल्या या निष्काळजीपणामुळे जिल्हा परिषदेची प्रतिमा मलिन होत असून, शिक्षकांच्या आंदोलनामुळे समाजमाध्यातून येणारी नकारात्मक प्रसिद्धीस आपण प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या जबाबदार धरून शिक्षण विभागाने सीईओंच्या स्वाक्षरीने शोकॉज नोटीस जारी केली आहे. सीईओंच्या या कारवाईमुळे अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. १४ पंचायत समितीच्या



देयके सादर करण्यात सातत्याने दिरंगाई होत असल्याने १४ गटशिक्षणाधिकारी यांना शो कॉज नोटीस बजावली आहे. खुलासा विविध मुदत प्राप्त न झाल्यास व खुलासा असमाधानकारक असल्यास दोषीवर कारवाई केली जाईल.

**सत्यम गांधी, जि.प.सीईओ**

गटशिक्षणाधिकारी यांना अंतिम व सक्त ताकीद देत माहे मार्च, पेड इन एप्रिल, एप्रिल पेड इन, मे आणि मे पेड इन, तर जून या महिन्याची वेतन देयके विहीत मुदतीत लेखी स्वरूपात सादर करण्याबाबत शो कॉज नोटीस बजावली आहे. ही नोटीस प्राप्त झाल्यापासून १० दिवसांत वेतन देयके विलंबाने सादर करण्याबाबतची कारणमीमांसा लेखी स्वरूपात सादर करण्याचे निर्देश सीईओ सत्यम गांधी यांनी दिले आहेत.

# बेनोडा ठाण्यात शांतता समितीची बैठक



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**बेनोडा ( श. ), दि.१२ :** पोलिस स्टेशन मध्ये शनिवार दि. ६ जून रोजी सकाळी ११.०० वा. तक्रार निवारण शांतता समितीची बैठक आयोजित केली होती.

या बैठकीचे अध्यक्ष पोलिस बेनोडा चे ठाणेदार विवेक देशमुख होते. तसेच उपविभागीय अधिकारी माधवराव गरुड यांनी नागरिकांना पोलिस स्टेशन च्या हद्दीमधील नागरिकांच्या आलेल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी मार्गदर्शन केले. तसेच पोलिस स्टेशन मध्ये दर शनिवारी नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करण्यात येईल याकरिता ठाणेदार विवेक देशमुख यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन या कार्यक्रमाच्या अनुषंगाने करण्यात आले.

या तक्रार निवारण शांतता समितीच्या बैठकीला बेनोडा पोलिस स्टेशनच्या ४२ गावाच्या हद्दीतील प्रत्येक गावातून सरपंच, पोलिस पाटील, तंटामुक्ति समिति अध्यक्ष, शांतता समिति सदस्य, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धनंजय गणोरकर यांचा विदर्भ प्रबोधन मंडळातर्फे सत्कार



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**दर्यापूर, दि.१२ :** दर्यापूर येथील सुमारे १६८ वर्षांची परंपरा लाभलेल्या आणि पंचक्रोशीतील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री दशरथी श्रीराम मंदिर संस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षपदी श्री. धनंजय वसंतराव गणोरकर यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल विदर्भ प्रबोधन मंडळातर्फे त्यांचा शाल व श्रीफळ देऊन भव्य सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभास विदर्भ प्रबोधन मंडळाचे चेअरमन श्री. जयसिंगदादा देशमुख, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. संतोषजी धर्माधिकारी, विश्वस्त श्री. बाप्पुसाहेब उर्फ भालचंद्रजी कोरपे, श्री. माधवजी बुरघाटे, श्री. प्रभाकररावजी कोरपे, अ‍ॅड. आदित्यजी धर्माधिकारी, अ‍ॅड. आदित्यजी देशमुख, कार्यकारणी सदस्य श्री किशोरजी गणोरकर,डॉ. दिलीपजी देशमुख तसेच प्रबोधन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. नरेंद्रजी गोंडाणे तसेच शिक्षक प्रतिनिधी श्री. गजाननजी सरदार यांची प्रमुख उपस्थिती होती.श्री धनंजय गणोरकर हे विदर्भ प्रबोधन मंडळाच्या कार्यकारी मंडळाचे उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत असून सामाजिक, शैक्षणिक व कल्याणकारी उपक्रमांमध्ये त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे श्री दशरथी श्रीराम मंदिर संस्थानच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.यावेळी उपस्थितांनी श्री. धनंजय वसंतराव गणोरकर यांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# चारित्र्यवान व व्यसनमुक्त पिढीच भारताची खरी संपत्ती

## प्रमोद पोकळे यांचे प्रतिपादन | विविध प्रात्यक्षिकांद्वारे सुसंस्कार शिबिराचा समारोप

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती,दि.१२ :** आजच्या मोबाईल व सोशल मीडियाच्या दुनियेत देशाचा कणा समजली जाणारी भारतीय तरुणाई अलिकडे नाना छंदीफंदी व व्यसनाधीन होत चालली असून गुटखा, खर्रा, बिडी, तंबाखू व नशिली पदार्थांचे सेवन जणुकाही फॅशन समजली जात आहे. अशा व्यसनाधीनतेने उद्याचे भविष्य असलेले तरुण बिघडत चालले असून त्यांना सुसंस्कारांचे बाळकडू पाजून वेळीच आवर घातला गेला नाही तर उज्ज्वल भारताची घडी पार विस्कटून जाईल. त्यामुळे अशाप्रकारच्या सर्वांगीण शिबिरांमधून सुसंस्कारित झालेली सशक्त, व्यसनमुक्त व चारित्र्यवान



नवपिढीच खऱ्या अर्थाने देशाची संपत्ती असल्याचे प्रतिपादन दूरदर्शन व आकाशवाणी लोक–कलावंत प्रमोद पोकळे गुरुजी यांनी केले.

गुरुकुंज–मोझरी नजिकच्या राष्ट्रसंत अध्यात्म केंद्र, दासटेकडी येथे १ मेपासून सुरू झालेल्या श्रीगुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात संस्थेचे सचिव प्रमोद पोकळे गुरुजी बोलत होते. याप्रसंगी त्यांनी आरोग्य व स्वच्छता याबाबतही मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित शिबिरार्थ्यांनी स्वेच्छेने आपापले हात वर करून मी आयुष्यभर कधीच कोणतेही व्यसन करणार नाही व माझ्या संपर्कात येणाऱ्या मित्रांनाही याबद्दल माहिती देईल, अशी पुढे येऊन शपथ वदवून घेतली.

याप्रसंगी उपस्थित शिबिरार्थ्यांनी योगासने, प्राणायाम, लाठीकाठी, कराटे, लेझिम व मल्लखांबाची प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमास आचार्य हरिभाऊ वेरूळकर, महात्मा फुले बँकेचे अध्यक्ष दिलीप लोखंडे, प्रल्हाद पारिसे, माधव सूर्यवंशी, रामदास चोरोडे, हभप नामदेव गव्हाळे, दिनकर चोरे, डॉ. नरेंद्र तराळे, रामदास सनके, शिवदास श्रृंगारे, गोपाल सालोडकर, श्रीकृष्ण बैलमारे, कविता येनुरकर आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन श्रीकृष्ण पखाले यांनी तर आभारप्रदर्शन संस्थेचे सचिव प्रमोद पोकळे गुरुजी यांनी केले. श्रीगुरुदेव राष्ट्रधर्म प्रचार संस्थेद्वारा आयोजित या शिबिरात यावेळी विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून सहभागी झालेले १०३ शिबिरार्थी, पालकवर्ग, शिक्षकवृंद, रवींद्र ढवळे, रुपेश मोरे, कुणाल खडसे, गणेश दरवरे, मयुर इंगळे, देवागुरू जांभुळे, नयन पऱ्हाड, सागर मेहकरे, यश आखरे, पुष्कर गुडधे, कुलदीप बोधाने, चेतन पारधी, कुंदन गुडधे, छगन मोरे व रवींद्र वानखडे उपस्थित होते.

# शाळा सुरू होण्यापूर्वी अभिनव कार्यशाळा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती दि.१२ :** जून महिन्याच्या शेवटी विदर्भातील शाळा सुरू होणार आहेत. त्या दृष्टिकोनातून सुज्ञ व सुजाण पालकांना अध्यापकांना व विद्यार्थ्यांना योग्य ती दूरदृष्टी देण्याच्या दृष्टिकोनातून एका अभिनव व दिशादर्शक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा नेदरलँड फ्रान्स अबुधाबी येथे कार्यरत असलेले जागतिक कीर्तीचे संशोधक व नवीन दृष्टी देणारे डॉ.चंद्रशेखर मुरादे हे घेणार आहेत.

या कार्यशाळेचे आयोजन अमरावती परतवाडा रोडवरील वलगाव येथील सिकची रिसॉर्ट मधील वातानुकूलित कृषी भवन येथे करण्यात आलेले आहे. डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकॅडमी मिशन आयएएस व प्रेमकिशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेमध्ये नोंदणी केलेल्या प्रतिनिधींना प्रवेश देण्यात येईल. या कार्यशाळेमध्ये वर्ग पाच ते वर्ग १० या वर्गातील विद्यार्थी त्यांचे पालक व शिक्षक सहभागी होऊ शकतात. या कार्यशाळेला प्रथम येणाऱ्या ५० प्रतिनिधींना प्रवेश देण्यात येणार आहे.

# मालखेड ( रेल्वे ) येथे महाआरोग्य मेळावा शिबीर संपन्न

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**मालखेड रेल्वे, दि.१२ :** तालुक्यातील मालखेड (रेल्वे) येथे माझं गाव, आरोग्य संपन्न गाव या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत आयुष्मान आरोग्य उपकेंद्राच्या वतीने दि. २९ मे व ५ जून २०२६ रोजी विशेष महाआरोग्य मेळावा शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.या शिबिरामध्ये ग्रामस्थांसाठी रक्तदाब (बीपी), मधुमेह (शुगर), ईसीजी, रक्त तपासणी तसेच इतर विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. यासोबतच आरोग्यविषयक मार्गदर्शन व सल्ला देण्यात आला. विशेष बाब म्हणजे या सर्व सेवा नागरिकांना पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या.

## ग्रामीण भागात विविध चर्चांना उधाण

# कर्जमाफी, पात्रता-अटींमुळे अनेक शेतकरी संभ्रमात

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**बेनोडा, दि.१२ :** महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीत दिलेल्या शेतकरी कर्जमुक्तीच्या आश्वासनाला अखेर राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी दिल्याची माहिती समोर आली आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना अद्याप अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आलेली नसली तरी आचारसंहिता संपल्यानंतर या योजनेची अंमलबजावणी सुरू होण्याची शक्यता आहे. य ा निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार असल्याचे बोलले जात आहे. प्रस्तावित योजनेनुसार राज्यातील सुमारे ५६ लाख खातेदार शेतकऱ्यांच्या



कर्जाचा प्रश्न मार्गी लागणार आहे. एकूण ३६ हजार ५८५ कोटी रुपयांच्या कर्जभारातून शेतकऱ्यांची सुटका होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. त्यापैकी सुमारे १६ लाख ७४ हजार शेतकरी पूर्णपणे कर्जमुक्त होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दोन लाख रुपयांपर्यंत थकीत कर्ज असलेल्या लाखो शेतकऱ्यांना या योजनेचा थेट लाभ मिळणार आहे. राज्यात आधीच विविध लोककल्याणकारी योजनांवर मोठ्या प्रमाणात खर्च होत असताना नव्या कर्जमाफी योजनेमुळे शासनाच्या तिजोरीवर सुमारे १४ हजार ७५४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. तरीदेखील शेती क्षेत्राला बळ देण्यासाठी आणि आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी शासनाने हा महत्त्वाचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

सरकारच्या या निर्णयाचे अनेक शेतकरी स्वागत करत असले तरी पात्रता निकष, अपात्रतेच्या अटी आणि अधिकृत शासन निर्णय अद्याप जाहीर न झाल्यामुळे ग्रामीण भागात विविध चर्चांना उधाण आले आहे. अनेक शेतकरी आपल्या कर्जाची स्थिती, पात्रता आणि लाभाबाबत माहिती घेण्यासाठी बँका व संबंधित कार्यालयांकडे चौकशी करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. कर्जमाफीची अधिकृत घोषणा आणि शासन निर्णय जाहीर झाल्यानंतरच योजनेचे संपूर्ण स्वरूप स्पष्ट होणार असून राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या नजरा आता शासनाच्या पुढील निर्णयाकडे लागल्या आहेत.

# भव्य हिंदू महासंमेलनाचे यशस्वी आयोजन

**अमरावती, दि.१२ :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) शताब्दी वर्षानिमित्त समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया उर्फ लप्पीभैया यांच्या वतीने कटोरा नाका येथील स्वामी विवेकानंद चौकात सायंकाळी ५ ते ९ वाजेदरम्यान भव्य हिंदू महासम्मेलनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान सुमारे २८० श्रद्धाळूंना भगवान श्रीकृष्ण



यांचे चित्र प्रसाद स्वरूपात भेट देण्यात आले. तसेच रथाच्या माध्यमातून भव्य हिंदू महासम्मेलन व धर्मजागरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक व भाविकांनी सहभाग नोंदविला.

# दोघांच्या भांडणात युवक जखमी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

मोर्शी : काकासोबत शेजारचा युवक भांडण करीत होता. म्हणून पुतण्या वाद मिटवण्यासाठी गेला, तर त्यालाच युवकाने मारहाण करीत जखमी केले. ही घटना येरला येथे घडली.

जखमी प्रज्वल रविंद्र पोहेकर (२०) याच्या तक्रारीवरून सचिन खंडारे (३५) याच्याविरुद्ध दुखापतीचा गुन्हा नोंदवला.

**तहसिलदार, धामणगांव रेल्वे यांचे कार्यालय**
**ता. धामणगांव रेल्वे जि. अमरावती-444709**

क्रमांक / म.स./ प्र-1/ कावि-97 / 2026 दिनांक :10/06/2026

**जाहिरनामा**

**विषय :-** मौजा दाभाडा येथील पाझर तलाव प्रकल्प येथिल BAIF Development Reasearch Foudation Amravati यांनी उत्खनन केलेले अंदाजे 500 ब्रास मुरुम साठ्याचा लिलाव करण्याबाबत.
**संदर्भ :-** नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी धामणगाव यांचा पंचनामा दि. 21/05/2026
उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते कि, मौजा दाभाडा येथील पाझर तलावाचे शेजारी शेततळ्याच्या दक्षिण बाजुला अंदाजे 500 ब्रास मुरुम आढळुन आला असुन सदर मुरुम मृद व जलसंधारण उपविभाग नांदगाव खंडेश्वर यांची नाला खोलीकरण करण्याची परवानगी असुन सदर मुरुम विना परवाना उत्खनन केल्यामुळे जप्त करुन पंचनामा सह अहवाल प्राप्त झाला आहे.
त्यान्वये सदर उत्खनन केलेले अंदाजे 500 ब्रास मुरूमाचा लिलाव म.ज.म. अधिनियम कलम 48 (7) अन्वये करण्यात येणार असुन, सदर मुरुम साठा ज्यांना घ्यावयाचा आहे त्यांनी विहीत विवरणपत्रा मध्ये, विहीत नमुन्यात नियमानुसार या कार्यालयास अर्ज सादर करण्यात यावे.

| अ.क्र. | ठिकाण | परिणाम | हातची किंमत |
|---|---|---|---|
| 1 | मौजा दाभाडा, ता. धामणगाव रेल्वे | 500 ब्रास (अंदाजे) | 300000/- |

उपरोक्त परिणामाच्या जप्त मुरुमसाठ्याच्या घोषित हातच्या किंमती नुसार जाहीर लिलाव तहसिल कार्यालय, धामणगाव रेल्वे येथील सभागृहात ठिक दुपारी 4.00 वाजता दिनाक 15/06/2026 रोजी करण्यात येईल. जाहीर लिलावात सहभागी होण्याकरीता इच्छुक व्यक्ती, संस्था व शासकिय विभाग यांना आवाहन करण्यात येत आहे

**तहसिलदार, धामणगांव रेल्वे**

**प्रतिलीपी :** 1. मा. जिल्हाधिकारी, अमरावती (खनिकर्म विभाग) यांना माहीती करीता सादर.
2. मा. उपविभागीय अधिकारी, चांदुर रेल्वे यांना माहिती करिता सादर.
3. ग्राम महसुल अधिकारी मौजा दाभाडा ता. धामणगाव रेल्वे जि. अमरावती यांना सदर जाहिरनामा प्रसिध्द करण्यात येवून प्रसिध्दी अहवाल सादर करण्यात यावा.
4. सदर जाहिरनामा दैनिक ............या वृत्त पत्रामध्ये प्रसिध्दी करुन व्यापक प्रसिध्दी दयावी.

**तहसिलदार, धामणगांव रेल्वे**

## थोडक्यात



### ॲड. दिलीप एडतकर यांचा राजीनामा नामंजूर

**यवतमाळ :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस ॲड. दिलीप एडतकर यांनी पदाचा दिलेला राजीनामा प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नामंजूर केला आहे. यवतमाळ येथे काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी ॲड. एडतकर यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांना राजीनामा मागे घेण्याची विनंती केली. त्यानंतर वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. सुनील देशमुख यांनी प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांचे राजीनामा नामंजूर करणारे पत्र एडतकर यांना सोपविले. ॲड. दिलीप एडतकर यांनी प्रदेशाध्यक्ष, प्रभारी रमेश चेन्निथला, यशोमती ठाकूर व सुनील देशमुख यांना ई-मेलद्वारे राजीनामा पाठविला होता. जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली असून, नाममात्र पदाला चिकटून राहणे शक्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. हा राजीनामा नामंजूर करण्यासाठी विविध पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या निवासस्थानी बैठक घेतली. यात माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, किशोर बोरकर, डॉ. बी. आर. देशमुख, वंदना कंगाले, वैभव देशमुख व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी डॉ. सुनील देशमुख यांनी एडतकर यांच्या स्वाभिमानी स्वभावाचा आणि पक्षातील योगदानाचा गौरव करीत त्यांचा सन्मान राखणे गरजेचे असल्याचे सांगितले. किशोर बोरकर यांनी एडतकर यांना शाहू-फुले-आंबेडकर विचारांचे प्रखर पुरस्कर्ते संबोधत, पक्षात त्यांच्यासारख्या नेतृत्वाची गरज असल्याचे नमूद केले. पक्षाच्या या निर्णयाचा आदर करीत एडतकर यांनी राजीनामा मागे घेतला असून, पूर्वीप्रमाणेच कार्य करीत राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.



### गृहमंत्री शहा यांच्या वक्तव्याचा निषेध

**यवतमाळ :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी २४ मे २०२६ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या कार्यक्रमात अनुसूचित जमातींसाठी वारंवार 'वनवासी' शब्दाचा वापर केला. या घटनात्मक उल्लंघनामुळे आदिवासी समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या असून, तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या निषेधार्थ भारतीय स्वाभिमानी संघ शाखा यवतमाळच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राष्ट्रपतींना अधिकृत निवेदन सादर करण्यात आले. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४२ नुसार 'अनुसूचित जमाती' ही संविधानिक ओळख निश्चित करण्यात आली आहे. सरकारी अभिलेखातही याच शब्दाचा वापर बंधनकारक असताना, गृहमंत्र्यांनी जाणीवपूर्वक वनवासी शब्दाचा वापर केल्याने समाजाच्या स्वाभिमानाला धक्का लागला आहे. संघाने या वक्तव्याचा जाहीर निषेध केला आहे. निवेदनात गृहमंत्री अमित शहा यांनी आदिवासी समाजाची सार्वजनिक माफी मागावी, अशी प्रमुख मागणी केली आहे. तसेच, भविष्यात केंद्र सरकारचे विभाग आणि लोकप्रतिनिधींनी केवळ 'अनुसूचित जमाती' किंवा 'आदिवासी' याच शब्दांचा वापर करावा, असे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली आहे. गृहमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी भूमिकाही संघाने घेतली आहे. निवेदन देताना कुंदा तोडकर (मडावी), प्रशांत ठमके, कमल पारधी, सौरभ मसराम, अनुज मसराम, विणा कनाके, सारिका भगत, पल्लवी कांबले, संध्या भितकर, सुनीता पोपटकर, नंदा वाकोडे, उज्वला पाटील, उषा तायडे, राजु फुलुके आणि प्रभाकर सावले उपस्थित होते.

### दुचाकीला लावली भीषण आग

**उमरखेड :** येथील नारळी गावात जुन्या वादातून दोन जणांनी मोटारसायकल पेटवून दिली आणि शेतातील पाईपलाईनचे नुकसान केले. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून चौकशी सुरू केली आहे. आरोपींनी संगनमताने भाड्याच्या वादातून फिर्यादीच्या घरासमोर उभी असलेली मोटारसायकल पेटवून दिली, यात ५ हजार रुपयांचे नुकसान झाले. तसेच, शेतातील पिकाला पाणी देण्यासाठी लावलेले ३० पाईप नोझलसह कुऱ्हाडीने तोडून ४० हजार रुपयांचे नुकसान केले. एकूण ४५ हजार रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला असून अधिक तपास करत आहेत.

# रेल्वे मार्गाच्या मागणीला प्रचंड जनसमर्थन

## अनेक ग्रामपंचायतींचे रेल्वेसाठी अधिकृत ठराव, शेतकऱ्यांसाठी रेल्वे मार्ग ठरणार लाभदायक

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

✦ मनोज माघाडे



**आर्णी, दि.१२ :** यवतमाळ-आर्णी-माहूर-किनवट या प्रस्तावित नव्या रेल्वे मार्गाच्या मागणीला दिवसेंदिवस व्यापक जनसमर्थन मिळत असून ही मागणी आता एका मोठ्या लोकचळवळीत रूपातरित झाली आहे. सुरुवातीला काही मोजक्या नागरिकांनी सुरू केलेले हे आंदोलन आता ग्रामपंचायती, सामाजिक संस्था, शेतकरी संघटना, विविध राजकीय पक्ष आणि सर्वसामान्य नागरिकांच्या सक्रीय सहभागामुळे अधिक मजबूत झाले असून संपूर्ण जिल्ह्यात या रेल्वे मार्गासाठी तीव्र इच्छाशक्ती दिसून येत असल्यामुळे मोठे जनआंदोलन उभे राहत आहे.

या रेल्वे मार्गाच्या मागणीसाठी आर्णी तालुक्यातील अनेक ग्रामपंचायती आता अत्यंत वेगाने पुढे सरसावल्या आहेत. लोकहिताचा विचार करून या ग्रामपंचायतींनी आपापल्या मासिक आणि विशेष सभांमध्ये अधिकृत ठराव मंजूर करत रेल्वे मार्गाला जाहीर पाठिंबा दिला आहे. यामध्ये प्रामुख्याने पोहंडूळ, जवळा, भंडारी, अंतरगाव, तीव्रंग, दहिसावळी, म्हसोला (का.), ब्राह्मणवाडा, कुंभा डुमणी, परसोडा आणि लोणबेहेळ या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. या ठरावांसाठी विशेष पुढाकार घेणाऱ्या सर्व संबंधित गावांतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सचिव व ग्रामस्थांचे रेल्वे कृती समितीने आभार मानले असून, त्यांच्या या मोलाच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. गाव करी ते राव न करी या उक्तीप्रमाणे सर्वसामान्य लोकांच्या एकजुटीतून सुरू झालेली ही मागणी आता एका व्यापक लोकआंदोलनाचे रूप घेत आहे. आर्णी शहर व संपूर्ण तालुक्यातील विविध स्तरांमधून मिळणाऱ्या या वाढत्या पाठिंब्यामुळे रेल्वे कृती समितीचे मनोबल अधिक उंचावले आहे. या जनभावनेची गांभीर्याने दखल घेत लोकप्रिय खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी थेट रेल्वेमंत्र्यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर मागणीचे निवेदन सादर केले आहे. तसेच आमदार राजू तोडसाम यांनीही या महत्त्वाच्या विषयाकडे प्रशासनाचे लक्ष वेधल्यामुळे या प्रस्तावित रेल्वे मार्गाच्या मागणीला आता अधिक गती मिळाल्याचे मानले जात आहे.दरम्यान, सामाजिक कार्यात नेहमीच सक्रिय असणाऱ्या स्थानिक 'गुड मॉर्निंग ग्रुप'ने देखील या रेल्वेच्या मागणीला एक आगळावेगळा पाठिंबा दिला आहे. नियमितपणे सकाळी पायी फिरून नागरिकांना आरोग्याचा संदेश देणाऱ्या या समूहाने विशेष व्हिडिओ तयार करून सोशल मीडियाद्वारे व्यापक जनजागृती मोहीम राबवली आहे. रेल्वे मार्गाच्या मागणीसाठी अनुकूल जनमत तयार करण्याचे मोठे कार्य या समूहाने केले असून, त्यांच्या या अनोख्या उपक्रमाचे रेल्वे कृती समितीने विशेष कौतुक केले आहे.या प्रस्तावित रेल्वे मार्गाचे आर्थिक, सामाजिक व धार्मिक दृष्टिकोनातून होणारे विविध फायदे स्पष्ट करणारे एक अभ्यासपूर्ण माहितीपत्रक राजू नालमवार यांनी तयार केले आहे. तर दुसरीकडे, अभियंता सागर घोडेराव यांनी या प्रस्तावित रेल्वे मार्गाचा अत्यंत आकर्षक आणि स्पष्ट नकाशा तयार केला आहे. या माहितीपूर्ण साहित्यामुळे जनजागृती मोहिमेला अधिक बळ आणि स्पष्ट दिशा मिळाली आहे.विशेष म्हणजे, या प्रस्तावित रेल्वे मार्गालगतच प्रसिद्ध व भाविकांचे श्रद्धास्थान असलेले एकविरा देवी देवस्थान आहे. रेल्वे आल्यास या देवस्थान परिसराच्या विकासाला देखील मोठी चालना मिळणार आहे. याच पार्श्वभूमीवर, एकविरा संस्थेचे पदाधिकारी व माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव पाटील कदम हिवरेकर यांनी या विषयात मोठा पुढाकार घेतला असून, येत्या १४ जून रोजी एका महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन केले आहे. या बैठकीत पुढील आंदोलनाची नेमकी दिशा ठरविणे आणि जनसमर्थन आणखी वाढविण्यासाठीच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा होणार असल्याची माहिती मिळाली आहे. या चळवळीला आर्णी कृषी उत्पन्न बाजार समितीनेही अधिकृतपणे आपला जाहीर पाठिंबा दिला आहे. हा नवा रेल्वे मार्ग भविष्यात शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरणार असल्याचे स्पष्ट करत, बाजार समितीचे सभापती अनिल आडे यांनी समर्थनाचा अधिकृत ठराव रेल्वे कृती समितीकडे सुपूर्द केला. या सहकार्याबद्दल रेल्वे कृती समितीने सभापती, उपसभापती, सर्व संचालक मंडळ, सचिव आणि बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांचे मनापासून आभार मानले आहेत. सर्व पक्ष, धर्म आणि समाजातील सर्व घटकांचा अभूतपूर्व पाठिंबा मिळत असल्यामुळे ही मागणी अधिकाधिक मजबूत होत असून, विविध प्रसारमाध्यमेही या लोकचळवळीला मोठा सकारात्मक प्रतिसाद देत आहेत.

## राष्ट्रीय सैनिक संस्थेचे अधिवेशन उत्साहात

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**पुसद, दि.१२ :** राष्ट्रीय सैनिक संस्था महाराष्ट्र राज्याच्या मार्गदर्शनाखाली विदर्भ प्रांताचे भव्य अधिवेशन पुसद येथील पार्थ सेलिब्रेशन हॉलमध्ये देशभक्तीपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या अधिवेशनाला विदर्भातील विविध जिल्ह्यांतून पदाधिकारी, माजी सैनिक, सामाजिक कार्यकर्ते आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुरुवातीला मान्यवरांचे स्वागत शाल व वृक्ष देऊन करण्यात आले. विदर्भ प्रांत सचिव श्री. प्रशांत गावंडे यांनी प्रास्ताविकातून संघटनात्मक कार्याची माहिती दिली. प्रमुख मार्गदर्शक तथा राज्य अध्यक्ष मा. श्री. हरिश्चंद्र बा. राठोड यांनी राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी व आपत्ती व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले. राष्ट्रनिर्मितीत युवकांनी राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी केले.अध्यक्षस्थानी उमरखेडचे माजी आमदार मा. श्री. राजेंद्र नजरधने होते. त्यांनी संस्थेच्या ग्रामीण भागातील कार्याचे कौतुक केले. विशेष अतिथी आणि राज्य सचिव मा. श्री. जनार्दन गो. पाटील यांनी संघटन विस्तारासाठी एकजुटीचे आवाहन केले. राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मा. श्री. यशवंत देशमुख यांनी अनुभव मांडले, तर विदर्भ प्रांत अध्यक्ष मा. श्री. अभयकुमार गुप्ता यांनी कार्याचा आढावा सादर केला.अधिवेशनात वीरमाता व वीरपत्नी माधुरी जगताप, एकता धुळधुळे, वैशाली सोडगीर आणि अलका राठोड यांचा सन्मान करण्यात आला. तसेच शांतीकुमार इंगोले, प्रकाश वानरे व ऋषीकेश टनमने या मान्यवरांचा आणि माणूसकीची भिंत सोशल फौंडेशन, मिशन ग्रीन पुसद, संवेदना सोशल फौंडेशन, शिवप्रभा ट्रस्ट, वसुंधरा बहुउद्देशीय संस्था (कारंजा) यांचा विशेष गौरव झाला. माजी सैनिकांचाही सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे आभार विदर्भ प्रांत उपाध्यक्ष प्रा. मनोहर नजरधने यांनी मानले. आयोजनासाठी संयोजक ॲड. रवींद्र रुढे, श्री. जगदीश जांगीड, पंकज असाटी, प्रभू जयस्वाल, ज्ञानेश्वर शिंदे, श्रीकांत पांचाळ, सुनील ठाकरे, राजू चिरडे व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. अधिवेशनानंतर विदर्भ प्रांत सचिव कार्यालयाचे उद्घाटन झाले. राष्ट्रगीताने व 'जय हिंद'च्या नाऱ्यांनी सांगता झाली.

## झाडाच्या सावलीनेच इस्त्रीवाल्याला आधार!

### मुकुटबनमध्ये जूनमध्येही उन्हाचा कहर कायम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.१२ :** जून महिना सुरू होऊन दुसरा आठवडा उजाडला, तरी मुकुटबन आणि परिसरात उन्हाचा तडाखा कमी झालेला नाही. दरवर्षी या दिवसांत पावसाचे आगमन होऊन हवेत गारवा येतो, मात्र यंदा अद्यापही पावसाने दडी मारल्याने तापमानाचा पारा चढलेलाच आहे. या कडक उन्हामुळे सर्वसामान्य नागरिक पुरते हैराण झाले असून, दुपारच्या वेळी रस्त्यांवर चक्क शुकशुकाट पाहायला मिळत आहे.

अशा या असह्य करणाऱ्या उन्हामध्ये पोटाची खळगी भरण्यासाठी आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी कष्टकरीवर्गाला मात्र मोठा संघर्ष करावा लागत आहे. उन्हाची तमा न बाळगता अनेक छोटे व्यावसायिक रस्त्याच्या कडेला आपली कर्तव्ये बजावत आहेत. मुकुटबनमधील असाच एक कपडे इस्त्री करणारा व्यावसायिक (प्रेसवाला) उन्हाच्या तीव्र झळांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी रस्त्या कडेला असलेल्या एका झाडाच्या सावलीचा आधार घेऊन आपले काम करताना दिसत आहे. भर उन्हात तापलेल्या वातावरणात या गरिबासाठी ते झाड आणि त्याची सावलीच काय तो एकमेव दिलासा ठरत आहे. हवेतील वाढता उकाडा आणि इस्त्रीच्या कोळशाची शेगडी, अशा दोन्ही बाजूंच्या उष्णतेचा सामना करत हा कष्टकरी नागरिकांचे कपडे नियमितपणे इस्त्री करण्याचे काम करत आहे. वाढत्या तापमानामुळे काम करणे अत्यंत कठीण आणि थकवून टाकणारे झाले असले, तरी कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी त्याची ही धडपड अविरत सुरू आहे. जून महिना निम्मा होत आला तरी मुकुटबनकरांना अजूनही पावसाची प्रतीक्षा कायम आहे. उष्णतेची तीव्रता कमी होत नसल्याने, सध्यातरी रस्त्यावरील छोटे व्यावसायिक, हॉकर्स आणि कष्टकऱ्यांसाठी निसर्गाची झाडे आणि त्यांची सावलीच मोठा जीवनदूत ठरत असल्याचे चित्र मुकुटबन परिसरात पाहायला मिळत आहे.

## 'मी सावित्रीबाई जोतीराव फुले' मालिका बंद करू नका

### नेर येथील नागरिकांची मागणी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नेर (परसोपंत), दि. १२ :** स्टार प्रवाह वाहिनीवरील लोकप्रिय 'मी सावित्रीबाई जोतीराव फुले' मालिका १५ जूनपासून बंद होणार असल्याची चर्चा आहे. फुले-शाहू-आंबेडकरी विचारांवर आधारित ही प्रबोधनपर मालिका सर्वधर्मीय प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे. ही मालिका बंद झाल्यास प्रेक्षकवर्ग आणि चॅनेलचा टीआरपी कमी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. महात्मा फुले यांच्या जन्मशताब्दी वर्षात ही मालिका सुरू ठेवण्यासाठी शासनाने हस्तक्षेप करावा, अशी मागणी नेर येथे झाली आहे.

शिक्षणाचा मूलमंत्र देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा जोतीराव फुले यांच्या समतेच्या लढ्यावर ही मालिका आधारित आहे. मालिका बंद केल्यास बहुजन समाजात असंतोष निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सामाजिक न्यायासाठी आणि स्त्री-पुरुष समानतेसाठी ही मालिका सातत्याने प्रसारित होणे गरजेचे आहे. या मागणीसाठी डॉ प्रवीण बनसोड, गणेश राऊत, डॉ दिलीप तिखे, विनोद गोबरे, प्रकाश भबुतकर, संदीप ठक आणि संदीप चौधरी यांनी पुढाकार घेतला आहे. मालिका सुरू राहिल्यास प्रेक्षकांचा प्रतिसाद कायम राहील, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले आहे.

## पुसदमध्ये अवैध धंद्यांची जोरदार चर्चा

### वसंत नगर पोलिस ठाणे संशयाच्या भोवऱ्यात, अवैध धंद्यांवर कारवाईची मागणी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**पुसद, दि. १२ :** तालुक्यातील वसंतनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत मटका, जुगार आणि दारू विक्रीसारखे अवैध धंदे खुलेआम सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. वरिष्ठ स्तरावरून अवैध धंद्यांवर लगाम घालण्यासाठी लेखी प्रमाणपत्राचा निर्णय घेतला जात असताना, पुसदमध्ये या व्यवसायांवर प्रभावी कारवाई होत नसल्याने पोलिस ठाण्यातील अधिकारी झांबरे यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पोलिस आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून हद्दीत अवैध धंदे नसल्याचे लेखी प्रमाणपत्र घेण्याचा निर्णय घेतल्याने राज्यभरात मोठी चर्चा सुरू झाली आहे. मात्र, पुसद येथील वसंत नगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत परिस्थिती अत्यंत विसंगत असल्याचे चित्र आहे. स्थानिक रहिवाशांच्या मते, या भागात अवैध मटका, जुगार आणि देशी-गावठी दारू विक्रीचे प्रकार सर्रासपणे सुरू आहेत. अनेक वेळा तक्रारी करूनही या व्यवसायांवर ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ज्या धर्तीवर पोलिस निरीक्षकांकडून जबाबदारी निश्चित केली आहे, त्याच धर्तीवर आता यवतमाळ जिल्हा पोलिस प्रशासनानेही कठोर पावले उचलण्याची गरज आहे. जर हद्दीत अवैध धंदे सुरू नसतील, तर संबंधित अधिकाऱ्यांनी लेखी प्रमाणपत्र द्यावे आणि त्याची स्वतंत्र पथकामार्फत पडताळणी करावी, अशी मागणी जोर धरत आहे. विशेष म्हणजे, ठाणेदार झांबरे यांच्या कार्यकाळातील या कथित अवैध धंद्यांच्या मुद्द्यावर पोलिस प्रशासनाने अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका स्पष्ट केलेली नाही. यामुळेच नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले असून, प्रशासनाच्या पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अवैध धंद्यांवर कारवाई करण्याची भाषा आणि प्रत्यक्ष जमिनीवरील परिस्थिती यामध्ये मोठी तफावत असल्याने जनतेचा विश्वास डळमळीत होत आहे. या सर्व परिस्थितीची दखल घेत, जिल्हा पोलिस अधीक्षकांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वास्तव जनतेसमोर मांडावे, अशी मागणी पुसदकर करत आहेत. अवैध व्यवसायांचा बीमोड करण्यासाठी स्थानिक स्तरावर अधिक जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे, अन्यथा या प्रकारांना आळा बसणे कठीण असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या गंभीर प्रकरणावर पोलिस प्रशासन आता कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# घाटंजीतील रामनगर तांडा अकरा दिवसांपासून अंधारात

## वीज पुरवठा विस्कळीत, विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा प्रश्न, नागरिकांचा आंदोलनाचा इशारा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

✦ अमोल कावळे



**घाटंजी, दि. १२ :** तालुक्यातील रामनगर तांडा आणि पारधीबेडा येथे रोहित्र जळाल्याने गेल्या अकरा दिवसांपासून संपूर्ण गाव अंधारात बुडाले आहे. वीज विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे पाणीटंचाई आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे प्रश्न गंभीर झाले आहेत. सातत्याने तक्रार करूनही अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याने, स्थानिक ग्रामस्थांनी त्वरित वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

घाटंजी तालुक्यातील रामनगर तांडा आणि पारधीबेडा येथील ग्रामस्थ गेल्या अकरा दिवसांपासून भीषण अंधाराचा सामना करीत आहेत. परिसरातील रोहित्र नादुरुस्त झाल्यामुळे गावाचा वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे. या समस्येमुळे नागरिकांचे दैनंदिन जनजीवन विस्कळीत झाले असून, वीज विभागाच्या कार्यपद्धतीवर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. स्थानिक ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, रोहित्र बंद पडल्याची कल्पना संबंधित विभागाला अनेकदा देण्यात आली आहे. मात्र, घाटंजी येथील उपकार्यकारी अभियंता उराडे यांच्याशी संपर्क साधला असता, ते योग्य प्रतिसाद न देता केवळ विभागीय कार्यालयाकडे टोलवाटोलवी करीत आहेत. अधिकारी फोन उचलत नाहीत किंवा त्यांचे मोबाईल बंद असतात, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याशिवाय, शिरोली येथील वीज विभागाचे कार्यालय अनेकदा बंद असल्याने तक्रार कोणाकडे करायची, असा प्रश्न निर्माण झाला आहे. कार्यालयाचे उंबरठे झिजवूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने नागरिकांचा संयम सुटला आहे. वीजपुरवठा नसल्यामुळे पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत उकाड्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. तसेच, रात्रीच्या वेळी गाव अंधारात राहत असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही याचा मोठा परिणाम होत आहे. गेल्या अकरा दिवसांपासून नागरिक या हालअपेष्टा सहन करीत आहेत, तरीही वीज विभाग मात्र मूग गिळून गप्प आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करावा आणि बंद पडलेले रोहित्र त्वरित दुरुस्त करून किंवा बदलून वीजपुरवठा पूर्ववत करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी लावून धरली आहे. प्रशासनाने जर या समस्येकडे दुर्लक्ष करणे सुरूच ठेवले, तर वीज विभागाच्या विरोधात रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. प्रशासनाने वेळीच दखल घेऊन ग्रामस्थांची समस्या मार्गी लावणे आवश्यक आहे.

## अमोलकचंद महाविद्यालयात नेत्र तपासणी

### राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या पुढाकाराने उपक्रम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. १२ :** येथील अमोलकचंद महाविद्यालयात १० जून २०२६ रोजी जागतिक नेत्रदान दिनानिमित्त नेत्र तपासणी शिबिर आणि जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. पी पी जोशी अध्यक्षस्थानी तर नेत्रतज्ज्ञ डॉ. आकाश माळवी मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या पुढाकाराने आयोजित या उपक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहून सर्वांनी नेत्र तपासणी केली.

नेत्रतज्ज्ञ डॉ. आकाश माळवी यांनी उपस्थितांची नेत्र तपासणी केली. त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, मृत्यूनंतर नेत्रदान करून अंध व्यक्तींच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणे हे सर्वात मोठे पुण्यकर्म आहे. प्रत्येकाने नेत्रदानाचा संकल्प करणे काळाची गरज आहे. प्राचार्य डॉ. पी पी जोशी यांनी अध्यक्षीय भाषणात डिजिटल युगातील बदलत्या जीवनशैलीवर भाष्य करत डोळ्यांची काळजी घेण्यासह जनजागृतीवर भर दिला. प्रमुख उपस्थिती असलेले डॉ. सुशील बत्तलवार यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना नेत्रदानासाठी समाजात व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. शशिकांत राठोड, डॉ. सुचिता वानखेडे आणि डॉ. रुपेश मुद्दलवार यांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिरात महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी आणि पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## थोडक्यात

### दुचाकीचा अपघात

**कळंब :** येथील वडगाव देशपांडे टोलनाक्याजवळ एका भरधाव ट्रकने मोटारसायकलला धडक दिली. या भीषण अपघातात मोटारसायकलस्वार गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची नोंद पोलिसांत करण्यात आली आहे. या अपघाताच्या घटनेत फिर्यादीचा मुलगा त्याच्या मोटारसायकलने जात होता. यादरम्यान आरोपीने आपले ट्रक वाहन कोणतीही दिशादर्शक चिन्हे न लावता रस्त्याच्या कडेला धोकादायक पद्धतीने उभे केले होते. यामुळे मागून येणाऱ्या मोटारसायकलची ट्रकवर जोरात धडक झाली. या अपघातात तरुणाच्या चेहऱ्याला आणि डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित ट्रक चालकावर गुन्हा दाखल केला असून, पुढील कायदेशीर तपास सुरू आहे.

### अपघातात तरुण जखमी

**यवतमाळ :** नागपूर रोडवरील ग्राम मानकापूर फाट्याजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत एक तरुण गंभीर जखमी झाला. घटनेनंतर चालक वाहनासह पसार झाला असून, पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. घटनेच्या दिवशी फिर्यादीचा भाऊ त्याच्या मोटारसायकलवरून जात असताना मागून आलेल्या अज्ञात चारचाकी वाहनाने त्याला जोरात धडक दिली. चालक आपले वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवत होता. या अपघातात फिर्यादीचा भाऊ जखमी झाला असून, त्याला तातडीने मदत करण्यात आली. या अपघाताबाबत पोलिसांत तक्रार नोंदवण्यात आली असून, अज्ञात चालकाचा शोध घेण्यात येत आहे.

### दुचाकीची चोरी

**आर्णी :** शहरात एका अज्ञात चोरट्याने भरदिवसा दुचाकी चोरी केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. आर्णी येथील पाण्याच्या टाकीजवळून फिर्यादीची मोटारसायकल अज्ञात चोरट्याने लंपास केली. दुचाकी चोरीला गेल्याचे लक्षात येताच फिर्यादीने परिसरात शोध घेतला, मात्र ती मिळून आली नाही. या दुचाकीची किंमत सुमारे २० हजार रुपये असल्याचे फिर्यादीने तक्रारीत नमूद केले आहे. फिर्यादीच्या जबाबी रिपोर्टवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पोलीस पथक परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोराचा शोध घेत आहे.

### दगडाने मारहाण

**यवतमाळ :** पुसद शहरात किरकोळ वादाचे रूपांतर हाणामारीत झाले असून, यात फिर्यादीला दगडाने मारहाण करण्यात आली. तसेच आरोपीने सार्वजनिक मालमत्तेचेही नुकसान केले असून गुन्हा दाखल करण्यात आला. पुसद येथील गोविंद नगर भागात ही घटना घडली. आरोपीने फिर्यादीला विनाकारण अडवून दगडाने डोक्यावर प्रहार केला, ज्यामुळे तो जखमी झाला. एवढेच नाही तर, आरोपीने शेजाऱ्याच्या मोटारसायकलवर दगड मारून १० हजार रुपयांचे नुकसान केले. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# नगराध्यक्षांचा अवमान खपवून घेणार नाही

## आदिवासी बांधवांचा मोर्चातून संताप; काँग्रेसच्या त्या नेत्यांवर फौजदारी कारवाईची मागणी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**यवतमाळ, दि.१२ :** यवतमाळ नगरपरिषदेच्या नगरध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके यांच्या शासकीय दालनात घुसून त्यांना अपमानित केल्याची धक्कादायक घटना गुरुवार, दि. ११ जून २०२६ रोजी घडली. या घटनेच्या निषेधार्थ शुक्रवारी, १२ जूनला आदिवासी समाज बांधवांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन संबंधितांवर तत्काळ फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे. नगराध्यक्षांचा अवमान कदापि खपवून घेणार नाही, असा इशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे.

नगरपरिषदेच्या गटनेत्या वैशाली प्रवीण सवाई, काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष प्रा. बबलू उर्फ अनिल देशमुख, कृष्णा पुसनाके आणि त्यांच्यासोबत असलेल्या १० ते १५ जणांच्या जमावाने नगरध्यक्षांच्या दालनात अनधिकृतपणे प्रवेश केला. यावेळी त्यांनी केवळ शासकीय कामकाजात अडथळाच आणला नाही, तर नगरध्यक्षांशी हुज्जत देखील घातली. यवतमाळ शहराच्या विकासासाठी प्रशासनामार्फत 'अतिक्रमण हटाव मोहीम' राबविली जात आहे. मात्र, या कायदेशीर मोहिमेला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न करत, गटनेत्या वैशाली सवाई यांनी 'अतिक्रमण काढू नये' असे बेकायदेशीर पत्र देऊन शासकीय कामात खोडा घातल्याचा आरोप निवेदनातून केला आहे. नगरपरिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच एका आदिवासी महिला भगिनीला नगराध्यक्षपद भूषविण्याचा मान मिळाला आहे. मात्र, काही घटकांना हे पचत नसल्याने सोशल मीडिया आणि इतर माध्यमातून सातत्याने त्यांचा अपमान केला जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नगरध्यक्षांच्या दालनातील हा प्रकार म्हणजे लोकशाही मूल्यांची पायमल्ली असून, अशा लोकप्रतिनिधींचे नगरसेवक पद तत्काळ रद्द करावे, अशी मागणी समाज बांधवांनी लावून धरली आहे. 'जर प्रशासनाने संबंधित दोषींवर त्वरित फौजदारी गुन्हे दाखल केले नाहीत, तर संपूर्ण आदिवासी समाज रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल. आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण झाल्यास किंवा अनुचित प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील,' असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, यवतमाळ जिल्हा पोलिस अधीक्षक आणि यवतमाळ शहर पोलीस स्टेशनच्या ठाणेदारांना देण्यात आल्या आहेत. या निवेदनावर बंडू मेश्राम, किशोर सलामे, अशोक गेडाम, वन मंगाम, सूरज नैताम, राजेंद्र नागभिडकर, चंद्रभान मसराम, बंडूभाऊ मेश्राम, पुरुषोत्तम घोडाम, पवन मंगाम, प्रफुल्ल पंधरे, किशोर चोकोलेवार, संगीता पेंदोर, मंगला मसराम, गंगा मडावी, देवका कुमरे, कल्पना नागभिडकर, दुर्गा किनाके, येणू किनाके, दिपीली केराम, वर्षा तिरणकर यांच्यासह असंख्य समाजबांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### अर्धवट व्हिडिओ प्रसारित करणे चुकीचे - नितीन गिरी

**यवतमाळ :** शहरातील अतिक्रमण कारवाईच्या संदर्भात काँग्रेसच्या काही नेत्यांनी यवतमाळ नगरपरिषदेत जाऊन नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके यांची भेट घेऊन निवेदन सादर केले होते. या भेटीनंतर सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आलेल्या अर्धवट व्हिडिओबाबत भाजपचे गटनेते नितीन गिरी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, 'लोकशाही व्यवस्थेत प्रत्येकाला आपली भूमिका मांडण्याचा अधिकार आहे, परंतु चर्चेचा पूर्ण संदर्भ न देता केवळ निवडक भाग सोशल मीडियावर प्रसारित करणे योग्य नाही. अशा कृत्यामुळे जनतेमध्ये गैरसमज निर्माण होतात आणि वस्तुस्थितीपेक्षा वेगळे चित्र उभे राहते.' नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके यांनी संयमाने सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले होते. त्यानंतर झालेल्या चर्चेचा केवळ काही भाग दाखवून राजकीय वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न दुर्दैवी आहे. लोकप्रतिनिधींनी जबाबदारीने वागणे अपेक्षित असून, जनतेची दिशाभूल होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. शहराच्या विकासासाठी आणि जनहिताच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा होणे गरजेचे आहे. अर्धवट व्हिडिओ प्रसारित करून प्रसिद्धी मिळविण्यापेक्षा नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी विधायक भूमिका घेणे अधिक महत्त्वाचे असल्याचे मत भाजपचे गटनेते नितीन गिरी यांनी व्यक्त केले.

# आभाळ कोसळलं अन् होत्याचं नव्हतं झालं

## वीजेच्या तडाख्यात मेंढपाळासह १२ बकऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू, वणी तालुक्यातील घटना

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. १२ :** वणी तालुक्यातील टाकळी शिवारात निसर्गाचा अत्यंत क्रूर आणि धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शुक्रवारी (दि. १२) दुपारी अचानक झालेल्या वादळी पाऊस आणि कडकडाटासह कोसळलेल्या विजेच्या भीषण तडाख्यात एका मेंढपाळाला आपले प्राण गमवावे लागले. या दुर्दैवी आणि काळजाचा थरकाप उडवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमध्ये मेंढपाळासोबतच त्यांच्या ११ बकऱ्या आणि एका श्वानाचा जागीच मृत्यू झाला. या धक्कादायक आणि दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण वणी परिसरामध्ये प्रचंड हळहळ पसरली असून सर्वत्र मोठी शोककळा पसरली आहे.

हवामान बदलामुळे ऐन उन्हाळ्यात अवकाळी पावसाचे सावट निर्माण झाले असतानाच, टाकळी परिसराला या निसर्गाच्या कोपाचा मोठा फटका बसला. नेहमीप्रमाणे गावातील शेतकरी आणि कष्टकरी वर्ग आपल्या दैनंदिन कामात व्यस्त होता. विलास तुमराम हे देखील आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी बकऱ्या चरण्याच्या उद्देशाने दुपारच्या सुमारास स्थानिक शेतशिवारात गेले होते. मात्र, दुपारनंतर अचानक वातावरणाने भीषण रूप धारण केले. आकाश काळ्या ढगांनी झाकोळून गेले, वादळी वारे सुटले आणि विजांचा प्रचंड कडकडाट सुरू झाला. काही समजण्याच्या आतच एक मोठी वीज थेट त्यांच्यावर कोसळली. हा आघात इतका भीषण होता की विलास मनकू तुमराम (वय ५५) यांना स्वतःचा जीव वाचवण्याची साधी संधीही मिळाली नाही. वीज कोसळल्यामुळे त्यांचा आणि त्यांच्या आजूबाजूला असलेल्या ११ बकऱ्या आणि एक श्वानाचा जागीच दुर्दैवी अंत झाला. या घटनेची माहिती मिळताच परिसरातील ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळाकडे धाव घेतली, परंतु तिथे पोहोचताच हृदय पिळवटून टाकणारे दृश्य समोर आले. या घटनेमुळे तुमराम कुटुंबाचा मुख्य आधार हरवला असून त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक महसूल प्रशासन आणि संबंधित विभागाने त्वरित धाव घेत घटनास्थळाचा पंचनामा केला. आकस्मिक ओढवलेल्या या संकटामुळे संपूर्ण टाकळी गाव सुन्न झाले असून, शासनाने पीडित कुटुंबाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना व पशुधनाच्या झालेल्या मोठ्या नुकसानीची तात्काळ भरपाई द्यावी, अशी आर्त मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. निसर्गाच्या या प्रकोपाने एका गरीब कुटुंबाचा संसार उघड्यावर आणला आहे.

# दिग्रस येथे मोफत आरोग्य महाशिबिर

## आरोग्य संकल्प अभियान; पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दिग्रस, दि.१२ :** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त 'रुग्णसेवा हिच ईश्वर सेवा' या संकल्पनेतून दिग्रस येथे 'आरोग्य संकल्प अभियाना'अंतर्गत भव्य मोफत रोगनिदान, शस्त्रक्रिया, उपचार व औषध वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आरोग्य सेवा समिती, यवतमाळ यांच्या वतीने तसेच दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था, सावंगी (मेघे) आणि आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर रविवारी, दिनांक १४ जून २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत दिनबाई विद्यालय, दिग्रस येथे पार पडणार आहे.



या शिबिरात अनुभवी व तज्ज्ञ डॉक्टरांकडून हृदयविकार, कर्करोग, स्त्रीरोग, बालरोग, त्वचारोग, अस्थिरोग, हृदयरोग, नेत्ररोग, कान-नाक-घसा विकार, श्वसनरोग, मानसिक आजार, न्यूरो विकार, दंत व मुखरोग तसेच मूत्ररोग आदी विविध आजारांची मोफत तपासणी व उपचार करण्यात येणार आहेत. महिलांसाठी ब्रेस्ट कॅन्सर (मेमोग्राफी) तपासणी, विविध प्रकारच्या कॅन्सरची तपासणी, पॅप स्मिअर चाचणी, बंध्यत्व तपासणी, व्हेरिकोज वेन्स तपासणी, किडनी तपासणी तसेच ईसीजीसह विविध आरोग्य चाचण्या करण्यात येणार आहेत. शिबिरात तपासणीनंतर आवश्यकतेनुसार रुग्णांना पुढील उपचार, शस्त्रक्रिया व विशेष वैद्यकीय सेवांसाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. अनेक उपचार आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत उपलब्ध करून दिले जाणार आहेत. यासोबतच नागरिकांना आयुष्मान भारत कार्ड काढण्याची सुविधाही शिबिरात उपलब्ध राहणार आहे. यासाठी लाभार्थ्यांनी आधार कार्ड, रेशन कार्ड व आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. दिग्रस, दारव्हा आणि नेर विधानसभा मतदारसंघातील गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी हे शिबिर मोठा दिलासा ठरणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहून या आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# दिग्रस पोलिसांचा पुणेपर्यंत पाठलाग, वेगवेगळ्या गुन्ह्यातील मुली सुखरूप

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दिग्रस, दि. १२ :** दिग्रस पोलीस स्टेशनच्या पथकाने २० तासांच्या आत तीन वेगवेगळ्या अपहरणाच्या गुन्ह्यातील पिडीत मुली आणि आरोपींना पुणे शहरातून ताब्यात घेऊन उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या धडाकेबाज कारवाईबद्दल संपूर्ण टीमचा दिग्रस पोलिस स्टेशन येथे सत्कार करण्यात येणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पोलिस उपनिरीक्षक किशोर मुरकुटे आणि पोलिस उपनिरीक्षक महेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार देवा फलटणकर आणि पोलिस कॉन्स्टेबल अभय इंगोले यांनी तातडीने हालचाली करीत तीन वेगवेगळ्या गुन्ह्यांचा छडा लावला. या पथकाने तीन वेगवेगळ्या गुन्ह्यातील पिडीत मुली आणि आरोपींना ताब्यात घेतले. सर्व गुन्ह्यात विविध कलमा अंतर्गत कार्यवाही करण्यात आली आहे. आरोपींनी दिग्रस हद्दीतून मुलींना घेऊन पळ काढला होता. माहिती मिळताच दिग्रस पोलिसांचे पथक तात्काळ पुण्याकडे रवाना झाले. अथक परिश्रम घेऊन पथकाने आरोपींचा माग काढला. त्यात एका मुलीला आणि आरोपीला चाकण पोलिस स्टेशन हद्दीतून तर इतर दोन मुलींना आणि आरोपींना सासवड पोलिस स्टेशन हद्दीतून ताब्यात घेण्यात आले. अत्यंत कमी वेळेत जिल्ह्याबाहेर जाऊन केलेल्या या कारवाईमुळे दिग्रस पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे. ही संपूर्ण कारवाई पोलिस निरीक्षक मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. जलदगतीने तपास करून पिडीत मुलींना सुखरूप परत आणल्याबद्दल किशोर मुरकुटे, महेश देशमुख, देवा फलटणकर आणि अभय इंगोले यांच्या संपूर्ण पथकाचा दिग्रस पोलिस स्टेशन येथे जाहीर सत्कार करण्यात येणार असल्याचे समजते. अशा प्रकारच्या जलद आणि समन्वयाने केलेल्या कारवाईमुळे दिग्रस परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यास मदत होत असून नागरिकांमध्ये पोलिसांविषयी विश्वास वाढला आहे.

# वंचितच्या रेट्यामुळे एस.सी., एस.टी., ओबीसी आरक्षणाची अट मान्य!

## नेताजी चौकातील ९५ कोटींच्या दुकान संकुलाला मंजुरी; पालिकेत २४ विरुद्ध १२ मतांनी ठराव मंजूर

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.१२ :** येथील नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत आज (दि.११) नेताजी चौकातील भव्य दुकान संकुल (शॉपिंग कॉम्प्लेक्स) बांधकामाचा ९५ कोटी रुपयांचा ठराव अखेर मंजूर करण्यात आला. बी.ओ.टी. तत्त्वावरील या बांधकामाच्या करारनाम्यात अनुसूचित जाती (एस.सी.), अनुसूचित जमाती (एस.टी.) आणि ओबीसी (ओबीसी) घटकांसाठी आरक्षणाची अट समाविष्ट करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. वंचित बहुजन आघाडीच्या नगरसेवकांनी हा आरक्षणाचा मुद्दा लावून धरल्यामुळेनगराध्यक्षा व मुख्याधिकाऱ्यांनी ही अट मान्य केली. त्यानंतर वंचितच्या पाठिंब्यासहहा ठराव २४ विरुद्ध १२ अशा बहुमताने पारित करण्यात आला, तर चार सदस्य तटस्थ राहिले.

आजच्या सर्वसाधारण सभेसमोर एकूण २७ विषय चर्चेला होते. त्यापैकी विकास आराखड्यातील आरक्षण क्रमांक ८६, नजुल शीट क्रमांक ३८ सी, भूखंड क्रमांक ३१/१ मधील बी.ओ.टी. तत्त्वावर दुकान संकुल बांधणे आणि विकासकाची नियुक्ती करणे, या विषयावर सभागृहात सांगोपांग चर्चा झाली. या चर्चेत वंचित बहुजन आघाडीचे गटनेते डॉ. नीरज वाघमारे आणि डॉ. आनंद गायकवाड यांनी भाग घेऊन मागासवर्गीयांच्या आरक्षणाचा मुद्दा आक्रमकपणे लावून धरला. सहसा बी.ओ.टी. तत्त्वावर बांधकाम करताना आरक्षणाची कोणतीही अट नसते. मात्र, हे बांधकाम नगर परिषद करीत असल्याने मागासवर्गीयांच्या लोकसंख्येनुसार आरक्षण ठेवणे बंधनकारक आहे, असा युक्तिवाद वंचितच्या सदस्यांनी केला.

### ५६० पैकी ११२ दुकाने मागासवर्गीयांसाठी राखीव

'या प्रस्तावित संकुलातील एकूण ५६० दुकानांपैकी एस.सी. आणि एस. टी. घटकांसाठी २० टक्के म्हणजेच ११२दुकाने आरक्षित ठेवली पाहिजेत. तशी स्पष्ट अट विकासकाच्या करारनाम्यात नमूद केल्यास आम्ही या ठरावाला पाठिंबा देऊ,' अशी भूमिका वंचितच्या नगरसेवकांनी घेतली. यावर नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके आणि मुख्याधिकारी शुभम क्यतमवार यांनी सकारात्मक होकार दिला. प्रशासनाने ही अट मान्य करताच वंचितच्या तिन्ही सदस्यांनी ठरावाच्या बाजूने मतदान केले, ज्यामुळे ठराव बहुमताने मंजूरु झाला.

### न्यायालयात जाण्याचा इशारा

ठराव मंजूर झाला असला तरी प्रत्यक्ष दुकान वाटप करताना या आरक्षणाच्या अटींचे उल्लंघन झाल्यास वंचित बहुजन आघाडी गप्प बसणार नाही, तर थेट न्यायालयाचा दरवाजा ठोठावेल, असा इशाराही वंचितच्या वतीने डॉ. नीरज वाघमारे यांनी या सभेत प्रशासनाला दिला आहे.

# यवतमाळ नगरपरिषदेत कोट्यवधी रुपयांचे घोटाळे

## काँग्रेसचा गंभीर आरोप; न्यायालयात दाद मागणार असल्याचा इशारा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.१२ :** यवतमाळ नगरपरिषदेच्या आज (दि.११) झालेल्या विशेष आमसभेत सत्ताधाऱ्यांनी सर्व नियमांना बगल देऊन कोट्यवधी रुपयांचे संशयास्पद ठराव मंजूर केल्याचा गंभीर आरोप काँग्रेस पक्षाने केला आहे. या आर्थिक गैरव्यवहाराच्या विरोधात काँग्रेसचे नगरसेवक वैशाली सवाई, संतोष बोबडे आणि शहराध्यक्ष बबलू उर्फ अनिल देशमुख यांनी पत्रकार परिषद घेऊन प्रशासनाच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला असून, हे प्रकरण न्यायालयात नेणार असल्याचे जाहीर केले.

पत्रकार परिषदेत माहिती देताना काँग्रेस नेत्यांनी सांगितले की, आमसभेतील विषय क्रमांक २ नुसार, नगरपरिषदेने शहरातील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी 'बीओटी'तत्त्वावर शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या जागेची बाजारपेठेत किंमत सुमारे ३५० कोटी रुपये असताना, नगरपरिषदेने ती केवळ ९५ कोटी रुपयांत तब्बल ९० वर्षांच्या दीर्घ मुदतीच्या लीजवर देण्याचा घाट घातला आहे. यावर कंत्राटदाराला केवळ २० टक्के रक्कम जमा करावी लागणार असून, बांधकामाचा कालावधी दोन वर्षांचा निश्चित केला आहे. या व्यवहारातून नगरपरिषदेचे प्रचंड आर्थिक नुकसान होणार आहे. या शॉपिंग कॉम्प्लेक्समधील दुकानांच्या किमती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जाणार आहेत. यामुळे शहरातील बेरोजगार युवक, महिला, अनुसूचित जाती (एस.सी.), अनुसूचित जमाती (एस.टी.) आणि दिव्यांग बांधव आपल्या हक्कापासून वंचित राहतील. शासनाचा ९० वर्षांचा '३०:३०:३०' चा आदेश नगरपरिषदेला लागू नसतानाही तो लादला जात आहे, तर वास्तविक पाहता '३:३:३' नुसार केवळ ९ वर्षांच्या लीजवर जागा देण्याचे कायदेशीर निर्देश आहेत. या संदर्भात काँग्रेस पक्षाच्या वतीने सभेत लेखी आक्षेप नोंदविण्यात आला असून, सभागृहात मांडलेले सर्व तोंडी आक्षेप आणि मुद्दे कामकाज रजिस्टरमध्ये जसेच्या तसे नोंदविण्याची मागणी नगरसेवकांनी केली आहे. पत्रकार परिषदेला तबस्सुम शहा, शाहीन परवीन, सविता चव्हाण, साधना शेख, गौतम मेश्राम, नईम भाई, ख्रिस्टन पुत्तर यांच्यासह काँग्रेसचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

### विद्युत देखभालीत २२ कोटींचा अतिरिक्त भार

विषय क्रमांक २५ नुसार, केवळ २० कोटी रुपये मूल्य असलेल्या विद्युत देखभाल, दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामांचे कंत्राट तब्बल ४२ कोटी रुपयांत १० वर्षांसाठी देण्याचा घाट घातला आहे. यातून नगरपरिषदेचे थेट २२ कोटी रुपयांचे नुकसान होत असल्याचा दावा काँग्रेसने केला आहे.

### न्यायालयात दाद

नगरपरिषद ही स्वायत्त संस्था असताना, कोणत्याही कायदेशीर अधिकाराशिवाय बेकायदेशीर आदेश काढून आर्थिक नुकसान केले जात आहे. हे प्रकरण सध्या मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठात न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना कंत्राटदारांना लाभ पोहोचविण्याची घाई न करता, नियमानुसार निविदा काढाव्यात आणि होणारे २२ कोटींचे नुकसान तातडीने थांबवावे, अशी मागणी काँग्रेसने केली आहे.

### वाळूची चोरी करणाऱ्यांवर कारवाई

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. १२ :** उमरखेड ते विडूळ रोडवर विना क्रमांकाच्या ट्रॅक्टरद्वारे अवैध वाळू वाहतूक सुरू होती. पोलिसांनी ट्रॅक्टरसह रेतीचा साठा जप्त करून कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. उमरखेड परिसरात ही कारवाई करण्यात आली. आरोपीने स्वतःच्या ताब्यातील विना क्रमांकाचे ट्रॅक्टर आणि ट्रॉलीचा वापर करून त्यामध्ये पिवळी रेती अवैधपणे चोरून नेली होती. या साहित्याची एकूण किंमत ४ लाख ६ हजार रुपये असल्याचे निष्पन्न झाले आहे. फिर्यादीच्या जबाबी रिपोर्टवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, जप्त केलेला मुददेमाल कायदेशीर प्रक्रियेनंतर ताब्यात घेतला आहे.